ब्राह्मण

अनुवादक--लक्ष्मणराव सरदेसाई

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, १

अनुक्रमणिका

ब्राह्मण

अनुक्रमणिका

भाषांतरमाला क्रमांक—३३

ब्राह्मण

डॉ. फ्रांसिस्कु लुईश गोमिश यांच्या
"Os Brahamanes"
या पोर्तुगीज कादंबरीचा मराठी अनुवाद

अनुवादक
लक्ष्मणराव सरदेसाई
मडगाव (गोवा)

महाराष्ट्र राज्य साहित्य—संस्कृति मंडळ
मुंबई

अनुक्रमणिका

प्रथमावृत्ति : १९७३ (शके १८९५)

प्रकाशक :
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य–संस्कृति मंडळ,
सचिवालय, मुंबई–३२

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

मुद्रक :
सुजित पटवर्धन
संगम प्रेस लिमिटेड,
१७ ब कोथरूड,
पुणे ४११ ०२९

किंमत : रु. ६=५०

अनुक्रमणिका

अर्पण–पत्रिका

आंतोनियु आवगुश्तु तैशैर द् व्हाश्कोंसेलुश,
बॅरिस्टर, कोईंब्रा विश्वविद्यालय,
डेप्युटी, पोर्तुगीज पार्लमेंट, बार्देश, गोवा तर्फे,
पोर्तुगीज गॅझेटचे संपादक इत्यादि इत्यादि यांस,

अनुक्रमणिका

पुरस्कार

मराठी भाषेला व साहित्याला ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात पश्चिमी भाषांचा दर्जा प्राप्त व्हावा, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन इत्यादी भाषांना जसे विद्यापीठीय स्तरावर स्वयंपूर्ण महत्त्व प्राप्त झाले आहे तसे मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे, इंग्रजी भाषेला व साहित्याला आज भारतीय विद्यापीठांमध्ये जसे प्रमुख स्थान आहे तसे स्थान, महाराष्ट्रामधील विद्यापीठांत मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे या उद्देशाने साहित्य आणि संस्कृति मंडळाने वाङ्मयनिर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. विश्वकोश, मराठी महाकोश, वाङ्मयकोश, विज्ञानमाला, भाषांतरमाला इत्यादी योजना या कार्यक्रमात अंतर्भूत आहेत.

संस्कृत व अन्य भारतीय भाषांतील आणि त्याचप्रमाणे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटिन इत्यादी पश्चिमी भाषांतील अभिजात ग्रंथांचे व उच्च साहित्यामधील विशेष निवडक पुस्तकांचे भाषांतर किंवा सारांश अनुवाद अथवा विशिष्ट विस्तृत ग्रंथांचा आवश्यक तेवढा परिचय करून देणे हा भाषांतरमालेचा उद्देश आहे.

भाषांतर योजनेतील पहिला कार्यक्रम मंडळाने आखून, ज्यांना अग्रक्रम दिला पाहिजे अशी पाश्चात्य व भारतीय भाषांतील सुमारे २०० पुस्तके निवडली आहेत. होमर, व्हर्जिल, एस्किलस, ॲरिस्टोफेनीस, युरीपिडिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल्, थॉमस ॲक्वाइनस, न्यूटन, डार्विन्, रूसो, कांट, हेगेल्, जॉन स्टुअर्ट मिल्, गटे, शेक्सपीअर टॉलस्टॉय्, दोस्तएव्स्की, स्तानिस्लाव्स्की बर्ट्रीन्ड रसेल, रुथ बेनेडिक्ट, रायशेन्बाख, व्हाइटहेड, क्रोचे, मालिनव्स्की, कॅसिरेर्, गॉर्डन् व्ही. चाइल्ड इत्यादिकांचा या भाषांतरमालेत समावेश केला आहे. संस्कृतमधील वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत भरताचे नाट्यशास्त्र, संगीतरत्नाकर, ध्वन्यालोक, प्राकृतातील गाथासप्तशती, त्रिपीटिकातील निवडक भाग इत्यादिकांचाही या भाषांतरमालेत समावेश केला आहे.

मंडळाच्या भाषांतर योजनेखाली आतापर्यन्त ३२ अभिजात ग्रंथांची भाषांतरे प्रकाशित केली आहेत. जॉन स्टुअर्ट मिलचे "ऑन् लिबर्टी", "रूसोचे सोशल कान्ट्रॅक्ट", एम्. एन्. रॉयचे "रीझन, रोमॅन्टिसिझम् ॲण्ड रीव्हल्यूशन", के. पां. वा. काणे यांचे "हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र", पंडित शिवनाथशास्त्री यांची "आत्मजीवनी", स्तानिस्लाव्स्कीचे "ॲन ॲक्टर प्रिपेअर्स" इत्यादि ग्रंथांची भाषांतरे व सारानुवाद प्रकाशित झाले आहेत.

डॉ. एफ. एल. गोमिश यांनी लिहिलेल्या "Os Brahmanes" या पोर्तुगीज कादंबरीचा मराठी अनुवाद प्रसिद्ध ललित साहित्यकार श्री.लक्ष्मणराव सरदेसाई मडगाव (गोवा) यांनी केला असून तो मंडळाच्या भाषांतर योजनेखाली— "ब्राह्मण" या शीर्षकाने प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे.

लक्ष्मणशास्त्री जोशी

वाई, — अध्यक्ष,

कार्तिक ३, १८९५ — महाराष्ट्र राज्य साहित्य—संस्कृति मंडळ,

(दिनांक २५ ऑक्टोबर, १९७३) — सचिवालय, मुंबई.

अनुक्रमणिका

फ्रांसिश्कु लुईश गोमिश :

जीवन व कार्य

गेल्या दोनतीन शतकात गोमंतकात जी थोर माणसे होऊन गेली त्यात फ्रांसिश्कु लुईस गोमिश यांची प्रामुख्याने गणना करावी लागेल. आबादी फारीया, दिवाण रामचंद्र मल्हार, सेनापती जिवबा दादा केरकर, डॉ. भाऊ दाजी लाड इत्यादी थोर माणसे आपापल्या क्षेत्रात चमकली. पण इतिहास, राजकारण, अर्थशास्त्र, साहित्य इत्यादी भिन्न क्षेत्रांत अफाट यश मिळवून जागतिक कीर्ती संपादन करणारे गोमिश हे एकटेच होऊन गेले.

त्यांचा जन्म गोमंतकातील सासष्टी तालुक्यातील नावेली या खेड्यात ३१ मे १८२९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉक्टर होते. ते अत्यंत बुद्धिमान, व्यासंगी, तसेच लोकसेवकही होते. त्यांच्या लोकप्रियतेमुळे सासष्टीचे पहिले ॲडमिनिस्ट्रेटर म्हणून सरकारने त्यांची नेमणूक केली. गोमिशचे घराणे खानदानी व सुसंस्कृत होते. घराण्याच्या संस्काराचा गाढ परिणाम बालवयातच त्यांच्यावर झाला होता. त्यांच्या बुद्धिमत्तेची चमक लहानपणीच दिसून येऊ लागली. वयाच्या ८ व्या वर्षी त्यांनी पोर्तुगीज भाषेत प्राविण्य मिळविले. १४ व्या वर्षी फ्रेंच, लॅटिन, मराठी, कोकणी या भाषात ते पारंगत झाले. १७ व्या वर्षी पणजीच्या मेडिकल कॉलेजमध्ये अत्युच्च यश मिळवून उत्तीर्ण झाल्यानंतर त्या कॉलेजमध्येच अध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. थोड्याच काळानंतर त्यांना सैन्यात वरच्या हुद्याची जागा देण्यात आली. १८६० साली सरकारने बहुमानाचा किताब बहाल करून त्यांचा गौरव केला. पुढे लवकरच पोर्तुगालच्या पार्लमेन्टवर ते निवडून आले. याबरोबरच विद्वान बहुश्रुत लेखक म्हणूनही ते चमकू लागले. त्यांच्या कर्तृत्वाला गोमंतक अपुरा पडू लागला.

गोमिश यांच्या बाबतीत लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे पोर्तुगीज संस्कृतीत वाढलेला हा तरुण मनाने भारतीयच राहिला. आपल्या भारतीयत्वाचा विसर त्यांना कधीच पडला नाही. पोर्तुगालमध्ये त्या वेळी पार्लमेन्टरी पद्धतीला सुरुवात झाली होती. १८६० च्या निवडणुकीत ते सासष्टी तालुक्यातून बिनविरोध निवडून आल्यामुळे पोर्तुगालच्या पार्लमेन्टचे सभासद झाले. २२ डिसेंबर १८६१ रोजी त्यांनी पोर्तुगालच्या भूमीवर पाय ठेवला. पार्लमेन्टमध्ये त्यांनी उदारमतवादी विरोधी पक्षात प्रवेश केला. ‘रिजेनेरेशन’ हे त्या पक्षाचे ब्रीदवाक्य होते. रिजेनेरेशनचा तात्पर्यार्थ व्यवहाराशी फारकत न झालेले आणि विरोधी परिस्थितीशी मिळतेजुळते घेणारे स्वातंत्र्य असा आहे. आपल्या कर्तबगारीच्या जोरावर ते थोड्याच अवधीत आपल्या पक्षाचे कर्णधार झाले. त्या पक्षाच्या मुखपत्राचे ते उपसंपादकही झाले. पोर्तुगालमधील प्रमुख नियतकालिकांत त्यांचे लेख प्रसिद्ध होऊ लागले. त्यांचे लेख इतके गाजले की, त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले. पट्टीचे वक्ते म्हणून तेथे ते नावाजले. इंग्लंडचा प्रसिद्ध वक्ता ब्राइट याच्याशी त्यांची तुलना होऊ लागली. पार्लमेन्टमधील त्यांची भाषणे माहितीपूर्ण, सडेतोड आणि लालित्याने नटलेली असत. अत्यंत जबाबदारीने आणि सत्याचा अपलाप न करता ते सरकारवर टीका करीत. त्यामुळे सरकारपक्षाला त्यांचा वचक वाटत असे. पार्लमेन्टात पहिल्या दिवशी आपली तडफ दाखविण्याची संधी गोमिशना मिळाली. अलफान्सेका नामक सदस्याने पार्लमेन्टातील पोर्तुगालच्या वसाहतीचे प्रतिनिधित्व रद्द करावे अशा आशयाचे विधेयक मांडले होते. इंग्लंडने कॅनडाचे प्रतिनिधित्व रद्द केले त्याचा आधार त्याने घेतला होता. या विधेयकावरील चर्चेत भाषण करताना गोमिशनी अलफान्सेकाच्या युक्तीवादाच्या चिंधड्या उडविल्या आणि काळ्या लोकांच्या हक्काचा धडाडीने पुरस्कार करून इंग्लंडने कॅनडाचे

प्रतिनिधित्व रद्द करण्यात फार मोठा गुन्हा केला असे जाहीर केले. भारताचा उल्लेख करून ते म्हणाले, “लॉर्ड डलहौसीला देखील लोकक्षोभ शमविता आला नाही. म्हणून त्याला लष्कराच्या साहाय्याने राज्यकारभार करणे भाग पडले. ही परिस्थिती अनुकरणीय मानावयाची काय?” आपल्या या भाषणात त्यांनी वर्णभेदाचा निषेध करून वसाहतीच्या जनतेच्या मूलभूत हक्कांचे जोरदार समर्थन केले. गोमिशच्या विरोधाचा पार्लमेन्टवर परिणाम झाला आणि ते विधेयक बारगळले.

ही त्यांची तडफ गुलामगिरीच्या प्रश्नातही दिसून आली. गुलामगिरीला थारा दिल्याबद्दल पोर्तुगीज सरकारचा त्यांनी अनेकदा तीव्र निषेध केला. ते म्हणत असत, “गुलामगिरी हा जुन्या सरकारांचा पाया होता. आधुनिक सरकारांचा पाया स्वातंत्र्य आहे. स्वातंत्र्य त्वचेचा रंग ओळखीत नाही. ते एक विश्वात्मक तत्त्व आहे. तत्त्वे ज्या वेळी लाथाडली जातात त्या वेळी त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात.” ते लोकशाहीच्या तत्त्वांचा सतत पुरस्कार करीत असत. गोव्यातील सत्तरीच्या राण्याना रानटी व क्रूर ठरवून सरकारी प्रवक्त्याने अनुचित उद्‌गार काढले. त्या वेळी गोमिशनी खडसावले की, “गोव्याच्या गव्हर्नर जनरलला पाठिंबा देणारे राण्यांच्या सह्याचे अर्ज पोर्तुगीज सरकारात दाखल होतात, त्या वेळी तेच राणे सुसंस्कृत ठरतात काय? राण्यांच्या प्रांतात मला श्वापदाच्या गुहा आढळल्या नाहीत. मी तेथे पाहतो ती कुळागरे व देवळे. देऊळ म्हणजे परमेश्वरापासून या भूमीवर उतरलेली संस्कृती आणि कुळागर म्हणजे भूमीत उगवून परमेश्वराकडे जाणारी संस्कृती.”

गोमिशना फ्रान्सचा महान साहित्यिक लामार्तिन याच्यापासून स्फूर्ती मिळाली. जन्मभर त्याचे ते भक्त राहिले. लामार्तिनला लिहिलेल्या एका पत्रात गोमिश लिहितात : “भारत देशात माझा जन्म झाला. जो देश एके काळी काव्य, तत्त्वज्ञान, इतिहास यांचा पाळणा होता व जो आज दुर्दैवाने त्याचे थडगे होऊन राहिला आहे. ज्या देशाने महाभारत निर्माण केले व बुद्धिबळाचा शोध लावला, तो देश माझा आहे. या दोन महान कृतींत दिक्‌कालातील असे काहीतरी आहे. पण आज हा देश अस्तित्वात नाही. आहे तो एक गुलाम देश. म्हणून त्याच्यासाठी मी स्वातंत्र्याच्या प्रकाशाची मागणी करीत आहे.” त्या काळी हे पत्र फार गाजले होते. ते पत्र वाचून लामार्तिन आनंदाने बेहोश झाला असे म्हणतात. भारताच्या पारतंत्र्याची चिकित्सा करताना ते म्हणतात, “इंग्लंडने हिंदुस्थान जिंकला नाही. हिंदुस्थान त्याच्या स्वाधीन झाला. स्वतःच्या स्वातंत्र्याचा तो स्वतःच शत्रू ठरला. जातीजातीतील वैमनस्य, धर्माधर्मातील वैर यासारख्या दोषांनीच त्याला पोखरून टाकले होते..... घोर निद्रेत पडलेल्या या विशालकाय पुरुषाच्या हृदयात आपल्या नैसर्गिक हक्कांचे स्वप्न थरथरत आहे. ते स्वप्न उघड्यावर येते तेव्हा त्याला क्रांती म्हणतात..... निःपक्षपाती माणसे वर्णनिरपेक्ष दृष्टीने स्वातंत्र्याकडे पाहतात. त्यांना हिदुस्थान हिंदुस्थान्यासाठीच हवा आहे..... मनूचा हा देश एखाद्या नाण्याप्रमाणे अलेक्झांडर, तैमूरलंग, अल्बुकर्क इत्यादींच्या हातातून जाता जाता एक दिवस आपल्या मूळ धन्याच्या हाती जाईल.”

त्या वेळचा गोव्याचा गव्हर्नर तोर्रिश नोव्हश याने गोव्यात भरपूर अनाचार आणि अत्याचार केले. लाचलुचपत फार बोकाळली. बारदेश तालुक्याच्या एका निवडणुकीत मतदार नागरिकांवर गोळीबार करण्यात आला. सत्तरी तालुक्यातील जमिनी स्थानिक लोकाना डावलून परकीयाना विकण्यात आल्या. या सगळ्या प्रकारांकडे गोमिशनी पार्लमेंटचे लक्ष वेधले. त्यांच्या टीकेचा एवढा परिणाम झाला की, त्या गव्हर्नरला राजीनामा देऊन पोर्तुगालला परत जावे लागले. याचा व चपा त्या गव्हर्नराच्या पाठीराख्यांनी १८६३ च्या निवडणुकीत सासष्टी तालुक्यात त्यांचा पराभव करून काढला. पोर्तुगीज सरकारने पार्लमेन्ट बरखास्त करून नव्या निवडणुका घेतल्या होत्या. पण बारदेश तालुक्यातील मतदारांनी त्यांना प्रचंड

अनुक्रमणिका

मतांनी निवडून आणले. तत्पूर्वी पोर्तुगीज सरकारने गोमिशना उमेदवारी दाखल करण्याची सूचना करताना तेथील बिशपमार्फत निरोप पाठविला होता की, “आपल्या कर्तव्याची जाणीव असलेली बुद्धिमान व सुसंस्कृत माणसे आम्हाला पार्लमेन्टात हवी आहेत. आम्ही कोणावर बंधने घालू इच्छित नाही. तुमच्यासारख्या उदारमतवादी स्वतंत्र व्यक्तीच्या बाबतीत तर हा प्रश्नच उद्भवत नाही. मनाने व बुद्धीने समर्थ अशी माणसेच आम्हाला हवी आहेत.” एका शतकापूर्वी एकतंत्री सरकारने अशी विनंती करावी या गोष्टीला खूपच अर्थ आहे.

पार्लमेन्टच्या आपल्या कारकीर्दीत गोमिशनी गोव्याच्या हिताच्या अनेक गोष्टी सरकारकडून करून घेतल्या. अनेक अन्यायी कायदे व नियम दूर करून घेऊन गोमंतकीयांना विविध क्षेत्रांत सवलती मिळवून दिल्या. करांचे ओझे कमी करून घेतले. गोव्यातील सरकारी नोकरांचा दर्जा पोर्तुगालच्या सरकारी नोकरांच्या बरोबरीने करून घेतला. त्यांच्या अकाली मृत्यूने गोव्याचा त्राता नाहीसा झाला.

मार्केज द पोम्बालचे चरित्र आणि अर्थशास्त्रावरील त्यांचा ग्रंथ (L' Essai surla theorie de L' Economic Politique) यामुळे त्यांना युरोपात इतिहासकार आणि अर्थशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्धी मिळाली. पोम्बाल हा पोर्तुगालच्या एकतंत्री राजवटीचा अनेक वर्षे प्रधानमंत्री होता. पोर्तुगालचा तो एक महापुरुष गणला जातो. त्याच्या चरित्रात गोमिशनी १८ व्या शतकाच्या उत्तरार्धातील समग्र राजकीय इतिहास उभा केला. या चरित्राने आदर्श इतिहासकार म्हणून त्यांचे नाव झाले. त्यांच्याच शब्दांत इतिहासकाराची भूमिका सांगावयाची झाल्यास, “इतिहास सूडबुद्धी जाणत नाही. त्याचप्रमाणे तो स्तुतिपाठकही असत नाही. तो न्यायी असतो. अवास्तव स्तुतिनिंदेत गुरफटलेल्या वास्तवतेला मुक्त करून मार्केज द पोम्बाल जसा होता तसा दाखविणे हे इतिहासाचे काम आहे.” हीच भूमिका या पुस्तकात त्यांनी यशस्वी रीत्या पार पाडली आहे. पोर्तुगालवर कोसळलेल्या मोठमोठ्या आपत्तींतून देशाला सावरून राज्यनौका कशी समर्थपणे पोम्बालने हाकारली हे त्यांनी दाखवून दिले आहे. गोव्याच्या बाबतीत पोम्बालने केलेले संस्मरणीय कार्य गोमिशनी विस्ताराने वर्णिले आहे. गोव्यासंबंधी त्याने असा आदेश दिला होता की, “पोर्तुगीज लोकांना जे हक्क, सवलती व मानसन्मान मिळतात, तेवढे सारे गोव्याच्या रहिवाश्यांना मिळाले पाहिजेत. कोणताच भेदभाव करता कामा नये.” पोर्तुगालच्या नागरिकांना मिळणारे हक्क व सवलती त्याने गोव्याच्या रहिवाश्यांना देण्याचा प्रयत्न केला. गोव्याच्या परिस्थितीची यथायोग्य माहिती त्याला होती. त्याची कारकीर्द गोवेकरांना हिताची ठरली.

अर्थशास्त्रावरच्या त्यांच्या ग्रंथावर तत्कालीन युरोपीय विचारप्रणालींचा प्रभाव पडला होता. निसर्गवाद (naturalism), व्यक्तिवाद, मुक्त अर्थव्यवहार ही तत्त्वे त्यानी स्वीकारली होती. तत्कालीन उदारमतवाद्यांप्रमाणे तेही आशावादी होते. बेन्थॅमचा उपयुक्ततावाद जशाचा तसा त्यांनी स्वीकारला नाही. उपयुक्तता (utility) आणि नैतिकता (morality) ही एकच आहेत हे त्यांनी अमान्य केले. देहाच्या गरजा भागवावयाला जसे अर्थशास्त्र आवश्यक आहे, तसेच मनाच्या व आत्म्याच्या गरजा भागवावयाला नीतिशास्त्राची आवश्यकता आहे आणि म्हणूनच आपले आर्थिक व्यवहार पार पाडताना माणसाला सत्य आणि कर्तव्य यांच्याशी फारकत करता येणार नाही. ही दोन्ही बुद्धीच्या द्वारे प्रतीत होतात आणि बुद्धीचे मूळ निसर्गनियमांत असते. त्यामुळे अर्थशास्त्राचे आणि नीतिशास्त्राचे नियम हे परस्परपोषक असून मानवी कल्याण हे दोहोंचेही उद्दिष्ट आहे; असे त्यांचे प्रतिपादन आहे. कर्तव्य, समता आणि स्वातंत्र्य या तत्त्वांवर त्यांनी आपले नीतिशास्त्र उभे केले होते. अर्थशास्त्राचे त्यानी आंतरराष्ट्रीय दृष्टिकोणातून प्रामुख्याने विवेचन केले. तसेच न्या. मू. रानड्यांप्रमाणे राष्ट्रीय दृष्टिकोणातूनही अर्थशास्त्राचा विचार त्यांनी केला.

अनुक्रमणिका

चलनविषयक सिद्धांताच्या बाबतीत (monetary theory) त्यांचे विवेचन रानड्यांपेक्षा अधिक चोखंदळ आणि शास्त्रशुद्ध होते. दादाभाई नौरोजींप्रमाणे त्यांनी देशाच्या दारिद्र्याकडे परकीय सरकारचे लक्ष वेधले आणि रमेशचंद्र दत्तांप्रमाणे व्यक्तिवादी दृष्टिकोणातून शेतीच्या प्रश्नाचा विचार केला. या सर्व बाबतींत ते या सर्वांचे पूर्वसूरी ठरतात. गोव्याच्या अर्थकारणाचा त्यांनी सांगोपांग विचार केला होता. भारताच्या अर्थशास्त्रीय विचाराचा सविस्तर इतिहास लिहिला जाईल त्या वेळी गोमिशच्या अर्थशास्त्रीय विचारांची दखल घ्यावी लागेल.

हे त्यांचे दोन्ही ग्रंथ फ्रेंच भाषेत लिहिले होते. हे दोन्ही ग्रंथ फ्रान्समध्ये मान्यता पावले, इतकेच नव्हे तर पॅरिसच्या "Societe de Economic Politique de Paris" या संस्थेचे सन्मान्य सभासदत्व त्याला बहाल करण्यात आले.

'ब्राह्मण' कादंबरी

युरोपीय रोमांटिसिझमच्या (romanticism) काळात ही कादंबरी लिहिली गेली. त्यापूर्वी बरीच वर्षे रोमँटिसिझमने पोर्तुगालात प्रवेश केला होता. व्हिक्टर ह्यूगो, लामार्तिन हे त्या साहित्यिक आंदोलनाचे प्रेरक होते. नामांकित कवी व लेखक त्या काळात पोर्तुगालात निर्माण झाले. या साहित्यिक आंदोलनावर फ्रेंच रोमँटिसिझमची गाढ छाप पडली. राजकारणातील उदारमतवाद साहित्यात शिरला. स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्वांचे पडसाद सगळ्या युरोपियन साहित्यात उमटू लागले. कथा, काव्य, नाटक इत्यादी साहित्य प्रकार जुनाट, पारंपरिक बंधनांतून मोकळे झाले. विषय, तंत्र, भाषा, प्रेरणा, आशय इत्यादी बाबतीत पूर्वसूरींचे दास्य झुगारण्यात आले आणि माणूस व निसर्ग याना प्राधान्य मिळाले. सच्च्या भावनेला महत्त्व आले. अवतीभोवती वावरणाऱ्या जिवंत व्यक्तींची वास्तव सुखदुःखे वेगळा अर्थ धारण करून साहित्यात प्रकट होऊ लागली. शब्दबंबाळ व कृत्रिम रचनेची सद्दी संपली. लेखकाच्या वृत्तीला—अनुभूतीला मोल आले. साहित्याला हेतू आला. ते लोकाभिमुख झाले. विषयांचे क्षेत्रही अचानक विस्तारले. वास्तवतेची आजवर झालेली आबाळ संपली. काल्पनिकाला गौणत्व आले. ह्यूगोची 'ले मिझेराब्ल' लामार्तिनची 'मेदितासिओ', आल्फ्रेद द व्हिग्नी व म्युसेत यांचे भावकाव्य यानी साहित्याची क्षितिजे एकदम विस्तारली. बुद्धी व भावना यांचा सच्चेपणा, मानवतेची समग्र—सर्वांगीण जाणीव, अशा गोष्टींमुळे या साहित्यिक क्रांतीला अमाप लोकप्रियता लाभली.

"ब्राह्मण" कादंबरी ही अशा अवस्थेत निर्माण झाली. गोमिशवर ह्यूगो व लामार्तिन या दोघा साहित्यश्रेष्ठींचा फारच प्रभाव पडला. या कादंबरीच्या तात्त्विक बाजूचे श्रेय ह्यूगोकडे जाते, तर भावनात्मक बाजूचे श्रेय लामार्तिनकडे जाते. गोमिशनी या ऋणाचा कित्येक ठिकाणी उल्लेख केलेला आहे. त्यांनी लामार्तिनला आपला गुरू मानला आहे. राजकीय व सामाजिक संदेश निःसंदिग्ध देणारी अशी पोर्तुगीज साहित्यात ही पहिलीच कादंबरी आहे. तिचे स्वरूप निश्चित करणे जरा अवघड आहे. बोध, नीती, मानवतावाद यांचे आडवेउभे धागे कादंबरीच्या वस्त्रात विणलेले आहेत. राजकीय प्रचार व समाजसुधारणा यांचेही लेखकाला वावडे नाही. कलानिर्मितीची शुद्ध प्रेरणा मात्र कमी दिसते. सगळ्या कथानकाला खिस्तनीतीचे अस्तर लावलेले आहे. आपल्या उद्देशाची स्वतः लेखकानेच एके ठिकाणी स्पष्ट कबुली दिली आहे. कथाकार या नात्याचे आपल्या मर्यादा कोणत्या आहेत याची गोमिशना जाणीव आहे. वर्तमानपत्रातून प्रचाराच्या अभिनिवेशात सांगितलेली तत्त्वे त्यांना अधिक टिकाऊ अशा कादंबरीसारख्या साहित्यप्रकारात एकत्र बांधून ठेवायची आहेत.

अनुक्रमणिका

ख्रिस्तप्रणीत नीतीचा विजय हा कादंबरीचा एक हेतू आहे. तो साध्य होण्यासारख्याच पात्रांचा उपयोग लेखकाने केलेला आहे. दुराचारी माणसांना शासन मिळाले आहे. सदाचारी माणसांना सुखशांतीचा लाभ झालेला आहे. माग्नोद या खलनायकाला पाद्री शाव्हिपेरच्या उपदेशामुळे उपरती होते व त्याचे धर्मान्तर होते. रिकार्दु हा पापी व कारस्थानी म्हणून त्याचा खून होतो. साधीभोळी एमिली ही त्याच्या मोहात पडते व फसते. या पापाबद्दल तिला प्रसूतीच्या वेळी मरण येते. पाद्री शाव्हियेर हा देवदूतासारखी प्रेरणा देत, संकटग्रस्तांना हात देत, सगळ्या कादंबरीत फिरत असतो. त्याचे हे 'मिशन' असते. त्याची घडण ह्यूगोच्या 'ले मिझेराब्ल' या कादंबरीतील बिशपासारखी आहे. फरक एवढाच की, सुरुवातीला पापी जां वाल्जाचा आत्मा जागविणारा बिशप नंतर दिसत नाही. उलट पाद्री शाव्हियेर हा ख्रिस्ती नीतीचा उपदेश करीत, मानवतावादी कार्य करीत सगळ्या पात्रांना व प्रसंगांना योग्य ते वळण देत सारखा हिंडत असतो. कादंबरीची रचना उत्कंठा वाढविणारी आहे. प्रसंगांची व पात्रांची गुंतागुंत आहे. वाचकांचे मन खेचून घेणाऱ्या प्रवाही व ओजस्वी शैलीत कादंबरी लिहिली असूनही त्याला सारखे वाटत जाते की, कादंबरीकार आपल्या हेतूसाठी, आपल्या इच्छेनुसार पात्रांना चालना देतो. त्यांच्या स्वतःच्या प्रेरणांनी त्यांना गती मिळत नाही. रोमँटिक साहित्यात हो दोष अटळ असतो. ब्राह्मण माग्नोदला राक्षस बनविला आहे. कारण कळत नाही. कदाचित त्याचे धर्मान्तर सुलभ व्हावे म्हणून असेल. कदाचित ब्राह्मण्याची भावना नष्ट झाल्याशिवाय हिंदू समाजाचा उद्धार अशक्य आहे हे दाखविण्यासाठी असेल. कदाचित हिंदू व ख्रिस्ती या भिन्न धर्मीयांचा मिलाफ घडवून आणण्यासाठी असेल. ते काहीही असले तरी पात्रपरिपोषाच्या दृष्टीने माग्नोदचे चित्र सदोष वाटते. सूडबुद्धीचे पोषण तो दिवसरात्र करीत असतो. यालाच गुन्हा म्हणायचे काय?

अँग्लोइंडियन रोबेर्त त्या कर्मठ ब्राह्मणाच्या अंगावर संतापाच्या भरात गाईचे शिजविलेले मांस फेकतो. त्यामुळे माग्नोद भ्रष्ट होतो. त्याची पत्नी आत्महत्या करते. माग्नोद अदृश्य होतो. सूड घेणे हे नेहमीच अमानुषपणाचे लक्षण आहे काय? माग्नोद आपल्या मुलीला भ्रष्ट करून तिच्या मृत्यूला कारणीभूत होणाऱ्या रिकार्दचा खून करतो आणि कोर्टात कबुली देतो. पण त्याला शासन झालेले दिसत नाही. रोबेर्तचा सूड घेण्यासाठी तो ठगांच्या टोळीत सामील होतो. त्यांची दीक्षा घेतो. पण नंतर अचानक गुप्त होतो व काही वर्षांनंतर आपल्या गावात सॉबाल या नावाने ज्यूच्या वेषात उगवतो आणि तोही मोठ्या आर्थिक घडामोडी करणारा सावकार–भांडवलदार म्हणून. हे प्रकार रोमँटिसिझमच्या अद्‌भुतरम्यतेला वावडे नाहीत. खुनाच्या कल्पनेने वेडा झालेला माग्नोद बराच काळ लोटला तरी आपल्या प्रतिज्ञापूर्तीच्या दृष्टीने कोणताच प्रयत्न करीत नाही.

कादंबरीचा विषय कोणता ते निश्चित सांगता येत नाही. वर्णभेद, जातिभेद यांचा कलह, इंग्रज लोकांचा साम्राज्यवाद, वर्णभेदामुळे काळ्या लोकांच्या नशिबी आलेले पारतंत्र्य हे सगळेच प्रश्न कादंबरीचे विषय आहेत. भिन्न धर्माची, भिन्न संस्कृतीची, भिन्न वर्णाची माणसे एकत्र आल्यावर त्यांच्यात संघर्ष निर्माण होतो. पण शरीरसंबंधामुळे व धर्मान्तरामुळे रूढ, प्रबळ संकेताना वर्णवर्चस्वाच्या व जातिवर्चस्वाच्या कल्पनाना मूठमाती मिळते. हा संदेशही कादंबरीतून मिळतो. ते काही असले तरी एक गोष्ट स्पष्ट आहे की, गोमिशना वर्ण, जाती, धर्म, संस्कृती यांच्या भेदामुळे माणसामाणसात, समाजासमाजात, राष्ट्राराष्ट्रात दुरावे निर्माण झालेले नको आहेत. राजकारणातील श्रद्धास्थान बनलेली तत्‌त्वत्रयी त्याना माणसांच्या सर्व व्यवहारात मूर्त झालेली हवी आहे.

या पुस्तकाला आणखी एका दृष्टीने महत्त्व आहे. एका टीकाकाराने म्हटल्याप्रमाणे कादंबरीपेक्षा हे पुस्तक मोठे आहे. म्हणजे असे की, कादंबरीला अनावश्यक असलेल्या फालतू गोष्टींचे भारूड या पुस्तकात

अनुक्रमणिका

खूप आढळते. पण त्यामुळेच त्याला विशेष महत्त्व आले आहे. गोमिशचा पिंड हा शुद्ध कलाकाराचा पिंड नाही. त्यामुळे जे तत्त्वज्ञान त्याना वाचकांच्या गळी उतरवावयाचे आहे ते कलेच्या एकजिनसी प्रवाहात ते सामावून घेऊ शकत नाहीत. येथे उपदेशक, प्रचारक, समजासुधारक कलाकारापेक्षाही वरचढ ठरलेला आहे. पण गोमिशच्या अवांतर फालतूपणाचा कंटाळा येत नाही. उलट आपण त्यांच्या फालतू गोष्टींत रंगून जातो. गोमिशना आपल्या ध्यासाच्या विचारांची—कल्पनांची धुंदी चढली, म्हणजे ते कादंबरीकाराची भूमिका विसरतात. कित्येक वेळा ही धुंदी अनावर होते तेव्हा ते वेगवेगळ्या विषयांवर बोलू लागतात. ठग, कलावंतीण, जुगार, डँडी अशा कित्येक विषयांवर लिहिताना त्यांचा संयम सुटतो. तरीही त्यांची गैरलागू, अनाठायी बडबड ऐकत रहावीशी वाटू लागते. त्याची कारणे दोन : एक, लेखकाची प्रवाही—खेळकर शैली; दुसरे नि महत्त्वाचे असे की लेखकाचे ध्येयदर्शी, तत्त्वदर्शी, अतृप्त, भावनेने आकंठ भरलेले, कृतीसाठी उतावीळ झालेले विशाल व्यक्तिमत्त्व त्या फालतू गैरलागू गोष्टींत साकारू लागते आणि मग असे वाटते की, त्याने असेच बोलते राहावे. उच्च श्रेणीचे हे ललित लेख कादंबरीला चिकटले असल्यामुळे तिला काही प्रमाणात हिणकसपणा आला तरी त्यामुळेच या पुस्तकाला मोल आले आहे. कुळागाराचे वर्णन हे भावनेने ओथंबलेले काव्यच वाटते. वटवृक्षाचे वर्णन पाहा. येथे वाचक स्वतःला हरवून बसतो. कादंबरीतील घनदाट अरण्य नजरेसमोर उभे राहते. मे महिन्यातील चंद्र चमकू लागतो. डिसेंबर महिन्यातील प्रभातसमयी दवाची मोत्ये चिकटलेली आढळतात. पावसाळ्यातील भयाण सुंदर रात्री गाढावू लागतात, आक्रंदू लागतात आणि झऱ्याच्या गोड उबेत पहाट फुलू लागते. या कादंबरीला अधूनमधून उदारमतवादाची फोडणी दिलेली आहे. उदारमतवादाने कादंबरीकार इतका भारावून गेलेला असतो की, त्याच्या तत्त्वांना मोकळी वाट करून दिल्याशिवाय त्याला स्वस्थता लाभत नाही. त्यामुळे उदारमतवादाची तत्त्वप्रणाली तर मांडलेली दिसतेच, पण त्याच्या कार्यक्रमाचेही येथे दर्शन घडते. उदारमतवादाचे मठविषयक धोरण, राज्यशासन व चर्च यांच्या परस्परसंबंधाविषयीचे धोरण, गुलामगिरीसंबंधीचे धोरण, अशा अनेकविध धोरणांचे सूत्ररूपाने विवेचन केलेले आढळते.

आपल्या कादंबरीसाठी गोमिशनी गोमंतकाची भूमी न निवडता उत्तर हिंदुस्थानातील एक खेडे का निवडले आहे असा प्रश्न उपस्थित होतो. त्याचे उत्तर असे की, गोमंतकात जातीय किंवा वांशिक भेदांचा कलह कधीच तीव्र नव्हता. ब्राह्मण—ब्राह्मणेतरसारख्या जातिकलहाने उग्र स्वरूप धारण केले नव्हते. त्याचप्रमाणे जित व जेते यांच्यामध्ये कातडीच्या रंगावरून दरी उत्पन्न झाली नव्हती. त्यामुळे कादंबरीकाराला गोमंतकाच्या हद्दीबाहेर जावे लागले. तेथे जातीय श्रेष्ठतेवर जगणारे ब्राह्मण होते, त्याचप्रमाणे स्थानिक लोकांना काळे म्हणून तुच्छ लेखणारे गोरे अँग्लोइंडियन होते. त्यांपैकी कादंबरीकाराने दोन प्रतीके निवडली : माग्नोद व रोबेर्त.

पण गोमंतकाबाहेरच्या ज्ञातिसंस्थेवर प्रहार करताना लेखकाने ख्रिस्ती धर्माच्या प्रभावाला फाजील महत्त्व दिलेले आहे. त्या धर्माच्या प्रभावाने जर हे प्रश्न सुटतात, तर खुद्द गोमंतकातील ख्रिस्ती समाजात—साडे चार शतकांचा काळ लोटला तरी—ज्ञातीसंस्था वेगळ्या स्वरूपांत अजून का जिवंत आहेत? तेथे ख्रिस्ती बामण, ख्रिस्ती चाड्डो (क्षत्रिय), ख्रिस्ती सुदीर (शूद्र) हे सगळे भेद का आहेत? शरीरसंबंधात असो किंवा सामाजिक व्यवहारात असो; हे भेद कमी—अधिक प्रमाणात डोकावतातच. दुसरे, माग्नोदच्या धर्मान्तरामुळे तो युरोपियनांच्या पातळीवर आला खरा. पण तो अस्पृश्यांच्या पातळीला उतरला काय? या प्रश्नाला कादंबरीत उत्तर सापडत नाही. त्याचे कारण असे की, या कादंबरीत ज्ञातिसंस्थेचा विचार राजकीय पातळीवरून झालेला आहे, सामाजिक नव्हे.

अनुक्रमणिका

सामाजिक व राजकीय तत्त्वप्रचाराचा प्रमुख दोष कादंबरीत ठायी ठायी आढळतो. या कादंबरीनंतर एक शतकाचा काळ कधीच निघून गेला असला तरीही तत्कालीन ज्वलंत प्रश्न अजून तसेच निरुत्तर राहिले आहेत. वर्णभेद जातिभेद, अजून उग्र आहेत. या प्रश्नांनी आज राजकारणात थैमान घातले आहे. त्यामुळे राजकीय स्वातंत्र्याचा लाभ झाला असला तरी आपण कित्येक क्षेत्रांत दुबळे राहिलो आहोत. वैयक्तिक स्वार्थाला परतंत्र राजकारणात जे स्थान नव्हते ते आजच्या लोकशाहीत त्याला प्राप्त झाले आहे. त्यामुळे लोकशाहीकडे पाहण्याची आपली दृष्टी जशी स्वार्थी, तशीच संकुचित झालेली आहे. या दृष्टीचा व वृत्तीचा परिणाम राष्ट्राच्या पिंडावर फार भयंकर होत आहे. त्यामुळे कोणतीही सामाजिक समस्या आज राजकारणाच्या ओंगळ स्वरूपात आपल्यापुढे उभी राहते. अशा वेळी या जुन्या कादंबरीचा ताजेपणा बराच जाणवतो. तिने दिलेला संदेश आजही नवा वाटतो.

—लक्ष्मणराव सरदेसाई

अनुक्रमणिका

प्रस्तावना

प्रिय महाशय,

"पोर्तुगालचे गॅझेट" या नियतकालिकाचा एक संस्थापक व संपादक म्हणून काम करण्यासाठी मला पाचारण करून वृत्तपत्रीय जगात आपण माझा प्रवेश करविलात. या मानाला मी अपात्र होतो, तरीपण मी तो मोठ्या खुषीने स्वीकारला. त्या वेळी मी लेखक नव्हतो. आजदेखील, इतकी वर्षे काम करूनही, मी लेखक झालो आहे, असे नव्हे. ते काही असले तरी संपादकाची कठीण कामगिरी पार पाडताना मी सर्वांशी न्यायबुद्धीने व औदार्याने वागण्याचा प्रयत्न केला हे मी आपणांस मनःपूर्वक सांगू शकतो. आणि मला विश्वास आहे की, आपणही असाच निर्वाळा दिल्याशिवाय राहणार नाही. मला भाषेची कलाकुसर अवगत नव्हती, आणि माझ्या व्यासंगी व साहित्यिक सहकाऱ्यांचे या क्षेत्रांतील विक्रम पाहून मी कधीकधी शरमिंदा व्हायचा; पण माझ्या उणीवांची जाणीव मला कमी बोचक झाली. ती, ज्या सत्याचा व तत्त्वांचा मी निर्धाराने पुरस्कार केला, त्यांच्याच बळावर."

मी आपल्याला आज अर्पण करीत असलेले हे पुस्तक म्हणजे काही लेखांचा संग्रह. डेप्युटीच्या खोलीत बसून पेन्सिलीने घाईघाईने खरडून संपादकाकडे पाठविलेले इतर लेखांसारखेच लेख— ज्यांच्यावर आपण आपल्या प्रतिभेचे संस्कार करण्याचे कष्ट घेतले. मला इथे गुपित सांगावयाचे आहे ते हे की, माझ्या दृष्टीने कादंबरी एक शक्कल आहे, जिच्यामुळे हे पुस्तक वाचकाच्या कपाटात अधिक काळ टिकू शकेल. वृत्तपत्रांना अशी संधी मिळत नसते. ती सूर्यकिरणाबरोबर सर्वत्र विखुरली जातात. पण चोवीस तासापेक्षा अधिक काळ कुठेच टिकत नाहीत. त्यांची चमक लवकरच लोपते. त्यांची किंमत एकदम घसरते. दुसऱ्या दिवशी केरकचऱ्याशी सामील होऊन ती तिरस्कृत ठरतात. त्याशिवाय माझ्या दृष्टीने महत्त्वाचे असे आणखी एक कारण आहे, ते असे की, कादंबरीचा प्रांत हा अधिक व्यापक व विशिष्ट असा असतो. त्या प्रांतात वर्तमानपत्रे आपला वेष पालटूनच जाऊ शकतात, ज्याप्रमाणे ख्रिस्ती मिशनरी धर्मलंड लोकांच्या परिसरात वेष पालटून जात असत, त्याप्रमाणे.

माझ्या सदोष वेषांतरामुळे जर माझा हेतू साध्य झाला नाही, तर टीकाकारांनी माझा अवश्य उपहास करावा. पण त्यांच्यापाशी मी एवढीच विनंती करीन की, माझे हृद्गत लक्षात घेऊन त्यांनी माझ्या हेतूचा आदर करावा. उच्च कार्यात आलेले अपयशदेखील उच्च ठरते. काळाच्या संदर्भात अमर असलेली "स्वातंत्र्य, समता व बंधुत्व" ही तत्त्वे त्यांच्या अंमलबजावणीच्या बाबतीतही विश्वात्मक व्हायला पाहिजेत, संस्था, कायदे व चालीरीती यांच्याद्वारा त्यांचा फैलाव सर्वत्र व्हायला पाहिजे, आणि समाजाच्या खालच्या थरापर्यंत ती झिरपत राहिली पाहिजेत. असे झाले तरच माणसांचा सर्वांगीण विकास होईल. माझ्या साऱ्या शक्तीनिशी या तत्त्वांचा हव्यास बाळगताना मी एका सामाजिक मृगजळामागे धावत आहे असे मला वाटत नाही. आणि कदाचित असे झाले तरी त्यात माझे हितच आहे असे मी समजतो. कारण हे स्वप्नच मुळी एवढे उज्ज्वल व कल्याणकारी आहे की, जे आपला आत्मा जागृत करते, क्षुद्रांच्या क्षुद्रत्वाचा निरास करून त्याना वरच्या थरात घेऊन जाते, जे वैभवसंपन्न आहेत, त्यांचा अहंकार नष्ट करते, सगळ्यानाच 'सिनाई' पर्वताच्या शिखरावर नेऊन बसविते, जेथून ख्रिस्तवधाच्या टेकडीवर उभारलेली मानवतेची पताका दिसू लागते.

अनुक्रमणिका

या कादंबरीचे बीज ही एक ऐतिहासिक घटना आहे. अँग्लो–इंडियन समाजाच्या चालीरीतींचा उपयोग करून मी त्या बीजाचा विकास केला आहे. असे करताना या विषयाचे दारिद्र्य लक्षात घेऊन मला काही पात्रे व प्रसंग कल्पावे लागले. यात खऱ्या निर्मितीचा हेतू फार थोडा आहे, हे मी जाणतो. असे करताना माझ्या हातून प्रमाद घडले असतील, कदाचित विषयाचे दारिद्र्य शुद्ध स्वरूपात आले असते तर, ते अधिक परिणामकारक झाले असते. पण त्या विषयाचे दारिद्र्य दूर करण्यासाठी ज्या कलात्म संस्कारांनी हा विषय सजविला त्यांचा वापर मी केला नसता तर हा विषय हास्यास्पद ठरला असता अशी मला भीती होती.

या कादंबरीतील दोषांची जाणीव मला इतरांपेक्षा अधिक चांगली आहे. आणि म्हणून ते दोष मी मान्य करतो. वाचकांचे मत वेगळे पडले तर मात्र मला नवल वाटेल. महाशय, तुम्हाला चांगले माहीत आहे की, मी कादंबरीकार नाही. या कादंबरीतील पात्रे व प्रसंग यांचे चित्रण करताना वापरलेल्या अनिश्चित रेषा व फिक्कट रंग ज्या वेळी वाचकांच्या लक्षात येतील, त्या वेळी त्यांनाही माझी अपात्रता कळून येईल.

तसे पाहिले तर या पुस्तकाला कादंबरी म्हणणे हे धाडसच आहे, नि ते मी निःसंकोचपणे करीत आहे. एखादा माणूस स्वतःला नेपोलियन किंवा न्यूटन म्हणवून घेतो, त्यातलाच हा प्रकार आहे.

वस्तुतः या कामात मी फारच परिश्रम घेतले आहेत. तरीही भाषासौंदर्याची वाण वाचकांना जाणवेल अशी मला भीती वाटते. याचे कारण असेही असू शकेल की, पोर्तुगीज भाषेचा गाढ व्यासंग मला करता आला नाही, हे एक; शिवाय, लहानपणी मी ही भाषा बोललो नाही, व नंतरच्या काळात शैलीकारांच्या सहवासात राहून त्या भाषेचा अभ्यास मला करता आला नाही.

कादंबरी लेखन हे सकृद्दर्शनी वाटते तितके सोपे नाही ही जाणीव मला यापूर्वी कधीच झाली नव्हती. आणि म्हणूनच मी असे ठरविले की, मी पुन्हा असल्या फंदात पडणार नाही. त्याऐवजी आपल्या साहित्यात ज्यांनी यश मिळविले, त्यांची वाहवा करीत राहावे.

या कादंबरीचे कथानक घडविताना मला जो अनुभव आला तो मी आपल्याला मनमोकळेपणाने सांगू इच्छितो. मी दोन, तीन, चार पात्रांची निर्मिती करावी, त्यांना उत्कृष्ट पेहेराव चढवावेत, त्यांना बोलायला चालायला लावावे, मग मी अत्यानंदाने त्यांना पाहात बसावे. त्या वेळी ती मला फार सुंदर दिसत. इतक्यात जेवणाची वेळ होई, मी जेवायला जाई; पण अर्ध्या तासापेक्षा अधिक वेळ थांबत नसे. कारण मला माझ्या माणसाची ओढ लागलेली असे. परत येऊन पहातो, तर काय चमत्कार! सगळी पात्रे मला बेढब दिसू लागत. त्यांचे पोषाख मला एकसारखे दिसत. त्यांचे संवाद बर्फाप्रमाणे थंडगार वाटत. मग मी उद्वेगाने, संतापाने सुरीच्या वारांनी सगळ्या पात्रांचा नायनाट करून टाकी. माझ्या नजरेसमोरचे ते दृश्य भयानक होते. तोडलेली मुंडकी, छाटलेले हातपाय, छिन्नविच्छिन्न बोटे, रक्ताचे पाट. सारे उध्वस्त!

दुसऱ्या दिवशी मी त्या उध्वस्त ठिकाणाकडे वळलो. मला ते दृश्य रणांगणाप्रमाणे भयानक व स्मशानाप्रमाणे दारुन वाटले. इथे अस्ताव्यस्त पडलेल्या मुडद्यांवर मी दुःखाची व पश्चातापाची आसवे गाळली, आणि म्हटले, "शेक्सपियरप्रमाणे मी वैभवसंपन्न का झालो नाही? त्या महाभागानं साऱ्या समाजाचं पोषण केले."

अनुक्रमणिका

Herculano, Costilho, Mendes Leal, A. Augusto, Rebelo de Silva यासारखा मी सधन का झालो नाही? या भाग्यवंतांनी कुटुंबे पोसली; पण त्याना कधीही अन्नाचा तुटवडा भासला नाही. मी Castelo Branco प्रमाणे समर्थ का झालो नाही? त्याने प्रजेचा निर्वाह चालविला.

निर्मितीचे स्वातंत्र्य ही कवी–कादंबरीकारांना लाभलेली सुंदर ईश्वर देणगी आहे. उदात्त नायक–नायिका निर्माण करून त्यांच्याविषयी वाचकाच्या मनात भक्तीभाव उत्पन्न करणे, त्यांच्या हृदयात उल्हास पेरणे आणि चिरंतनाचे व अमरत्वाचे लेणे त्यांना बहाल करणे यासारखा दैवी गुण दुसरा कोणता आहे? पण कवी–कादंबरीकारांना एवढे प्रिय असलेले हे निर्मितिस्वातंत्र्य मला मात्र तापदायक झाले. कारण निर्मितीच्या त्या अवकाशात मला श्वासोच्छ्वास करणे दुर्घट झाले, इतकेच नव्हे तर, अनंताच्या त्या अंदाधुंदीत मार्गक्रमण करणे मला अशक्य झाले. आयुष्यात पहिल्यांदाच मला गणिताच्या व अर्थशास्त्राच्या दास्याची जाणीव झाली. माझी आत्मघातकी प्रवृत्ती मी काबूत आणली आणि माझे हात बांधून टाकले. तेव्हा मी ही कादंबरी पुरी करू शकलो. आपल्याला या कादंबरीत कोणतेच गुण आढळले नाहीत तरी तिच्यात माझी कृतज्ञता आपल्याला आढळून येईल यात मला शंका नाही.

–फ्रांसिश्कु लुईश गोमिश

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

पुरस्कार ७
फ्रांसिश्कु लुईश गोमिश : ८
प्रस्तावना १५
भाग पहिला २०
१ बंगला..२१
२ ग्रिफीन..२३
३ ब्राह्मणांचे पावित्र्य..२५
४ पतन २८
५ शोकदग्ध ब्राह्मण विधवेची आत्महत्या ३१
६ प्रायश्चित..३५
७ ठग Pluet super pectatoes laqueos ३७
८ दीक्षा..४१
९ तीन भावंडे ४६
१० फुलांची फळे होतात..५०
११ Quantum Mutatus ab illo? ५३
१२ मृत्युपत्र O homen poe e Deus dispoe ५६
१३ वंद्य पाद्री फ्रान्सिश्कु द सान्त कातारीन.. ५८
१४ त्याच्या विवंचना..६३
१५ अंधारात सगळ्या मांजरांचा रंग एकच ६५
१६ जुगाराचे दुष्परिणाम.. ६८
१७ सॉबल ज्यू..७२
१८ डँडी..७५
१९ सज्जनाला परमेश्वराइतके दुसरे काहीही प्रिय नाही..७७
२० जेत्सेमानी [ज्या बागेत येशू ख्रिस्ताने मृत्यूपूर्वी शेवटची प्रार्थना केली ती बाग.]...................... ८१
२१ Deposuit potentes [“बलाढ्याना पदभ्रष्ट केले.”] ८७
भाग दुसरा..९०
१ एक ॲंग्लोइंडियन कुटुंब ९१

२ बाल्य संपते ९५
३ Festina lente ["सावधगिरी बाळगावी."] ९८
४ कानपुरातील समारंभ १०१
५ बॉल १०५
६ मत्सर १०९
७ गौप्यस्फोट ११४
८ शाप ११७
९ प्रवास १२१
१० नवे मोह १२६
११ अंधत्व १२९
१२ खंदक १३३
१३ ढागाळलेले आकाश १४०
१४ Vox clamans ["वाळवंटातील आवाज"] १४८
१५ क्रॉसवरचे दिव्य १५२
१६ १८५७—शिपायांचे बंड १५७
१७ वादळ आणि शांतता १६०
१८ उपसंहार १६४
उल्लेख—सूची १६५

भाग पहिला

अनुक्रमणिका

१

बंगला

फिझाबाद हे राजधानीचे शहर. ते औध जिल्ह्यात लखनौपासून थोड्याच अतरावर प्रसिद्ध घोगरा नदीच्या दक्षिणेला आहे. एकेकाळी ते वैभवसंपन्न होते. सतराशे पंचाहत्तर सालापूर्वी त्याचे तट गाजले होते. आज त्याची मोडतोड झालेली आहे. सुजादौला राजवाडा तसाच ऐश्वर्यशाली होता. पण आज तो उध्वस्त झालेला आहे. तेथील रहिवासी लखनौला येऊन तेथेच स्थायिक झाले. राजे आणि युवराजे, त्याचे दरबार, त्यांचा डामडौल, त्यांची व्यसने याचा तेथे मागमूस राहिला नाही. तेथे वसती झाली ती शेतकऱ्यांची, बुलबुल पक्ष्यांची. काबाडकष्ट व साधेपणा तेथे वावरू लागले. जेथे शहर नांदत होते, तेथे आता मळे उगवले.

ज्या काळातील घडामोडी आम्ही कथन करीत आहोत त्याकाळी फिझाबाद दौला घराण्याच्या ताब्यात होते. १८०१ सालच्या कुप्रसिद्ध कराराच्या तडाख्यातून ते बचावले होते. नबाब असफ नियतीचे खेळणे ठरला. त्याशिवाय त्यांचा दुबळेपणाही त्याला बाधला. आपला राजमुकूट सामर्थ्यशाली इंडिया कंपनीच्याकरवी, असहाय्य स्थितीत छिन्नविच्छिन्न झालेला त्याने पाहिला. राज्याचे तुकडे तुकडे झालेले पहाणे त्याच्या नशिबी आहे. एवढ्या लाचारीचे बक्षीस त्याला मिळाले नाही असे नाही. ते बक्षीस म्हणजे एक पोकळ किताब आणि दिखाऊ अधिसत्ता. हा जबरा तडाखा देणारा हात वेलस्लीचा होता. त्या तडाख्याने केलेल्या जखमेचा कालांतराने व्रण झाला आणि लवकरच ज्या औधमध्ये हिंदुस्थानातील चार पवित्र नद्यांचा संगम होतो आणि ब्राह्मण्यांचे केंद्र मानलेल्या बनारस शहराचे जेथे वास्तव्य आहे, ते औध खिळखिळे होऊन १८५६ साली ब्रिटीश साम्राज्याच्या सर्वग्रासी भोवऱ्यात विरून गेले.

फिझाबादच्या मध्यभागी एका डोंगराच्या उतरणीवर १८ साली एका बंगल्याच्या उंच, सफेद भिंती तळपत होत्या. त्या पाहून असे वाटते की, एक आश्रमच जणू पर्वतशिखरावर तरंगत आहे. त्या भिंतीभोवती आंब्याच्या डेरेदार झाडांची रांग उभी होती. आपल्या दाट व टवटवीत पर्णसंभाराची त्याच्यावर पाखर घालून ती रांग, वळणे घेत घेत पायथ्यापर्यंत उतरली होती. आणि मग खालच्या मैदानात विलीन झाली होती. बंगल्याच्या डाव्या बाजूला घोगरा नदीचे पात्र सूर्यकिरणात चमचमत, त्या देखाव्याला आगळीच शोभा देत होते.

जवळून पहाणाऱ्याला बंगल्याच्या पौर्वात्य ऐश्वर्याची कल्पना येई. इमारतीचे स्थापत्य भारतीय वळणाचे साधे, पण सुंदर होते. छप्पर त्रिकोणी व चपटे होते. त्याला आधार देऊन उंच उंच खांबाच्या रांगा खड्या होत्या. दगडी भिंती किल्ल्याच्या तटांप्रमाणे जाड व मजबूत होत्या. बंगल्याभोवती एक गॅलरी फिरली होती. तिचा कोरीव कठडा चंदनी लाकडाचा होता. त्याच्यावर वाळलेल्या सुगंधी मुळ्यांचे जाळे पसरले होते. ते वर्षभर फुलांनी डवरलेल्या वेलींनी झाकळून टाकले हाते. त्यातून सुगंध व गारवा निथळत होता. खालचा विस्तीर्ण बाग, तेथे वहाणारे पाण्याचे झरे आणि घरात दिवसरात्र भरभर फिरणारे पंखे, यामुळे बंगल्याच्या सगळ्या दालनांतर सुखद गारवा जाणवत होता. डोंगराच्या पायथ्याशी सुरू झालेल्या दगडी पायऱ्यांचा जिना वळणा—वळणाने, चढत—चढत बंगल्यात शिरला होता. जिन्याच्या दुतर्फा हरएक प्रकारच्या झाडांच्या रांगा होत्या आणि त्यांच्या गर्द पानांचे हिरवे छत पायऱ्यावर हेलावत होते.

हिंदुस्थानात असल्या बंगल्यांची संख्या कमी नाही. त्यांत सुखसोई व ऐश्वर्य एकत्र नांदतात. हे बंगले म्हणजे एक प्रकारचे प्रासादच होत. तेथे नबाब राजे, व साहेब लोक पहुडलेले असतात. भोगांच्या धुंदीत आपल्या गुलाम व आळशी सेवकांचे मुजरे घेण्यात ते दंग असतात.

कॉंस्तासिया हा सेनापती क्लॉड मार्टीनचा बंगला आमच्या वाचकांना अपरिचित नसेल. कारण वैभवाचे व कलाभिरुचीचे ते एक सुंदर प्रतीक आहे. औध संस्थानातील तो एक चमत्कार आहे; असे म्हटले तरी चालेल. त्याच्या बांधकामाला एक लाख साठ हजार पौंडाचा खर्च आला होता.

अनुक्रमणिका

२

ग्रिफीन

आमच्या कथानकाच्या काळात फिझाबादच्या बंगल्याची मालकी एका आयरीश कुटुंबाकडे होती. त्या कुटुंबात दोनच माणसे होती. एक, ऐंशी वर्षांचा म्हातारा दाविस. तो पक्षाघाताने आजारी असलेला. दुसरा, त्याचा पुतण्या रॉबेर्त. हाच त्या म्हाताऱ्याचा एकमेव वारस. दाविस हा मूळ डब्लीनचा. तो आपल्या वडिलांबरोबर लहानपणीच हिंदुस्थानात आला होता. तो सैन्यात बडा अधिकारी होता. दाविसचा ओढा लष्करातील नोकरीकडे नव्हता. त्याचप्रमाणे सरकारी नोकरीचीही त्याला आवड नव्हती. त्यामुळे तो आपल्या बापापासून विभक्त झाला आणि औधला येऊन स्थायिक झाला. तेथे त्याने तंबाखूची मोठ्या प्रमाणावर लागवड केली. या धंद्यात त्याने एवढी अक्कलहुशारी दाखविली की, थोड्याच काळात बरीच मोठी संपत्ती कमावली. संपत्तीबरोबर त्याची लालसा वाढतच गेली आणि तो हिंदुस्थानातच खिळून राहिला. वृद्धापकाळ आला तरी तेथून हलण्याची त्याला बुद्धी झाला नाही. त्यामुळे युरोपला परत जाण्याचा त्याचा मूळ बेत तसाच पडून राहिला. आणि मग, एक दिवस, अकस्मात त्याला पक्षाघाताचा दुसरा झटका आला, आणि स्वदेशात परत जाण्याच्या विचाराला तो कायमचा दुरावला. कित्येक वर्षे दाविस खाटेवरच पडून होता. तेथेच त्याची शुश्रूषा करण्यात येऊ लागली. शेवटच्या आजाराची लक्षणे दिसून येताच, आपली इस्टेट चालविण्यासाठी त्याने आपल्या पुतण्याला तातडीने बोलावून घेतले.

रॉबेर्त हा सुसंस्कृत तरुण होता. गोड चेहऱ्याचा. इतरांना ओढ लावणारे गुण त्याच्या अंगी होते. उमर बत्तीस वर्षांची. औधला येऊन काही महिने लोटले होते. चुलत्याच्या जमीनजुमल्याचा कारभार तोच चालवीत असे, काकांच्या पश्चात तोच सगळ्या इस्टेटीचा मालक बनणार होता. तशी व्यवस्था काकांनी अगोदरच करून ठेवली होती. कोवळे वय, रसरसणारे यौवन, उफाळू पहाणारे कर्तृत्व इत्यादी गोष्टीमुळे फिझाबाद त्याला कंटाळवाणे वाटायचे. एखाद्या मठामध्ये दाबून ठेवलेल्या कुमारिकेला आपल्या त्या दारुण निवासाचा उबग यावा, जाड्याभरड्या वेषाखाली गुदमरणाऱ्या आपल्या यौवनाला व लावण्याला तिने मूठमाती द्यावी तशीच गत रॉबेर्तची झाली होती. आपल्या या '**पर्गाटोरी**'मध्ये निराश न होता तो तळमळत होता. ज्या रॉबेर्तने आपले बावीसेक वसंतऋतु आनंदात, चैनीत घालविले होते, त्या रॉबेर्तला आता त्याचे मित्र ओळखायला विसरले असते, इतका तो पालटला होता. त्याला मिळालेले नमुनेदार गुहशिक्षण आणि इतरांशी गोडीगुलाबीने वागण्याची त्याची पद्धत यामुळे त्याच्या बोलण्याचालण्यात जो गोडवा व जी सफाई इतरांना जाणवत होती त्यांचा आता मागमूसही राहिला नव्हता. फिझाबादच्या एकांतात त्याचा स्वभाव कडवट झाला असला तरीदेखील एखादा क्षण असा असे की, जेव्हा त्याची मूद्रा झाकळून टाकणारा मूकवेदनाचा पडदा अवचित फाटला जाई. आणि त्याच्या ओठांवर स्मिताची लकेर चमकून जाई. अशावेळी, आपल्या लाडक्या हेलेनाची प्रतिमा हळूच खिशातून बाहेर काढून तो तिचे चुंबन घेई. त्या विषण्ण एकांतात आपल्या मुलीची प्रतिमा हाच त्याचा विरंगुळा होता. तो तिच्याशी बोलायचा. ती त्याला प्रतिसाद द्यायची.

हेलेना चंद्रकोरीप्रमाणे देखणी होती. ती पोरकी होती. तिने या जगात पहिले पाऊल टाकले. आणि त्याच क्षणाला तिच्या आईने इहलोकचा निरोप घेतला. रॉबेर्तने तिला लंडनमधील एका निर्मल

अनुक्रमणिका

चालीरितीच्या आयरीश कुटुंबात ठेवले. त्यामुळे पाण्यासारखा पैसा खर्च करूनही जे गृहशिक्षण आपल्या सहवासात त्याला देता आले नसते ते देण्याची व्यवस्था झाली.

रॉबेर्तचा एकाकी जीवनप्रवास आता कर्तव्य व स्मृती यांच्यामधून वाहात होत. आजचा दिवस कालच्याप्रमाणे निघून जाई आणि उद्याचां आजच्याप्रमाणे. त्यात, फरक नव्हता. सकाळच्या वेळी तो कचेरीत बसून कामाचा फडशा पाडी. संध्याकाळी पाच ते सहापर्यंत, आपल्या उमद्या घोड्यावर बसून आसमंतात फेर–फटका करून येई. सात वाजता जेवण उरकून घेई. झोपण्यापूर्वी तो पाद्री फ्रांसिश्कु नावाच्या एका पोर्तुगीज मिशनरी माणसाच्या संगतीत चहापान करी. वाचनाला त्याने कधीच फाटा दिला होता. कारण सगळ्या ग्रंथांत दुःखाचे एकच रडगाणे भरलेले आहे असे त्याला वाटत असे. वृत्तपत्रांना तर तो क्वचितच शिवत असे. चुलत्याच्या वारशापायी एवढे मोल द्यायला दुसरा कोणी तयार झाला नसता. पण रॉबेर्तला एक मुलगी होती आणि तिच्या भवितव्याची काळजी त्याला लागून राहिली होती. या गोष्टीत त्याच्या दुःखी मनाला एक प्रकारचा विरंगुळा मिळत होता. युरोपहून येताना ज्या चालीरीती व सवयी रॉबेर्तने आपल्या बरोबर आणल्या होत्या त्यांना तो कवटाळून बसला होता. मुलीच्या भवितव्याच्या प्रश्नात तो मग्न असे, त्या वेळी त्याला आपल्या दुःखाचा काही क्षण विसर पडत असे. युरोपीयनचालीरीतीचा अजून त्याच्या मनावर पगडा होता. त्यांची तो कसोशीने कदर करी, तितकाच तो आपल्या देशबांधवांच्या बाबतीत बेदरकार असे, कारण त्याच्या दृष्टीने हे लोक आपले आयुष्य चैनीत घालवीत. कधी कधी तो आपल्या संभाषणात उपहास, उपरोधाचे बाण त्यांच्यावर सोडी, आणि ग्रीफीनचे साधेसुधे जीवन आपण जगणार अशी प्रतिज्ञा करी. पालखीचे भोई, हुक्का तयार करणारे नोकर, पंखा चालविणारे सेवक, वाढपी, आचारी, मनोरंजनार्थ कहाण्या सांगणारा ब्राह्मण, पाय चेपणारा दास, हे सगळे रॉबेर्तला निरर्थक वाटत. हास्यास्पद वाटत. त्यांना सोडचिठ्ठी द्यावी असा विचार कधीकधी त्याच्या मनात येईल. पण त्याचे काका अजून इस्टेटीचे मालक होते. त्यांच्या मर्जीबाहेर वागणे, अर्थातच त्याला अशक्य होते.

ज्या समाजात राबेर्त वाढला त्या समाजाबाहेर तो कधी गेला नाही. त्यामुळे तरुणपणातले दोष अजून त्याला चिकटून राहिले होते. वार्धक्यात ते नष्ट होत जातात. इतकेच नव्हे तर त्यांचे गुणात पर्यवसन होते. तो हिंदुस्थानात आला तेव्हा त्याचे काका आजारी होते आणि आपल्या कामधंद्यानिमित्त शहरात वास्तव्य करून राहाणारे इंग्रज विरळा होत चालले होते. त्यामुळे तो स्वकीयांना दुरावला होता. शिवाय, गतस्मृतींच्या भाराखाली त्याचे एकलकोंडे मन चिरडून गेले होते. हिंदुस्थानातले रीतीरिवाज आपल्या रीतीरिवाजापासून बरेच भिन्न असतील या गोष्टीचीही त्याला तितकीशी जाणीव नव्हती.

पदोपदी त्याला छळणारी, जाळणारी वेदना त्याच्या उदासीनतेतून प्रकट होत होती. त्याची वागणूकही दिवसेंदिवस निष्प्रेम होत चालली होती. आपल्या नोकरचाकराशी चालण्या–बोलण्याची पद्धतही कडवी होती. त्यांच्याशी तो क्वचितच बोले. त्यांच्या प्रश्नांना तिरसट उत्तरे देई. आणि त्यांच्या आर्जवी, हांजीखोर वृत्तीचा धिक्कार करी.

माग्नोद हा ब्राह्मण त्याचा फार विश्वासू होता. त्याला तो फार मानीत असे. तरीदेखील त्याच्याशी रॉबेर्तची वागण्याची तऱ्हा मासलेवाईक होती.

हा माग्नोद कोण?

या प्रश्नाचे उत्तर वाचकांना पुढील प्रकरणात मिळेल.

अनुक्रमणिका

३

ब्राह्मणांचे पावित्र्य

ब्राह्मण हे एक कुल आहे, एक जात आहे. ब्रह्म हे सूर्याप्रमाणे तेजस्वी असून ब्राह्मण हे त्याचे किरण होत. देवाच्या मुखातून ब्राह्मण निघाले, जणू त्याचे पवित्र उद्‌गार. शुद्र देवाच्या पायापासून निघाले, जणू अपवित्र धूळ. ब्राह्मणांना स्पर्श करण्याची शुद्रांना अन अस्पृश्यांना बंदी आहे. झाडाच्या मुळांना त्याच्या फुलांचा स्पर्श घडत नाही. पायाच्या तळव्यांना मुखाला स्पर्श करता येत नाही. तीच गत.

अस्पृश्यांनी ब्राह्मणांना स्पर्श करण्याचे धाडस केले तर त्यांच्या हातावर नरकाचा ठसा उमटतो. ब्राह्मणांच्या अंगावर गाईचे रक्त सांडले तर ते त्याच्या हाडाच्या गाभ्यापर्यंत जाऊन भिनते. ब्राह्मणाचे पावित्र्य हे पानावर तरळणाऱ्या दवबिंदू प्रमाणे असते. पानाला स्पर्श होताच दवबिंदूचे अस्तित्व नष्ट होते.

माणूस काही स्खलनातून आपला उद्धार साधतो. **ज्यॉबचे** पतन दुःखदारिद्र्याच्या दरीत होते. तेव्हाच, त्याला सामर्थ्य लाभते, दिव्यत्व लाभते. त्याचे कोड हेच त्याचे भूषण ठरते. त्याच्या दुःखोद्‌गारातून स्तोत्र स्रवू लागते. त्याच्या एकांतवासात देवदूत नांदू लागतात. त्याच्या श्रद्‌धेच्या प्रकाशाने अंधार उजळून निघतो. आशेच्या झोक्यांनी त्याची व्यथा दूर होते. **साउल**च्या पतनातून **पॉल** उभा राहतो. दुबळ्या **गालिले**वच्या पतनातून **पीटर** निघतो. प्रेमाने धगधगणाऱ्या अश्रूंनी पुनीत झालेला. पतिता **माग्दालेना**च्या स्खलनांतून नवी उज्ज्वल माग्दालेना निघते. शरीराचे पतन हे दुर्दैव. आत्म्याचे पतन हे पाप. पश्चाताप हा पापक्षालक. आपदा म्हणजे साधुत्वाचे दूध. एकदा का चांडाळाचा स्पर्श ब्राह्मणाला झाला, किंवा गाईच्या रक्ताचा शिंतोडा त्याच्या अंगावर उडाला, म्हणजे त्याला मुक्ती नाही. **कार्तागो**, **निनिव्ह**, **जेरुजलिम** प्रमाणे तो कायमचा नष्ट होतो. त्याचा उद्धार नाही. त्याच्या पतनाला नरक हे दुसरे नाव.

ब्राह्मणाची तुलना **गोलकोंदा**च्या हिऱ्यांशी करतात. त्या हिऱ्याला म्हणे सावली नसते. ब्रिटनमधल्या एर्माइन या प्राण्याच्या शुभ्रतेची त्याला उपमा देतात. ती नुसत्या स्पर्शाने डागळते.

ब्राह्मणाचे पावित्र्य हे कौमार्यासारखे पूर्णत्वाने नटलेले, अभयाचा वरदहस्त असलेले अक्षय असायला हवे. खग्रासग्रहण लागलेला चंद्र पुनरेव आपल्या मूळ दिप्तीने व सौंदर्याने तळपू लागतो. ब्राह्मणाची गोष्ट अशी नाही. एकदा का तो भ्रष्ट झाला म्हणजे त्याच्या उद्धाराचा मार्ग बंद होतो. कुमारिकेची गत अशीच.

असा हा ब्राह्मण धार्मिक समजूतींनी रंगविलेला, अहंकार आणि धर्मवेडा यांनी रेखाटलेला, वेदांत वर्णिलेला नव्हे. वेदांतील ब्राह्मण हा पावित्र्यात कमी, पण मानवतेत श्रेष्ठ. माग्नोद हा ब्राह्मण धर्मसमजूतीनी घडविलेला; वेदांत वर्णिलेला नव्हे.

लहानपणीच त्याने वृद्ध दाविसच्या घरात प्रवेश केला होता. तेथे त्याचे मोकळ्या मनाने स्वागत झाले. कारण तो चलाख होता तसाच इंग्रजी भाषेच्या प्राविण्याबद्यलही प्रसिद्ध होता. तीव्र बुद्धिमत्ता, ब्राह्मणविशिष्ट धूर्तता आणि हिंदुस्थानात क्वचितच दिसून येणारी उद्यमशीलता या गुणांमुळे थोड्याच

अनुक्रमणिका

अवधीत त्याने आपल्या धन्याचे प्रेम व विश्वास संपादन केला. आणि दाविसनेही तो हितकर्ता आहे असे मानून त्याला नेहमीच स्नेहाळ वागणूक दिली.

माग्नोद पस्तीशीच्या आतबाहेर असावा. सुदृढ पिंडप्रकृतीचा, प्रमाणबद्ध शरीराचा, नितळ रंगाचा, काळ्याभोर डोळ्यांचा, लाल, नाजूक ओठांवर भरगच्च मिशा असलेला, नजर तेजस्वी व शोधक, गंभीर मुद्रा, सफेद तलम पैरणीवर काश्मीरी कोट, त्याच्या डाव्या बाजूच्या खिशातून सोन्याची साखळी लटकत असलेली, कमरेला धोतर अशा सफाईने लपेटलेले की, ती तुमानच वाटावी. धोतर गुडघ्यापर्यंत आलेले; त्यात मांड्या झाकलेल्या, तंगड्या उघड्या, पायात लाल चढाव, माथ्याला त्याच रंगाची टोपी.

माग्नोदला द्रव्याची अभिलाषा नव्हती पण मानसन्मानाची लालसा जबर. दाविस रंगात आला म्हणजे त्याच्या पाठीवर थाप मारून त्याला क्षेमकुशल विचारायचा, तेव्हा त्याच्या आनंदाला पारावर नसे. आपल्याला घरोब्याने वागविण्यात यावे असे त्याला वाटत असे. दाविसची ह्या गोष्टीला हरकत नसे. कारण माग्नोदच्या सेवेच्या आणि विश्वासूपणाच्या मोबदल्यात दाविस त्याला द्रव्यापेक्षा शब्दाचीच खैरात अधिक करी. आणि त्याच्या अहंकाराचे पोषण करी. त्यामुळे माग्नोदला आपल्या धन्याच्या कृपालोभाची व प्रशंसेची इतकी सवय झाली होती की, तो त्यांची जणू हक्काने अपेक्षा करी.

इतर गोष्टीत तो कपटी कारस्थानी होता. आपली नाराजी लपविण्यात कुशल होता. संतापाच्या वेळी ओठांवर हास्य खेळविण्यात, सूडबुद्धीचा थांग लागू न देण्यात अपमानाच्यावेळी मनाची स्थिरता राखण्यात मोठा पारंगत होता. तो बुद्धिमान खरा, पण धार्मिक बाबतीत दुराग्रही होता. त्याचा बुद्धिवाद आंधळा होता. तो जगदीश्वरवादी होता पण देहभोगाच्या खातेऱ्यात लोळत रहावे इतका त्याचा जगदीश्वरवाद बोजड नव्हता. त्याचप्रमाणे तो इतका सूक्ष्म व उच्च नव्हता की, देहदंड, उपवास वगैरे प्रकारात त्याने धर्मसर्वस्व मानावे. धर्मांध असल्यामुळे तो आपल्या अतिरेकी बुद्धिवादाचा दास बनला होता. मुक्या प्राण्याबद्दल त्याला जेवढी दयामाया वाटे, तेवढीदेखील अस्पृश्यांबद्दल दाखविण्याचे औदार्य त्याच्या अंगी नव्हते. जातिसंस्थेच्या तत्त्वाचा तो कट्टा पुरस्कर्ता होता. जातिसंस्था ही त्याच्या दृष्टीने एक अढळ धर्मतत्त्व होते. आत्मोद्धाराचा मार्ग परमेश्वराने केवळ ब्राह्मणानांच मोकळा ठेवला आहे. ख्रिस्ती धर्माने मात्र तो अधिकार सर्वांना बहाल केलेला आहे. त्यात भविष्याची आशा आहे आणि वर्तमानाचे सांत्वन आहे.

पाश्चात्य संस्कृतीची ओळख, दाविसचा सहवास, पाद्री फ्रान्सिश्कुची दीर्घ मैत्री, या सगळ्या गोष्टी माग्नोदच्या धर्मश्रद्धेत कोणताच बदल करू शकल्या नाहीत. बायबलच्या पानापानांवर शिंपडलेली उदात्त तत्त्वे, उदात्त प्रतिके, उदात्त भावना या अहंकारी ब्राह्मणाचे मन वळवू शकल्या नाहीत. त्याचप्रमाणे पाद्री फ्रान्सिश्कुच्या हृदयावर कोरलेली आणि त्याच्या दैनंदिन आचरणात उतरलेली नीतीतत्त्वेही, त्याच्या कर्मठ, आकुंचित दृष्टिकोनांत फरक पाडू शकली नाहीत.

काही दिवसांपूर्वी, एक ब्राह्मण गंगेच्या काठावर गेला असताना, तेथेच बेशुद्ध होऊन पडला. नदीच्या लाटांनी त्याला मुक्तीचा मार्ग दाखववायचा; पण एका इंग्रज गृहस्थाने, त्याला अपघात झाला आहे असे समजून, आपल्या घरी आणले. आणि शक्यते उपचार करून त्याला जीवदान दिले. त्याने परधर्मीयाचे हातचे पाणी प्राशन केले या सबबीवर ब्राह्मण वर्गाने त्याला दोषी ठरविले. ब्रिटिश न्यायदेवतेने त्या इंग्रजी माणसाला अपराधी ठरवून समाजाने वाळीत टाकलेल्या त्या दुर्दैवी ब्राह्मणाच्या योगक्षेमाची

जबाबदारी त्याच्यावरच टाकली. हा लाजिरवाणा प्रकार त्या ब्राह्मणाला असह्य होऊन त्याने आत्महत्या करण्याचे ठरविले. आणि दुःखाची गोष्ट ही की, त्या असाहाय्य इंग्रजी गृहस्थाने त्याला ती करू दिली.

मार्ग्नोद हा अशा प्रकारचा ब्राह्मण होता. रॉबेर्तची वागणूक मार्ग्नोदला फारच जाचक होत होती. रॉबेर्त त्याच्याशी क्वचितच बोले आणि बोलताना त्याची टिंगल करी. ‘काळा आदमी’ म्हणून त्याला हाक मारी, मानभावी मार्ग्नोद ही थट्टामस्करी गिळून गप्प राही. पण त्याच्या हृदयात मात्र भडका उडत होता आणि त्याचे रक्त पेटत होते. पण स्फोटाचा क्षण आला नव्हता.

अनुक्रमणिका

४

पतन

बंगल्याच्या प्रशस्त गॅलरीत भोजनगृह होते. त्याच्या पाचही खिडक्या खालच्या बागेवरती आल्या होत्या. बागेत पाण्याचे पाट सळसळत होते. त्यामुळे तेथील वनस्पती रसरसत होती. खाली जमिनीवर हिरवळीचा दाट गालीचा अंथरला होता. जँस्मिनची फुलझाडे संध्याकाळच्या वाऱ्याच्या झुळूकांनी हलत होती. व वातावरणात सौम्य सुगंध उधळीत होती. खिडक्यांसमोरच्या भिंतीवर रंगीबेरंगी गोंडे लावलेला भला मोठा रेशमी पंखा दिसत होता. दोन जवान नोकर तो हलविण्यात गुंतले होते.

एप्रिल महिन्यातील एक गुरुवार. सकाळची वेळ. सातचा सुमार. मधल्या मेजावर रंगीबेरंगी काचपात्रे चकाकत होती. सिंधचे रुपावत व जपानी कलाकुसरीची भांडी प्रेक्षकांचे मन वेधून घेत होती.

मेजाभोवती तीन इसम बसले होते. छताला लटकणाऱ्या दोन दिव्यांचा लख्ख प्रकाश दालनात ओसंडत होता. तो दिवसाच्या प्रकाशाइतकाच स्वच्छ होता. त्या तिघांपैकी एक हिंदी सैनिकदलांतील तरुण अधिकारी होता. त्याचे नाव फ्रेर. असफच्या दरबारात तो रेसिडेन्ट होता. दुसऱ्याचे नाव स्मिथ. त्याला टक्कल होते. कपाळाला आठ्या होत्या. सफेद दाढी होती. तो औधचा चीफ मॅजिस्ट्रेट होता. तिघा इसमात तोच विचारवंत दिसत होता. त्या दोघांच्या मधोमध रॉबेर्त बसला होता. तो घरचा यजमान होता. फिझाबादला अलीकडेच वारलेल्या राणीने जी संपत्ती मागे ठेवली होती, त्यासंबंधी फ्रेर बोलत होता. आपल्या पश्चात् तिने ठेवलेल्या उंची दागदागिन्यांचे तो रसभरित वर्णन करीत होता. तिचे जडजवाहीर वीस लाख पौंड किंमतीचे होते. मॅजिस्ट्रेट स्मिथ व रॉबेर्त एकाग्र मनाने त्याचे भाषण ऐकत होते.

एवढ्यांत, दरवाजा लोटून एक शिपाई आत आला. रॉबेर्तसमोर वाकून त्याने तीनदा मुजरा केला आणि मग एक बंद लिफाफा त्याच्या हातात दिला. तो एक तारेचा संदेश होता. रॉबेर्त पाहुण्यांच्या परवानगीसाठी किंचित वाकला. बंद लिफाफा उघडला आणि आपल्या कागदाच्या मजकुरांवरून त्याने नजर फिरविली.

मग शिपायाकडे वळून त्याने त्वेषाने म्हटले,

“माग्नोदला इकडे ताबडतोब यायला सांग. त्याच्याशी मला बोलायचं आहे.”

शिपाई तातडीने निघून गेला आणि थोड्या वेळाने परत येऊन त्याने मालकाला कळविले की, माग्नोद इकडे येऊ इच्छित नाही.

बुद्धिपुरस्सर असेल किंवा चूकभूलीने असेल, शिपायाने कळविलेला संदेश बरोबर नव्हता. माग्नोदने कळविले होते की, यावेळी आपण येऊ शकत नाही. येऊ इच्छित नाही या पर्यायात अनेकदा उद्धटपणाच व्यक्त होतो.

माग्नोदच्या अनपेक्षित उत्तराने रॉबेर्त चमकला. त्याने आपल्या पाहुण्यांकडे बघितले. ते देखील त्याला संतप्त दिसले. माग्नोदचा उद्धटपणा पाहून तो बेभान झाला, त्याने पायाची आदळआपट केली. आपण कोठे आहोत आणि काय करीत आहोत याचे देखील त्याला भान राहिले नाही. तो आपल्या भोयांना ओरडून म्हणाला "त्याला आत्ताच्या आता माझ्यासमोर घेऊन या. जरूर तर फरफटत ओढत आणा. चला."

त्याच्या तोंडून हे शब्द निघण्याचा अवकाश, भोई तेथून दिसेनासे झाले.

आणि थोड्याच वेळात माग्नोद तेथे येऊन ठेपला. त्याने एक गुडघा जमिनीला लावला होता. दोघा नोकरांनी त्याचे दंड घट्ट पकडून ठेवले होते. हे दृश्य भयानक होते. डोक्यावर रुमालही नव्हता. केस विस्कटले होते. चेहरा पांढराफटक पडला होता. धाप लागली होती. त्यामुळे छाती वरखाली होत होती. ओठाच्या कोपऱ्यात फेस साचला होता. डोळ्यांत ठिणग्या उडत होत्या.

रॉबेर्तच्या इशाऱ्याबरोबर नोकरांनी त्याला मोकळा सोडला तशी तो धन्याच्या डाव्या बाजूला जाऊन थरथर कापत उभा राहिला. त्याने हात सैल सोडले. मान खाली घातली आणि काही वेळ निश्चल राहिला.

"धन्याचा हुकूम पाळावयाचा असतो हे तुला माहीत नाही?" रॉबेर्तने आपले थरथरणारे ओठ किंचित विलग करून विचारले.

"ते मला माहित आहे"— ब्राह्मण भीषण शांततेने म्हणाला— 'पण मला हे देखील माहीत आहे की, ब्राह्मणाचं पहिलं कर्तव्य ईश्वरविषयक आहे. मी देखील एक उच्चवर्णीय गृहस्थ आहे." स्मिय आणि फ्रेर हे संभाषण उद्विग्न मनाने ऐकत होते. रॉबेर्तची तापट वृत्ती त्यांना परिचित होती. पण माग्नोद वृत्तीने संथ व गंभीर असल्यामुळे काही अनुचित प्रकार घडेल असे त्यांना वाटले नाही.

"तुझ्या परमेश्वराशी मला काय करायचे आहे? नोकराची वागणूक हाच माझ्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न आहे," रॉबेर्त त्वेषाने म्हणाला.

"साहेब"— माग्नोद मस्तक उंचावून म्हणाला. बोलताना त्याचे ओठ कापत होते— "तुमच्या या नीच नोकरांनी आपले भ्रष्ट हात माझ्या पवित्र अंगावर टाकले या गोष्टीचा निषेध म्हणून मी तुमच्याशी एकही शब्द बोलू इच्छित नाही, तुमचं वर्तन सर्वथैव निंद्य आहे." "चूप! नीच माणसा, अधिक बोलू नकोस माझ्यासमोर" इतके संतापाने बोलून त्याने गोमांसाने भरलेली बशी माग्नोदच्या तोंडावर फेकली. निमंत्रित पाहुणे हा अनपेक्षित प्रकार पाहून यंत्रवत ताठ उभे झाले. नोकरांच्या डोळ्यांची पाती लवेनाशी झाली.

माग्नोदने आपले तोंड दोन्ही हातांनी झाकून घेतले आणि गुदमरेलेल्या आवाजात तो ओरडला,

"माझा सत्यानाश झाला!" "याला घेऊन जा इथून" रॉबेर्त नोकरांकडे वळून वेड्याप्रमाणे किंचाळला. तत्काळ दोन नोकर पुढे झाले आणि माग्नोदला घेऊन जाऊ जागले.

अनुक्रमणिका

माग्नोद संथ पावलांनी दरवाजापर्यंत गेला. मग थांबला. विचारात पडला. मग आपल्या जळजळीत नजरेचे निखारे फेकीत श्वापदाप्रमाणे गुरगुरला आणि तेथून बाहेर पडला.

काय ती त्याची नजर! काय ती त्याची गर्जना! त्याच्या मनात उफाळून आलेला त्वेष, संताप, सूड त्याच्या डोळ्यात त्या वेळी साचला होता. हजार चित्त्यांचे डोळे तेथे एकवटले होते. मृत्यूची शिक्षा झालेल्या गुन्हेगाराच्या मनात उसळणारा भयानक प्रश्न त्याच्या गर्जनेत साचला होता. त्याची नजर आणि गर्जना म्हणजे बंदुकीची ठिणगी, आणि तोफेचा आवाज. मानवी विकारांचीं ती चमक आणि गडगडाट. मानवी विकारातदेखील भयंकर वादळे उठत असतात.

त्या भोजनगृहात काही वेळ स्मशानशांतता पसरली. कुणालाही असे वाटावे की, माग्नोदच्या नजरेने तेथील मंडळीचे रक्त गोठवून टाकले आहे.

आवेगाचे क्षण ओसरले, तेव्हा रॉबेर्तच्या मनावर अनुतापाच्या लाटेने आक्रमण केले. पाहुण्यांसमोर आपल्या अविचारी वर्तनाचे समर्थन कसे करायचे हेच त्याला कळेना. आपल्या अतिरेकी, आततायी वागणुकीने त्याने पाहुण्यांची मने घायाळ केली होती. फ्रेर हतबुद्ध झाला होता. मॅजिस्ट्रेट स्मिथचा हिंदी चालीरीतीची ओळख असल्यामुळे त्या भयंकर घटनेची कारणे उमगली. पण रॉबेर्तची मनःस्थिती अधिक बिकट होईल म्हणून ती विशद करण्याचा त्याला धीर झाला नाही.

बराच वेळपर्यंत कुणीच बोलले नाही. त्या स्तब्धतेचा भंग करीत फ्रेर म्हणला, ‘या लोकांचा उद्दामपणा खरोखर असह्य आहे.’

‘असह्य आहेत त्या धार्मिक कल्पना’ स्मिथ म्हणाला.

‘असं कसं म्हणता?’ रॉबेर्तने प्रश्न केला. स्मिथ किंचित विचारात पडला. पण नंतर निर्धाराने म्हणाला, ‘त्याचं असं आहे की, कोणताच ब्राह्मण आम्हा परकीय लोकांचं जेवण चाललं असताना आमच्यापाशी यायला कबूल नसतो.’

‘खरं आहे तुमचं म्हणणं’ फ्रेरने मॅजिस्ट्रेटला दुजोरा दिला.

मग थोडावेळ थांबून रॉबेर्तने वाढप्याना इशारा केला, रॉबेर्तने कोणतीच हालचाल केली नाही. अधून मधून तो आपली वळवलेली मूठ कपाळावर घाशीत होता. जणू काय मस्तकातील एक विचार त्याला ठेचून काढायचा आहे. परंतु पश्चात्तापाने त्याच्या डोक्यात आधीच घर केले होते. भोजनगृहात हा प्रकार चालू असताना माग्दनो दाविसच्या खोलीत शिरला. तेथे तो बराचवेळ थांबला. मग तो बंगल्यातून बाहेर पडला.

त्या वेळी मध्यरात्र उलटली होती. निमंत्रित पाहुणे उठले. भोजनाचा कार्यक्रम पाच तास चालला होता.

५

शोकदग्ध ब्राह्मण विधवेची आत्महत्या

आम्ही कथन केलेल्या घटनेनंतर तीन दिवसांनी एक इसम अंतरा अंतरावर थांबून माग्नोदच्या घराभोवती घिरट्या घालीत होता. पण घरात शिरण्याचे त्याला धैर्य होत नव्हते. त्याची मनोदेवता त्याला सांगत होती, “हो पुढे” तर त्याचा अहंकार त्याला बजावीत होता. “फिर मागे”

त्याचे मन याप्रमाणे हेलकावे खात होते. अहंकाराचा भाला त्याच्या मनाला टोचत होता. त्या वेदनेची कल्पना करणे दुर्घट होते. दुसरा एक विचार त्याला सतावीत होता. आपली अवस्था लोकांना करुणास्पद वाटेल हा तो विचार. तो त्याला सतावीत होताच. पण त्यापेक्षाही दुसरी एक भीती त्याला दुःसह होत होती. एवढ्या अवहेलनेनंतर आपल्याच नोकराने आपली परस्पर संभावना केली तर आपल्याला काय वाटेल?

“माझ्या पदरी काल परवापर्यंत असलेल्या एका हिंदी माणसाचा उद्दामपणा सहन करण्याची शक्ती माझ्या अंगी असेल काय? कदापी नाही! तसं केलं तर या माणसाच्या दृष्टीनं ती एक नामुष्कीची गोष्ट ठरेल. ज्या प्रतिष्ठेवर युरोपीयन लोक या देशात जगत आहेत त्या प्रतिष्ठेला मी धक्का लावल्यासारखं होईल. छे, छे! .... त्यापेक्षा मी परत जाईल....”

पण तो परतत नव्हता. कोणीतरी त्याला तेथे आपल्या जबरदस्त हाताने जखडून टाकीत होते, त्याचे हृदय चिरडून टाकीत होते. आणि तो रात्री दुष्ट स्वप्नांनी घेरला जाणार होता. हा राक्षस दुसरा तिसरा कोणी नसून त्याची मनोदवताच होती आणि तिचे भक्ष्य ठरलेला हा इसम म्हणजे दाविसचा तरुण पुतण्या होता.

शेवटी, मनाचा निर्धार करून रॉबेर्त लगबगीने घराच्या पायऱ्या चढला. उंबरठ्याबाहेर थबकला आणि कान देऊन ऐकू लागला.

घरात शून्य स्तब्धता नांदत होती.

त्याने दरवाजावर थाप दिली. पण कोणीच ओ दिली नाही. मग त्याने कुलूपाच्या फटीतून घरात नजर फेकली. तशी तो दचकून मागे सरकला. त्याला एक प्रेत दिसत होते.

ही वार्ता कळविण्यासाठी तो तत्काळ पोलीसठाण्यावर धावला. काही क्षणाच्या आत पोलीस आले. आणि त्यांनी इतर लोकांच्या मदतीने दरवाजा फोडला. तेव्हा सगळ्याना एक भीषण दृश्य दिसले. एका प्रशस्त दालनात एक बाई दोरीच्या गळफासाला लटकत होती. ती सफेद वेषात होती. तिची जीभ बाहेर आली होती व चेहरा सुजला होता. जिवणीच्या दोन्ही कोपऱ्यात लालसर, काळसर लाळीचे ओघळ दिसत होते. खाली जमिनीवर एका कुत्र्याला कवटाळून दोन उघडी बागडी पोरे गाढ झोपली होती. सगळे प्रेक्षक

या दृश्याने पाषाणवत स्थिर जाले. कारण, ते दृश्य तसेच भयानक होते. त्यात माणूस आणि पशू, जीवन आणि मृत्यु, अपराधी आणि निरपराधी हे सारे एकत्र झाले होते.

मुफ्तीची—त्या कुत्र्याची नजर रॉबेर्तवर पडली मात्र, तो त्वेषाने त्याच्याकडे धावत आला व त्याने आपले डोळे त्याच्यावर रोखले. त्याबरोबर त्या उद्दाम इंग्रजाचे मस्तक लवले आणि त्याच्या अंगावर काटा उभा राहिला. कुत्र्याने दिलेला निर्णय त्याला कळला असावा. कारण, आपली मनोदेवता हीच आपली न्यायदेवता असते. म्हणून तर निर्जीव दगडातून साक्षीदार निघतात. पशू न्यायाधीश बनतात. बिछाना वधस्थान बनतो. जीवनाचा नरक होतो. पण दोषी दोषमुक्त होऊ शकत नाही. त्याक्षणी मुफ्ती हा न्यायाधीश बनला होता. आणि रॉबेर्तचे मन हेच त्याचा जुलमी दुश्मन बनले होते.

त्या दारुण घटनेमुळे फिझाबादमध्ये मोठी खळबळ माजली. लोकांचे थवे माग्नोदच्या घराकडे लोटू लागले.

आत पोलीस पंचनामा करण्यात गुंतले होते. बारीक—सारीक गोष्टींची ते नोंद करीत होते, चौकशी करीत होते. आणि एका बाजूला खुर्चीवर बसलेला रॉबेर्त समोरच्या प्रकाराकडे शून्य मनाने पाहात होता.

काही वेळानंतर एक शिपाई आत आला आणि चौकशीच्या एकसूरीपणाचा भंग करीत त्याने पोलीस अधिकाऱ्याच्या हातात एक पत्र देऊन म्हटले. “हे पत्र पलंगावर सापडलं. त्यातील मजकूर मला माहीत नाही.”

शिपायाच्या या उद्‌गारांनी प्रेक्षकांचे लक्ष एका नव्याच प्रश्नाकडे वेधले. रॉबेर्त ताड्कन उभा राहिला. पोलीस अधिकाऱ्याने प्रथम ते पत्र वाचून काढले. मग त्यातील आशय समजून घेण्याच्या उत्कंठेने तेथे गोळा झालेल्या समुदायाला त्याने ते खणखणीत आवाजात वाचून दाखविले.

प्रिय भिमा,

सर्व प्राणिमात्राचा राजा म्हणून मी जन्माला आलो. पण, आज रानावानत वणवणत आहे. विषारी बाणाने जखमी झालेला पक्षी आकाशातल्या उंचीवरून खाली कोसळावा तशी माझी गत झाली आहे. जगाला प्रकाश देण्यासाठी, ब्रह्माने माझ्या शरीरात उजळलेला दिवा एका चांडाळाच्या अपवित्र स्पर्शाने आणि पवित्र गाईच्या रक्ताच्या विटाळाने समूळ मालवला. नरकाच्या खोल गर्तेत माझा आत्मा कोसळला असून तेथून तो कधीच वर येण्याची आशा नाही. गंगेच्या पाण्याइतक्याच पवित्र आणि विपुल अश्रूधारा माझ्या डोळ्यातून वाहात राहिल्या. तरी नरकाचा जो डाग माझ्यासारख्या उदात्त भालावर फेकला गेला. तो धुऊन निघणे दुरापास्त.

दुर्दैवाशी मुकाबला करणे यासारखी दुसरी महान गोष्ट नाही. सर्वभक्षक नियतीशी झुंज देणे म्हणजे शुद्ध वेडेपणा. जे असाध्य ते अजिंक्य. विधिलिखित घडल्याशिवाय रहात नाही. आज माझ्याभोवती अंधार दाटला आहे. मला काहीच दिसत नाही. फक्त तो दुष्ट मात्र माझ्या अफाट सूडबुद्धीच्या चमकाऱ्यांनी उजळल्यामुळे शुभ्र ठिपक्याप्रमाणे मला सतत दिसत आहे.

अनुक्रमणिका

मृत्यूला कवटाळण्याची मी धडपड करीत आहे. पण तो जवळ दिसत नाही. चिरंतन हाल आणि सूडबुद्धीचा नंगानाच यांच्या मधोमध मी लोंबकळत आहे. परमेश्वरा! मृत्यूचा दरवाजा तू का बंद केलास?

यापुढचे माझे आयुष्य म्हणजे एक भयाण रात्र. ती अधून मधून सूडाच्या चमकाऱ्यांनी उजळून निघेल तेवढीच. माझ्याकडे पाहून सगळे पाठ फिरवतील. सगळेच माझ्याकडे बोट दाखवतील. कुणीच माझ्याशी बोलणार नाही. चांडाळ माझी कुचेष्टा करतील. ज्ञातीश्रेष्ठत्वाचा वेष माझ्या अंगावर नसेल. कुलश्रेष्ठत्वाचे चिन्हही माझ्या हातात नसेल. त्यामुळे उपरोधाची उपहासाची शस्त्र मला घायाळ करतील. आणि ती माझ्या अंगात खोलवर रुतून बसतील. माझ्या हाकेला परमेश्वर धावून येणार नाही. कारण ब्राह्मणाचा प्रार्थना करण्याचा पहिलावहिला अधिकार मी गमावून बसलो आहे. काही झाले तरी मला जगायचे आहे. त्याचप्रमाणे केवढ्याही त्यागाच्या मोबदल्यात मला सूड घ्यायचा आहे. कारण सूड हाच माझा स्वर्ग.

प्रिय भिमा! दुर्दैव तुझे नि तुझ्या मुलांचे. कुऱ्हाडीच्या प्रहाराने झाडाचे खोड अमंगळ खातेऱ्यात पडते तेव्हा पानाफुलांना कोठले पावित्र्य? सगेसोयरे, मित्र, नातेवाईक या सगळ्यांना वंचित झालेल्या तुझ्या आयुष्याची काय दुर्दशा उडेल? प्रत्येक वियोगाला शेवट असतो. प्रेमिक याच आशेवर विसंबून जगत असतो. त्यासाठी तळमळतो.

तुझा कायमचा निरोप घेतो.

तुझा
मान्नोद.

या पत्राचे वाचन चालले असताना रॉबेर्तची मान खाली झाली. नजर जमिनीला खिळली. आणि तो पुतळ्याप्रमाणे निश्चल झाला. त्या पत्रातील प्रत्येक शब्द त्याच्या काळजात घुसत होता. नजर वर करण्याचा त्याला धीर झाला नाही. त्याला अशी भीती वाटली की, आपल्या अंतरंगात चाललेल्या वादळाचा प्रेक्षकांना आपल्या मुद्रेवर थांग लागेल. आणि सगळ्यांच्या तोंडून उद्‌गार निघतील, “या सगळ्या दुःखाला कारणीभूत तूच आहेस”.

पोलीस अधिकाऱ्याने पत्राची घडी करून ते खिशात घातले. नवा धागादोरा हाती आल्याचा त्याला आनंद झाला. आता अधिक चौकशीची गरज उरली नव्हती. आत्महत्येचे कारण उघड झाले होते. जातिवंत पोलीसांना या क्रूर आनंदात रस मिळतो. गुन्हेगाराचा शोध करणे व गुन्ह्याच्या कारणाचा तपास लावणे ही गोष्ट म्हणजे एक किचकट समस्या उलगडण्यासारखेच असते.

पंचनामा पुरा करण्यापूर्वी पोलीस अधिकाऱ्याने उपस्थित मंडळीकडे वळून म्हटले, “या मुलांची जबाबदारी कोण उचलीत आहे?”

“नात्यागोत्याची माणसं निश्चित येणार नाहीत.” दुसरा अधिकारी म्हणाला.

“हे काम करायला कोणीच पुढे येणार नाही काय?”

अनुक्रमणिका

पहिल्या अधिकाऱ्याने प्रेक्षकांपुढे प्रश्न टाकला. तो कानांवर पडताच एक इसम ताड्कन पुढे आला आणि त्याने म्हटले— "मी"—

सगळ्यांनी चमकून त्याच्याकडे पाहिंले. तो इसम म्हणजे औधचा पोर्तुगीज पाद्री फ्रान्सिश्कु.

पाद्र्याच्या फिक्कट चेहऱ्यावर यावेळी उन्हाचा एक कवडसा चमकत होता. आणि त्याची प्रभा त्याच्या तुकतुकीत टकलावर पसरली होती. वज्रजडित मुकुट घातल्याप्रमाणे पाद्र्याचा चेहरा तळपत होता. सद्‌गुणांनादेखील आपले सम्राट असतात. रॉबेर्तने प्रेमभराने त्याचा हात दाबला आणि म्हटले,

"आम्ही"—

एका तासानंतर पाद्री फ्रान्सिश्कु घराकडे परतत होता. त्याच्या बरोबर एक कुत्रा व दोन मुले होती. माग्नोदच्या कुटुंबाचे एवढेच अवशेष शिल्लक राहिले होते.

भिमाच्या शवाला त्याच दिवशी मूठमाती देण्यात आली. ब्राह्मणधर्माने तिला अंत्यविधी नाकारला. करुणेने तिच्यासाठी अश्रू गाळले, जी करुणा सर्व धर्मांत श्रेष्ठ धर्म होय. कारण, प्रत्यक्ष परमेश्वरापासून निघालेला तो धर्म होय. मृत्यूच्या नग्नतेवर केवळ श्रद्धाच आपले वस्त्र टाकू शकते.

अनुक्रमणिका

६

प्रायश्चित

रॉबेर्तचे दुःख दिवसेंदिवस वाढतच गेले. अनुतापाची भावना त्याला सतत सतावू लागली. आणि त्यामुळे भोजनगृहातील घटनेचे संभाव्य परिणाम त्याला भडक स्वरूपात दिसू लागले. एका मातेची आत्महत्या, एका पित्याची वेडसर मनःस्थिती, दोन अर्भकांची अनाथ अवस्था, एका सुखी व निरुपद्रवी कुटुंबाचा सत्यानाश असे विदारक चित्र त्याला भेडसावू लागले.

पश्चात्तापाचे शस्त्र हळूवार मनाची चिरफाड करण्यात मोठे तरबेज असते. रॉबेर्त पिंडाने दुष्ट नव्हता. एकाकीपणात त्याची वृत्ती खाष्ट झाली असेल. हिंदी माणसासंबंधी त्याच्या कल्पना कुढ्या असतील. त्याचे आवेश उग्र झाले असतील. लोकमताच्या आदरापेक्षा आपल्याच गुणांची तो फाजील कदर करीत असेल, पण जन्मतः तो वाईट नव्हता. त्याची नीतिमत्ता ख्रिस्ती धर्माच्या संस्कारानुसार घडली होती. त्याच्या हातून अविचाराच्या भरात दुष्कर्म घडले असेल. कारण तो एक माणूस होता. इतरांप्रमाणे त्यालाही विकार होते; पण त्याच्या हातून घडलेल्या अपराधाचा पुरस्कार मात्र तो कधीच करणार नव्हता.

एक दिवस, सकाळच्यावेळी, एका मोठ्या अलमारी समोर आपल्या खोलीत तो बसला होता. पाद्री फ्रान्सिश्कु बाहेर त्याची वाट पहात आहेत, असे त्याच्या नोकराने आत येऊन त्याला कळविले. तशी त्याने पाद्री फ्रान्सिश्कुला त्वरीत आत घेऊन येण्याची आज्ञा केली.

“आमचा धनी झेणूस क्रिस्तचा विजय असो.” रॉबेर्तजवळ पोहचताच पाद्री फ्रान्सिश्कु म्हणाला.

‘**बाँ दिअ**’ खुर्चीवरून उठून रॉबेर्त उद्गारला व त्याने पाद्रीशी हस्तांदोलन केले.

मग, पाद्री फ्रान्सिश्कु बसला. आणि काही क्षण थांबून म्हणाला, “तुम्हाला काही सांगण्यासाठी मी मुद्दाम इकडे आलो आहे. ते ऐकून घ्यायची सवड आहे का तुम्हाला”?

“हा पहा तुमच्या सेवेला मी सादर आहे.” समोरचे कागदपत्र बाजूला सारीत रॉबेर्तने म्हटले.

“ज्या दोन मुलांचा प्रतिपाळ आम्ही अंगावर घेतला आहे त्यांच्यासंबधी मला थोडं बोलायचं आहे. त्यांना लंडनला पाठवून एखाद्या आयरीश शाळेत ठेवण्याचा माझा विचार होता. पण इच्छा असून भागत नाही. त्यांचा खर्च भागविण्याइतकी माझी सांपत्तिक स्थिती समाधानकारक नाही म्हणून मदत मागण्यासाठी मी तुमच्याकडे आलो आहे. या पोरक्या मुलांना मदत केली तर देव तुमचं भलं करील.”

“पाद्रीसाहेब—” रॉबेर्त सद्गदित होऊन म्हणाला. “तुम्ही विशेष काही मागत नाही. एवढंच मागता की, जे परमेश्वरी न्याय व मानवी न्याय या दोन्ही न्यायाच्या नावानं माझ्यापाशी मागण्याचा तुम्हाला अधिकार आहे. या हतभागी मुलांना मी फार मोठं देणं लागतो. त्यांचं ऋण पूर्णतया फेडणं या जन्मी मला शक्य नाही. त्यांच्या मातेच्या ममतेपासून मी त्यांना वंचित केलं. पित्याच्या संरक्षणाचं छत्र मी त्यांच्यापासून

हिरावून घेतलं. सग्यासोयऱ्याच्या आणि शेजाऱ्यापाजाऱ्याच्या संगतीवर मी घाला घातला. म्हणून त्यांचं दुःख कमी करण्यात माझा हातभार लागला तर तेवढंच मला समाधान लाभेल. लंडनला माझी मुलगी एका आयरीश कुटुंबात आहे. तुमची आडकाठी नसली तर या मुलांना आपण तिकडेच पाठवून देऊ. हेलेनला दोन भाऊ मिळतील. मला दोन मुलं मिळतील. त्यांच्या मासिक खर्चाची रक्कम मी नियमितपणे तुमच्या स्वाधीन करीन. ती तुम्ही त्यांना पाठवून द्या. आमची ही योजना षट्कर्णी होऊ नये अशी माझी इच्छा आहे. इकडच्या लोकांचं धर्मवेड किती भयंकर असतं याची तुम्हाला कल्पना आहेच."

मग पाद्री फ्रान्सिश्कु उठला. या सज्जन माणसाच्या गंभीर चेहऱ्यावर दैवी समाधानाची लकेर चमकली. आणि त्याच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. पश्चात्तापाने पवित्र झालेल्या पापी माणसाला पाहिल्यावर सज्जन मनाला जे समाधान लाभते त्याची सर कशाला येईल? अनीतीच्या नरकात सापडलेले मन पश्चातापाच्या जोरावर सर्व पातकांपासून मुक्त होते. आणि स्वर्गलोकात त्याचे विशुद्ध स्वरूपात स्वागत करण्यात येते. त्या महोत्सवाचा आनंद जणू पाद्री फ्रान्सिश्कुच्या मुद्रेवर ओसंडत होता.

पाद्रीने आपले डोळे आकाशाकडे लावले आणि मग ते रॉबेर्तकडे वळविले.

त्याच्या तोंडातून शब्द फुटला नाही. मौन हीच प्रबल भावनांची प्रभावी भाषा असते.

बराच वेळपर्यंत तेथे गाढ शांतता पसरली. नोकराने न्याहारीची वर्दी दिली. पाद्री फ्रान्सिश्कुला प्रार्थनेसाठी चर्चमध्ये जायचे होते. म्हणून त्याने आपल्या मित्राचा निरोप घेतला.

या भेटीनंतर सहा महिने लोटले. न्यायाधीश स्मिथ लंडनला जायला निघाला. त्याच्याबरोबर माग्नोदची दोन्ही मुले होती. निघण्याच्या पूर्वदिवशी त्यांना बाप्तिस्मा देऊन त्यांचा नामकरण विधी झाला होता. तॉमाश व ॲमिली अशी त्यांना नावे ठेवण्यात आली होती. रॉबेर्त आणि फ्रान्सिश्कु हे त्यांचे धर्मपिते झाले होते.

७

ठग

Pluet super pectatoes laqueos

दाव्हिदचा शाप खरा ठरला. भयानक राक्षसीवृत्ती हिंदुस्थानात बळावल्या. त्यांचे प्रत्यक्ष प्रतीक म्हणजे ठग. ब्राह्मण संस्कृतीत एक व्रण आहे. तेथे कृमी उत्पन्न होतात आणि प्रकाशाच्या स्पर्शाने त्यांचे घातकी सर्पात रूपांतर होते. ब्राह्मण धर्मांच्या विघटनेतून एक राक्षस निघाला. तो विध्वंस करतो. पण तो स्वार्थासाठी नाही. गंमत म्हणून, निष्पाप मनाने, तोंडातून रामनामाचा जप करीत. काली ही मृत्यूची देवता. ठग हे तिचे पुजारी.

परमेश्वरासमोर	—	निंदानालस्ती
माणसासमोर	—	क्रौर्य
विवेकबुद्धीसमोर	—	वेड

ओल्या तळघरात राखून ठेवलेल्या पावाला बुरशी येते, तेव्हा तिचे विष बनते. दारिद्र्यात पिचलेला, जुलमाने छळलेला हिंदी माणूस कालांतराने ठग बनतो, रानटी लोकांच्या या जमातींत पापाची जाणीव नष्ट होते. खुनी माणसांच्या कुटुंबात गुन्ह्याला झळाळी येते. तत्त्वाची प्रतिष्ठा लाभते, क्रौर्याला तेज येते. दुष्टाव्याला दैवी साज चढतो.

प्रत्येक पंथाला युक्तीवादाचा आधार लागतो, प्रत्येक तर्कटाला बुद्धीवादाचे आवरण असते. खोट्या नाण्याला खरा शिक्का असतो त्याचप्रमाणे.

ठग हा पंथनिष्ठ असतो. तो सगळ्यांची उलथापालथ करतो. या कामात तो बिनचूक युक्तीवादी असतो. दूष्ट कृत्यांना तो सत्कृत्ये मानतो. दुष्कृत्यात त्याला सत्कृत्ये दिसतात, गुन्हेगार व संत यांच्यात त्याला फरक आढळत नाही, त्याचा स्वर्ग नरकात असतो, सैतान हा त्याचा देव असतो. या प्रेरणेत, वृत्तीत समाजाला धोका असतो, असली संघटना असल्यास बळकटी देते.

माणसाच्या तहानेला तृप्तीची मर्यादा असते. दैवतांची तृप्ती मात्र अमर्याद असते. जोपर्यंत काली नरभखक राहील तोपर्यंत ठगांचे धर्मकार्य चालूच राहील.

न्यायाच्या तावडीत सापडलेला ठग संताच्या स्थिरतेने वधस्थानाकडे जातो. त्या वेळी त्याचा भालप्रदेश उद्धाराच्या प्रभेने तळपतो. विजयी वीराप्रमाणे त्याच्या मस्तकावर पुष्पमुकूट चढवलेला असतो आणि त्याच्याभोवती गोळा झालेल्या त्याच्या अनुयायांकडून त्याचा जयजयकार होतो. लाजेने चूर झालेले इंग्रज पोलीस त्या दुर्दैवी इसमाच्यासमोर असहाय्य बनतात. कारण धर्मवेडाने बहाल केलेल्या सामर्थ्याच्या जोरावर हे बंडखोर जगातील कोणत्याच सत्तेची कदर करीत नाहीत. मृत्यूच्या अंधाराला ते भीत नाहीत.

अनुक्रमणिका

कारण अमरत्वाची उषा तो अंधार उजळून टाकायला समर्थ असते. त्याच्या मनाला चीत करणारी कोणतीच शक्ती जगात नसते.

श्वापदांच्या भयानक गुहेत ते दिवस कंठितात. व्यसनाच्या, गुन्ह्याच्या, भुकेच्या वातावरणात राहिल्यामुळे, त्यांची अंधःकारमय बुद्धी त्यांना तेथेच खिळवून ठेवते. तीच त्यांच्यावर हुकमत गाजविते. ती त्यांची महाराणी आणि कधी कधी दासी बनते, कधी हुकूमशहा बनते. कधी त्याच्या हातचे खेळणे बनते. **नाबूकोदोनुसार**प्रमाणे देवाच्या अवकृपेला पात्र ठरलेले व माणसाच्या मर्जीतून उतरलेले हे ठग सापांप्रमाणे सरपटत जातात. गरुडाच्या गतीने उडतात. अजगरांप्रमाणे शीळ घालतात. आणि कुत्र्यांप्रमाणे टोळकी करुन राहतात.

कॉलरा आणि ठग हे दोन्ही एकाच साली, एकाच जागी उत्पन्न झाले. हिंदुस्थान ही त्यांची जन्मभूमी. १८१८ हे त्यांचे जन्मवर्ष. भ्रष्टाचारातून निघालेल्या या प्राण्यांवर निसर्गाने भ्रष्टाचाराचे काम सोपविले. ते मृत्युवर जगतात. दोघेही रोग. गंगेच्या पाण्यातून वाहात चाललेल्या कुजक्या प्रेतांच्या दुर्गंधीतून कॉलरा निघाला आणि अनिर्बंध स्वातंत्र्य कुजले तेव्हा त्यातून निघालेल्या प्राण्याने माणसांचा आकार घेऊन ठग निर्माण झाले. कॉलऱ्याने सगळा यूरोप पालथा घातला. शहरे ओसाड पाडली. खेडी उध्वस्त केली. आणि सगळ्यांचे शिव्याशाप घेत तो मायदेशाला परतला.

ठग आपले जंगल सोडून अजून बाहेर आला नाही. आपल्या शत्रूची टेहळणी करीत तेथेच फिरत आसे. कॉलरा हा नेपोलियनप्रमाणे सेनापती आहे. ठग हा **नाना**प्रमाणे दरोडेखोर व शूद्र आहे. ठगांचा नायनाट झाला पाहिजे. त्यासाठी त्याचे मूळ शोधून काढून त्याच्यावर घाव घातला पाहिजे. समाजात त्याची वाढ होऊ देता उपयोगी नाही. त्याच्या हातातील फासाची दोरी हिसकावून घेण्याऐवजी इंग्रज सरकारने त्याचे मन अहिंसक केले पाहिजे. त्याच्याभोवतालचा अंधःकाराचा पडदा काढून त्याची दृष्टी निर्मळ केली पाहिजे. स्वच्छ पहाणारी निर्मळ दृष्टी हाच त्याच्या उद्धाराचा मार्ग आहे.

ठग हे जितके घातकी, तितकेच अनुयायी जोडण्यात वाकबगार आहेत. रात्रीच्यावेळी, उघड्यावर झोपणारे भटके, प्रवाशांसमोर हात पसरून रोटीची याचना करणारे भिकारी, मनात हत्येची कल्पना कुरवाळणारे आततायी, मनात शिजणारे दुष्ट विचार, टाहो फोडणारे दुःखदारिद्र्य हे सारे सगळ्या देशांतील, सगळ्या काळांतील ठग आहेत. हिंदुस्थानात आणखी एका ठग वर्गाची त्यांत भर पडली आहे. तो वर्ग म्हणजे भटाब्राम्हणांचा.

आज सहा महिने माग्नोद जनावरांची कातडी पांघरून, रानफळे खाऊन गोरखपूरच्या जंगलात वणवण फिरत आहे. त्याची दाढी वाढली आहे, मस्तकावरचे काळ व लांब केस त्याच्या खांद्यावर अस्ताव्यस्त पसरले आहेत. आणि त्याचा चेहरा झाकळून टाकीत आहेत. त्याचे दोन डोळे मात्र निखाऱ्याप्रमाणे धगधगत असलेले दिसत आहेत. संध्याकाळच्यावेळी मावळते सूर्यकिरण उंच डोंगराच्या बोडक्या माथ्यावर सुवर्णोदकाचा शिडकाव करतात, त्या वेळी एका दरडीवर उभे राहिलेला माग्नोद गोरखपूरच्या गुराख्यांना दिसतो. त्याच्या मुठी वळलेल्या असतात. त्यांची कपाळपट्टी मोकळी असते. ओंठावर फेस खदखदत असतो. डोळ्यांतून अग्निबाण सुटतात. लांब दाढी वाऱ्याच्या हिसक्यांनी हलत राहाते. अशा स्थितीत रॉबेर्तचे नाव घेऊन, करकरा दात वाजवीत तो ओरडत असतो. आणि शोकावेगाने डोक्याचे केस व दाढी उपटन काढण्याचा प्रयत्न करतो. त्या वेळी, त्याच्या मस्तकातून रक्तप्रवाह होतो.

त्याच रक्ताचे सुकलेले ओघळ त्याच्या गालांवर दिसतात, हेच त्याचे अश्रू. दुसरे अश्रू कधीच आटले आहेत.

रात्रीच्या वेळी इतर माणसे आपल्या घरात विसावा घेऊन श्रमपरिहार करीत असतात. तेव्हा माग्नोद एकाकी, वृक्षाच्या बुंध्याला टेकून सगळी रात्र, उभ्याने जागत काढतो. कित्येक वेळा कासावीस होतो. आणि भुताखेताच्या काल्पनिक दृश्याने ओरडत सुटतो. किती भयानक दृश्य ते! एक बर्फसदृश राक्षस दोघां अर्भकांना फाडून टाकतो. तीन काळेकभिन्न चांडाळ या दृश्याकडे पहात आसुरी आनंदाने विकट हसतात. त्या दुर्देवी अर्भकांचा आक्रोश तेथे निनादतो. आणि त्यांतच या हत्त्या करणाऱ्याचे भीषण हास्य मिसळून जाते.

हे दृष्ट स्वप्न येथेच संपे आणि माग्नोद दचकून जागा होई. त्याच्या कपाळाच्या शिरा ताडताड उडत आणि अंगातील तापाने त्याचे शरीर भाजून निघे. त्या वेळी, जंगली श्वापदांच्या आरोळ्यांनी भंग पावणारी गाढ शांतता त्याला स्वर्गातील शांततेपेक्षा राक्षसांची शांतता वाटे. मग तो संतापाच्या भरात निद्रिस्त विश्वाला शिव्याशाप देई. आणि त्याच्या ओठातून असे उद्‌गार बाहेर पडत, ‘धन्य हे जंगल जे माझ्यासमवेत आक्रोश करीत आहे. धन्य हा वाघ जो माझ्यासारखा जागत आहे. धन्य ही वृक्षराजी, जी आपल्या दंवबिंदूची आसवे माझ्या मस्तकावर ढाळीत आहे.”

अशा दारुण रात्रीनंतर दिवस उगवत. अशीच एक सकाळ माग्नोदच्या आकांक्षाचा भंग करणारी. आज शेवटची आशाही नष्ट झाली होती. थोड्याच काळात त्याने सर्वप्रकारची दुःखे सोसली होती. सगळ्या शक्तीची उपासना केली होती. मृतपिशाच्चांचा धावा केला होता. पण व्यर्थ! पाच महिने लोटले होते. तरीही सूडाची कल्पना अजून कल्पनाच होती. नामर्दाप्रमाणे शरणागती पत्करणे, सतत दुर्दैवाचे आघात सोशीत रहाणे हेच त्याच्या नशिबी होते. आशेशिवाय जगणे अशक्य होते, दुःखांची, हालअपेष्टांची परमावधी झाली होती. ज्याप्रमाणे कित्येक वर्षे तुरुंगात कुजणाऱ्या बंदिवानाला काळ्या पाण्याची ओढ लागते त्याचप्रमाणे माग्नोदला मृत्यूची ओढ लागली होती. हे एक प्रकारचे स्थित्यंतर होते. मनाच्या अशा निर्धाराने तो एकदा पर्वतशिखर चढला. खाली खोल डोह पसरला होता. त्याने छातीवर मस्तक वाकविले. आणि समोरच्या डोहावर खिळलेली नजर मनाच्या खोल खोल दरीत वळविली. विचार केला, चिंतन केले. क्षणकाल अंतरंगात द्वंद्व पेटले. त्यांत तो जिंकला. सूडाशिवाय या आयुष्याला काय किंमत? काय अर्थ आहे? किंचित पुढे वाकला आणि आपले शरीर खाली झोकून देणार, इतक्यात एका अज्ञात इसमाने त्याचा दंड पकडला.

“कोण आहेस तू? नि अशावेळी. का पकडलास माझा हात”? माग्नोदने भांबावून विचारले.

“माझी एक सूचना आहे. तू इथं मरू पहातोस खरं ना? मग या फासानं मला तुझी हत्त्या करू दे. एकाच क्षणाचा अवकाश, तुझा हेतू साध्य होईल नि मला सत्कृत्य केल्याचं समाधान मिळेल. काली देवतेनंच मला इथं आणलं आहे.”

माग्नोदच्या मस्तकात अकस्मात एक विचार चमकला.

“तू एक ठग असावास असा माझा तर्क आहे.” तुझी टोळी कुठं राहाते ते सांगशील मला?” माग्नोदने विचारले.

अनुक्रमणिका

“माझ्या टोळीशी तुला काय कर्तव्य? तुला मृत्यूची भेट घडवावी हीच माझी इच्छा. तेवढ्यासाठी तर मी इथं आलो आहे. माझं कौशल्य तर पहा. चल, कर तयारी!”

“धन्यवाद! पण मरण्यापूर्वी ठग व्हावं असं मला वाटू लागलं आहे.”

“मग ठीक आहे! आजच तुला आमच्या टोळीत घेऊन जातो. पण एक अट आहे. तुला मरावसं वाटलं तर इतराच्या आधी तुला मारण्याचा हक्क मी राखून ठेवीत आहे. कृतघ्न होऊ नकोस. आहे कबूल”?

“हे घे वचन”

मग दोघेही हातात हात घालून पर्वत उतरु लागले.

अनुक्रमणिका

८

दीक्षा

ब्राह्मणाने जंगलाच्या आसमंतात नजर फिरविली तेव्हा दूरवर त्याचा कुत्रा मुफ्ती त्याच्याकडे येत असलेला त्याला दिसला. सहा महिन्याच्या वियोगानंतर तो आज त्याला दिसत होता.

महाभारतात पांडवांच्या इमानी कुत्र्याची खूप प्रशंसा केली आहे. इंद्राने त्याला स्वर्गाचे द्वार खुले केले. पण माग्नोदला वाटले, आपल्या कुत्र्याची सर पांडवाच्या त्या कुत्र्याला काही येणार नाही. त्याचे मन कळवळले. कुत्रा जवळ आला तशी त्याने त्याला उचलून थोपटले. कुरवाळले. त्याचे लाड केले. त्याला आपल्या चांगल्या दिवसाची आठवण झाली. त्या वेळी तो देव मानीत होता. श्रद्धा आणि आशा यांच्या बळावर जगत होता.

माग्नोद व ठग हे दोघे मोठमोठ्या शिळांच्या गर्दीत दिसेनासे झाले झाले. बरीच वाट कापल्यानंतर ते एका झोपडीपाशी थांबले. तिच्याभोवती गर्द झाडीचा तट उभा होता. तो एकांत आणि ती शांतता पाहून माग्नोदने तर्क केला की, जवळपास ठग लोकांचे गुप्त ठाणे असेल.

त्याच्या सोबत्याने शीळ घातली व काही वेळ तो प्रतीक्षा करीत राहिला. दुसऱ्या इशाऱ्याची गरज राहिली नाही.

“कोण आहे”? एक आवाज निघाला. झोपडीतून कुणीतरी डोकावून बाहेर पाहिले.

“मी...” रामाक म्हणाला (रामाक हे सोबत्याचे नाव).

“काय हवंय तुला”?

“गुरुजीपाशी बोलायचं आहे.”

“गुरुजी लांबच्या पल्ल्यावर गेले आहेत”— त्याच आवाजात बऱ्याच शुकशुकाटानंतर उत्तर आले.

“ते मध्यरात्रीनंतर येतील.”

रामाकने माग्नोदला तेथेच थांबण्यास सांगितले व तो निघून गेला. माग्नोदने जमिनीवर बैठक ठोकली आणि थोड्याच वेळाने तो झोपी गेला. मुफ्ती त्याच्या शेजारीच बसून राहिला.

दुपारचे तीन वाजले तेव्हा एक जवान तेथे आला. त्याच्या पोशाखावरून व चर्चेवरून तो ठग दिसत नव्हता. त्याने माग्नोदला जागा केला आणि म्हटले,

“चल माझ्याबरोबर.”

अरुंद व वाकड्यातिकड्या पायवाटेने ते जाऊ लागले. बराच वेळपर्यंत ते असंख्य शिळामधून जात होते. शेवटी दोन डोंगरांमधील एका दरीत पोचले. तेथे गर्द झाडी माजली होती. आणि पाण्याचे धबधबे खळखळत होते.

त्या जवानाच्या इशाऱ्याबरोबर त्या झाडीतून एक इसम आला. भटाचा साधा वेष त्याने केला होता. एका पिवळ्या वस्त्राखाली त्याचा चेहरा झाकला होता. त्याच्या मस्तकावरून उतरलेली काळीभोर जटा त्याच्या खांद्यावर अस्ताव्यस्त पसरली होती, हेच त्याचे गुरुजी होते.

“ठग व्हायचं आहे काय तुला?”

माग्नोदकडे वळून गुरुजीनी गंभीर स्वरात प्रश्न केला.

“होय महाराज.”

माग्नोदने ठाम शब्दात उत्तर केले.

“इथं इमान दिलं पाहिजे. तुझ्यासमोर काली आहे हे लक्षात ठेव. विश्वासघातक्यांना ती क्षमा करीत नसते.” तोंडात विडा चघळीत गुरुजीनी म्हटले.

“माझ्यावर विश्वास ठेवायला हरकत नाही.” माग्नोद अदबीने म्हणाला.

“ठीक आहे! प्रथम तुला स्नान करावं लागेल. मग तुझे कपडे बदलून या आमच्या पंथाची शुभ्र वस्त्रं तुला धारण करावी लागतील. आणि याप्रमाणे सर्व कलंक धुऊन गेल्यानंतर मगच तुला सामर्थ्यसंपन्न कालिदेवतेच्या मंदिरात प्रवेश करता येईल.” अर्ध्या तासानंतर शंखनाद झाला आणि तत्काळ चाळीसांवर इसम माग्नोदच्याभोवती गोळा झाले.

या गिधाडांनी आपल्या भाईबंदाच्या रक्तामासांवर कित्येक वेळा चंगळ केली असेल; पण आता त्याच्या चेहऱ्यावर क्रूरतेचा लवलेश नव्हता. त्यांच्या प्रशांत व निश्चल मुद्रांवर मानसिक समाधान खेळत होते. खरे म्हटले तर देवतूतांचा वेष पेहरून आलेले हे सैतान होते. मानवतेला वाहून घेतलेला जोगिणीचा मेळावा प्रेक्षकांच्या मनात एवढा आदर निर्माण करू शकला नसता. दाटीवाटीने माग्नोदच्याभोवती जमलेल्या या इसमांनी आपल्या नजरा त्याच्यावर रोखल्या होत्या. त्याची यत्किंचतही हालचाल त्यांच्या नजरांतून सुटत नव्हती. त्याची कडक तपासणी करण्याच्या उद्देशाने ते त्याच्यावर प्रश्नांचा मारा करीत होते. त्यांच्या अविश्वासाला तशीच सबळ कारणे होती. पोलीसलोकांनी त्यांना इतक्या वेळा अचानक सतावले की, एखादे पान सळसळले, झाडाची फांदी हलली, एकादा माणूस जवळ आला तरी त्यांना पोलीस जवळ आल्याचा भास होई.

अनुक्रमणिका

थोड्या वेळाने एक ठग जवळ आला. इतरांनी त्याचा मुजरे केले. तो त्यांचा मुख्य असावा. या नव्या इसमाची जनर माग्नोदवर पडली मात्र, तो दचकला. व त्याच्या तोंडून भितीचा चित्कार निघाला. तो कानावर पडताच सगळे ठग सावध होऊन यंत्रवत ताठ उभे राहिले आणि आपल्या हातातील फास त्यांनी सैल केले. नेभळट शेळ्याचे क्षणार्धांत क्रूर श्वापदात रूपांतर झाले. हा देखावा खरोखरच भीषण होता. हा माणूस—ठगांचा मुख्य—कर्कश आवाजात बोलू लागला.— "ब्राह्मण आहे आणि इंग्रजांचा नोकर आहे. मी याला पुरेपूर ओळखतो, हा आपल्या टोळीत येऊ शकत नाही."

"जे सगळ्यांना ठाऊक आहे ते ठासून सांगण्यात अर्थ नाही" माग्नोदने आपल्या वरील आरोपाचे खंडण करण्यासाठी म्हटले— "मी ब्राह्मण होतो. गोष्ट खरी आहे. पण तूर्त ब्राह्मण नाही. मला आज जातपात राहिली नाही. सगळ्या इंग्रजांचा, सगळ्या साहेबांचा मी दुश्मन आहे. ज्यांचं मीठ मी खाल्लं आहे अशा दोन इंग्रज इसमांना वगळून मी हे बोलत आहे. हे दोन इसम म्हणजे थोरले दाविससाहेब आणि पाद्री फ्रान्सिश्कु." माग्नोदचे हे आत्मविश्वासपूर्ण उद्‌गार बाहेर पडले तेव्हा वादळ शांत झाले. पण सगळ्यांनी एकसाथ म्हटले, "तुला हे सिद्ध करून दाखवावं लागेल."

"त्याला माझी तयारी आहे." ब्राह्मणाने तत्काळ उत्तर केले, जंगलाच्या डाव्या बाजूला एक अजस्त्र शिळा होती. सुप्रसिद्ध 'एलेफन्टा' लेण्याप्रमाणे ती खोदून तिच्यात एक मंदिर तयार करण्यात आले होते. हिंदुस्थानांत अशी लेणी पुष्कळ आहेत. ती पुरातन माणसांनी तयार केली असावीत. हिन्दी लोक सांगतात की, देवतानी पर्वताच्या उदरात खोदून एकाच नमुन्याची व घाटाची, प्रतीकात्मक अशी मंदिरे तयार केली आहेत. त्यापैकीच हे एक असावे.

या गुहेचे द्वार असंख्य दरडींच्या व लहानमोठ्या शिळांच्याखाली दडलेले आहे. त्यांची मांडणी अशा पद्धतीने केली की, परक्या इसमाला वाटाड्याशिवाय या जागेचा थांगपत्ता लागू नये.

मंदिराचा अंतर्भाग सात स्तंभावर उभा असून त्याचे दोन विभाग पाडण्यात आले आहेत. एका दालनाच्या मध्यभागी एक दिवा जळत असून त्याच्या मंद उजेडात खांबाच्या पायथ्यावर व शिखरांवर वाघ, सिंह, अजगर इत्यादी श्वापदांच्या खोदलेल्या आकृती दिसत आहेत. त्यामुळे ही गुहा अधिकच भयाण दिसते. या अर्धवट उजेडाच चाळीस ठगांचे शुभ्र पोशाख उठून दिसत आहेत. गुहेच्याभोवती घुबडाचा अपशकूनी घुत्कार अधून मधून कानावर पडत आहे आणि वर्तुळाकार फिरणाऱ्या माशांचा गोंगाट अव्याहत चालू आहे.

गुहेच्या दुसऱ्या टोकाला गर्भागार आहे. तेथेच देवीची शस्त्रधारी पाषाणी मूर्ती उभी आहे. पुजारी—भट एका शिळेवर देवतेकडे पुढा करून बसला आहे आणि तो आपल्या भाषेत तिची आराधना करीत आहे. माग्नोद दरवाजाबाहेर उभा राहून कौलाच्या निकालाची वाट पाहात आहे.

देवतेला आरत्या ओवाळून झाल्यानंतर एका उच्च आसनावर बसलेल्या गुरुजींनी आपल्या लोकांना गर्भागारापाशी बोलावले व देवतेच्या अनुकूल वा प्रतिकूल इशाऱ्याकडे लक्ष द्यायला सांगितले.

बराच वेळपर्यंत सर्वजण निश्चल अवस्थेत, एकाग्र मनाने, कान टवकारून उभे होते. शेवटी एका घुबडाचा आवाज मंदिरात घुमला. देवतेने माग्नोदची विनंती मान्य केली होती.

अनुक्रमणिका

एवढे झाल्यावर गुरुजी चौकाच्या मध्यभागी आले आणि एका प्रमुख ठगाकडून त्याने मंतरलेला फास घेतला. त्याची लांबी त्यांनी तपासून पाहिली. मग आपले त्रोटक भाषण केले. मग माग्नोदने त्या दोरीच्या प्रतीकावर हात ठेऊन प्रतिज्ञा केली की, आपण देवतेला आणि आपल्या टोळीला इमान देऊ.

ही प्रतिज्ञा पार पाडल्यानंतर गुरुजींनी नव्या ठगाला—माग्नोदला थोडे मीठ व एक लोखंडी सळई बहाल केली. आणि मग हा विधी संपला.

माग्नोदला दीक्षा मिळाली तरी ठगांच्या मनात त्याच्या निष्ठेबद्दल शंका राहिलीच. त्याच्या आश्वासनाने त्यांचे समाधान झालेले नव्हते. त्याच्या इमानीपणाचा पडताळा पहाणे त्यांना शहाणपणाचे वाटले. म्हणून त्याच्या बाबतीत विशेष खबरदारी घेण्यात यावी आली असे ठरले.

गिरा नावाच्या एका ठगाची त्या कामावर नेमणूक झाली. माग्नोदच्या बारीकसारीक हालचालीवर गिराने देखरेख ठेवावी असे ठरले. अस्पृश्यांच्या मनात ब्राह्मणाबद्दल जो उपजत द्वेष साचलेला असतो त्यामुळे गिराच्या निवडीला सगळ्यांचा दुजोरा मिळाला. गिराच्या मनात ब्राह्मणद्वेष पराकाष्ठेचा होता.

त्यानंतर माग्नोद व गिरा या दोघांनी एकत्र जंगलात फेरफटका मारला. त्यात, एकेठिकाणी गिराने पाण्याने भरलेला पेला तोंडाला लावला आणि मग ते उष्टे पाणी प्यायची माग्नोदला आज्ञा केली. पेल्याला स्पर्श होताच माग्नोदचा हात कापू लागला. अशा भयंकर दिव्याला त्याची तयारी नव्हती. पेल्यातील पाणी स्वच्छ होते खरे, पण एका चांडाळाच्या ओठाचा त्याला विटाळ झाला होता. म्हणून माग्नोदला ते विषवत वाटले. त्याने पुनः पुन्हा पेला तोंडाजवळ न्यावा व दूर करावा. त्याचा घसा कोरडा पडला. त्याला उलटी आल्यासारखे झाले. शेवटी, त्याला आपल्या दुश्मनाची, रॉबेर्तची आठवण झाली तेव्हा मनाचा निर्धार करून व डोळे मिटून त्याने पेला तोंडाला लावला व सगळे पाणी घशांत ओतले. आपल्या शत्रूचे रक्तच जणू आपण प्राशन करीत आहोत असे त्याला वाटले.

गिराचे मन एवढ्याने स्वस्थ झाले नाही. माग्नोदला तापदायक होतील असे दुसरे उपाय योजून त्याचा सूड घ्यावा असा विचार तो करू लागला. त्याच्या दृष्टीने ही संधी दुर्मिळ होती.

एक दिवस, माग्नोद आपल्या कुत्र्याबरोबर एकटाच होता. एका झाडाच्या सावलीत तो आडवा झाला होता. त्याच्या मनात दुःखदायक विचारांनी गर्दी केली होती. इतक्यात गिरा क्रुद्ध चेहऱ्याने त्याच्याजवळ येऊन म्हणाला,

“तुला दीक्षा घेऊन सहा महिने झाले तरी तुला हा फास फेकण्याची कला अवगत झालेली नाही. आमच्या व्यवसायातील साहसही मला तुझ्या अंगी दिसत नाही. तू ब्राह्मण खरा....!”

“अगदी खोटं” माग्नोदने उत्तर केले. सशस्त्र हाताने तोंडावर वार करावा तसा गिराने केलेला अपमान त्याला खुपला— “तुमच्या सर्वांत जास्त वाकबगार ठगाइतकाच मी वाकबगार आहे. माझं कसब दाखवायला मी केव्हाही तयार आहे.” इतके बोलून तो त्वेषाने उठला आणि आपल्या फासाचे गुंडाळे सोडले.

[अनुक्रमणिका](#)

“मग ठीक आहे. आजच एक प्रयोग करून पाहू” मग जणू एखादी वस्तू शोधण्याच्या इराद्याने गिराने आपली नजर आसपास फिरवली आणि काही क्षणात ती मुक्तीवर स्थिर करून म्हटले, “तुझ्या कुत्र्याचा गळा आवळून त्याला मारून टाक”

“माझ्या कुत्र्याला? मी अशी प्रतिज्ञा केली नाही.” माग्नोद संतापाने थरथर कापू लागला.

“ही माझी आज्ञा आहे”.

“मी ती पाळू शकत नाही”.

“हा आज्ञाभंग आहे. विचार कर. उद्या पोलीसांच्या ताब्यात जाशील.” माग्नोदला आपली चूक कळून आली. आपल्या उद्गाराबद्दल नापसंती दर्शविण्यासाठी त्याने मान खाली घातली. आणि बाह्यात्कारी शांतता दाखवून म्हटले,

“मी तयार आहे. माझी विनंती एवढीच की”—

“मग वेळ दवडू नकोस आटप लवकर.”

मुफ्ती एका दगडावर शरीराचे वेटोळे करून झोपला होता. बिचाऱ्याला नजीकच्या संकटाची कल्पनाही नव्हती.

क्षणार्धात माग्नोदने फांस टाकला व कुत्र्याच्या गळ्याभोवती तो आवळला व गिराकडे वळून पाहिले. जणू काय तो त्याच्या दयेची याचना करीत होता.

“इतकंच!” जमिनीवर पाय आपटून गिरा ओरडला. तसा माग्नोदने फास ओढला आणि तो एका अंगावर मूर्च्छित पडला.

समोर मुफ्ती मरून पडला होता.

“छान! छान! शाबास!”

गिरा विकट हास्य करीत म्हणाला.

माग्नोद वळला. त्याची नजर निष्पाप मुफ्तीवर रेंगाळली. दोन्ही हातांनी आपले मस्तक घट्ट दाबून तो बोलला— “काय हे माझं दुर्दैव!” त्याच्या डोळ्यातून दोन आसवे ओघळली. सहारा वाळवंटात पडलेले पाण्याचे दोन थेंबच जणू. सहस्त्रावधी वर्षे धगधगत्या सूर्याखाली त्याची तळमळ चाललीच आहे.

अनुक्रमणिका

९

तीन भावंडे

पंधरा डिसेंबर १८—रोजी औधचा न्यायधीश स्मिथ लंडनला पोहोचला. त्याच्याबरोबर टॉमस व ॲमिली ही दोन पोरकी मुले होते. पाद्री फ्रान्सिश्कुच्या सूचनेप्रमाणे स्मिथ लगेच त्यांना घेऊन एक आयरीश गृहस्थ हार्टमन याच्या घरी गेला. हेलेन तेथेच राहात होती. तिच्या वडिलांनी त्याला या मुलांच्या व्यवस्थेविषयो अगोदरच लिहिले होत. त्यामुळे त्यांचे आगमन त्याला अनपेक्षित वाटले नाही. त्याने त्याचे प्रेमभराने स्वागत केले. विशेषकरून स्मिथचे तर त्याने सन्मानपूर्वक आदरातिथ्य केले.

हार्टमनची साठी उलटली होती. तो उंच व शिडशिडीत बांध्याचा होता. त्याचा चेहरा लांबट होता. कपाळावर गाढ खिन्नतेचे सावट पडले होते. त्याच्या समजूतदारपणाला जगाच्या अनुभवाची जोड मिळाली होती. दुदवाच्या तडाख्यानी त्याला या धंद्यात लोटले होते. त्याच्यावरच त्याचा निर्वाह चालला होता.

त्याच्या बायकोचे नाव रोझा. ती बरीच लठ्ठ व ठेंगणी होती. तिचे केस पिंगट होते. नाक टॉमॅटोसारखे लाल होते. गाल फुगीर होते. या सगळ्या गोष्टीमुळे ती एखाद्या दारुच्या ‘बार’ ची मालकीण शोभे. झांटिपीचे सारे गुण तिच्या अंगी होते. तिचे शरीर व मन यांमध्ये संपूर्ण मिलाफ होता.

रोझाने आपले भिंग बाजूला ठेवले आणि खोलीच्या कोपऱ्यात बसलेल्या मुलांना आपादमस्तक पाहून घेतले आणि मग त्यांच्यावर आपल्या कुत्सित हास्याचे फवारे सोडले “हा! हा! काय पण विचित्र ध्यान हे. त्या रॉबेर्तच्या मस्तकात या हिन्दी लोकांना सुधारण्याचं वेड शिरलं असावं.” थोडावेळ थांबून ती पुढे म्हणाली, “या दोन पोरांमागं तो आपल्याला काय देणार आहे?” स्मिथ अजून बसला होता. त्याच्याकडे तिची नजर वळली नसावी.

त्या अनोळखी मुलांकडे तिने अशा विचित्र नजरेने पाहिले की, ती बिचारी गोंधळून गेली.

“हे मिस्टर स्मिथ. हिंदुस्थानातून इकडे आले आहेत.” हार्टमन आपल्या पत्नीला स्मिथचा परिचय करून देऊ लागला.

“मी दिलगीर आहे. तुम्हाला मी पाहिलं नाही. नि. स्मिथसाहेब, ही मुलं श्रीमंताची असावी. कदाचित नबाबाची असतील. तुम्हाला माहीत असेलच.”

“ते मला ठाऊक नाही—” स्मिथने उत्तर केले. रोझाचे खोंचक बोलणे त्याला आवडले नाही— “एका पाद्रीनं ही मुलं माझ्या स्वाधीन केली आणि रॉबेर्तशी बोलून हेलेनच्या संगतीत त्यांना इकडे ठेवण्याची व्यवस्था केली.”

स्मियच्या उत्तराने तिचे समाधान झाले नसावे. त्याच्या तोंडून त्या मुलांची इत्थंभूत माहिती समजून घेण्याचा तिचा इरादा होता. त्यासाठी दुसरी युक्ती लढविण्याचा चिवटपणा तिने दाखविला. स्मिथला त्या

अनुक्रमणिका

पोरांच्या आईबापासंबंधी काहीच माहिती नसावी या गोष्टीवर तिचा विश्वास बसेना. रोझाचे वावगे प्रश्न स्मिथने मोठ्या शिताफीने टाळले.

रोझाला नवऱ्याकडून कळले की, या मुलांची खाण्यापिण्याची व राहण्याची मासिक फी हेलेनच्या फी इतकीच आहे. त्यापेक्षा अधिक नाही. त्या वेळी रोझा नवऱ्यावर चरफडली. "काय पण!"— ती फणफणत म्हणाली, "या रानवट जनावरांना माणसाळण्यासाठी महिना सहा पौंड म्हणजे काय थट्टा आहे? ... काय पण ह्यांची भाषा! किती विचित्र! सैतानालादेखील समजण्याची मारामार!.... एका दमडीच्या मोबदल्यात एक अंडं उपटण्याची ही अक्कल!"

"जरा शांत हो, रोझा, माझं ऐक. या मुलांची दया येऊ दे तुला. ही दुर्दैवी अनाथ पोरं. याना शिक्षण दिलं तर पुण्य लाभेल आपल्याला. त्यांना इंग्रजीचा सराव होईपर्यंत मी दुभाष्याचं काम करीन. तू नको काळजी करू." एवढ्यानं तेथे सोनेरी केसांची एक सुंदर मुलगी आली. हार्टमनने तिला ही नवीन मुलं दाखवली. तो म्हणाला, "हेलेन, ही पहा तुझी नवीन भावंड. त्यांना पाहून हेलेन चमकली; व एक पाऊल मागे सरकली.

"त्यांना मुका दे पाहू" हार्टमनने तिला किंचित पुढे लोटीत मायाळू स्वरात म्हटले.

हेलेन लाजली. भीत भीत तिने ॲमिलीचे चुंबन घेतले. मग तॉमासचे. तत्काळ त्या दोघांनी आपले चेहरे बाजूला वळविले. आणि आपल्या रुमालांनी चुंबनाचा डाग जणू पुसून काढला. त्या चुंबनामागील अर्थ त्यांना माहीत नव्हता. ते पाहून रोझा पुन्हा विचित्र हसली. तशी हेलेनला रडू कोसळले.

"रोझा काय हे"? — हार्टमन अस्वस्थ होऊन म्हणाला. "लोकांची टिंगल करायची तुझी खोड कधी जाणार? तुझ्या वयाला ते शोभत नाही."

ॲमिली हेलनच्या वयाची—पाच वर्षांची होती. तॉमासचे वय थोडे अधिक होते. या घरात अधिक काळ वास्तव्य केल्यामुळे हेलेनकडे वडिलकीचा मान आला होता. त्या जाणिवेने दोघाही मुलांना तिथे आपल्या मायेच्या पंखाखाली घेतले आणि लागलीच आपली खेळणी त्यांना वाटून दिली. हेलेनला बंगाली भाषा कळत नव्हती आणि या नवीन मुलांना इंग्रजी येत नव्हते. तरीदेखील रानातील पांखराप्रमाणे मनाची भाषा त्यांना कळत होती.

आपल्या सर्व नातेवाईकांपासून ही तिन्ही मुले दूर होती. त्यांच्या समान दुर्दैवाने त्यांना एकत्र आणले होते. त्यामुळे त्यांच्या मनात लवकरच सद्भावना शिरल्या. नियतीने त्यांच्यामध्ये नवे नाते निर्माण केले होते. पण त्यापेक्षाही वृत्ती आणि आवडी याच्या साधर्म्यामुळे ती सर्व दृष्टींनी खरीखुरी भावंडे बनली. एकाच कळवळ्याने लवकरच त्यांची मने बांधून टाकली.

तॉमास व ॲमिली पहिला शब्द शिकली ते म्हणजे बहीण आणि भाऊ.

आपल्या नव्या विद्यार्थ्यांचे स्वभाव पाहून हार्टमन खूष झाला. ती मुले इतकी मायाळू, मेहनती व आज्ञाधारक होती की, त्यांना रागे भरण्याची पाळी त्यांच्या गुरुजीवर क्वचितच यायची आणि गंमत ही की,

अनुक्रमणिका

त्यांच्यापैकी एखाद्याला शिक्षा व बक्षीस मिळाले तर लगेच त्यांची ती मुले आपसात वाटणी करीत. थोडक्यात, सगळ्याच बाबतीत ती भावंडाप्रमाणे वागू लागली.

रॉबेर्त आणि पाद्री फ्रान्सिश्कु या मुलांच्या हकीकती वाचून उल्हसित होत. आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यकाळाची स्वप्ने रंगवीत. हेलेन ही लावण्याची मूस होती. आनंदी व आकर्षक चेहेऱ्याच्या ह्या मुलीचे मन उदार व मोकळे होते. तिच्या चांगुलपणाचे प्रसंग कितीतरी होते. एक प्रसंग तर इतका हृदयस्पर्शी होता की, तो पाहून निष्ठूर रोझादेखील गहिवरली.

रोझाला त्वचेचा विकार हाता. हवेत उष्मा वाढला म्हणजे तो विकास तिच्या नाकावर उमटू लागे नि मग ते लालबुंद होई. त्याच्यावर तिला पावडरचा वापर करावा लागे. एक दिवस ती अशीच आरशासमोर उभी राहून तोंडाला पावडर लावण्याचे काम करीत असताना हेलेन चाहूल लागू न देता खोलीत शिरली आणि एका खुर्चीच्या मागे लपून राहून रोझाची हालचाल लक्षपूर्वक पाहू लागली.

एखादा नवा शोध लागल्याप्रमाणे ती आनंदाने उचंबळ झाली आणि तशीच, हलक्या पावलांनी तेथून बाहेर पडली व भावंडात मिसळली. तीन दिवसानंतर ॲमिलीबरोबर रोझाच्या खोलीत जाऊन तिने आतून दार बंद केले. व तिला एका खुर्चीवर बसविले, आणि मग अलमारीतला पावडरचा डबा काढून तो तिने तिच्या तोंडाला फासला. आणि तिच्या चेहऱ्याचा रंग बदललेला पाहताच ती म्हणाली, “ताई! तू आता कित्ती कित्ती सुरेख दिसायला लागलीस” एवढे झाल्यावर पळत जाऊन तिने आरसा आणला व ॲमिलीच्या तोंडासमोर धरला. ॲमिलीला गोरी करण्याची तिला तळमळ लागली होती.

एवढ्यात आनास्तासियाने—रोझांच्या दासीने खोलीत प्रवेश केला, तिने तत्काळ हेलेनच्या हातातून पावडरचा डबा हिसकावून घेतला आणि ॲमिलीच्या सफेद तोंडावरून खसकन रुमान फिरवला. बहिणीला पूर्ववत काळी झालेली पाहून हेलेनने तिला मिठी घातली व दोघीही मुसमूसून रडू लागल्या. एका दिलदार मनाची एक साधी, सुंदर करणी आनास्तासियाने एका फुंकरीसरशी उधळून लावली होती.

कालांतराने त्या मुलीच्या अनेक गुणांचा विकास होत गेला. परस्परावरील त्यांचे प्रेमही वाढत गेले. हार्टमनला त्यांचा एवढा लळा लागला की, त्याला आपल्या मुलाप्रमाणे वाटू लागल्या. कधी कधी त्या रोझावर चरफडत. त्या वेळी त्यांची समजूत घालून तो त्यांना शांत करायचा.

रोझा त्यांच्या शिक्षणाकडे धंदेवाईक दृष्टीने पाही. थोडे काम करून तिला खूप खूप कमावयाचे होते. उलट, हार्टमन धंद्याला गौणत्व देऊन शिक्षणकार्याला प्राधान्य देई. नवराबायकोमधील या विरोधामुळे त्या कुटुंबात कलहाचे प्रसंग वारंवार येत.

मुले वयाने वाढली आणि वरचे शिक्षण घेऊ लागली. तॉमास लॅटिन शिकू लागला. त्याची शाळा जवळच होती. आपल्या बहिणीपासून दूर असल्यामुळे त्याला वर्गातले तास शतकासारखे दीर्घ वाटत. तीन वाजता तो वर्ग आटोपून घरी येई, त्या वेळी हेलेन व ॲमिली त्याची प्रतीक्षा करीत दारात उभ्या असत. त्याच्या आठवणी त्यांच्या मनात जमा होत आणि त्यांचे हात त्याला मिठी घालण्यासाठी आतूर होत.

वाचकांना रोझाची मोलकरीण अनास्तासिया हिचा थोडा परिचय करून दिला पाहिजे. जरठ कुमारिकांच्या वर्गांत मी मोडत होती. विवाहस्पर्धेतील उमेदवाराच्या सेनेत बरीच वर्षे त्यांनी काम केलेले

असते. पुष्कळ लढाईत अपयश आल्यानंतर त्या स्वयंपाकघरात शिरतात. तेथे दिवसरात्र आपल्या दुर्दैवाचे रडगाणे गातात. व कुढ्या मनःस्थितीत जगावर आग पाखडून कुणावर तरी सूड उगवतात. झग्यांतले हे पाचवे चार्लस असह्य असतात. त्यांची नेहमीच कुरकूर असते. व त्या सगळ्यावर उखडलेल्या असतात. फ्रेंच लोक त्यांना धान्याच्या कोठारातील मांजरे म्हणतात.

अनास्तासिया मुलांच्या आनंदावर, वेळी अवेळी, विरजण घालणारी बाई होती. ती मुले—भावंडे नसल्याचे रहस्य तिनेच एक दिवस त्यांच्या कानावर घातले. व त्यांच्या मनात रुजलेल्या एका गाढ व शुद्ध भावनेवर वार केला. त्यांच्यामध्ये निर्माण झालेले बंधुत्वाचे रेशमी धागे तोडण्याचा अविचार तिच्या हातून घडला.

त्यांच्या हृदयावर अवचित आघात करणाऱ्या या अप्रिय बातमीचा जणू प्रतिकार करण्यासाठी त्यांनी एकमेकांना मिठ्या घातल्या. मुके घेतले. एकाच तेजोवयालयात आपली मस्तके खुपसली. हात हातात गुंफले आणि घातकी गिधाडाची चाहूल लागताच त्याच्या भीतीने कोंबडीची लहान लहान पिल्ले तिच्या पंखाखाली दाटीवाटीने गोळा होतात त्याप्रमाणे हे तीन जीव—ही तीन भावंडे एकजीव झाली आणि परमेश्वरासमोर त्यांनी प्रतिज्ञा केली की, आपण भावंडे म्हणून जगणार. त्यांच्या आसवांनी या प्रतिज्ञेवर शिक्कामोर्तब केले. ती आसवे म्हणजे हृदयाच्या उद्रेकांना पावित्र्य आणणारे तीर्थच जणू.

हेलेन फार चाणाक्ष नव्हती. पण तिचे मन एवढे दिलदार होते की, त्यातून निघणारे गुणसौंदर्य हे परिपक्व बुद्धिमत्तेचे फळ वाटावे. तर्काचे हात जेथे पोहोचत नाहीत असे काहीतरी उच्च व असाधारण मुलांच्या विचारात गवसते. ही विचारसंपदा त्यांना स्वर्गातूनच मिळत असावी.

प्रत्येक मूल म्हणजे देवदूत. देवाच्या लाडक्या मुलाप्रमाणे हेलेन स्वभावतःच उदात्त होती.

तॉमास आणि ॲमिली ही आपली भावंडे नाहीत असे जेव्हा तिला कळून आले तेव्हा त्यांच्या व आपल्यामधील अंतर केवळ हृदयाच्या बळावर तोडून टाकण्याचा तिने जिवाचा आटापिटा चालविला. तत्त्वज्ञानी सांगतात की, एक काटकोन दुसऱ्या काटकोनाप्रमाणे असतो त्याप्रमाणे एक माणूस दुसऱ्या माणसाप्रमाणे असतो. लेखक सांगतात की, सगळे नागरिक समान आहेत. या अजाण मुलापासून त्यांनी एक धडा अगत्य शिकावा, जो त्यांच्याद्वारे परमेश्वर आपल्याला शिकवतो. तो हा की, समानता ही हृदयाच्या भावनेतून व प्रेरणेतून येते तेव्हाच ती खरी समानता बनते. जी समानता तत्त्वाच्या अदृश्य प्रांतात वावरते आणि आपल्या वर्तनातून, चालीरीतीतून प्रकट होत नाही ती समानता अर्थशून्यच नाही काय?

अनुक्रमणिका

१०

फुलांची फळे होतात

आणखी काही वर्षे ओलांडून पुढे जाऊ या म्हणजे आपल्याला असे दिसेल की आपण बाल्यावस्थेत पाहिलेली ती भावंडे प्रौढावस्थेत प्रवेश करीत आहेत. तॉमास सतराव्या वर्षांत गेला आहे. प्राथमिक शिक्षण पुरे करून तो वाणिज्य पाठशाळेत गेला आहे.

प्रमाणबद्ध अवयवांमुळे तॉमास आता रुबाबदार दिसत होता. त्याचा श्यामल वर्ण, त्याचे देखणे रुप, त्याच्या अवयवांच्या नाजूक व सफाईदार रेषा, त्याचे काळे चमकदार डोळे, त्याचा किंचित लांबट चेहरा यामुळे हिंदी व अरब या दोन वंशांचा मिश्र नमुना तयार झाला होता. तरतरीत बुद्धी व अभ्यासवृत्ती यामुळे तो सगळ्या वर्गात घवघवीत यश मिळवीत होता. त्याची लोकप्रियताही दांडगी होती.

तॉमासच्या पिंडप्रकृतीत दोन भावनाना प्राधान्य मिळाले होते. प्रेम व कृतज्ञता या त्या भावना होत. पहिल्या भावनेची प्रेरक शक्ती हेलेना होती, रॉबेर्तपासून तिने ती उचलली होती. या दोन भावनांत त्याला विरोध दिसत नव्हता. तो शक्य नाही अशीच त्याची समजूत होती. आपला उपकारकर्ता रॉबेर्त आणि आपली मानलेली बहीण हेलेना ही त्याची दैवते होती. आपल्या हृदयमंदिरात त्याने त्यांची स्थापना केली होती. आणि भक्तिभावाने तो त्यांची पूजा करीत होता. कधी कधी त्याला या दोन भक्तीभावात अंतर दिसून येई. दोहोंपैकी एका व्यक्तीकडे आपल्या प्रेमभावनेचा कल अधिक झुकत आहे याची त्याला जाणीव होई, तेव्हा या अभावित आकर्षणाबद्दल त्याचे मन विषण्ण होई. असेही म्हणता येईल की, या तरुणाच्या मनात ब्रुटसची निष्ठूरता आणि पारव्याचीं कोमलताही दोन्ही एकवटली होती. त्या दोन मुलभूत भावनांच्या साहचर्यातून त्याच्या सगळ्या कृती, इच्छा विचार निघाले होते. आणि त्यांनीच त्याच्या शारीरिक व मानसिक वृत्तींची घडण तयार केली होती.

हार्टमॅनने आपल्या शिष्याच्या हळूवार व ग्रहणक्षम हृदयात कृतज्ञतेचे बीज पेरले होते. तेथे त्याला अनुकूल भूमी सापडल्यामुळे थोड्याच काळात त्याचे डेरेदार झाडात रूपांतर झाले होते.

ॲमिली तशी सुंदर नव्हती. पण अनमोल माधुर्याची ती खाण होती. चित्रकाराच्या कुंचल्यातून निसटावा व शब्दांकित न होऊ शकणारा असा गोडवा तिच्या अभिजात रुप—सौंदर्याला पूर्णत्व जाणीत होता. आणि तिच्या गव्हाळी रंगाला झळाली आणीत होता. तिचे काळेभोर केस लाटांप्रमाणे लहरत तिच्या खांद्यावर झुलत. तिच्या काळ्याभोर डोळ्यात एक पौर्वात्य हृदय धगधगत होते. Nigra Sed Formosa आणि या सगळ्याला जोड मिळाली होती ती तिच्या सहज सुंदर लाघवांची, निर्मळ बुद्धीमत्तेची, मनाच्या चापल्याची. त्यामुळे हेलेनापेक्षा तिच्याशीच संभाषण करावे असे सर्वांना वाटे.

हेलेनासंबंधी मी काय सांगू? तिचे डोळे सौम्य, निळे होते. त्यात जणू आकाशाचे प्रतिबिंब पडले होते. तिचे नाक सरळ होते. तिच्या नितळ गालांवर कांती रसरसत होती. तिची जिवणी चिमुकली होती. तिच्या आत मोत्याचे दोन सर चमकत होते. तिचे केस फिक्कट सोनेरी होते. त्यात झऱ्याचा अवखळपणा होता. तिचा बांधा उंच व गोंडस होता. या सगळ्या गोष्टींमुळे आदर्श सौंदर्याची ती पुतळी वाटावी. ॲमिलीची

तरतरी तिच्या अंगी नव्हती खरी. पण तिच्या बोलण्या—चालण्यात अधिक साधेपणा होता. आणि वागणुकीत अधिक लाडिकपणा होता.

या दोन मुलींच्या स्वभावात बरेच साम्य होते पण काही विरोध होता. ॲमिलीच्या पारदर्शक त्वचेत तिचे हृदय प्रकट होत होते. तिच्या वृत्तीत लपंडावाला स्थान नव्हते.

ती लपंडाव खेळली असती तर तिच्या चेहऱ्यावरच्या लालीने तिची फजिती केली असती. तिची त्वचाही तिच्या आत्म्याचीच होती म्हटले तरी चालेल. फुलातून सुगंध निघावा त्याप्रमाणे तिच्या कांतीतून तिचे सद्गुण दरवळत होते. देवदूत पृथ्वीवर वास करतात असे मानले तर तिला एक देवदूतच मानावे लागेल.

ॲमिली रहस्ये, गुपीते राखू शकली असती. कारण तिचा गव्हाळी रंग त्यांच्यावर आच्छादन घालू शकला असता. तिची त्वचा अशा साडीप्रमाणे होती, जिच्या पदराआड असलेले डोळे बाहेरच्या माणसांना दिसत नाहीत. इमानी, विश्वासू व कृतज्ञ असूनही तर्क हा तिचा एक अंगभूत गुण होता. कित्येक वेळा त्याग व नेहमीच झुंज हा तिचा स्वभाव. इतर स्त्रियांप्रमाणे भावनाप्रधान होतीच पण तिच्या मनाच्या घडणीत कर्तव्याला मानाचे स्थान होते. हेलेनच्या तुलनेने तिच्या स्वभावात पुरुषीपणा अधिक होता.

रोझा व आनास्तासिया या दोघी हेलेनाकडे अधिक ओढल्या जात. तिची त्या तोंडभर स्तुतीही करीत. त्यामुळे ॲमिलीचा वंशविशिष्ट अहंकार व असूया जागृत झाली होती. आणि इतरांपेक्षा वरचढ होण्याची व विजय मिळवण्याची आकांक्षा तिच्यांत निर्माण झाली होती. अमिलीचे हृद्‌गत् जाणून घेतले तर असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही की, हेलेनाचे लावण्य पाहून तिला खेद होई. ते लावण्य आपल्याला लाभणे दुर्घट आहे हे तिला माहीत असले तरी ते तिला हवे होते. त्याच्यासाठी ती तळमळत होती. क्वचितच ती आपल्या कडवट शब्दात बोलून जाई “तू सुंदर आहेस!” आणि मग रॉबेर्तची मुलगी हुंदके देऊ लागे.

तॉमास व हेलेन परस्परांना आवडत होती. पण हे गुपीत एकाने दुसऱ्याला सांगितले नव्हते. तॉमासने ते हेलेनाच्या डोळ्यात पाहिले होते. आणि हेलेनाने तर्काने जाणले होते. या प्रेमाला बाण नव्हते व अग्नीचा दाह नव्हता. एकाच आकाशाखाली उमललेल्या दोन फुलांचा हा सुगंध होता. त्यांचा आनंद, निर्व्याजता व भाग्य यांचे ते प्रतिबिंब होते.

सुख हे नदीचे पाणी कापून जाणाऱ्या जहाजासारखे किंवा अवकाश कापून जाणाऱ्या गरुडपक्षासारखे सतत धावत असते. या तीन भावंडांच्या सुखाच्या आकाशात ढग क्वचितच येत. त्यांचे यौवनही त्यांच्या भाग्याचीच पुढची वाटचाल होती. त्याला भविष्याची काळजी नव्हती. त्याचप्रमाणे वर्तमानकालापासून ते अलिप्त होते.

पावित्र्य म्हणजे पृथ्वीवरील देवदूत व स्वर्गतील देवदूत यांच्या साहचर्याचा परिपाक. देवाची कृपा या तीन भावंडावर झरत होती. आणि प्रेमाच्या बळावर ही त्रिमूर्ती एकरूपता पावली होती. बाल्य चिरंतन असते तर त्यांना धन्यता वाटली असती.

रविवार हा त्यांच्या आनंदाचा दिवस. कारण त्या दिवशी या दोघा बहिणींना तॉमासचा सहवास मिळे, प्रत्येकजण या दिवशी आपले अनुभव, सुखदुःखे यांची झडती घेई. व त्याचा पाढा वाची. आणि बंधुत्वाच्या पिंडिकेला वसंतऋतूतील पहिल्या फुलांप्रमाणे, आपले विचार अर्पण करी. दुसरा आनंदाचा दिवस म्हणजे रॉबेर्तची व पाद्री फ्रान्सिश्कुची पत्रे येत तो दिवस. त्याच दिवशी त्यांना उलट पत्रे लिहायची त्यांना उत्सुकता लागे. ती पत्रे बैठकीत वाचली जात. त्यांना उत्तरे दिली जात. गेल्या बऱ्याच दिवसांत त्यांना हा आनंद चाखता आला नव्हता. कारण शेवटच्या डाकेने त्यांना पत्रे आणली नव्हती

अनुक्रमणिका

११

Quantum Mutatus ab illo?

मे महिना. सूर्याच्या प्रखर उष्णतेने मैदाने रखरखीत होती. वाळलेली पाने करकरत होती. माडाच्या झावळ्यानी आपला स्वाभाविक हिरवा रंग टाकून पिवळा रंग धारण केला होता. वनस्पतीच्या सृष्टीत हा रंग मृत्यूचा सूचक आहे. हरीण धापा टाकीत जीभ बाहेर काढून झऱ्याकडे धाव घेत असतो. पाखरे आपल्या घट्याभोवती भयभीत होऊन घिरट्या घालीत असतात. उकाड्यात तळमळणारी माणसे गुदमरत असतात.

त्या ऋतूत तुम्ही हिंदुस्थानात गेलात तर शहराच्या चौकात किंवा सडकांच्या बाजूला, झाडांच्या सावलीत अस्ताव्यस्त पडलेले अर्धनग्न हिन्दी कामगार तुम्हाला दिसतील. dolce bar niente माणसांची व सामानांची ने–आण करणारे ते हमाल व भोई आहेत. तुम्हाला त्यांची गरज असली तर तुम्ही त्यांना उठवा. आणि तुमचा बाडबिस्तरा नेण्याची त्यांची इच्छा असल्यास त्यांना विचारा. बसल्या बसल्याच, अर्धवट झाकलेल्या डोळ्यांनी, झोपेने पेंगत ते तुम्हाला म्हणतील, “आमच्यानं होणार नाही.” तुम्ही त्यांना दुप्पट मुशाहिरा देण्याचे कबूल केलेत तर तत्काळ ते भुईवर लवंडतील. तिप्पट सांगितला तर झोपतील. चौपट सांगितला तर घोरू लागतील. उकाड्यामुळे निकामी झालेल्या या आळशांना धाकधपटशा दाखवून उठविणारा पोलीस शिपाई तुम्हाला जवळपास दिसला नाही तर स्वावलंबी बनून तुम्हालाच आपले सामान पाठीवर लादून न्यावे लागेल. भारी उष्णतेचे हे परिणाम आहेत.

रखरखीत वाळवंटातल्या हिरवळीप्रमाणे परमेश्वराने हिंदुस्थानात कुळागरे निर्माण केली. अशा हेतूने की, सूर्याच्या प्रखर उन्हात माणसाला निवारा मिळावा. कुळागराला एका मंदिराचे ऐश्वर्य व बागेचा गारवा लाभलेला असतो. पोफळीची उंची वीस ते चाळीस मीटर इतकी असते. तिच्या झावळ्यांचे हिरवेगर्द झुबके एक प्रकारचा विस्तीर्ण घुमट तयार करतात. पोफळींना पिवळी भरदार शिपटी लटकलेली असतात. त्यांच्या खालचा संबंध विस्तीर्ण प्रदेश दाट सावलीत बुडून गेलेला असतो. जमिनीवर जाड, गुबगुबीत हिरवळ पसरलेली असते. तिच्यावर विविध रंगांची रानवट फुले उगवलेली असतात. अधून मधून पाण्याचे पाट चमकत असतात. पोफळीच्या सफेद खोडावर गर्द हिरवे मिरवेल चढतात व ते एकमेकात गुंफले जाऊन पानांचे जाळे विणतात. ह्या हजारो खोडांच्या मधून आकाशात तळपणारा सूर्य दिसतो. त्याच्या प्रखर उन्हात मैदाने भाजून निघतात. आणि त्यांच्यातून धुरांप्रमाणे धुळीचे लोट बाहेर पडतात. बाहेर दुपार कडकडत आहे. पण कुळागरात नुकतीच पहाट फुटते. कोंबडे अविरत आखतात. दवबिंदूचे मौक्तिक पानापानांवर चमकतात. इथे फुले कधी कोमेजत नाहीत आणि झरे आटत नाहीत. इथे पाखरांना धगधगीत उन्हापासून निवारा मिळतो. श्वापदांना इथे विसावा मिळतो. गुराख्यांचा दिवसभराचा शीण इथे दूर होतो. इथे माणसांच्या तोंडून उद्गार निघतात, “ही माझी स्वप्नभूमी आहे. मी नेहमीच इकडे परत येईन.”

हा भव्य प्रासाद वाऱ्याच्या झुळकीबरोबर हळू डोलू लागतो. पानाफुलांचा हा पर्वत हेलावू लागतो. सारी झाडे सुस्कारू लागतात. छतातून पुष्पवृष्टी होते. आणि हिरवळीच्या मऊ मऊ सुगंधी बिछान्यावर झोपलेल्या गुराख्याच्या पोरांना जाग येते. झोपाळ्यावरच्या या बिछान्याला, निसर्ग मायाळू मातेप्रमाणे, पाखरांच्या सुस्वर आलापांमध्ये व मंद वायूलहरीमध्ये झोके देत असतो.

फिझाबादच्या बंगल्याच्या एका विस्तीर्ण दालनात एका जाळीदार झोक्यावर बसून एकेकाळचा विरागी रॉबेर्त हुक्का पीत होता. हुक्कापात्र एका सुबक जपानी भांड्यावर ठेवले होते. त्या हुक्क्यातून निघणारा धूर गुलाबपाण्यात मिसळून रेशमी वस्त्राने अवगुंठीत असलेल्या नळीतून 'अंबर'च्या पाईपच्या द्वारा बाहेर पडत होता. झोक्यावरती असलेला चुणीदर भलामोठा पंखा दोन जवान सतत हलवीत होते. उशीगत सुरेख घडणीची एक मूर्ती होती. तिच्या हातात एक मुकूट होता. तेथून एक गुलाबी रंगाचा विरल पडदा सुटला होता. रॉबेर्तच्या उजव्या बाजूला बटलर होता. त्याच्यासमोर शिसवी लाकडांचे मेज होते. त्याच्यावर उंची दारूची बाटली होती. व चिनी कलाकुसरीचे एक भांडे व काही पेले होते. डाव्या बाजूला हुक्क्यात घातलेल्या निखाऱ्यावर फुंकर घालीत एक नोकर उभा होता. जवळच सफेद पोशाखात एक उंच ब्राह्मण सीतेच्या मुक्ततेवर कवने गाऊन दाखवीत होता. दालनाच्या चारी कोपऱ्यात संगमरवरी पाषाणाची उंची भलीमोठी पात्रे चमकत होती. त्यांच्यावर बागेतल्या ताज्या फुलांचे गेंद शोभत होते. आणि धुपाटण्यात चंदन जळत होता. त्या धुराच्या विरळ आवरणात भोगवादी रॉबेर्त गुरफुटला होता. मध्यभागी एक चिमुकले कारंजे जलमौक्तिकांचा शिडकाव करीत होते.

दालनाच्या भिंतींना; दारांना व कठड्यांना सौम्य हिरवा रंग दिला होता. आमच्या इंग्रजी नबाबाने आपले डोके पिवळ्या 'दामास्कस' कापडाच्या तक्क्यावर टेकले होते. हिरव्या सॅटिनचा लांब–रुंद पायजमा त्याने पेहरला होता. अंगात गुलाबी गंजीच्यावरती लिननचे खमीज घातले होते. पायात तलम रेशमी पायमोजे घातले होते आणि त्यांच्यावरती जराने मढविलेले लाल मखमलीचे चढाव घातले होते.

ब्राह्मणाच्या कथाकथनाच्या संथ आवाजाने आणि जाळीच्या सुखद झोक्यांनी रॉबेर्त डुलक्या घेऊ लागला.

अकस्मात दरवाजा करकर वाजला. तेव्हा त्याला जाग आली. डॉ. कार्टर आत पाऊल टाकीत होता. त्याच्या चेहऱ्यावर मनाची चलबिचल दिसत होती. रॉबेर्तच्या मादक नशेचा भंग करायला त्याला तसेच गंभीर कारण होते. डॉक्टरवर नजर पडताच रॉबेर्तने दचकून विचारले,

"डॉक्टर, अशा अवेळी यायला काय झालं?"

"दाविससाहेब" अत्यवस्थ आहेत. सहा वर्षानंतर त्यांना आता तिसरा झटका आलेला आहे. तिसरा झटका नेहमी घातक असतो. मला कोणतीच आशा दिसत नाही. आजाऱ्याला घरघर लागली आहे."

एक दिवस आपल्या काकांवर हा घाला पडेल अशी भीती रॉबेर्तला सतत वाटत होती. असे असले तरी त्याला धक्का बसल्याशिवाय राहिला नाही. त्याने लगेच पाद्री फ्रान्सिश्कुला बोलावणे धाडले व तो डॉक्टरकडे वळून म्हणाला,

"डॉक्टर, मला विश्वास आहे की, शक्य ते उपाय योजून तुम्ही आपल्या मित्राला वाचवाल."

डॉक्टरने निरोप घेताना रॉबेर्तचा हात दाबला व तेथून घाईघाईने निसटला.

दाविसची खोली म्हणजे पोलीसठाण्यावरची अंधारकोठडीच होती. थडग्याप्रमाणेच ती दुःखी दिसत होती. तेथील गाढ शांततेचा भंग करणारी गोष्ट म्हणजे मृत्युशय्येवर चाललेली दाविसची घरघर.

अनुक्रमणिका

एका दिव्याच्या अंधुक उजेडात बिछान्यावरची शुभ्र वस्त्रे वाऱ्याने उठणाऱ्या लाटांप्रमाणे हलत होती. या भीषण दृष्यात उशीवर डोके ठेऊन पडलेला डॉ. कार्टर उठून दिसत होता.

पाद्री फ्रान्सिश्कु नैवेद्यपात्र बरोबर घेऊन खोलीत शिरला. त्याच्यामागोमाग साक्रिस्ताव कंदील व धुपाटणे हातात घेऊन आला. मग देवाच्या मूर्तीसमोर सगळ्यांनी जमिनीला गुडघे टेकले. मूर्ती एकाकी होती. पण आपल्या उदात्त तेजोवलयात ती भव्योदात्त दिसत होती. पाद्री फ्रान्सिश्कुने पाहिले की, अत्यवस्थ दाविस 'कन्फेशन' (पापे कबूल) करण्याच्या अवस्थेत नाही. म्हणून पाद्रीने अंतिम धार्मिक विधी केला आणि डोळे आकाशाकडे वर करून हलक्या आवाजात मनाच्या तळमळीने परमेश्वराची प्रार्थना केली. इहलोक सोडून अमर लोकांकडे देवाच्या राज्यात जाणाऱ्या आत्म्यासाठी.

संध्याकाळची घंटा वाजली. दाविसने आपल्या एक तपाच्या झोपेचा शेवट केला.

अनुक्रमणिका

१२

मृत्युपत्र

O homen poe e Deus dispoe

दाविसच्या मृत्युनंतर, चारस दिवसांनी सकाळच्या दहा वाजता त्याच्या खोलीत औधचा नवीन न्यायाधीश आणि त्याचे कामगार गोळा झाले. काही वेळानंतर रॉबेर्त शोकनिदर्शक काळ्या पोषाखात तेथे दाखल झाला. त्याच्याबरोबर फ्रान्सिश्कु होता. ते दिसताच न्यायाधीश उठला. आणि चाव्यांचा एक जुडगा रॉबेर्तच्या स्वाधीन करून गंभीर आवाजात म्हणाला, “कृपा करून त्या मेजाचे खण उघडा. तुमच्या काकांची शेवटची इच्छा मला समजून घ्यायची आहे.”

रॉबेर्तने तेथे उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांसमोर किंचित मान लववून मेजाचा पहिला खण उघडला. मग त्यातून एक कागद बाहेर काढला. व तो न्यायमूर्तीच्या हवाली केला. एक कामगार तो कागद खड्या आवाजात वाचून दाखवू लागला. त्यात लिहिले होते—

नंबर २ च्या खणात शेतकरी कुळांचा हिशेब ठेवलेला आहे. आमच्या एजंटांचा पत्रव्यवहार आहे. वेगवेगळ्या कंपनीशी झालेल्या व्यवहाराचा हिशोब आहे. आणि ज्या साली साहेब आजारी पडले त्या १८४० पर्यंतचे कागदपत्र आहेत.

नंबर तीनच्या खणांत बंगाल बँकेच्या पॉलिसी आहेत. कंपनीचे रोखे आहेत. तीन हजार पौंडांची रोकड आहे. आणि रिकार्दच्या हिती केलेले मृत्युपत्र आहे.

नंबर चारच्या खणात एक बंद तिजोरी असून तिच्यात सात हिरे आहेत. त्यातील एका हिऱ्याची किंमत दहा हजार पौंड आहे. आणि रॉबेर्तच्या हिती एक मृत्युपत्र आहे.

माग्नोद (सही)

रॉबेर्तच्या कानावर हे नाव पडले मात्र. एक थंडगार सणक त्यांच्या देहांतून धावली. कित्येकवेळा मनाचे होरे किती आश्चर्यकारक असतात?

दुसरा खण उघडण्यात आला. त्यात यादीत नोंद केलेल्या सगळ्या वस्तू मिळाल्या. तिसरा खण उघडण्यात आला. मृत्युपत्रावरचा मोहरबंद कागद फोडून उपस्थितांच्या माहितीसाठी न्यायाधीश तो उंच आवाजात वाचू लागला. त्यात दाविसच्या थोरल्या भावाचा मुलगा—मृताचा पुतण्या रिकार्द दाविस याला जिंदगीचा वारस नेमण्यात आले होते. अशा अटींवर की, त्याने रॉबेर्तच्या मुलीशी विवाह करावा. तिची ह्या विवाहाला संमती नसली तर सगळी जिंदगी रिकार्दला मिळावी. या अटीशिवाय रिकार्दने दरमहा रॉबेर्तला मासिक पंधरा पौंडाचे वेतन द्यावे असे कलम होते. इतर कलमात धार्मिक संस्थाना दिलेल्या रकमांचा उल्लेख होता.

अनुक्रमणिका

"हे मृत्युपत्र दाविसच्या अंतःकाळी केलेले दिसत नाही." न्यायाधीश रॉबेर्तकडे वळून म्हणाला, "ते रद्द केले गेले आहे. ज्यावर्षी मी हिंदुस्थानात आलो त्यावर्षी पण त्यानंतर केलेल्या मृत्युपत्रात कितीतरी अधिक कलमे आहेत. हे तुम्हाला लौकरच कळून येईल." रॉबेर्तने म्हटले.

"आता चौथ्या खणात पाहू." न्यायाधीशाने जवळ जाऊन म्हटले.

रॉबेर्तने कुलूपामध्ये किल्ली घातली आणि ती जोराने ओढली. त्याबरोबर खण उघडला, पण तो अगदी रिकामा होता. विजेचा झटका बसल्याप्रमाणे सगळेजण मागे सरले. त्यांच्या मनात उडालेल्या गोंधळाला सीमा नव्हती. रॉबेर्तचे तर देहभान हरपले होते. ज्या काळ्याकुट्ट विचारांनी त्याला घेरले होते. त्यात त्याला माग्नोदचे नाव बाल्मीझारच्या भिंतीवर लिहिलेल्या Thecel Manes Phares ह्या शब्दांप्रमाणे चमकत असलेले दिसले. पाद्री फ्रान्सिश्कु उद्गारला.

"परमेश्वराची इच्छा!"

अनुक्रमणिका

१३

वंद्य पाद्री फ्रान्सिश्कु द सान्त कातारीन

आल्गव्हिच्या एका जुन्या खानदान घराण्यात पाद्री फ्रान्सिश्कुचा जन्म झाला. लहानपणीच त्याने पाद्रीची दीक्षा घेतली ती, थडग्याचा उपयोग प्रेत झाकण्यासाठी करतात, त्याप्रमाणे आपल्या गतायुष्यावर पांघरुण घालण्यासाठी नव्हे. जगाच्या अमंगळ संपर्कापासून आपल्या आत्म्याचे संरक्षण करावे याच हेतूने हे कवच घातले. तो तरुण, श्रीमंत व गुणी होता. असे असूनही त्याते मनचा एकांत स्वेच्छेने पत्करला. कफनी परिधान केली. जी पुष्कळदा अंतःकाळी देहाचे आच्छादन ठरते, आणि आत्म्याचा शृंगार ठरते. जीवनाची रात्र ठरते, आणि चिरंतनाची उषा ठरते.

ज्यांचा कल परमार्थाकडे असतो, ज्याच्याकडे परमेश्वराची कृपादृष्टी वळते त्यांना मठ हे इहलोकांचे थडगे असते व परलोकचा पाळणा असतो. तेथे एका जीविताचा अंत होतो व दुसऱ्या जीविताचा प्रारंभ होतो, तेथे माणसांचे दुर्भिक्ष असते, व परमेश्वराचे अमर्याद साहचर्य असते. शरीराची निद्रा असते, व आत्म्याची जागृती असते. लौकिक ऐश्वर्याचे शून्य असते, व चिरंतनाचे ब्रम्हांड असते.

लौकिक दृष्टीला अभागी वाटणारे हे मठवासी जिवंत प्रेते वाटतात. देवदूत संताच्या समाधीवर ओणव्याने राहातात. त्याप्रमाणे हे मठवासी आपल्या गुडघ्याने फरशीच्या दगडांना खिळलेले असतात. डोळे स्वर्गाकडे लावून, हात पसरून प्रसन्न चेहऱ्याने बसलेले हे प्राणी पृथ्वीवरची जिवंत भुते वाटतात. चिरंतनाच्या मृगजलाने त्यांना आपल्याकडे खेचलेले असते. आशेच्या धुंदीने त्यांना पाषाणवत स्थिर केलेले असते. या जीवांना पाहिल्यावर असे वाटते की देवांच्या राज्यात जागे होण्यासाठीच या निद्रेत बुडालेले आहेत. श्रद्धेमुळेच त्यांनी ही वस्त्रे परिधान केलेली असतात. श्रद्धेनेच त्यांना या थडग्यात गाडून ठेवलेले असते. आणि एका संताने एका महारोग्याला सांगितले त्या प्रमाणे ती श्रद्धाच त्यांना सांगत असते "**Sis mortuus mundo Vivens itesrum Deo**"

जे धीराने प्रतिक्षा करतात ते धन्य होत! मठांच्या या हुतात्म्यांचा जयजयकार असो!

ज्यांना परमार्थात रस नाही अशांचीच संख्या या जगात मोठी असते. त्यांना मठ हा एक करमुक्त धंदा आहे; कष्टाविना नफा आहे; लज्जारहित व्यसन आहे; दुष्किर्तीरहित गुन्हा आहे; गुणवत्तारहित पूजा आहे; श्रद्धेविना आत्मा आहे; आशेविना भविष्य आहे, ज्युडासचे **चुंबन** आहे; दांभिकाचा दंभ आहे; सौजन्याने मढविलेले दुराचाराचे दगड आहेत.

या विश्वासघातकी माणसांची छी : थू होईल!

मठाकडे धाव घेणारे पुष्कळ असतात. पण त्यांत पुण्यवान थोडेच असतात. या जगात दुष्टांचाच भरणा मोठा आहे. आणि सज्जनांची वाण आहे. क्रियास्वातंत्र्य हा नियम झाला पाहिजे. मठवास हा अपवाद झाला पाहिजे. मठाचा अधिवास हा स्वर्ग आहे. त्याचा धिःकार हा नरक आहे. अशा दुटप्पी संस्थांपासून सावध रहा.

अनुक्रमणिका

मठ, पंथ, चर्च यांनी नव्या संस्कृतीला तिच्या बाल्यावस्थेत अंगाई गीते म्हणून झोके दिले. त्यांची जोपासना केली, संरक्षण केले. राजसत्ता ही बराच काळपर्यंत चर्चची दासी झाली. आज ती सज्ञान झाली असून स्वातंत्र्याची मागणी करीत आहे. ते तिला हवे. लहानपणीचे कपडे घालण्याची तिच्यावर जबरदस्ती करणे हे मूर्खपणाचे आहे. चर्चने राजसत्तेपाशी भक्तीची व स्वातंत्र्याची मागणी करावी ते त्याला मिळतील. अधिक मागू नये. कारण त्याचा अवमान होण्याचा संभव आहे.

आता पाद्री फ्रान्सिश्कुकडे वळूया. तो एक देवमाणूस होता. लहानपणीच तो गोव्यात आला होता. तेथे सेन्ट आगोश्तीन्यु पंथाच्या संन्याशांचा एक भव्य मठ होता. आणि 'पॉपुलु' नावाची एक शिक्षणसंस्था होती. धर्म संप्रदायांच्या संस्था नष्ट करण्यात आल्या, त्या वेळी पाद्री फ्रान्सिश्कुचे वय सत्तेचाळीस वर्षांचे होते. मठांची द्वारे जगाला बंद झाली होती. पाद्री फ्रान्सिश्कुला कृतिस्वातंत्र्य देण्यात आले. आणि ते त्याने नाकारले. कारण त्याच्यापासून ते कोणीच हिरावून घेतले नव्हते. त्याने स्वेच्छेने सेवाधर्म पत्करला होता. मठ नष्ट झाले. पण मिशन्स राहिली, आश्रम राहिले. पाद्री फ्रान्सिश्कुने मागणी केली की, मठातील शांती व सुख यांच्याऐवजी आपल्याला कष्ट दारिद्र्य, संकटे, भूक, तहान, हालअपेष्टा देण्यात यावे म्हणजे तेथे आत्म्याची शक्ती, भक्ती व पूर्णत्व यांची सत्ता गाजविता येईल. त्याची विनंती मान्य करण्यात आली गोव्याच्या आर्च बिशपने मिशनरी म्हणून उत्तर हिंदुस्थानांत त्याची नेमणूक केली. त्याने कोणतीच तक्रार केल्याशिवाय आपली खोली सोडली.

त्याच्या दृष्टीने मठ हे एक बाह्यस्वरूप होते. तो नष्ट केला म्हणून धर्म नष्ट होत नाही. किंवा त्याग त्याज्य होत नाही. मठ काय किंवा आश्रम काय, परमेश्वर सगळीकडे असल्यावर तक्रारीला स्थान कोठे आहे?

आपला मठ सोडताना पाद्री फ्रान्सिश्कुने ज्या वस्तू बरोबर घेतल्या त्या म्हणजे एक क्रॉस, एक बायबल व दोन रावे पक्षी असलेला एक पिंजरा. तो बरेच प्रदेश फिरून आल्यावर दाविसने व बऱ्याच ख्रिश्चनांनी आपल्या गांवची धर्मोपदेशकांची वाण दूर करण्याकरिता त्याला औधला येण्याचा आग्रह केला आणि मग तो औधला आला.

त्याचे घर म्हणजे एक बराकी होती. या दैवी **डायोजेनिसला** अधिक कांही नको होते. कारण देवावरील प्रेमांमुळे तो कष्ट उपसण्यासाठीच जगत होता. घरातले फर्नीचर गरजेपुरते अगदी साधे होते. एक खाट, दोन खुर्च्या व एक मेज. कांचसामान म्हणजे त्याला लोकांनी दयाबुद्धीने दिलेल्या वस्तूंचा संग्रह. त्याचा ग्रंथसंग्रह म्हणजे एक प्रार्थनेचे पुस्तक आणि बायबल. हा ग्रंथ म्हणजे सगळ्या ग्रंथांचा राजा. सगळ्या काळांचा. सगळ्या लहानथोर बुद्धिवंताचा. कारण तो चिरतत्वाचा.

त्याचे कुटुंब म्हणजे एक नोकर, एक **साक्रिस्तांव** जो रात्रीच्यावेळी त्याला सोबत करी. आणि (वाचकांच्या परवानगीने) दोन पक्षी. गोवा सोडल्यापासून त्याने या दोन पांखरांना कधीच अंतर दिले नाही. एक पक्षी मेला तर लगेच पिंजऱ्यात दुसरा आणून ठेवण्यात येई. त्यांची नावे साबाय्यू आणि टिपू. ही नावे परंपरेने चालू राहिली.

पहाटेच्या वेळी या पक्षांचे सुगमसंगीत कानावर पडले म्हणजे पाद्री फ्रान्सिश्कु साखर झोपेतून जागा होई. सूर्याच्या पहिल्या कवडशांची वर्दी तेच त्याला देत. महमदच्या **पारवीप्रमाणे** त्याच्या खांद्यावर बसून ते

अनुक्रमणिका

त्याला दुपारच्या वामकुक्षीतून जागे करीत. तो दारात दिसला की, पळत जाऊन तेच त्याचे पहिले स्वागत करीत. दीर्घ वियोगानंतर बाप घराला आला म्हणजे त्याच्या आठवणीनी हैराण झालेली मुले त्याला वेंगेत घेण्यासाठी धावत जातात त्याप्रमाणे ते दोघे पक्षी लगबगीने त्याच्याकडे धाव घेत. खोलीत इकडे तिकडे उडून व गाऊन त्याची करमणूक करीत. पाद्री फ्रान्सिश्कु त्यांचा एकढा दोस्त झाला होता की, त्यांना कुरवाळल्याशिवाय त्याला चैन पडत नसे. तो त्यांना रागे भरे आणि कधी कधी तो त्यांच्यासमवेत रडू लागे. माणसाला जगण्यासाठी प्रेमाची जरूरी असते. प्रेमाला उदात्त क्षण असतात तसेच बालीश क्षण असतात. गंभीर बाजू असते आणि अल्लड बाजू असते. पहिल्या बाजूचा आदर करायला शिका. पण दुसऱ्या बाजूकडे क्षमाशील व्हा. प्रेम हे एक बालक आहे. जे प्रेम करतात ते बालक बनतात.

एखाद्या बँकेचे दिवाळे निघाले म्हणजे ठेवीदारांना मूळ ठेवीचा क्षुल्लक हिस्सा मिळतो त्याप्रमाणे पाद्री फ्रान्सिश्कुला गोव्याच्या सरकारी तिजोरीतून सालीना तीस पौंड मिळत. त्यांत आणखी वीस पौंडची भर पडत होती. डिसेंबरच्या तीन तारखेला तो एक प्रार्थना व एक प्रवचन करी. त्या कामाबद्दल दाविस त्याला तेवढी रक्कम देई. त्याच्या हवाली केलेल्या कळपात तीनशेपेक्षा अधिक मेंढ्या नव्हत्या. त्यामुळे त्यांच्यापासून प्राप्ती अशी थोडीच होई, ही त्याची उत्पन्नाची बाजू. खर्चाची बाजू कधीच उत्पन्नापेक्षा अधिक होत नसे. कारण तत्त्वनिष्ठ माणसांप्रमाणे पाद्री फ्रान्सिश्कुला कर्जाची भिती वाटे.

त्याचे जेवण म्हणजे भिकार न्याहरी. त्याचा एक शेजारी त्याला घोडे पुरवीत असे. त्याचा मुशाहिरा म्हणून त्याला वार्षिक तीन पौंडाचा खर्च येई. त्याला फाटा द्यावा असे कित्येकदा त्याच्या मनात येई. पण ते शक्य होत नसे. त्याचे वय वाढले होते, हे एक. शिवाय अतिरिक्त श्रमामुळे त्याची शक्ती तुटत चालली होती. म्हणून तो खर्च अटळ होता. त्याला त्याने मान्यता दिली, ती आपल्या सुखसोयीसाठी नव्हे, तर आपल्या निष्पाप कळपाची सेवा करता यावी म्हणून. सेवेसाठी जगण्याची गरज होती म्हणून. आपल्या कळपाला साद घालून तो त्याला एकत्र आणि. आणि आपल्या शब्दांनी व आचारांनी त्याला शिकवी.

पाद्री फ्रान्सिश्कुचा जीवनप्रवाह याप्रमाणे संथ व एकाकी चालला होता. दररोज सकाळी सात वाजतां तो सेन्ट शाव्हियरच्या चर्चमध्ये प्रार्थना करी. तीन वाजतां बायबल वाची व स्त्रोत्र म्हणे. संध्याकाळी सहा वाजता दाविस कुटुंबाच्या भेटीस जाई. राहिलेला वेळ तो धर्मशास्त्र शिकविण्यात व गरजवंताना सहाय्य देण्यात खर्च करी.

संध्याकाळचे पाच वाजले. आणि पर्वतशिखरावर सोनेरी किरण उतरू लागले म्हणजे फ्रान्सिश्कु पायघोळ डगला घालून घराबाहेर पडे. त्या वेळी त्याच्या हातात वेताची छडी असे. पायांत जाड्या भरड्या वाहणा असत. आणि डोक्यावर युरोपीयन टोपी हलत असे. वाटेत पाद्री फ्रान्सिश्कुला शेतातून परतणारे मजूर लोक भेटत. त्याची शुभ्र दाढी काळ्या डगल्यावर हलत राही. जणू धबधब्याचा प्रवाह काळ्या खडकावर आदळून असंख्य जलधारांनी पिळवटून जात आहे. त्याचे जागरणाने ओढलेले डोळे, आणि आसवांनी भिजलेले गाल, देहदंडाने झिजलेली व वाकलेली काया हे सारे पाहून ते गावकरी आपल्या टोप्या उचलून त्याला मुजरा करीत आणि थबकत, तेव्हा आपला कापरा हात टोपीकडे नेऊन तो पुटपुटू लागे.

Boas Tardes माझ्या मुलांनो!"

मूर्तीपूजक हिंदी लोक देखील त्याला फार मानीत. तो चर्चमध्ये करीत असलेल्या प्रार्थनांना कृतज्ञ मनाने उपस्थित रहात. त्या त्यांना इतक्या मधुर व आंतरिक तळमळीने ओंथबलेल्या वाटत की, संताच्या

तोंडून निघालेले बायबलचे संदेशच जणू. कित्येकवेळा त्याच्या ओठावरचा शब्द अवचित विरून जाई. आणि त्या हृदयातून करुणा वाहू लागे. त्या वेळी भाविक श्रोते गहिंवरून जात.

पाद्री फ्रान्सिश्कु उदारमतवादी होता. बायबलाची त्याला तशी शिकवण होती. तो वर्ण व जाती मानीत नव्हता. गुलाम आणि धनी हा भेद मानीत नव्हता. चांडाळ आणि राजपुत्र दोन्ही त्याला सारखे होते. त्याच्या दृष्टीने सगळी परमेश्वराची लेकरे होती. ख्रिस्ती धर्म हेच त्याचे राजकारण होते. जुलमी राजवटीत तो जन्मला होता. आणि तो अशा कुटुंबात वाढला होत की, जेथे एका पंथाखेरीज कोणीच स्वतंत्र नव्हते. पाद्री फ्रान्सिश्कुने पुराणमतवादी संस्थांशी व विचारांशी असलेला आपला संबंध तोडून टाकला होता. ज्याप्रमाणे सुरवंटांना पंख फुटले, म्हणजे कोश फोडून ते उडून जातात त्याप्रमाणे.

हिंदुस्थानांतील इंग्रजी राजवट त्याला पसंत नव्हती; पण राजे महाराजांच्या व नबाबांच्या सुलतानशाहीपेक्षा ती त्याला चांगली वाटे. बंगाल प्रांतात विकासाची जी कामे चालू होती, त्यांना त्याचा पाठिंबा होता.

पाद्री फ्रान्सिश्कु माग्नोदला आपला भाऊ मानीत असे. व त्याच्याशी तो जाती व गुलामगिरी याची चर्चा करी. शॅरीडन व विल्बरफोर्स अधिक प्रभावी रीतीने बोलले असतील; पण पाद्री फ्रान्सिश्कुच्या बोलण्यातील तळमळ व उद्वेग त्यांच्या वक्तृत्वात निश्चित नव्हता. वक्तृत्वाच्या नयनमनोहर कारंज्यापेक्षा निष्ठेला अधिक महत्त्व आहे. संबंध मानवजातीची एकता अस्तित्वात असेपर्यंत मला गुलामगिरी व ज्ञातीव्यवस्था मान्य करताच येत नाही, असे तो म्हणत असे.

'**पाद्रोआद**'च्या बाबतीत त्याची मते जितकी स्पष्ट तितकीच निश्चल होती. आपल्या राष्ट्रप्रेमाच्या सगळ्या शक्तिनिशी तो 'पाद्रोआद'चे समर्थन करी. धार्मिक कायदा व चर्चने बहाल केलेल्या सवलती या दोन्ही दृष्टींनी त्यांना पाद्रोआदने योग्य वाटत होता.

पण पाद्रीवर्ग आपल्या कर्तव्यपालनात चुकारू ठरला तर त्याला 'पाद्रोआद' नष्ट झाला पाहिजे असे वाटे. कारण ख्रिस्ती जमातींना आपल्या आत्म्याचे कल्याण करण्याचा जो अधिकार बहाल करण्यात आला आहे यापेक्षा दुसरा मोठा अधिकार नाही. त्याचप्रमाणे आपल्या लेकरांचा उद्धार करण्याचे जे महान कर्तव्य त्याच्या पित्याच्या—परमेश्वराच्या वाट्याला आले आहे त्यापेक्षा दुसरे कोणतेच कर्तव्य श्रेष्ठ नाही.

म्हणून '**प्रॉपागांद फिदे**'ला जर पोर्तुगालपासून कायदेशीर व सरळमार्गांनी 'पाद्रोआद' हिरावून घ्यावयाचा असेल तर त्याने हे सिद्ध करून द्यावे की, पोर्तुगालचा पाद्रीवर्ग हा कर्तव्यदक्ष नाही, त्याने चर्चला आधार दिलेला नाही आणि ख्रिस्ती समजाच्या पारलौकिक कल्याणाकडे दुर्लक्ष केले आहे.

जे बळजबरीचा उपयोग करतात त्यांची कालांतराने हानी व दुष्कीर्ती झाल्याशिवाय राहात नाही. कुभांड रचणाऱ्याविरुद्धच ते उलटते.

जर 'प्रॉपागांद फिदे'ने ओसाड डोंगरमाथ्याची लागवडीसाठी मागणी केली असती, जर अंधःकार नष्ट करण्याकरिता त्याच्या शोधासाठी ते बाहेर पडले असते, आत्म्यांचा उद्धार करण्यासाठी त्यांचा शोध केला असता, जर **जॉनासप्रमाणे** जेरूसलेमचा पोकळ जयजयकार धुडकावून 'निनिव्ह' ची महान शिकवण शिरोधार्य मानण्याचे धैर्य दाखवले असते, तर त्यांचे प्रयत्न स्तुत्य व न्याय ठरले असते. परंतु दुर्दैवाने या

उपदेशकांच्या आवाजाचे पडसाद शहराबाहेर कुठेही एकू येत नाहीत. त्यांची पावलट फक्त शहरांतील सडकांवर उमटलेली दिसते. आणि त्यांची दक्षता जेथे तिची गरज नाही तेथेच उभी रहाते.

अनुक्रमणिका

१४

त्याच्या विवंचना

तॉमास आणि ॲमिली ह्यांच्या भविष्याची काळजी पाद्री फ्रान्सिश्कुला लागून राहिली होती. दाविसच्या मृत्युपत्रातील कलमानुसार रॉबेर्तला फक्त मासिक पंधरा पौंडाचे वेतन मिळणार होते. त्यांतले बारा पौंड हेलेना व दोन भावंडे ह्यांच्यासाठी देणे त्याला अशक्य होते. तूर्त काही दिवसांपुरता तो दाविस घराण्याचा कारभार चालविणार होता. त्या कामाबद्दल त्याला दरमहा पंधरा पौंडांची बिदागी मिळणार होती. आणि मग?

पाद्री फ्रान्सिश्कुची ताकद एवढी नव्हती की या अनाथ भावंडांच्या खर्चाचा बोजा त्याने उचलावा. हा प्रश्न इतका गंभीर होता की, त्याने पाद्री फ्रान्सिश्कुची झोप उडाली. आपले शिक्षण पुरे करायला अवघे एक वर्ष शिल्लक असताना तॉमासला ते बंद करायला सांगणे म्हणजे शुद्ध वेडेपणा होईल—पाद्री फ्रान्सिश्कु स्वताशीच सल्लामसलत करीत म्हणाला—तॉमास व ॲमिली यांना कॉलेज सोडायला लावणे, विशेषतः त्याची त्यांना अधिक जरुरी आहे अशा वेळी—म्हणजे आजवर त्यांच्यासाठी केलेला खर्च निष्फळ होईल. ६ पौंडापेक्षा अधिक मदत रॉबेर्त देऊ शकणार नाही. राहिलेल्या सहा पौंडाची तरतूद कशी करणार? एवढी रक्कम आपण कशी उभी करणार?

पाद्री फ्रान्सिश्कुने आपल्या जमाखर्चाचे अंदाजपत्रक तपासून पाहिले. त्यांतील प्रत्येक कलमाची कसोशीने छाननी केली. एवढ्या कसोशीने की, आपले अर्थमंत्री देखील करीत नसतील. काही कलमे तर त्याने अगोदरच इतकी आवळून आणली होती की, त्यांत नवीन काटछाटीला वावच नव्हता. शिवाय, त्यात कोणाचाच फायदा नव्हता. दुसरी काही अशी होती की, जेथे कातर लावता आली असती.

मग त्याने आपल्या बिअरवर गदा आणली. गोवा सोडल्यापासून त्याने तिची सवय लावून घेतली होती. ते कलम सपशेल गाळले.

भिक्षेच्या कलमांत पुन्हा काटकसर केली, दर महिन्याला 'मॉन्तीपियु' नावांच्या पतपेढीत तो काही रक्कम टाकीत होता. ती बंद करण्याचा त्याने निर्णय घेतला. पण हा सारा काटछाटीचा प्रपंच करूनही तीन पौंडाचादेखील भरणा होत नव्हता. बाकीची रक्कम कुठून पैदा होणार? इथे तो डोके खाजवू लागला.

आकाशाकडे लागलेले डोळे नव्या कल्पनेचा शोध करू लागले. आणि अवचित, आशेचा किरण दिसल्यागत तो उद्गारला.

"देव समर्थ आहे. दिल्लीत वर्गणी गोळा केली आणि माझ्या काही स्नेह्यांकडे याचना केली तर हा गुंता सुटेल." तो स्वतःशीच पुटपुटला.— परमेश्वरावर ज्याची श्रद्धा त्याला निराशा ठाऊक नसते.

एका सकाळी पाद्री फ्रान्सिश्कु रॉबेर्तच्या भेटीस जाण्याच्या तयारीत होता. इतक्यात त्याला दारात एक उघडावागडा, अनोळखी इसम दिसला. चौकशीअंती त्याला असे कळून आले की, एका मरणोन्मुख माणसाचा अंतिम धर्मविधी करण्यासाठी पाद्री फ्रान्सिश्कुला घेऊन जाण्याचा त्याचा इरादा होता.

"फार दूर नाही ना?" पाद्री फ्रान्सिश्कुने त्याला न कंटाळता विचारले?

"जुन्या औधात, इथून चार कोसांवर." तो अपरिचित इसम चाचपडत म्हणाला.

साक्रिस्तांवच्या कानावर ही निराशाजनक वार्ता पसरली मात्र, त्याच्या डाव्या पायाला अचानक संधिवाताचा झटका आला.

आपला पाय प्रयासाने ओढीत तो पाद्रीच्या खोलीच्या दारापर्यंत येऊन कण्हत म्हणाला "पाद्रीसाहेब... इतक्या दूर...? ... माझा पाय" आणि इतके बोलून हाताने आपला पाय दाबीत तो पुन्हा कण्हू लागला.

"म्हणतोस काय तू?" पाद्रीने रागीट स्वरात विचारले. पाद्री फ्रान्सिश्कुचा नूर पाहून साक्रिस्तांव नरमला. आणि आपल्या लबाडीची सारवासारव करण्यासाठी म्हणाला,

"साहेब, पण मी तुमच्याबरोबर यायला तयार आहे." साक्रिस्तांवचे हे ढोंग पाद्रीच्या लक्षात आले. त्याबरोबर त्याने निक्षून सांगितले. "माझी परवानगी नाही. तू झोप जाऊन"

पाद्री फ्रान्सिश्कुने पायात बूट चढविले. आपला डगला घातला. रॉबेर्तने दिलेला गरम कोट घेतला मग निघण्यापूर्वी आपल्या पाखरांचा निरोप घेतला व घराबाहेर पडला.

एकेकाळी औध शहर फार प्रसिद्ध होते. अब्दुल फाझलच्या म्हणण्याप्रमाणे, त्याची लांबी दोनशे नव्वद मैल होती. आज ते उध्वस्त झालेले आहे आणि त्याच्या वेळूच्या दाट जंगलात ढग आणि श्वापदे यांची वस्ती झालेली आहे.

संध्याकाळचा चारचा सुमार. सूर्याच्या प्रखर उन्हात वाकड्या तिकड्या वाटेने बराच वेळ चालून गेल्यानंतर पाद्री फ्रान्सिश्कु एका मोडक्या देवळाजवळ पोहोचला. तेथे त्याला एका इसमाने सांगितले की, मरणोन्मुख असलेला तो रोगी आज दुपारी बारा वाजता वारला.

पाद्री फ्रान्सिश्कुने छातीवर दोन्ही हातांचा क्रॉस केला आणि त्याच्या ओठातून अभावितपणे मृतासाठी प्रार्थना निघाली.

आपल्या कर्तव्याची सांगता होताच त्याने घोड्याला चरायला सोडला. ओव्हरकोट एका झाडाच्या सावलीत जमिनीवर अंथरला आणि त्याच्यावर आडवा झाला; काही मिनिटांच्या आंत त्याला गाढ झोप लागली.

अनुक्रमणिका

१५

अंधारात सगळ्या मांजरांचा रंग एकच

माग्नोद थोड्यात काळात ठगांच्याच टोळीचा मुख्य बनला, तो आपल्या शौर्यापेक्षा कपटी स्वभावामुळे. गोरखपूरचे जंगल सोडून त्याला आता दोन महिने झाले होते. आणि या दिवसात तो आपल्या टोळीनिशी औधच्या परिसरात भटकत होता. एकदा त्याच्या हेराने त्याच्या कानावर वार्ता घातली की, जवळच्याच एका मोडक्या देवळाच्या आसपास एका युरोपियन साहेबाला त्याने पाहिले आहे. हे वर्तमान कळताच त्याच्या साथीदाराने चेहरे आसुरी आनंदाने चमकले. माग्नोद आपल्या जागेवरून ताड्कन उठून उभा राहिला.

“हा रॉबेर्त तर नाही ना? — माग्नोद अभावितपणे म्हणाला.

मग त्याने एका साथीदाराला सोबतीला घेतले आणि तो कामगिरीवर निघाला. संथ चालीने ते वाट तोडीत होते, घटकेत उजव्या बाजूला तर घटकेत डाव्या बाजूला पाहात. अवचित माग्नोद चमकून एक पाऊन मागे हटला. व त्याच्या तोंडून एक चित्कार निघाला.

“याच माणसानं माझ्या मुलांना व बायकोला ठार केलं. यानंच माझ्या सुखावर थडगं उभारलं जे आता कधीच ढळणार नाही. आज हा माझ्या तावडीत सापडला आहे. माझं मन मला सूडाचं आश्वासन देत होतं. ते आज खरं ठरत आहे. हाच तो रॉबेर्त मी त्याला पक्का ओळखतो. तो पहा त्याचा कोट. आता अधिक वेळ दवडता उपयोगी नाही. “माग्नोद मनातल्या मनात म्हणाला. मग त्याने लगेच भोठ्या शिताफीने त्याच्यावर फास टाकला. परंतु तो आवळण्यापूर्वी आपल्या दुष्मनाच्या अंतःकाळच्या यातना त्यला पाहायच्या होत्या. ब्राह्मणाच्या हृदयात संताप व आनंद यांचे कढ उसळत होते. अत्याचाराचा क्षण नजीक आला म्हणजे अत्याचारी इसमाच्या मनात तो आसुरी आनंद सळसळतो, त्याने आता माग्नोदचा कब्जा घेतला इतक्यात त्या अज्ञात इसमाने आपल्या मस्तकाला गुंडाळलेला रूमाल बाजूला सारला. त्याबरोबर त्याचे टक्कल उघडे पडले. मशालीचा फिक्कट उजेड त्याच्यावर पडला.

तो दुर्दैवी इसम दुसरा तिसरा कोणी नसून पाद्री फ्रान्सिश्कु होता. माग्नोदने त्याला ओळखला. त्याची फसगत झाली होती. आपला गळा फासात अडकला आहे असे दिसून येताच, धर्मोपदेशकांने आपला चिमुकला क्रॉस बाजूला काढला. दुःखभराने त्याच्याकडे पाहिले. एका बाजूला वळून त्याने क्षीण आवाजात म्हटले, “मला फक्त दोन मिनिटांचा अवधी द्या.”

“का?”— माग्नोदने आपला आवाज बदलून विचारले, व लगेच मशाल विझवली.

“देवीची करुणा भाकण्यासाठी.”

“देवापासून कोणती अपेक्षा करता”?

“चिरशांती—”

“कुठून आलात तुम्ही?”

“फिझाबादहून—”

अनुक्रमणिका

“रॉबेर्तला ओळखता?”

“हो”

“तो खुशाल आहे?”

“कसा असणार खुशाल? वैभवातून तो आता दारिद्र्यात कोसळला आहे. ज्या मृत्युपत्रात दाविसाने त्याला आपला वारस नेमले होते ते मृत्युपत्र माग्नोदने नष्ट केले.”

माग्नोदच्या हातून नुकतीच चुकभूल घडली होती. त्यामुळे माग्नोद इतका गोंधळून गेला होता की ही बातमी त्याने आस्थेने ऐकली नाही.

“तुम्ही माग्नोदला ओळखत होता?”

“हो तर! तो माझा मित्र होता.?”— येथे पाद्री फ्रान्सिश्कुचा आवाज अडखळला.

“नि त्याच्या बायकोमुलांचं काय झालं?”

“बायकोनं आत्महत्त्या केली. नि मुलांना परदेशात पाठविण्यात आलं.” पाद्री फ्रान्सिश्कुने अत्यंत मंद आवाजात म्हटले.

माग्नोद काही वेळ स्तब्ध झाला. पाद्रीच्या त्या शब्दांत त्याला मृत्युसूचक घंटेचा निनाद ऐकू येऊ लागला. पाद्री फ्रान्सिश्कुच्या गळी पडावे असे त्याला वाटले. त्याला पक्के ठाऊक होते की, पाद्रीचे हात दुःखिताना झिडकारीत नाहीत.

“मी तुम्हाला जीवदान देऊ शकत नाही. कारण तुमच्या आयुष्यावर माझा अधिकार नाही. तुमचा मृत्यू पुढे ढकलणे मात्र माझ्या हाती आहे. आजपासून सहा महिन्यांनी याच ठिकाणी, अगदी एकाकी हजर राहाण्याचं मला तुम्ही वचन देऊ शकता का?”

पाद्री फ्रान्सिश्कुने, उत्तर करण्यापूर्वी, आपल्या मनोदेवतेचा कौल घेतला. एक आश्चर्यकारक आवाज आपल्या कानात हे शब्द गुणगुणत आहे असा त्याला भास झाला.

“ही मुदत मान्य कर. अनाथ मुलांच्या कल्याणासाठी तुला हे मान्य केलंच पाहिजे.”

“देतो वचन” पाद्री फ्रान्सिश्कु जड आवाजात म्हणाला.

“परमेश्वराची शपथ घेऊन वचन द्या.”

पाद्री फ्रान्सिश्कुने विचार करण्यात काही क्षण घालविले. त्याला काही शंका होत्या. शेवटी क्रॉसवर आत ठेवून त्याने स्पष्ट आवाजात म्हटले—

“मी शपथपूर्वक तुम्हाला वचन देतो की, आजपासून सहा महिन्यांनी मी याच जागी, संध्याकाळच्या चार वाजता हजर राहीन.”

अनुक्रमणिका

“ख्रिश्चनाच्या शब्दाला काय किंमत आहे ते मला पहायचं आहे. तुम्ही इकडे आला नाही तर तुमच्यावर मी टाकलेल्या विश्वासाच्या बदल्यात मला आत्महत्त्या करावी लागेल. काही झालं तरी कालीदेवतेचा रक्ताचा नैवेद्य दिलाच पाहिजे. असा माझा नवस आहे.”

त्यानंतर थोडा वेळ तेथे गाढ स्तब्धता पसरली. पानांच्या सळसळीने तिचा भंग होई तेवढाच.

तेथून निघण्यापूर्वी माग्नोदने पाद्री फ्रान्सिश्कुला म्हटले.

“काही हवं असलं तर सांगा.”
“मला तहान व भूक लागली आहे.”
“मी लवकर फळं नि पाणी पाठवून देतो.”

एवढे बोलून माग्नोदने गळफासाची दोरी काढून घेतली. आणि आपल्या साथीदारासह निघून गेला.

पाद्री फ्रान्सिश्कुच्या हृदयात यावेळी भावना विचारांचे जे वादळ माजले होते, त्याचे वर्णन करणे दुरापास्त.

पाद्रीने जमिनीला गुडघे टेकले. दीर्घ प्रार्थनेला अवधी नव्हता. त्याने एक सुस्कारा टाकला.

थोड्यावेळाने माग्नोदचा साथीदार फळे नि पाणी घेऊन परतला. तेवढ्यात पाद्री फ्रान्सिश्कुने आपले भोजन उरकले.

दुसऱ्या दिवशी रविवार होता. फिझाबादच्या धर्मोपदेशकाने आपल्या नेमाप्रमाणे परमेश्वराला नैवेद्य वाहिला. सेन्ट शाव्हियरच्या चर्चमध्ये त्याची प्रार्थना संपली तेव्हा देवाचा चबुतरा त्याच्या आसवांनी भिजला होता.

अनुक्रमणिका

१६

जुगाराचे दुष्परिणाम

जुगार म्हणजे सर्व व्यसनांचा अर्क. करमणुकीचे व्यसनात होणारे शीघ्र व अविरत पर्यवसान, व्यसनाचे गुन्ह्यांत, गुन्ह्याचे अत्याचारात होणारे; जुगार म्हणजे एका क्रूर देवतेची उपासना. तिला प्रथम पैसा हवा असतो. नंतर मालमत्ता व जमीनजुमला, नंतर अब्रू, त्यानंतर कुटुंब, मग जीवित, शेवटी आत्मा; जुगार म्हणजे दैव, ते आपल्या एकनिष्ठ भक्ताला फुलांनी भरलेल्या रस्त्यावरून घेऊन जाते आणि एका पहाडापाशी नेऊन त्याचा कडेलोट करते. आणि इतके झाल्यावर खदखदा हसते; जुगार म्हणजे आशेचे दुष्टचक्र, लोभाची शिकस्त, वाळवंटातील मूर्ती, मुलींच्या हुंड्यापासून आणि स्त्रियांच्या अलंकारापासून घडविलेली; योगायोगाचा जुलूम.

खेळगडी पहिला डाव गमावतो, तेव्हा दुसऱ्या डावाची आशा धरतो. दुसरा डाव हुकतो, तेव्हा तिसऱ्यावर विसंबतो. तिसरा हरतो तेव्हा चौथ्यावर जीव टाकतो. पाचवा डाव असता तर त्याच्यावर तो विसंबला असता. खेळ संपला म्हणजे त्याची आशाही संपते.

पण जुगारी का खेळतो? कंजूषाप्रमाणे पैशाचा लोभ असतो म्हणून? खेळगड्याइतका उधळा दुसरा कुणीच नसतो. जुगाराच्या अड्ड्यावर पैसा ही त्याची देवता असते. तेथून तो बाहेर गेला म्हणजे लोक त्याचा तिरस्कार करतात. शिकारी आनंदासाठी शिकार करतो त्याचप्रमाणे जुगारी जुगाराच्या आनंदासाठी खेळत असतो. खेळगड्याला जर काही खेचून घेत असेल तर ते म्हणजे त्याच्या तीव्र व सैराट संवेदना, त्याची भिती, तिरस्कार, भोगलालसेचा विस्तार, दुःखाचे केंद्रीकरण, दैवाचे फांसे....

खेळाचा अड्डा म्हणजे कुटुंबाच्या संपत्तीचा भयानक बाजार. धंद्यातील भांडवलाचा, शरीराच्या व मनाच्या सगळ्या वैभवाचा बाजार. एकच पत्ता पण तो एकाच क्षणांत आर्किमिडिसच्या पहारीप्रमाणे अफाट पैसा उचलतो व फेकतो. आणि त्या छोट्याशा मेजाभोवती केवढ्या संवेदनांचा, केवढ्या काळजीचा, केवढ्या धक्क्याचा कल्लोळ उडत असतो! तेथे दैव वेगवेगळ्या हातात खेळते; दुःख व हर्ष चेहऱ्याचेहऱ्यावर खेळतात; हृदयाहृदयांवर क्रोध थयथय नाचतो; बोचक उपहास मुद्रेमुद्रेवर वळवळतो; प्रारब्ध खेळते; योगायोग खेळतो; सैतान थैमान घालतो! तेथे विवेक नसतो, हक्क नसतो, न्याय नसतो, अन्याय नसतो. जे घडेल ते असते. दैवाच्या निर्णयावर अपील नसते. जगात एवढ्यामोठ्या घडामोडीचा दुसरा सट्टाबाजार नसेल, इतक्या विविध देखाव्याचे नाटक नसेल. तसे पाहिले तर जुगारात जे कमी गमावले जाते तो म्हणजे पैसा. या नुकसानीपेक्षा नीतीची हानी मोठी असते.

जुगारी खराखुरा जगतो ते खेळताना. एकच विचार, एकच विकार तो ओळखतो. तो म्हणजे जुगार! त्याचा श्वास रोधला जातो. त्याच्या हृदयाचे आकुंचन होते. त्याचे शरीर फुलून येते, त्याचे डोळे रोखले जातात. त्याची जीभ मुकी होते. जो आकडा किंवा पत्ता त्याला क्षणकाल सुखी किंवा कायमचा दुःखी करील तो तो फुटलेला दिसतांच, तो विलक्षण बेचैन होतो. त्या वेळी त्याला जाऊन सांगा की, त्याच्या घराला आग लागली आहे, त्याची एकुलती एक मुलगी मरणोन्मुख स्थितीत आहे, देवतेसमान

मानलेली त्याची पत्नी पातिव्रत्याचा भंग करीत आहे; तो तुमचे ऐकूण घेणार नाही. या गोष्टीचे आश्चर्य वाटून घेऊ नका. पिशाचे कुणाचे ऐकत नसतात.

जयाच्या विरळा आनंदाच्या क्षणांनी अपजयाच्या दारुण दुःखाची भरपाई होत नाही. पैसा मिळतो तेव्हा त्याची किंमत घसरते. पैसा गमावला जातो तेव्हा त्याची किंमत बेफाम चढते. पैसा मिळाला म्हणजे तो विसरला जातो. गमावला म्हणजे हजारदा मोजला जातो, हजारदा तोलला जातो, हजारदा हळहळला जातो. जीत मिळालेला खेळगडी भाग्यवान ठरत नाही. अपजय नशिबी आलेला मात्र दुर्भागी ठरतो. मिळालेल्या कमाईला इतिहास नसतो. कला नसते. पदरी गमावलेल्या कमाईची मात्र नोंद होते. तिला टीका, निंदा असते हार खाल्लेला जुगारी आपल्या बऱ्याबाईट खेळाची छाननी करतो, आपल्या डावांची चिकित्सा करतो. मोठमोठे निष्कर्ष काढतो. नशीबवान जुगाऱ्याची झोप गाढ व शांत असते. दुर्दैवी जुगाऱ्याची झोप क्रूर असते. त्याच्या मनात भुताखेतांचा, भयानक दृश्यांचा नाच सुरू होतो. त्याच्या पाचवीला पुजलेला 'गुलाम' ज्याच्यामुळे तो वीस डावांत चित झाला, त्याच्या कर्जफेडीचा तगादा लावणारा मारवाडी, दैनंदिन खर्चासाठी पैशाची मागणी करायला आलेला नोकर, कालच्या खेळाचा, निकालाचा जाब विचारणारी कजाग बायको हे सारे त्या दुर्दैवी जुगाऱ्याला खायला उठते. अशा निद्रेनंतरची जागृती तर अधिकच भीषण असते. ती असते वस्तुस्थिती. मग त्याला वाटते. यापेक्षा चिरनिद्राच बरी.

आता आम्ही कथन करणार त्या प्रसंगात वाचकाला जुगाराचा एक दूषपरिणाम आढळून येईल.

पाद्री फ्रान्सिश्कु प्रार्थना आटोपून खुर्चीत चिंता करीत बसला होता. काल घडलेल्या अकल्पित प्रसंगाने त्याच्या मनात खळबळ माजली होती, ठगांच्या भेटीची अस्पष्ट चित्रे तरळत होती. त्याने शपथपूर्वक दिलेल्या वचनाची आठवण मात्र त्याला पक्की राहिली होती. या वचनाची किंमत काय आहे ते त्यालाच सांगता आले नसते. त्यलाच ते माहीत नव्हते. ती चिकित्सा करण्याचा त्याला धीर नव्हता. कारण त्या प्रकरणांतील धोका समोर उभा ठाकलेला पाहण्याची त्याला भिती वाटत होती.

घड्याळात तीन वाजले होते. रॉबेर्त पाद्री फ्रान्सिश्कुच्या खोलीत शिरला. त्याच्या अगावर काळा पोपाख होता. त्याच्या दुर्दैवाने केलेला उठाव त्याच्या मुद्रेवर उमटला होता. कारण वार्धक्य हे आपत्तीच्या पंखावर बसून उडत असते. त्याच्या खोल गेलेल्या डोळ्याखाली काळीनिळी अर्धवर्तुळे उठून दिसत होती. फिकट गाल बसले होते. काळ्या पोषाखाचा मुद्रेवरील सावलीशी मिलाफ झाला होता. मनाची हताश अवस्था तेथे पूर्णतया प्रगट झाली होती.

"काय घडलं आहे, बेटा?"— त्याला आलिंगन देत पाद्री फ्रान्सिश्कुने विचारले.

"काय घडलं आहे म्हणून विचारता? माझी बेअब्रू माझ्या लाडक्या मुलीचा सत्यानाश, दोन अनाथ पोरांची दुर्दशा. परमेश्वराने मला शासन केलं, तारुण्यातील माझ्या अविचाराचं फळ व माग्नोदचा केलेला छळ मी भोगतो आहे."

पाद्री फ्रान्सिश्कु त्याच्याकडे घाबरलेल्या मनाने पाहात होता.

अनुक्रमणिका

“जुगाराच्या व्यसनानं” रॉबेर्त म्हणाला, “माझा नाश केला. एका वादळी व्यसनाच्या स्मशानात मी माझं तारुण्य बरबाद केलं. पत्यांच्या एका पानावर माझी संपत्ती पणाला लावली. आणि काकांच्या मृत्यूनंतर मला मिळणार असलेला हिस्साही खेळलो. तेव्हापासून मी सावकाराचा गुलाम झालो. त्यामुळं माझी गाढ झोप गमावून बसलो. माझ्या चेहऱ्यावरील उल्हास मला सोडून गेला. माझ्या मुलीच्या स्मिताला दुरावलो. या सैतानाच्या तावडीतून मुक्त होण्यासाठी या देशात आलो. काकांच्या पश्चात मला मिळणार असलेल्या अफाट इस्टेटीवर नजर ठेवून माझे सावकार गप्प राहिले. कधी कधी ते मला लिहीत. पण ते काकासंबंधी माहिती मिळविण्यासाठी. यापुढे ते कायद्याचा क्रूर बडगा घेऊन माझ्यामागे लागतील. कदाचित चोरीच्या गुन्ह्याचा शिक्का कपाळावर घेऊन मी तुरुंगात जाऊन बसेन. आणि माझं दुर्दैव हे की, अशा अनवस्थेत मला धीराचे शब्द देणारा कुणी दिसत नाही. माझी दुष्कीर्ती काही शतके भूतकालात परतून माझी वीस पिढ्यांची अब्रू मातीत मिळवील. अणि खाली उतरून माझ्या मुलीच्या भविष्याचा चुराडा करील. माझी लाडकी हेलेन! तिच्यासाठीच मी असा हतबुद्ध झालो आहे.”

दुःखावेगामुळे रॉबेर्तला बोलता येईना. त्याच्या गालावरून आसवांचे ओघळ वाहू लागले ती आंसवे पुसून पाद्री फ्रान्सिश्कु म्हणाला—

“परमेश्वरी कृपेवरील तुझा विश्वास ढळू देऊ नकोस. परमेश्वरी संकेतासमोर लीन होण्यातच धन्यता आहे. आपल्या पापाचा पाढा वाचण्यापेक्षा त्यांची दुरुस्ती आमच्या शिकस्तीच्या प्रयत्नांनी केलेली बरी.”

त्यावर रॉबेर्त म्हणाला— “माझ्या सज्जन मित्रा, मला क्षमा कर. माझ्या भग्न मनःस्थितीत निराशेचे कडवट उद्‌गार माझ्या तोंडून निघाले असले तर मला क्षमा कर. परमेश्वरावर श्रद्धा नसती तर आज माझी काय गत झाली असती. दुर्दैवाने मला अनुभवाचं देणं दिलं नि त्यांतूनच श्रद्धा आली.”

“आणि म्हणूनच ज्या सकंटांची तुला भिती वाटते ती टाळण्याचा प्रयत्न करू या.”

“हे काम फार कठीण आहे. पाद्रीसाहेब, माझं कर्ज पाच हजार पौंडावर गेलं आहे. आणि माझ्यापाशी तर शंभर पौंड देखील नाहीत. मला त्रासदायक होणारी गोष्ट एवढीच की, ज्या अभागी मुलांना मी आजवर आधार देत आलो होतो. त्याना यापुढे मी उपयोगी पडू शकणार नाही. हार्टमनच्या सूचनेप्रमाणे हेलेना आणि ती दोन पोरकी मुलं यांना निदान आणखी आठ महिने माझ्याकडून मासिक मदत मिळाली पाहिजे. माझा चुलत भाऊ रिकार्द इकडे येईपर्यंत मला काळजी करण्याचं कारण नाही. माझ्या वेतनातले मी बारा पौंड देऊ शकेन. पण नंतर?”

एवढे बोलून त्याने आपल्या हातावर डोके ठेवले आणि शून्य मनाने बसून राहिला.

“मुलांच्या मासिक खर्चाची मी तजवीज केली आहे. त्याची काळजी तू करू नकोस. तुझ्या कर्जाच्या बाबतीत मला असं वाटत की, तुझा चुलतभाऊ तो भार आपल्या अंगावर घेईल. लगतच्या नातेवाईकांचं ते कर्तव्य आहे.”

“माझा चुलतभाऊ! परमेश्वर करो नि माझा तर्क खोटा ठरो.”

अनुक्रमणिका

आपल्याला प्रिय असलेल्या गोष्टी आपणाला सुसाध्य वाटतात. आमच्या चुलतभावाच्या दानतीबद्दल रॉबेर्तच्या मनात शंका आली होती, ती पाद्री फ्रान्सिश्कुचे धीर देणारे भाषण ऐकताच विरून गेली. व त्यांचे मन शांत झाले. मुलांच्या मासिक खर्चाची विवंचना त्याने मनांतून काढून टाकली. त्याबाबतीत तो पाद्री फ्रान्सिश्कुच्या कर्तृत्वावर विसंबून राहिला.

राहिलेल्या वेळात त्या दोघांनी हेलेन, तॉमास व ॲमिली यांची पत्रे वाचून काढली. ही मुले आपली केवढी काळजी वाहतात ते पाहून दोघांनाही समाधान वाटले.

“तुमच्या भेटीनं माझं मन किती शांत झालं म्हणून सांगू!”— रॉबर्त म्हणाला.

“मी दुःखी होतो. आतां माझं मन इतकं हलकं झालं आहे की, कुणीतरी माझ्या हृदयावरचं दडपण काढून टाकल्यासारखं मला वाटू लागलं आहे. दुःखितांचं दुःख निवारण्यासाठी परमेश्वर तुम्हांला दीर्घायुष्य देवो.

पाद्री फ्रान्सिश्कुने हात वर उचलून आकाशाकडे पाहिले.

“परमेश्वरी इच्छा!” त्याच्या तोंडून उद्‌गार निघाला.

अनुक्रमणिका

१७

सॉबल ज्यू

आम्ही सांगितलेल्या घटनेनंतर दोन महिन्यांनी फिझाबादला एक परकी इसम येऊन राहिला. त्याचे नाव सॉबाल. त्याची उमर पन्नास वर्षाची असावी. त्याच्या अंगात एक पायघोळ डगला होता, व त्याच्या डोक्यावर बांधलेल्या फडक्यामध्ये त्याचा चेहरा झाकला होता. त्याची लांब काळी दाढी तेवढी बाहेर दिसत होती. त्याच्या डोळ्यांना हिरव्या काचांचा चष्मा होता. त्याच्यावर त्याच रंगाचे एक आच्छादन होते. त्या खाली त्याचे उरलेले अवयव लपले होते. त्यामुळे त्याने एक रुपडेच घातले आहे असे वाटावे.

त्याचा समावेश कोणत्या मानवी वंशात होत होता ते सांगता येण्यासारखे नव्हते तो कोठून आला हे देखील एक गुपीतच होते. त्याच्या धंद्यासंबंधी निश्चित एवढेच सांगता येत होते की, तो एक धनको—सावकार म्हणून परिचित होता. त्याच्या सहवासात दोन नोकर होते. ते देखील त्याच्याच प्रमाणे न उलगडणारे कोडे होते. एका छोट्या प्रदेशात एका परदेशी माणसाचे आगमन ही नेहमीच महत्त्वाची घटना मानली जाते. तो कोण कोठून आला व कोठे जातो, हे समजून घेतल्याखेरीज लोकांची जिज्ञासा तृप्त होत नसते. ती प्रश्न करते, पृच्छा करते, टेहाळणी करते, आणि शेवटी कसलाच थांगपत्ता लागला नाही म्हणजे कल्पनाच चालविते व त्या नव्या इसमाला साहसी हेतू चिकटविते. पुष्कळवेळा कल्पना गरगर फिरू लागते आणि तिच्या वावड्यांना सरकारी नाण्याची प्रतिष्ठा येते. सॉबालच्या बाबतीत हीच गोष्ट घडली. हा विलक्षण, अज्ञात माणूस कोठून आला ते, जनमनाला ताडता येईना. तेव्हा त्याने अशी भरारी मारली की, तो दिल्लीचा बडा व्यापारी असावा. लोकांच्या या तर्काला आधार म्हणजे बंगालच्या मोठमोठ्या व्यापारी कंपनीशी त्याचा होत असलेला पत्रव्यवहार.

सॉबाल एकाकी राहात होता. फक्त दोनदां दररोज तो घरातून बाहेर पडे. सकाळी पांच वाजता व संध्याकाळी सहा वाजता सूर्य उगवण्यापूर्वी व मावळण्यापूर्वी. अंधार हे त्याचे स्वतःला झाकून घेण्याचे दुसरे वस्त्र. त्याचा फेरफटका ठराविक परिसरातच होत असे. त्याला वाटेत भेटणारी माणसे सांगत की, तो त्यांच्याकडे वळून देखील पहात नाही. नेहमीच खालच्या मानेने खिशात हात घालून एकाच गतीत तो चालत असे. सॉबाल राहात असलेले घर उत्कृष्टपैकी होते. त्याची कामाची खोली हिरव्या रंगाची होती. तीत उजेडाची वाण होती. लोक बोलत की, त्याला डोळ्यांचा विकार आहे.

थोड्याच काळात सॉबालचे घर हा व्यापार धंद्याच्या क्षेत्रांतील घडामोडींचा अड्डा बनला. मजूर, शेतकरी, छोटे व्यापारी, मोलकरणी बाया अशी माणसे त्याच्या कडे जात आणि काटकसर करून साठवलेले पैसे त्याच्याकडे ठेवीत. आणि मग कधीतरी येऊन ते सव्याज परत घेत. फेडीच्या बाबतीत तो नियमीत होता. सत्यकथनार्थ हे सांगितले पाहिजे की, त्याचे व्याजाचे दर नेमस्त होते. आपल्या व्यवहारात तो दिलदारपणा दाखवी व आपल्या कुळांवर उपकारांची खैरात करी. त्यामुळे लौकरच तो लोकांच्या प्रेमादरास पात्र झाला. तेव्हापासून फिजाबादचे रहिवासी त्याच्या गुप्त हेतूबद्दल संशय घेईनासे झाले. इतकेच नव्हे तर त्यांना मनःपूर्वक असे वाटायला लागले की, सॉबाल हा एक सज्जन माणूस आहे. त्यांना काय कल्पना की ज्या माणसाची ते एवढी वाहवा करीत त्याच्या बुरख्याखाली त्याचे खरेखुरे मन दडले आहे.

अनुक्रमणिका

येथे नमूद करण्यासारखा आणखी एक प्रसंग घडला. त्यामुळे लोकमताला बळकटी मिळाली व त्याच्या सद्‌गुणाच्या कीर्तीत भर पडली. तो असा :—

एक दिवस नेहमीपेक्षा थोडा अगोदर तो फेरफटका करीत असताना सडकेच्या बाजूला धुरळ्याचा लोट उडत असलेला त्याला दिसला आणि पाठोपाठ त्याच्या कानावर काही आरोळ्या पडल्या. तशी तो थांबला.

उधळलेला एक घोडा फार वेगाने दौडत येत होता. धुळीच्या लोटात त्याला घोडेस्वार दिसत नव्हता. सॉबाल उभा होता त्या जागी एका खोल खंदकावर एक अरुंद लाकडी पूल होता. त्याच्यावरून सडक जात होती. घोडा दौडत येत होता. संकट नजीक होते. त्याला घोडेस्वार दिसला. तो रॉबेर्त होता. सॉबालच्या तोंडून अभावित उद्‌गार निघाला.— “रॉबेर्त जगला पाहिजे.”

मग रस्त्याच्या मध्यभागी त्याने ताड्दिशी उडी टाकली आणि सारी शक्ती वेचून लगामाला हात घातला. व घोड्याला मागे खेचले. घोडेस्वार धुळीत कोलमडला त्याला किरकोळ जखमा झाल्या, पण तो बचावला. लोक जमले.

“रॉबेर्त!”

सगळ्यांच्या तोंडून उद्‌गार निघाला.

सॉबाल तेथून दिसेनासा झाला. दुसऱ्याच दिवशी फिझाबादात सॉबालचे साहस हा नागरिकांच्या चर्चेचा विषय झाला होता.

प्रत्येकजण आपापल्यापरीने बोलत होते. सगळेच अतिशयोक्ती करीत होते. समाज हा नेहमीच निकृष्ट इतिहासकार असतो एवढे खरे.

दुसऱ्या दिवशी सॉबालच्या उपकाराबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रॉबेर्त त्याच्या घरी गेला. त्याच्या भेटीची आगाऊ कल्पना असलेल्या एका नोकराने त्याला सांगितले की, मालक फार आजारी आहे. तेव्हा भेट होऊ शकत नाही. मग रॉबेर्त दुसऱ्या दिवशी गेला. आणि तेच उत्तर मिळाले. तिसऱ्या दिवशी तो पोहोचला तेव्हा सॉबाल घराचा जिना उतरत होता. धावत जाऊन त्याने त्याच्या हाताचे चुंबन घेतले. सॉबाल चमकून मागे सरला. मग घाईघाईने दिलगिरी प्रदर्शित करून तो लगेच घरात परत गेला. सॉबालचा विनय पाहून रॉबेर्त थक्क झाला व घरी परतला.

“हा माणूस—” रॉबेर्त मनाशी म्हणाला.— “मोठ्या दक्षतेने जगापासून लपत आहे जणूं काय सद्‌गुण म्हणजे गुन्हेच. त्याची दया सगळ्या ढोंग सोंगापासून अलिप्त आहे. सत्कर्म केलेल्या हाताला तो इतरांना स्पर्श देखील करू देत नाही. आपलं तोंड दाखवित नाही. पृथ्वीच्या उदरात हिरा दडून असतो, त्याप्रमाणे तो एकांतात, गुप्ततेत रहातो. माणसाची कृतज्ञता परमेश्वरी कृपाप्रसादातच अंतर्भूत होत असते अशी त्याची समजूत असावी.”

अनुक्रमणिका

याप्रमाणे रॉबेर्त तर्क चालवित असताना सॉबाल आपल्या खोलीचे दार बंद करून बसला होता. आपल्याला कोणी पहात तर नाही ना? याची खात्री करून घेण्याकरता तो चौफेर पहात होता. त्या एकांतात त्याने सद्गुणांचे रुपडे काढून ठेवले होते व राक्षसाच्या नंग्या स्वरूपात स्वतःला पाहण्याचा आसुरी आनंद तो अनुभवीत होता.

त्याने स्वतःचे अंग चाचपून पाहिले. तो तोच होता. हृदय क्रोधाने जळत होते. पण शरीरावरून वाहणारे सद्गुणाचे पाट त्याच्या मनात धगधगणारी सूडबुद्धी स्पष्ट करू शकली नाही.

नंतर स्वतःचाच संशय आल्याप्रमाणे तो खिडकीकडे धावला. गेले सहा महिने बंद असलेली ती खिडकी त्याने उघडली. त्याने ओणवून बाहेर पाहिले. एका मोडक्या घरावर त्याने नजर टाकली. एखाद्या थडग्यातून निघाल्याप्रमाणे एक स्त्री व दोन मले त्याला त्या घराच्या आवारात उठत असलेली दिसली. त्यांचा सूडासाठी आक्रोश चालला होता. सॉबालचे मस्तक फिरू लागले. त्याचे डोळे भयानकपणे चमकले. अंगावर शहारे उभे राहिले. ओठ पांढरे पडले आणि सर्वांग कापू लागले. मग त्याने खाडकन् खिडकी बंद केली आणि हर्षानंदाने तो ओरडला.

“तरी बरं, मी अजून तोच आहे. सूडाचा जर मला विसर पडला असता तर मी स्वतःचाच तिरस्कार केला असता. रॉबेर्तचा बचाव करून मी सूडभावनेचा बचाव केला.”

सद्गुणाच्या आकर्षणाला सॉबाल भीत होता. आपल्या हातून सत्कृत्ये घडत गेली तर ते समाधान आपल्या सूडबुद्धीचा ताबा घेईल असा विचार त्याच्या मनात येई, तेव्हा त्याचा थरकाप होई. तिजोरीवर प्रेम करावे तसा तो द्वेषावर प्रेम करीत होता. आपल्या हृदयातील विष कमी होत आहे, असे दिसताच तो खिडकी उघडी करी आणि पलीकडच्या त्या मोडक्या घराच्या फिक्कट व एकाकी अवशेषात नव्या विषाचा पुरवठा करी. ते अवशेष म्हणजे त्याला एक झराच वाटे. इतके झाल्यावर तो शांत होई.

त्या दिवसापासून सॉबाल कधीच घरातून बाहेर पडला नाही. रॉबेर्तच्या कृतज्ञतेचे प्रदर्शन तो टाळीत होता. त्या विनयामुळे तो लोकांना अधिकच वंद्य ठरला. आणि त्याच्या नावाचा उच्चार संताच्या नावाप्रमाणे भक्तीभावाने होऊ लागला.

अनुक्रमणिका

१८

डँडी

डॅन्डी शब्दाचा अर्थ फॅशनचा माणूस असा समजू नये. रस्त्यावरच्या धुळीतून निघालेल्या पोरट्यांप्रमाणे, रेस्टॉरन्ट आणि नाट्यगृहे यांच्या कचऱ्यातून निघालेल्या सुवासिक, सुंदर बाहुल्यांपैकी तो नाही. इतरांच्या जिवावर खातात, पेहरतात, सिगारेटस् ओढतात अशा दुर्भागी माणसांच्या वर्गांत तो मोडत नाही. जे आनंदी चेहऱ्याखाली व उंची कपड्याखाली शिंपी आणि चांभार यांचे पत्करलेले दास्य लपवितात त्यांच्यापैकी तो नाही.

डॅन्डी ही विकृती नव्हे. एक वृत्ती आहे. कवी व चित्रकारांप्रमाणे तो जगांत अवतरला. त्याचे दोष, साहसे, गुन्हे यांची चर्चा, नोंद म्हणजे मानवजातीच्या नैतिक इतिहासाचे एक मनोरंजक प्रकरण आहे. पुरातन कालांतील **आल्सेबियडीश** आणि अर्वाचीन काळांतील **बायरन्** हे या वर्गाचे प्रतिनिधी आहेत. त्यानी केलेल्या गोष्टीपैकी कांही सुंदर अन् महान आहेत. पुष्कळ वाईट आहेत. आणि चांगली एकही नाही. त्याच्या पिंडातील सैतानी तत्वाशी शीलचारित्र्याचे नातें जुळत नाही. डॅन्डी विचार करतो तो केवळ स्वतः संबंधी. त्याला संधी मिळाली असती तर त्याने म्हटले असते, **L'univers, C'est moi** (विश्व म्हणजे मी)

डॅन्डी हा पिंडाने अहंकारी असतो. तेथूनच त्याचा स्वार्थ निघतो. त्याचा अंध स्वार्थ कोणतीच सामाजिक कर्तव्यें ओळखीत नाही. मानवतेचा उपहास करता करता तो साऱ्या सत्याचा उद्धट उपमर्द करू लागतो. पण दुर्दैवाच्या पहिल्याच तडाख्याला सपशेल कोसळतो. संकटाशी त्याला झुंज देता येत नाही. 'ज्यॉब'ची कला त्याला अवगत नाही. ईश्वरी सत्ता तो मानीत नाही. एखादा आजार, एखादा प्रेमभंग, औट घटकेचे दारिद्र्य ही त्याच्या साऱ्या अहंकाराचे दारुण निराशेत रुपांतर करायला पुरेशी असतात. मग तो मठांतील एकांतवास किंवा मृत्यू यासाठी तळमळतो. मठाच्या शांततेत व एकान्तवासात मेलेले डॅन्डी आहेत. आपल्या दुःखाचा शेवट आत्मघाताने केलेले डॅन्डी आहेत. पण त्यांच्या या वर्तनांत भेकडपणा नसतो किंवा त्यांच्या अहंकारी वृत्तीशी विसंगती नसते. आपले दुर्धर वार करतांना दुर्दैव नेहमीच आपला हात लपवते. त्या दुर्दैवाच्या मागे नियती असते. तिच्यासमोर तो वाकतो. गोगलगाय बनतो. मृत्यूने त्याचा व त्याच्या प्रबळ विकारांचा शेवट लावला नाही आणि संकटाच्या तडाख्यामुळे मानवतेशी व परमेश्वराशी त्याचे सख्य घडून आले नाही तर आपल्या प्रक्षुब्ध विकारांसह तो वार्धक्य गांठतो. डॅन्डी! आणि **वार्धक्य**!

जे विकार तो पश्चात्ताप—अनुतापाने जाळू शकला नाही, ते काळाच्या प्रभावाने बोथट हातात, पेंगू लागतात. पण जगाला मात्र दुप्पट आवेशाने छळू लागतात. त्याच्या उद्धटपणामुळे त्याचे निर्वीर्य वार्धक्य माणूसघाणे बनते. त्याचे तत्त्वज्ञान 'माकियाव्हेली'च्या ऋणंकृत्वाघृतंपिबेत् अशा प्रकारचे बनते. दुराचार व नीती ह्या दोहींना तो दुरावतो आणि मग त्याच्या दुर्धर आयुष्याचे क्षण, पाण्याच्या थेंबाप्रमाणे, गळत रहातात. वृद्ध डॅन्डी हा उत्तरेच्या पिंपळ वृक्षांप्रमाणे असतो. त्या वृक्षाची पाने झडली म्हणजे तो आपल्या ऐश्वर्याचा ओसर सहन करीत काळ कंठतो. सगळीच राष्ट्रे डॅन्डीच्या बाबतीत संपन्न नाहीत. दक्षिण युरोपांत डॅन्डीचे प्रमाण फारच अल्प आहे. लंडन शहरात भारी आहे.

रिकार्द हा एक डॅन्डी होता. सूर्याप्रमाणे एकाच वेळी सगळ्या मुलींकडे पाहून हंसणारा. तो तरूण होता. पंचवीसच्या खाली उमर. एकाच वेळी सुंदर स्त्रियांचे पूजास्थान व भयस्थान होता. लाडिक जिवणी, भव्य मोकळे कपाळ, लांब दाढी, सोनेरी केस, मध्यम उंची, सडसडीत देहयष्टी, रुंद छाती व आकर्षक व्यक्तिमत्व.

आपल्या चुलत्याच्या मृत्युपत्राची वार्ता त्याला कळली मात्र, तो हिंदुस्थानात येऊन दाखल झाला. रॉबेर्तच्या अपेक्षेपेक्षा तो बराच अगोदर येऊन पोहोचला. आल्या बरोबर त्याने घराचा कारभार आपल्या हाती घेतला. आणि चुलतभावाला—रॉबेर्तला बंगल्याचा कांही भाग रहायला दिला.

यापुढे घराचा कारभार चालविणे रॉबेर्तला मानहानीकारक होणार होते. चुलतभावानेही त्याला तशी सूचना केली नव्हती. कारण तसे केल्यास रॉबेर्तचा स्वाभिमान दुखावला जाण्याचा संभव होता.

रिकार्दने जाहीर केले की, आपल्या काकाची इच्छा पुरी करण्याकरिता आपण चुलतबहिणीशी लग्न करायला तयार आहोत. पण व्यवहाराच्या सोयीसाठी ठरलेल्या लग्नाचा त्याला तिटकारा होता. त्यामुळे, लग्नाचे कलम गुप्त राखण्यात यावे अशी त्याने सूचना केली. रॉबेर्तने ती मोठ्या आनंदाने मान्य केली आणि तो चुलतभावावर विशेष खूष झाला.

१९

सज्ञनाला परमेश्वराइतके दुसरे काहीही प्रिय नाही

महिना ऑक्टोबर होता. सव्वीस तारखेला पाद्री फ्रान्सिश्कुला लंडन येथे चोवीस पौंडांची रक्कम रवाना केल्याशिवाय गत्यंतर नव्हते. त्यापैकी बारा पौंड मुलांची सप्टेंबर महिन्याची थकलेली फी व बारा पौंड चालू महिन्याची. रॉबेर्तकडून अर्धी रक्कम आली हाती. पाद्रीच्या बँकेमध्ये फक्त दहा पौंड रक्कम शिल्लक होती. दोन पौंडाची तरतूद कशी होईल हा प्रश्न होता. पाद्री फ्रान्सिश्कु आपल्या खोलीत तिरमिरीत येरझारा घालीत होता. अधून मधून तो आपल्या गरम कपाळावर हात फिरवीत होता; पण काही केल्या त्याला उपाय सुचत नव्हता. त्याच्या भोवतालच्या प्रपंचाइतकीच त्याची कल्पनाशक्ती दरिद्री झाली होती. डोके छपराकडे वळले म्हणजे तेथे वासे दिसत. ते जुने व बरगलेले होते. ते खाली वळले म्हणजे फरशी दिसे. ती ओबडधोबड व उंचसखल. आजूबाजूला वळले तर मोडक्या खिडक्या व तसलीच मेजे त्याच्या मनाला बोचत. दारिद्र्य हे पृथ्वीवर कुचकामी आहे. स्वर्गात त्याला मोल आहे. बुडणारा इसम आपल्या भेसूर धडपडीत एखादा ओंडका शोधतो त्याप्रमाणे पाद्री दोन पौंड शोधीत होता. आशेचा किरण दिसतो न दिसतो तोच तो नष्ट होई. या मनःस्थितीत काही तास निघून गेले. पण आधार देणारा विचार त्याला सुचला नाही.

अवचित, फिरता फिरता तो खोलीच्या मध्यभागी थबकला. जणू कोणीतरी त्याच्या गतीत अडथळा आणला आहे. एका परमेश्वरी प्रेरणेनेच तो असा निश्चल झाला होता.

“सॉबाल दयाळू आहे. त्याच्याकडे जाऊन मी दोन पौंडाची मागणी का करू नये? तो सज्ञन आहे. तो मला नकार देणार नाही.” मनातल्या मनात असे पुटपुटून त्याने आपली हॅट उचलली. डगल्याची बटणे घातली आणि सॉबालच्या घराच्या दिशेने तो चालू लागला. आपली शेवटची आशा कदाचित विरून जाईल म्हणून त्याचे काळीज धडधडत होते.

त्याने दारावर थाप मारली. खुद्द सॉबाल दार उघडायला आला मग त्याने पाद्रीला आपल्या अंधाऱ्या खोलीत नेले. थोडावेळ पाद्रीने सॉबालकडे मुकाट पाहिले. व मग मनाचा निर्धार करून तो म्हणाला—

“साहेब, आपल्याशी थोडे बोलायचे आहे. तुम्हांला माझ्यापासून उपसर्ग होत असला तर क्षमा करा.”

“बोला, तुमच्या दर्शनानं मला आनंदच झाला.”

सॉबाल विस्मयनिदर्शक मुद्रा करीत म्हणाला. पाद्री फ्रान्सिश्कुने एक खुर्ची मेजाजवळ ओढली. तो म्हणाला,

“तुमच्या दयाबुद्धीसंबधी मी खूप ऐकलं आहे त्यामुळे तुमच्याकडे येण्याचा मी धीर केला. आमची तीन मुलं सध्या मोठ्या अडचणीत सापडली आहेत. तेथून त्यांची सुटका करायला दोन पौंडांची गरज आहे.

अनुक्रमणिका

ही मदत मागण्यासाठी मी तुमच्याकडे आलो आहे. तुमच्या दयेला ती मुलं पात्र आहेत असं मी तुम्हांला आश्वासन देतो."

"ही दुर्दैवी मुलं तूर्त कुठं आहेत?" आपली उत्कंठा दाखविण्याचा प्रयत्न करून सॉबालने प्रश्न केला.

"लंडन येथे" पाद्री फ्रान्सिश्कुने उत्तर केले. बराच वेळपर्यंत सॉबाल स्तब्ध झाला. मग पाद्री फ्रान्सिश्कुला आपला आदरभाव व्यक्त करून तो आतच्या खोलीत गेला. मेणाचा खण उघडण्याचा आवाज आला. तो कानावर पडताच फ्रान्सिश्कुचा निराश चेहरा उजळला. सॉबाल पैसे आणण्यासाठी आत गेला आहे असा पाद्रीने तर्क केला होता.

सॉबाल लवकरच परत आला; व आपल्या जागेवर बसता बसता मोठ्या उत्सुकतेने विचारले—

"या अनाथ मुलांपैकी एकाचे नाव हेलेन आहे काय? आणि हार्टमन हा तिचा पालक किंवा शिक्षक आहे काय?"

"होय, साहेब!" फ्रान्सिश्कुने आनंदभरित होऊन म्हटले.

"या दुर्दैवी मुलांबद्दल तुम्हांला आस्था असली तर मी सांगू इच्छितो की, हार्ट मन हा एक विश्वासघातकी माणूस आहे."

"विश्वासघातकी?!"— खुर्चीवरून चटकन् उठून पाद्री फ्रान्सिश्कुने म्हटले.

"बरोबर हेच!" सॉबाल उत्तरला. त्याच्या डोळ्यांत समाधान चमकले. आपल्या शब्दांचा पाद्री फ्रान्सिश्कुच्या मनावर काय परिणाम झाला आहे ते त्याने बारकाईने पाहून घेतले. आणि तो पुढे म्हणाला, "तो नीच आहे. तो आपल्या घरात अनाथ मुलांची सोय लावतो आणि मग एका पाखंडी धर्मसंस्थेला ती विकून टाकतो."

"काय दुष्ट लोक आहेत पाहा!"— पाद्री फ्रान्सिश्कु दुःखावेगाने उद्गारला— "तुमच्या करुणेचा फायदा तुम्ही यावेळी त्यांना दिला नाही तर ती मुलं दुर्गतीला मिळतील! तुमच्यापाशी माझी एवढीच विनंती आहे की, परमेश्वराच्या वतीने तुम्ही त्यांचे तारक व्हा."

"त्यांना मी उपयोगी पडू शकत नाही. याचं मला अतोनात वाईट वाटतं—" सॉबाल बेफिकीर उदासीनतेने म्हणाला— "तुम्ही अगोदर बोलला असता तर..."

"देव कृपाळू आहे"! हात आकाशाकडे उचलून पाद्री फ्रान्सिश्कु म्हणाला.

काही क्षणाच्या स्तब्धतेनंतर पाद्री फ्रान्सिश्कुने मान किंचित वाकवली आणि चुरडलेल्या हृदयाने खोलीबाहेर पाऊल टाकले. येताना जितका तो हताश होता त्यापेक्षाही अधिक हताश जाताना झाला. पायांना मणाचे ओझे बांधल्यागत त्याचे पाय जड झाले. आपल्या खोलीत पाय ठेवण्याची कल्पना त्याला

दुःसह वाटली. कारण तेथे नवीन कलह त्याची वाट पाहात बसला होता. शेवटचा आशाकिरण आता निमाला होता.

आपल्या विचारचक्रांत सापडलेला पाद्री फ्रान्सिश्कु संथ पावलांनी चालत होता. पहिल्या पायरीवर त्याचे पाऊल पडले असेल नसेल, सॉबाय्यू व टिपू हे त्याचे दोन्ही रावे त्याच्या स्वागतासाठी बाहेर आले. त्यांच्यावर नजर पडताच पाद्री पांढरा फटफटीत पडला. त्याच्या मस्तकात एक भयानक कल्पना चमकली, तशी खळखळून हसून त्याने ती हाकलून लावली. मग खोलीत आला. हॅट ठेवली खुर्चीत बसला.

तीच कल्पना सावलीप्रमाणे भिंतीवर चित्रित झालेली आणि बिछान्यावर व बाकावर पिशाच्चाप्रमाणे चाळा करीत असलेली दिसली. तो तिचा धिःकार करीत होता आणि ती दैवी तेजोवलयात गुरफटली जात होती. तो तिला दाबण्याची शिकस्त करीत होता. आणि ती ओरडत, उसळू पहात होती. तो तिला ठार करीत होता आणि ती पुनरुज्जीवित होत होती. तो तिचा उपहास करीत होता. आणि ती विकट हसत होती. एकच कल्पना, पुनःपुन्हा तीच भीषण कल्पना— “माझी पाखरं विकायची.” पाद्री फ्रान्सिश्कु गुदमरलेल्या आवाजात, डोळ्यातून आसवे गाळीत म्हणत होता— दोन्ही हातांनी डोळे झाकून घेत होता— “माझे मित्र, माझे वीस वर्षाचे सोबती विकायचे? अशक्य! अशक्य!”

“आणि का नाही?”— एक आंतरिक आवाज कुजबुजला. “अब्राहमनें आपला एकुलता एक मुलगा परमेश्वराला अर्पण करण्यात आढेवेढे घेतले नाहीत आणि तू नाकरतोस? दुबळ्या माणसा, तुला माहीत नव्हतं की, परमेश्वराचं प्रेम त्यागाशिवाय लाभत नाही.”

तळमळत, कण्हत त्याने आसपास नजर फिरविली, खोलीत कोणी नव्हते. मग हा आवाज कोठून आला? नरकातून खचित नव्हे. कारण दाव्हिदच्या व्हायोलीनाच्या स्वराप्रमाणे हा स्वर मधूर होता.

मनाच्या ह्या वेदना जाचीत असताना पाद्री फ्रान्सिश्कुने गुडघे जमिनीला लावले. कपाळ फरशीवर घासले. जे सगळ्यात भरून राहिले आहे, त्याच ईश्वरी तत्त्वाचा तो आवाज होता. आणि ज्या पडसादांत तो आवाज पुनः पुन्हा उमटत होता, ते पडसाद त्याच्या मनोदेवतेतून निघत होते, जी देवता माणसाची सदैव पाठीराखण करते.

पाद्री फ्रान्सिश्कु उठला, तेव्हा त्याचा चेहरा एका गाढ समाधानाने चमकत होता. परमेश्वरावरील प्रेमाने वीस वर्षाचे प्रेम झिडकारले होते.

नंतर दैनंदिन व्यवहाराची एक गोष्ट सहज केल्याप्रमाणे ह्या सज्जन माणसाने एका पिंजऱ्यात दोन्ही पक्ष्यांना घातले आणि वात्सल्यभराने त्यांच्यावर आपली स्निग्ध नजर स्थिर केली. जणू काय तो त्याना म्हणत होता—

“लंडनपर्यंत उडत जा. या दुर्दैवी पोरांना वाचविण्यासारखे पवित्र कार्य तुमच्या वाट्याला कधी आलेले नाही.”

अनुक्रमणिका

मग त्याने नोकराला बोलावून म्हटले, "ही पाखरं विकून टाक."
नोकर पेद्रू डळमळला. चकित मुद्रेने तो धन्याकडे पाहू लागला.

"विकून टाक म्हणतो ना?"— पाद्री निर्धाराने बोलला— "दोन पौंड सांग, देतील ते घेऊन ये..."

ही आज्ञा देत असताना त्याचे डोळे आकाशावरून ढळत नव्हते. त्याची कल्पना त्याच्यासमोर आकाशात अब्राहमची दुःखी व पवित्र मूर्ती रेखाटत होती. तिच्या हातात देवाचे नाव घेऊन त्याने निष्पाप मुलावर उगारलेला सुरा होता.

नोकर काही पावले टाकून पुढे गेला. इतक्यात दरवाजाच्या उंबरवठ्यावर त्याची पत्रे घेऊन आलेला शिपाई त्याला दिसला.

"दिल्लीहून आलेली ही माझी डाक. पाद्री फ्रान्सिश्कु हर्षभरित होऊन म्हणला— "माझी पाखरं अजूनही बचावतील. स्वर्गातून खाली उतरलेला हा देवदूत असेल." पेद्रू नोकराला थोडा वेळ थांबायला सांगून, त्याने लगबगीने पत्रे फोडली. मुलांच्या मदतीसाठी सुरू केलेल्या वर्गणीला अवघा एक पौंड मिळाला होता.

पाद्री फ्रान्सिश्कुने पेद्रूला जाऊ दिले.

संध्याकाळची सहा वाजता पेद्रू दोन पौंड घेऊन परत आला. हिशोब पुरा झाला होता. या कामात पाद्री फ्रान्सिश्कुने आपले हृदय ओतले होते.
दुसऱ्या दिवशी सकाळी पेद्रूच्या हाका कानावर पडून पाद्री उठला. पाखरांचे गाणे त्याला ऐकू आले नाही.

मग प्रार्थनेसाठी तो बाहेर पडला. वाटेत त्याला सॉबालचे घर लागले. एका खिडकीत त्याला तो पिंजरा लटकत असलेला दिसला. त्यात सॉबाय्यु व टिपू हे त्याचे रावे होते. त्यांच्या आठवणीने डोळ्यातून बाहेर पडणारी आसवे याच्या निर्धाराच्या आचीने आटत होती.

संताचे मन हे अतिशय लवचिक असते. ते वाकते पण मोडत नाही. पडते व उठते, आकुंचित होते पण लगेच प्रसरण पावते. परमेश्वराशीच ज्यांचे लग्न झाले आहे त्याना एकाकीपणा ठाऊक नाही, विधुरावस्था ठाऊक नाही.

पाद्री फ्रान्सिश्कुचे मन आताच्या इतके कधीच गजबजलेले नव्हते. Nunquam minus solus, quam solus. जेजुस क्रिस्त एकाकी रहातो. अनंत अनंतात वास करते.

अनुक्रमणिका

जेत्सेमानी [ज्या बागेत येशू ख्रिस्ताने मृत्यूपूर्वी शेवटची प्रार्थना केली ती बाग.]

हिंदुस्थानातील पावसाळी रात्र जितकी भेसूर तितकीच सुंदर असते. अनेक लेखकांनी तिचे वर्णन केले आहे. पण यथायोग्य असे विरळा. येथे तिची ढोबळ कल्पना देत आहोत.

रात्र नजीक असते. काळ्याकुट्ट, जाड ढगांच्या कोटकिल्ल्यांनी झाकळून जाते. हे ढग समुद्राच्या लाटांप्रमाणे दक्षिणेकडून वाहात येतात. पक्षी एकमेकांना गाठून भयसूचक आवाज करीत, सैरावैरा पळ काढतात. सगळीकडे स्मशान शांतता नांदते. गरम वारे सुटतात. पाण्याचे तुरळक थेंब झडू लागतात. वादळाची ही नांदी असते.

दक्षिणेच्या वाऱ्याला झाडांचा सळसळाट मिळतो. त्यांतच अरण्याचे गाढ आक्रंदन मिसळते. ढगाच्या दीर्घ गडगडाटाची साथ मिळते. घनगर्जनेचे पडसाद आकाशाच्या अवकाशात लागोपाठ उमटत असतात. बराच वेळ हा प्रकार चालतो आणि शेवटी, तुंबळ पाऊस कोसळतो. पर्वताची शिखरे, मंदिराचे कळस आणि समुद्रसपाटी ही सारी क्षणमात्र तळपतात व लगेच गाढ अंधारात बुडून जातात. विचाराच्या शीघ्रतेने ढगांतून वीज उतरते; मिळेल त्याचा फडशा पाडते. वृक्ष आणि इमारती जमीनदोस्त करते. हजारो माणसांना घायाळ करते. शेकडोंचा बळी घेते. असे वाटते की, आकाशाच्या घुमटाचे एका धगधगीत यंत्रात रूपांतर झाले असून ते सारखे जळजळीत बॉंबचा वर्षाव करीत आहे. ते सणसणत, गर्जत, आसमंत उजळीत येतात व मग त्यांचा स्फोट होतो. निसर्गाच्या महातत्त्वाच्या या राक्षसी युद्धासारखे दिव्य व भव्य दुसरे युद्ध नाही. निसर्गाचा अपार विस्तार आपल्या बोलक्या व दणकेबाज आवाजात परमेश्वरी अधिसत्तेची ग्वाही देत राहातो. भयभीत श्वापदे आपल्या गुहांचा आसरा घेऊन अंतरिक्षातील श्वापदांची लढाई पहातात. माणूस—हा शक्तिशाली व परिपूर्ण प्राणी—समोरच्या खवळलेल्या महानतेसमोर चिमुकला होतो आणि एका जुन्या व धुरकट मूर्तीकडे धाव घेऊन गुडघे टेकतो, हात जोडतो. 'सांताबारबाराची' करुणा भाकतो आणि लीनतेचे मधुर व दिव्योदात्त गाणे म्हणतो.

दुसरा दिवस उजाडतो. शांत, आल्हादकारी असा. बेडूक त्याचा जयजयकार करतात. समोरच्या दृश्याच्या लखलखाटाने आपले डोळे दिपून जातात. शेताचा समुद्र बनतो आणि त्याच्यामध्ये नानाविध वनस्पतीने शृंगारलेली बेटे आकस्मिक उगवतात. केळींची सरळ व शुभ्र, खोडे, वल्ही नसलेल्या चिमुकल्या नावांप्रमाणे पाण्यात तरंगतात आणि प्रवाशांप्रमाणे साप आणि किडे यांच्या अनपेक्षित वसाहतीची वहातूक करतात. माड वाऱ्यांच्या झुळूकांनी आपल्या हिरव्या झावळ्या हलवितात. पांखरे वातावरणात वर्तुळाकार घिरट्या घालीत आपल्या मंद फेरीत उल्हासाचे दर्शन घडवितात, गुराखी आणि त्याचे कळप, गारवा आणि हर्ष नव्या दिवसाचा सत्कार सोहळा साजरा करतात. औट घटकेचे हे सारे राज्य पावसाळ्यांतील हा क्षणकालाचा वसंतऋतू एका रात्रीचे हे गुपीत आपल्या डोळ्यांना, आकाशीच्या सूर्याला अचब्याची गोष्ट. निसर्गाच्या शक्तीची सारी करणी!

उनाड मुलगा आपल्या शाळेला दांडी मारून नजीकच्या बांधावर चढतो. समुद्रात तरंगणाऱ्या नावांच्या ताफ्यांवर शुभ्र झेंडा फडकावतो. आणि हे पोर समुद्र ओलांडीत नव्या जगाच्या शोधासाठी पुढे जाते

व पहिल्या सुरक्षित बंदरात उतरते. आणि मग 'माँबाता' आणि 'कालीकत' मधील वास्को द् गामाप्रमाणे जमिनीवर उतरून फेऱ्या मारू लागते आणि तेथून हात उंचावून दुसऱ्या तीरावर उभ्या असलेल्या बहिणीला संदेश पाठविते. त्या बिचारीला आपल्या साहसी भावाबरोबर जायचा धीर झाला नव्हता; पण वेळेवर बसून व भावावर नजर लावून, दालचिनीच्या व लवंगाच्या मोबदल्यात, मुक्यांचे आश्वासन देते. या वस्तू आपला भाऊ नव्यानेच शोध लावलेल्या हिंदुस्थानातून आपल्याला आणून देईल अशी तिला खात्री आहे.

निसर्गाने शेताचे समुद्र केलेले असतात. आणि म्हणून निसर्गाची सोबत करण्याकरिता शेतकऱ्याचा कोळी होतो आणि बिचारे मासे काही घटकांपुरतेच काबीज केलेल्या कळपांच्या प्रांतांत मजा मारतात. अशीच एक वादळी रात्र. पाद्री फ्रान्सिश्कुच्या छोट्या घराच्या खिडक्यांच्या फटीतून मंद उजेड बाहेर डोकावत होता. ओल्या व फिक्कट खोलीत पाद्रीची तळमळ चालली होती. बाहेरच्या वादळाची त्याला जाणीव नव्हती. कारण त्याच्या मनात चाललेले वादळ बाहेरच्या वादळापेक्षा कितीतरी मोठे होते. मनाच्या खोल गर्तेतून परस्परविरोधी विचार निघत होते आणि तुफानात उठणाऱ्या अजस्र लाटांप्रमाणे त्याच गर्तेच्या तळाशी जाऊन फुटत होते; पण लगेच तेथून अधिक त्वेषाने अक्राळविक्राळ स्वरूपात पुन्हा उसळत होते. या राक्षसांच्या धुम्रश्चक्रीत सापडलेले पाद्रीचे मन घटकेत अजाण बालकांप्रमाणे थरथरत होते तर घटकेत 'दाव्हिद'प्रमाणे निश्चल व 'सांसांव'प्रमाणे समर्थ होत होते.

या कलहाचा प्रेरक तोच परमेश्वर असतो. त्यात सापडलेले मन अनंत सागरात धडपडत असते. शरीर व आत्मा, नरक व स्वर्ग समोरासमोर येऊन त्यांच्यात तुंबळ युद्ध सुरू होते. अशा युद्धात विजयी झालेल्या वीरांना संत म्हणतात.

दुसऱ्या दिवशी ३० ऑक्टोबरला, चार वाजता, पाद्री फ्रान्सिश्कुला औधला जायचे होते. आणि आपल्या गळ्याभोवती ठगाचा फास आवळून घ्यावयाचा होता. तशी त्याची शपथ होती; पण ज्या जीवितावर आपला अधिकार नाही, त्याचा विनियोग आपल्या इच्छेप्रमाणे आपल्याला करता येईल काय?

त्या जीविताचा तो केवळ वहिवाटदार होता, मालक नव्हता. अशाप्रकारे इतरांकडून मारून घेणे म्हणजे आत्महत्याच करणे नव्हे काय? आणि जी प्रतिज्ञा—हृदयातून निघाली असली तरी, आपल्या मालकाच्या धनावर सत्ता गाजवू पाहाते त्या प्रतिज्ञेला काय किंमत आहे! ठगांना दिलेले वचन म्हणजे श्रद्धा व भावना यांना वंचित झालेल्या श्वापदांना दिलेल्या वचनांप्रमाणेच व्यर्थ नाही काय?

पाद्री फ्रान्सिश्कु स्वतःलाच असे प्रश्न विचारीत होता. आपल्या खोलीत मस्तक लीन करून छातीवर हाताची घडी करून थोड्या वेळाने तो बसला आणि म्हणाला—

"मी जात नाही. परमेश्वरच माझ्या प्रतिज्ञेचा भंग करू इच्छितो. त्याची आज्ञा मला पाळायलाच हवी."

आणखी काही क्षण गेले, पुन्हा नाना शंकांचा लोंढा त्याच्या मनात घुसला. आपला निर्णय अयोग्य आहे या विचाराबरोबर तो ताडकन उठला. व पुन्हा फेऱ्या मारू लागला.

त्याची मनःस्थिती दारुण झाली होती.

अनुक्रमणिका

हुतात्म्यानी स्वेच्छेने श्वापदांकडून स्वतःला फाडून घेतले. संतानी आपली मस्तके मारेकऱ्यासमोर वाकविली. त्याचप्रमाणे मुसलमानांच्या समशेरीसमोर हे सारे आपल्या जीविताचे धनी कुठे होते? क्रुद्ध सत्ताधाऱ्यांनी तशी मागणी केली त्या वेळी ते डळमळले नाहीत. सत्कार्यासाठी प्राण गमावणे म्हणजे तो परमेश्वरालाच अर्पण करण्यासारखे आहे. परमेश्वराच्या लाडक्या भक्ताला सक्ती जाणवत नसते. पीटरचे डोळे पश्चात्तापाच्या आसवांनी भरून येऊ नयेत म्हणून त्याच्यावर सक्ती झाली ती निरुपयोगी ठरली. दुबळ्यावर होते ती सक्ती. समर्थ करतात तो प्रतिकार. जो वचन देतो त्याला ते वचन पवित्र असते. कारण ते त्याच्या मनोदेवतेला बंधनकारक ठरते. आपल्या प्रतिष्ठेबरोबर केलेला तो एक करार असतो. सज्जनांच्या बाबतीत वचनाला किंमत, दुर्जनांच्याबाबतीत ते निरुपयोगी! हा न्याय किती सोयीस्कर आहे! दुष्टाशी दुष्ट व्हा! काय पण सुंदर नीतीतत्त्वा!

आपल्या निर्णयाची आणि त्याच्या कारणपरंपरेची पाद्री फ्रान्सिश्कुला शरम वाटली. ज्या वाईट विचारांनी त्याच्यावर मात केली. त्यांना चिरडून टाकण्यासाठी जणू त्याने फरशीवर जोराने पाय आपटला आणि तो निर्धाराने म्हणाला—

"मला गेलंच पाहिजे. हाच माझा अंतिम निर्णय."

मध्यरात्र. पाद्री फ्रान्सिश्कु दमला होता. कपाळावरून घामाच्या धारा वाहात होत्या. काळीज छातीत मावत नव्हते. मस्तकाच्या शिरा ताडताड उडत होत्या. त्याने खिडकी सताड उघडली. पावसाचे शिंतोडे त्याला कुरवाळू लागले. वाऱ्याच्या झुळूका तापाने फणफणत असलेल्या आजाऱ्याला चाटून शांत करतात त्याप्रमाणे.

अवचित वीज चमकली. आणि त्या निमिषार्धात संत शाव्हियरच्या चर्चच्या सफेद भिंती आणि शिखरावरील क्रॉस त्याच्या नजरेसमोर तळपला. त्याला वाटले आपली दुर्दशा आणि धर्मकार्याला येणार असलेला धोका ते आपल्या तोंडावर फेकीत आहेत.

"बरं आहे." पाद्री फ्रान्सिश्कुने झटपट खिडकी बंद करून म्हटले— "यासंबंधी मी विचारच केला नव्हता. माझ्या उपदेशाची गरज असलेली तरुण पिढी, सांत्वनाविना तळमळणारी मरणोन्मुख माणसं, धर्मदीक्षेविना राहिलेली अर्भकं, धर्मोपदेशकाविना राहाणारे चर्च, पितृविहीन पोरं, लुळेपांगळे चिरगुटात कुडकुडणारे उघडेवाघडे लोक, अंध, संरक्षण न लाभता छळले जाणारे प्राणी या सगळ्यांचा माझ्या जीवितावर हक्क आहे. माझ्यावर कितीतरी कर्तव्यांचं दडपण आहे. या सगळ्यांचा हिशोब मी परमेश्वराला दिला पाहिजे."

पण लगेच या विचाराचा निषेध करणारा एक नवा दुर्धर विचार त्याच्या मनात उसळतो आणि त्याच्यावर प्रहार करू लागतो. तशी तो दचकतो. हा सगळा विवेक आपल्या बळकट बुद्धिवादांतून येतो की, प्रकृतीच्या दुबळेपणातून येतो ते त्याला कळेना. खिडकीतून एक देवदूत येऊन आपल्याला अंधारातली वाट दाखवितो की, सैतान येऊन आपल्या मोहजालात मला अडकवू पाहातो. मन याप्रमाणे लोंबकळू लागले. क्षणात ते आकाशातल्या ताऱ्यांपर्यंत उडू लागले. क्षणात खोल दरीच्या तळापर्यंत उतरू लागले. क्षणात देवदूतामध्ये वावरू लागले. क्षणात सैतानांच्या सहवासात रमू लागले. क्षणात ज्यॉबप्रमाणे Peccavi

(चुकलो) म्हणू लागले. क्षणात Non & peccavit (चुकलो नाही) म्हणू लागले. एक लाट नरक घेऊन येऊ लागली. दुसरी लाट स्वर्ग घेऊन येऊ लागली.

रात्र सरत होती. मंद दिवा मालवू लागला होता. वादळाची गर्जना ऐकू येत नव्हती. पावसाची झोड जाणवत नव्हती. झुंज करता करता थकलेली महातत्त्वें निजून पडली होती. पाद्री फ्रान्सिश्कु मात्र जागाच होता. मेजावर रेलून हातांनी तो कपाळ दाबीत होता. त्यातून एकदा समाधानकारक निर्णय निघतो का पहात होता. पण थडग्यागत त्याचे मस्तक ओसाड झाले होते. घड्याळात वेळ पहाण्यासाठी तो उठला. गेल्या काही तासात त्याच्या वेदनांची युगे पसरली होती. मग त्याला दिवा विझलेला दिसला. आणि डोळ्यासमोरचा अंधार वृद्धीच्या अंधारात मिसळला. मनाच्या आकांताने त्याने घड्याळ उचलले. आणि खिडकी उघडली. अजून रात्र होती. आकाशापाशी विजेच्या चमकाऱ्याची याचना केली. पण व्यर्थ!

पृथ्वीवर उजेड दिसत नव्हता. आकाशात तारा दिसत नव्हता. आणि वादळात सापडलेल्या या दुर्दैवी प्राण्याकडे कोणी ढुंकून पहात नव्हता. कोणी त्याचे ऐकत नव्हता. पहाटेचे चार वाजले असावेत. पाच वाजेपर्यंत कोणतातरी निर्णय घ्यायला हवा होता. अजून त्याचा थांगपत्ता नव्हता. काळा, तुझी गती थांबव. फक्त एक तास, एकच तास आणि नंतर कोणी सांगावे? नरक... नरक! परमेश्वरी लीला अगाध आहे!

'ऑलिव्हेयरश' च्या डोंगरावर दोन हजार वर्षांपूर्वी यापेक्षाही एक दारुण घटना घडली. देवाचा लाडका पुत्र वाकला. जेव्हा त्याच्या अपार प्रेमावर परमेश्वराचा कोप उतरला. तो कोपही अपार होता. कुणाच्याच साक्षीशिवाय झालेली झुंज महान होती. परमेश्वराचा न्याय व ख्रिस्ताची निष्ठा यांच्यामध्ये झालेली ती झुंज होती. ती पाहून मानवजात थरथर कापली. तिच्या अंगातून रक्ताचा घाम निथळला. आकाशातून एक देवदूत उतरला व त्याने तिला दिलासा दिला. सभोवतालचा अंधःकार हा आत्म्याचा प्रकाश असतो. आत्मरत मन हीच तेजाची ज्योत बनते. त्याचवेळी ती दडून असलेली सत्ये मानवी क्षुद्रतेला आतापर्यंत दिसत नव्हती, त्यांचा मानवी मनाला शोध लागतो.

पाद्री फ्रान्सिश्कु खोलीच्या अंधारात चाचपडत फिरत होता. त्याला आत्मतेजाच्या प्रकाशात पुढचे स्पष्ट दिसू लागले. अकस्मात तो थांबला. त्याच्यासमोर कल्पना असेल, वस्तुस्थिती असेल—एकच सरळ रस्ता होता. आणि त्याच्यावर एक ठग होता. त्याच्या तोंडचे हे उद्गार आपल्या कानावर पडत असल्याचा त्याला स्पष्ट भास झाला.

"तू मरण लांबणीवर टाकण्याची मला विनवणी केलीस आणि मी ती मान्य केली. तुझ्या आणभाकेवर मी विश्वास टाकला. कारण तुझ्यावर माझा विश्वास होता. मला असे वाटले की, तोंडातून ज्या लोकांसाठी अष्टौप्रहर सत्य निघत असते ते तोंड कदापी परमेश्वरासमोर खोटे बोलणार नाही. मी फसलो. या माझ्या अपराधाबद्दल मी मृत्युदंडाची शिक्षा भोगणार आहे. मी केलेल्या कल्याणाची फेड तू अकल्याणानें केलीस. मी मृत्युदंडानं करणार आहे. तू मला दिव्य मरण दिलंस म्हणून मी कृतज्ञ आहे. जे आयुष्य तू प्रतिज्ञाभंगाने मिळविलेस त्याचा मी हेवा करीत नाही. कारण लवकरच ते तुला पश्चात्तापाच्या सैतानाला विकून टाकावं लागेल. कालीच्या भक्ताचे देवदूतात रूपांतर करण्यासाठी ख्रिस्ताचा एक उपदेशक सैतान बनला. तू ख्रिस्ती ऐस. पोर्तुगीज ऐस. पाद्री ऐस. काही असलास तरी ज्याप्रमाणे भेकड, बेईमानी व

प्रतिज्ञाभंगाचे पातकी थोरासमोर नतमस्तक होतात त्याप्रमाणे माझ्यासमोर नतमस्तक हो. पवित्र बायबलची पानं पुनः पुन्हा वाचून चर्चमधल्या वेदीवरून तू जगाला हेच शिकवीत होतास?

विश्वासघातकी माणसा, तुला शतकांचे आयुष्य लाभो. तुझ्या शिक्षेसाठी आणि माझ्या सूडासाठी.”

शंकाकुशंकांनी सतावलेली पाद्रीची मनोदेवता आता उजव्या बाजूला वळली. तेथे तिला एक पर्वत दिसला. परमेश्वरी कृपाप्रसादाने त्याने जी वाट निवडली, ती या दोन पर्वतांमधील दरीतून जात होती. आता निवडीचा प्रश्न नव्हता. म्हणून भांबावण्याचा, टंगळमंगळ करण्याचाही नव्हता.

एवढ्यात कोंबडा आरवला. निसर्ग झोपेंतून जागा झाला होता, आणि पाद्री फ्रान्सिश्कु आपल्या तंद्रीतून, धुंदीतून. निसर्गाची विश्रांती संपली होती. पाद्री फ्रान्सिश्कुची आताच सुरू होत होती. तो मरणाच्या तयारीला लागला. मग तो खोलीच्या मध्यभागी गुडघे टेकून बसला आणि दोन्ही हातात ख्रिस्ताची प्रतिमा धरून त्याने ती ओठाजवळ नेली. एकच चित्कार कानावर पडत होता. बहात्तर वर्षाचा तो आरोपी होता. आयुष्यातील क्षणाक्षणाचे गुन्हे स्वतःवरच शाबित करून तो न्यायनिष्ठुर, न्यायाधिशासमोर स्वतःलाच दोषी ठरवीत होता. आणि परमदयाळू परमेश्वराकडे दयेची, क्षमेची याचना करीत होता. तो चित्कार, तो नाद म्हणजे आशेच्या समर्थ आवाजात भीरू, दुबळे आंक्रदन मिसळून झालेला नाद होता. जगाच्या उंबरठ्यावर सगळे क्षुद्रत्व झाडून, विश्वापेक्षाही उंच होऊन आणि स्वर्गाचे संजीवक वारे पिऊन एका श्रद्धावान आत्म्याने दिलेली ती शेवटची कबुली होती. एका ख्रिश्चनाची ती अंतिम प्रार्थना होती.

पाद्री फ्रान्सिश्कु उठला. त्याची मुद्रा आता शांत व उल्हसित दिसत होती. त्याच्या भव्य कपाळावर चिंतेचा एकही ढग नव्हता. वाटत होते की, या माणसात हृदय धडधडत नाही आणि त्याच्या साऱ्या हालचाली कुठेतरी दूर असलेल्या अदृश्य इच्छेनुसार होतात.

सूर्य उगवला. त्याचे पहिले कवडसे जमिनीवर उतरले तेव्हा पाद्री फ्रान्सिश्कुने लंडनला असलेल्या अनाथ मुलांविषयी रॉबेर्तला एक विस्तृत पत्र लिहिले. मोठ्या खबरदारी व शांत वृत्तीने ते बंद केले. तेच त्याचे मृत्युपत्र होते. वेगळ्या मृत्युपत्राची गरज नव्हती. मग त्याने एक जुनी पेटी उघडली आणि तिच्यातून एक पोषाख काढला. त्याला गोव्याच्या मठांतील मातीचा वास येत होता. समारंभाच्या पोषाखाप्रमाणे मरणकाळचे ते वस्त्र त्याने परिधान केले हॅट घालत असता नोकराने दोन पत्रे त्याच्या हातात दिली. ती नुकतीच लंडनहून आली होती. ती उत्कंठेने उघडली व वाचली.

हार्टमनची बायको मुलांची फी तुंबल्याबद्दल तक्रार करीत होती. आणि असा धाक घालीत होती की, दुसऱ्या महिन्यांत मागची सगळी बाकी आली नाही तर मुलांना एखाद्या अनाथाश्रमात पाठविण्यात येईल.

“ही माणसं पोरांना निश्चित विकून टाकतील.” पाद्री फ्रान्सिश्कु एका खुर्चीत अंग टाकून म्हणाला. थोडावेळ स्तब्ध राहिला. मग भग्न अंतःकरणाने पुटपुटला. “तीन डिसेंबरपर्यंत मला जीवंत राहाता आले असते तर? रॉबेर्तकडून येणाऱ्या दहा पौंडांनी हे प्रकरण मिटले असते. परमेश्वरा, मला पुन्हा या दरीत लोटू नकोस... मला हे सोसवत नाही...”

अनुक्रमणिका

त्याची प्रार्थना ऐकली गेली. आपल्या निर्णयासंबंधी कोणतीच शंकाकुशंका त्याच्या मनात आली नाही. त्याने आणखी दोन ओळी ताज्या कलमात लिहिल्या. आणि ते पत्र नोकरांकडे देऊन त्याला निक्षून सांगितले की, ते दुसऱ्या दिवशी रॉबेर्तला दे.

उंबरठ्याबाहेर पाऊल टाकण्यापूर्वी त्याने नोकराला व साक्रिस्तांवला जवळ बोलावले. बोलण्याचा प्रयत्न केला पण जमले नाही. थोडा वेळ त्याने पाहून घेतले व बाहेर पडला.

दूरवरून हुंदके ऐकू येत होते.
(Consumatum est.)
त्याचेच असतील का ते?

अनुक्रमणिका

२१

Deposuit potentes ["बलाढ्याना पदभ्रष्ट केले."]

पाद्री फ्रान्सिश्कु औधच्या सडकेवरून चालला होता. आणि एक इसम रॉबेर्तच्या बंगल्याचा जिना चढत होता. त्याच्या मस्तकाभोवती एक हिरवा फडका गुंडाळला होता. त्यामुळे त्याची गळ्यापर्यंत रुळणारी लांब दाढी तेवढी बाहेर दिसत होती. त्याच्या अंगात एक पायघोळ लाल रंगाचा झगा होता. आणि त्याच्यावर एक काश्मिरी कापडाचे जाकिट घातले होते.

रखवालदाराने त्याला पहाताच दचकून उडी टाकली आणि दरवाजा बंद केला. त्या अज्ञात माणसाने दारावर जोराची थाप दिली. खिडकीतून एक आवाज बाहेर पडला. त्या पृच्छा केली. "काय काम आहे?"

"मला रॉबेर्त साहेबांना भेटायचं आहे" बाहेरच्या इसमाने उत्तर केले.

काही क्षणानंतर दार हलकेच उघडले गेले आणि एका नोकराने त्या नवागताला रॉबेर्तच्या कचेरीत नेऊन सोडले. त्या जागेत पूर्वी कापसाचे गोदाम होते. गॅलरी ओलांडून जाताना, वेगवेगळ्या दालनातून जाताना, त्याला विचित्र वाटले तरी, त्याने आपल्या प्रयोजनाचा स्वतःला विसर पडू दिला नाही. भावनांचे आवर्त त्याच्या संयमशील बुद्धीला आवरता येईनात. जुन्या दुःखद स्मृतींनी त्याचे हृदय धडधडत होते.

तो मेजाजवळ बसला. चेहऱ्यावरील आच्छादनाची त्याने चाळवाचाळव केली. मेजावरील लिहिण्याच्या सामानाचे व घंटीचे निरीक्षण केले. या वस्तू जुन्याच होत्या. तोच तेवढा बदलला होता. रॉबेर्तचा आवाज कानावर पडताच तो तंद्रीतून जागा झाला.

"सॉबालसाहेब, तुम्हाला या घरात पाहून मला फार फार आनंद झाला—" रॉबेर्तने त्याच्याजवळ अदबीने येऊन येऊन म्हटले.

एक शब्द न उच्चारता सॉबालने मान हलविली. मग रॉबेर्तने खुर्ची जवळ ओढली व तो त्याच्याजवळ बसला. काही क्षण कोणीच बोलले नाही. या अवधीत त्यांनी एकमेकांना लक्षपूर्वक बघून घेतले. मग शांततेचा भंग करीत सॉबाल म्हणाला, "कालच मला लंडनहून हे पत्र आलं आहे"

रॉबेर्तने लिफाफ्यावरील पत्त्यावर नजर टाकली तशी त्याच्या कपाळाला आठ्या पडल्या. तो चमकून बावरला. पत्राची घडी उलगडून त्याने आतील मजकूरावरून नजर फिरविली. आणि मग हतबुद्ध होऊन खुर्चीत अंग लोटून दिले.

प्रिय मित्र,

हे पत्र घेऊन येणारा सॉबाल जोसेफात आहे. दहा दिवसांच्या आत तू मला देणे असलेली तीन हजार पौंडाची रक्कम त्याच्या स्वाधीन करावीस. ही फेड वरील मुदतीत करणे अशक्य झाल्यास तू

सॉबालशी या बाबतीत बोलणे कर. त्यालाच मी कायदेशीर खत करून देऊन सारे हक्क विकून टाकले आहेत.

तुझा स्नेही
जॅक मॅथ्यू

थोड्या स्तब्धतेनंतर, दुष्ट स्वप्नातून जागा झाल्याप्रमाणे रॉबेर्तने मान वर करून दीर्घ श्वास घेतला आणि केविलवाण्या स्वरात म्हटले, "तूर्त ही रक्कम तुम्हाला देणे मला सर्वथैव अशक्य आहे. माझ्या पदरी सध्या काहीच शिल्लक नाही. तेवढी रक्कम माझ्या हाती लवकर येईल असंही मला वाटत नाही. तुम्ही मला आणखी चार महिन्यांची मुदत द्या. म्हणजे या अवधीत माझा चुलतभाऊ या कर्जफेडीची काही व्यवस्था करीत असल्यास मला कळून येईल."

सॉबाल करारी आवाजात म्हणाला, "तुमच्या आजच्या अवस्थेबद्दल मला कितीही सहानुभूती वाटत असली तरी तुमची इच्छा मला पुरी करता येत नाही." निष्ठुरता नेहमी अशीच मितभाषी असते.

"ज्या माणसानं मला जीवदान दिलं तोच माझा छळ करील हे मला शक्य वाटत नाही"— रॉबेर्त म्हणाला, — "तुम्ही उदार आहात. आणखी थोडे उदार व्हा. माझ्या नशिबातली कैद टाळा. ही प्रार्थना मी माझ्यासाठी करीत नाही. तुरुंगाच्या अंधारात माझं आयुष्य नि माझा नावलौकिक यांना मूठमाती द्यायला मी भीत नाही. मी विनवणी करतो ती, माझ्या निष्पाप मुलीसाठी—"

एखादा गुन्हेगार दयेची याचना करतो त्याप्रमाणे दोन्ही हात पसरून त्याने सॉबालची विणवणी केली.

सॉबालच्या मुद्रेवर त्याच्या जीवनाने जणू विराम घेतला होता.

थोड्या वेळानंतर त्याच्या ओठांवर स्मित लहरले, पण लगेच ते विरले. कदाचित त्याला ते अनुचित दिसले असेल.

त्याच्या हृदयातला सैतान आता हर्षाने वेडा झाला होता. तीन हजार पौंडाच्या मोबदल्यात विकत घेतलेले रॉबेर्तचे अश्रू त्याच्या जुनाट व दुर्धर जखमेवर गुलाबपाण्याच्या थेंबाप्रमाणे सांडत होते. हात पसरून व गयावया करून याचना करणाऱ्या ह्याच माणसाने अकरा वर्षापूर्वी याच घरात एका इशाऱ्याने त्याच्या स्वाभिमानावर वार केला होता. आणि त्याच्या प्रतिष्ठेबरोबर संबध ज्ञातीची प्रतिष्ठा धुळीत मिळविली होती. परमेश्वरी लीला अगाध आहे एवढे खरे!

"माझ्या खऱ्याखुऱ्या समाधानाला हे अपुरे आहे. ह्या माणसाचा विपत्काल लांबविण्यासाठी त्याला दीर्घायुष्य मिळण्याची तरतूद मला केली पाहिजे," असे मनातल्या मनात म्हणून सॉबाल उद्गारला—

"साहेब, मी तुम्हाला एक महिन्याची मुदत देत आहे."

"एकच महिना?" रॉबेर्तने प्रश्न केला.

अनुक्रमणिका

“होय, एवढीच मुदत मी देऊ शकतो. यापेक्षा अधिक नाही.” सॉबाल निष्ठूर आवाजात ओरडला.

एवढे बोलून तो लगबगीने बाहेर पडला. रॉबेर्त निराशेच्या समुद्रात गटांगळ्या खाऊ लागला.

दुर्दैवी रॉबेर्त!

अनुक्रमणिका

भाग दुसरा

अनुक्रमणिका

१

एक अँग्लोइंडियन कुटुंब

तडवे सौम्य वारे वाहू लागले होते. फुले टवटवत होती. पानांवर जलबिंदू चमकत होते. पहाटेच्या दवातून निघणारे मोतीच जणू. सिलोनच्या दर्यापेक्षा समृद्ध अशा पहाटेतून निघणारे. सूर्य किरणांच्या चुंबनाबरोबर ते मोती विरून जात. आकाश आपले पावसाळी उदास आवरण फेकून देत होते. आणि उत्सवाची नवी वस्त्रे पेहरत होते. युरोपियन लोकांना वसंत ऋतूसारखा भासणारा हा ऋतू.

डिसेंबर महिना. फिझाबाद आनंदाने ओसंडते. परदेशी यात्रेकरू याचवेळी इकडे गर्दी करतात.

एक विस्तृत दालन. प्रकाशाने उजळलेले. उंची तसबीरींनी शृंगारलेले. आरसे, पुतळे, शिसवी लाकडाच्या खुर्च्या आणि सोफा, फुले आणि कांचसामान यांची सुबक मांडणी.

एका उघड्या खिडकीजवळ एक इसम होता. वय वर्षे चाळीस परंतु दिसत होता साठ वर्षांचा वृद्ध. संसारातील क्लेशांनी अकाली वार्धक्य आले होते. लिननचा सफेद पोषाख अंगात होता. डोक्यावर मखमलीची टोपी होती. तो खुर्चीत बसला होता. जवळच सतरा अठरा वर्षांची एक मुलगी होती. तिचा हात त्याने आपल्या हातात घेतला होता.

“किती सुंदर सकाळ ही!” तो इसम म्हणत होता :

“डिसेंबर महिन्यात इतकी सुंदर हवा दुर्मिळच नाही का?” आपले गोजिरवाणे मस्तक हलवीत हेलेन बोलली.

“तू लंडनमध्ये आहेस असे समजतेस?” तो इसम म्हणाला. तो रॉबेर्त होता हे वाचकांनी ताडलेच असेल.

“मला इकडचा निसर्ग किती आवडतो याची कल्पना नाही तुम्हाला पपा.” अशा साध्या शब्दांनी ती कुलीन मुलगी आपली भावना व्यक्त करीत होती. सभोवतालच्या अफाट क्षितिजात ती खोल पहात हाती. तेव्हा तिचे डोळे उल्हसित होत. समोरची हिरवी व हसरी शेते व उदासीन सावल्यांनी काळवंडलेले लंडन शहर यांतील विरोध तिला स्पष्ट जाणवत होता. इकडच्या निसर्गाच्या रेषांची भव्यता, देखाव्यांची जादू, आकृतींचा सुंदर सफाईदारपणा, या आसमंताचा विस्तार. ज्याच्यावरून आपली कल्पना हुंदडत जाते, वेडी होते, उदात्त होते. या वस्तीची शांतता, धबधब्याच्या धारांतून सूर्यकिरणांचे होणारे सप्तरंगी दर्शन, नदीच्या पात्रातून आणि तलावातून हेलावणारे आकाशाचे प्रतिबिंब. ही संपन्न आणि समृद्ध सृष्टी—यौवनाने रसरसलेली आणि सौंदर्याने लखलखणारी—हे सारे पाहून ही मुलगी देहभान विसरत हाती. तिने नेहमीच इंग्लंडचा दुःखी सूर्य व तोदेखील काचेच्या तावदानाआड पाहिला होता.

बापलेकीमध्ये चाललेला हा दीर्घ संवाद ऐकण्याची जबरदस्ती आम्ही वाचकांवर करू इच्छित नाही. त्याची कल्पना त्याला सहज येऊ शकेल.

हेलेनाने आपल्या अनुभवांचे तपशीलवार वर्णन कितीतरी पत्रांतून केले होते, तोच पाढा ती आता, हसत हसत वाचीत होती. रॉबेर्तचे डोळे तिच्यावरून हलत नव्हते. तिच्या कपाळाभोवतालचे केस तो वळवीत होता. आणि त्यांचा एक मुकुटच बनवीत होता. पुनः पुन्हा तिचे मस्तक चुंबनाने भरून टाकीत होता. तिचे उद्‌गार तो हृदयात साठवीत होता. आणि आत्यंतिक समाधानाने आपले मस्तक हलवीत होता. एखादी गुराखी पोरगी आपले रूप वहात्या पाण्याच्या आरशात अभिमानाने पाहाते त्या प्रमाणे तो तिच्या रूपात स्वतःला पाहात होता. रॉबेर्त तिचा पिता होता एवढे सांगितले म्हणजे त्यात सगळे आले.

आपल्या संभाषणात हेलेन तॉमाससंबंधी सांगायला विसरली नव्हती बोलता बोलता ती म्हणत होती.

"सात महिन्यापूर्वी तॉमास एक दिवस आमच्या अभ्यासाच्या खोलीत आला. आम्ही–मी व ऑमिलीने त्याला अस्वस्थ होऊन विचारले— 'काही विशेष घडलं नाही ना?' तो उत्तरला, नाही. एक साधा निर्णय–उद्या माझ्या अभ्यासाला रजा देतो नि एका व्यापारी कंपनीत नोकरी पत्करतो' हे शब्द कानावर पडताच आम्ही घाबरून म्हटले, 'मग सोडून जाणार का तू आम्हाला?' 'नाही.' तो तत्काळ उत्तरला. त्याच्या स्वरांतील कंपात त्याच्या मनातील कलह उमटला होता. ज्या निष्ठुरतेनं तो आम्हाला तडकाफडकी सोडून जात होता, त्या निष्ठुरतेचा आम्हाला अचंबा वाटला. त्याला आपल्या निर्णयापासून परावृत्त करण्यासाठी आम्ही जे मुद्दे पुढे केले त्यांना अत्यंत सौम्य शब्दात त्याने उत्तर दिले."

"त्या दिवसापासून तॉमास संध्याकाळी कामाला लागायचा. रात्री जेवण झाल्याबरोबर तो बंद खोलीत पहाटेपर्यंत लिहीत बसायचा. थोड्या दिवसानंतर आम्हाला कळून आलं की, तो फारच थकलेला आहे नि फिक्कट दिसत आहे. डोळ्यात पाणी आणून आम्ही त्याची विनवणी केली की, तू इतकं काम करू नकोस. आमच्या मागणीला पुष्टी आणण्यासाठी आम्ही असंही सांगितलं की, आम्हाला मासिक रक्कम मिळते, ती आम्हाला पुरून उरते. यावर तो काही बोलला नाही. त्या रात्री आमच्या समाधानासाठी तो लवकर झोपला."

"पप्पा, तुम्ही जर आम्हाला इकडे बोलावून घेतलं नसतं तर आमचा भाई निश्चित आजारी पडला असता."

"तू पण त्याला भाई म्हणतेस?" रॉबेर्तने आश्चर्याने विचारले.

"होय पप्पा, तेवढी त्याची लायकी आहे."

"घरात तुम्ही त्याला अशी हाक मारायला हरकत नाही. पण चारचौघात— छे! छे!—" रॉबेर्तने कपाळाला आठी घालून म्हटले.

हेलेन चपापली. तिची नजर खाली वळली. तिच्या चेहऱ्यावर गुलाबी छटा पसरली.

अनुक्रमणिका

रॉबेर्तने प्रेमभराने तिचा मुका घेतला.

रॉबेर्त मुलीशी संभाषण करण्यात गुंतला असताना पाद्री फ्रान्सिश्कु व तॉमास जवळच्या खोलीत येरझारा घालीत होते. रॉबेर्तचे शेवटचे उद्‍गार तॉमासच्या कानावर पडले होते.

वाचकांची उत्कंठा शांत करण्यासाठी येथे हे सांगून टाकले पाहिजे की, पाद्री फ्रान्सिश्कु औध गावातून—एकाही ठगाची भेट झाल्याशिवाय परतला होता. बराच वेळपर्यंत काळा डगला घातलेला एक इसम त्याच्या मागोमाग फिरत होता. पण तोदेखील नंतर दिसला नाही.

पाद्री फ्रान्सिश्कु आता हात पाठीमागे गुंफून रॉबेर्तच्या खोलीत फिरत होता. फिरता फिरता पुटपुटत होता.

"हार्टमनसंबंधी मला इतकी वाईट माहिती मिळाली होती की, आमच्याकडून तुम्हाला जाणारी मासिक रक्कम बंद झाल्याबरोबर तो तुम्हाला एखाद्या 'प्रॉटॅस्टन्ट' धर्मप्रचाराच्या शाळेत पाठवून देईल अशी भीती आम्हाला वाटली. जरूर ती रक्कम गोळा करण्याची मी शिकस्त केली. पण यश आले नाही. फिझाबादमध्ये खरे ख्रिश्चन फार थोडे आहेत."

"पाद्रीसाहेब, एका वर्तमानपत्रातील बातमीवरून मला समजून चुकलं की, एका ब्राह्मणाने रॉबेर्तला कपटानं फसविलं. त्याचवेळी मी ताडलं की, यापुढे रॉबेर्त अडचणीत येईल. व आम्हा मुलांची फी नियमितपणे पाठविणं त्याला कठीण जाईल. लगेच मी या अडचणीतून मार्ग काढण्याच्या प्रयत्नाला लागलो. माझ्या बहिणींना मी यासंबंधी काहीच सांगितलं नाही. मी फॉरबस कंपनीच्या कचेरीत गेलो आणि मला एखादी नोकरी देण्याची तेथील अधिकाऱ्यांना विनंती केली; आणि सुदैवानं माझ्या पदव्यांच्या जोरावर अठरा पौंड पगाराच्या एका जागेवर माझी नेमणूक झाली. माझ्या गरजेच्यामानानं हा पगार थोडाच होता. म्हणून मी आठ ते अकरा वाजेपर्यंत गणिताच्या शिकवण्या देऊ लागलो. आणि रात्रीच्यावेळी म्युझिकच्या नकला करू लागलो. अशा रीतीने आणखी सात पौंड मिळू लागले. माझ्या एवढ्या कष्टाच्या कमाईचा काही हिस्सा मला वापरता आला नाही. कारण तुमच्या एका मित्रानं दरमहा तीन पौंडाची मदत पाठवायला सुरुवात केली."

"माझा मित्र!" पाद्री फ्रान्सिश्कुने त्याला आडवीत म्हटले.

"त्यानं आपलं नांव कळविलं होतं"—

"काय त्याचं नांव? सांग लवकर."

"सॉबाल असावं"— तॉमास म्हणाला.

पाद्री फ्रान्सिश्कु विचारात पडला. सॉबालने आपल्यावर विश्वास टाकून ही मदत आपल्या स्वाधीन का केली नाही यासंबंधी त्याचा तर्क चालेना. "माझ्या सच्चेपणावर त्याचा विश्वास नसावा—" पाद्री स्वगत म्हणाला. मग तॉमासकडे वळून बोलला. "—परमेश्वर तुझं कल्याण करो. सज्जन मुला, तू चांगला भाऊ आहेस हे सिद्ध केलंस.

धर्मोपदेशकाच्या डोळ्यात आसवे चमकली.

अनुक्रमणिका

तॉमासने त्याचा हात हातात घेतला. त्याचे चुंबन घेतले. व त्याच्यावर नजर स्थिर केली. जणू काय त्याला म्हणायचे होते.

“तुम्ही व रॉबेर्तन मला शून्यातून घडविलं. तुमचे उपकार मी कधीच विसरणार नाही.”— थोडावेळ थांबून तो पुढे म्हणाला.—

“रॉबेर्तने आमच्या प्रवासखर्चाची रक्कम कशी उभी केली ते मला समजलं नाही. ती रक्कम काही थोडीथोडकी नव्हती.”

“हा सारा खर्च रिकार्दने केला. तोच आता तुमची सारी व्यवस्था पाहातो. पण तू त्याचे आभार मानायला जाऊ नकोस. त्याचा विनय दुखावेल.”

“केवढा थोरपणा!”— तॉमास बोलला— “तो जे काही करीत आहे त्यापेक्षा ज्या पद्धतीनं तो करीत आहे ती पद्धत मला महत्त्वाची वाटते. देवानं मला संधी दिली तर माझी कृतज्ञता इथून निघण्यापूर्वी मी व्यक्त करणार आहे.”

“म्हणजे? तू लंडनला परत जाणार आहेस काय?”

“फॉरबस कंपनीची कलकत्त्यात एक शाखा आहे. माझ्या बहिणींना सोबत करण्यासाठी मी बदलीची मागणी केली. ती मान्य करण्यात आली. फिझाबादला मी पंधरा दिवसापेक्षा अधिक काळ राहू शकत नाही. ॲमिलीला माझ्याबरोबर घेऊन जायचा माझा विचार होता; पण हेलेनापासून ती दूर राहू शकेल की काय हाच प्रश्न आहे. त्यांचं एकमेकांवर फार प्रेम आहे हे तुम्हाला माहीतच असेल.”

“तिची काळजी तू नको करूस.”
—एवढे बोलून पाद्री फ्रान्सिश्कुने आपली हॅट उचलली व तो बाहेर पडला.

अशी संभाषणे नेहमी होत. त्यात त्याला आपल्या शिष्याचा कुलीनपणा व उदात्त भावना यांचा थांग लागला. आपण लावलेल्या झाडाचे पहिले फळ पाहून मळ्याच्या मालकाला जो आनंद लाभतो, तो आनंद पाद्री फ्रान्सिश्कुला अनुभवायला मिळाला.
आपले परिश्रम फळाला आलेले पहाण्याचे भाग्य किती उल्हासकारी असते? ज्या कार्यात आपण शक्ती वेचलेली असते, दगदग काढलेली असते, रात्री जागत काढलेल्या असतात, त्या कार्यात यश मिळाले म्हणजे आपले हृदय आनंदाने नाचू लागते. पाद्री फ्रान्सिश्कु आणि रॉबेर्त यांनी आपल्या शिक्षणासाठी केलेल्या त्यागाची आपल्याला जाणीव आहे हे सिद्ध करण्याची तॉमासला तळमळ लागून राहिली.

अनुक्रमणिका

२

बाल्य संपते

तॉमास बागेत उतरला. त्याच्या मनाला कसलीतरी हुरहूर लागली होती. झऱ्याचा मर्मरध्वनी, फुलांचा सुगंध, पानांची सळसळ, पाखरांची किलबिल या गोष्टी त्याच्या मनाला विरंगुळा देऊ शकत नव्हत्या. रॉबेर्तचे शेवटचे उद्‌गार, गतिमान व आक्रमक लाटांप्रमाणे त्याच्या मनांत त्वेषाने उसळत होते. त्यात दुसऱ्या एका गोष्टीची भर पडली होती. तो लंडनहून येत असताना प्रवासात हेलेनाशी बोलत होता आणि तिला बहीण म्हणून संबोधीत होता. ते पाहून इंग्रजी प्रवासी सखेदाश्चर्च व्यक्त करीत होते. हा एक प्रकारचा भयानक इशारा होता. त्याच्या मानसिक यातनेत भर घालण्याकरिता जणू लंडनला निरोप देताना हार्टमेनने त्याला जो उपदेश केला होता. तो त्याला आठवला.

“हे पहा, हिंदू समाज हा युरोपीयन समाजासारखा नाही. तुला जर लोकप्रिय व्हायचं असेल तर तू हिंदी आहेस हे कधी विसरू नकोस व नम्रता कधी सोडू नकोस.”

ही एकप्रकारची भीतीच होती. तिचे कारण त्याला माहीत नव्हते. पण तिच्या परिणामाशी तो झगडत होता.

बालपणापासून तॉमासने आपले हृदय हेलेनला अर्पण केले होते. ते प्रेम अबोल, गूढ विनम्र असे होते. त्याच्या वेदना त्याच्या अंतःकरणाला माहीत. भित्र्या फुलपाखराप्रमाणे आपल्या फुलाभोवती हा हिंदी तरुण भिरभिरत होता. त्याचा पहिला सुगंध त्याने हुंगला होता. तिला पाहाण्यात, कौतुक करण्यात, पूजा करण्यात रंगला होता. तिचे निरीक्षण करण्यात धन्यता मानीत होता. फुलाला झाकून टाकणाऱ्या ओलसर धुक्याप्रमाणे निरागसतेच्या आवरणात गुरफटलेल्या आपल्या प्रेयसीचे कौतुक करण्यात दंग होता.

दिवस नि रात्री कचेरीच्या एकांतात, रस्त्यावरच्या गडबडीत, आकाशाच्या विस्तारात, रुपेरी लहरत्या समुद्रसपाटीवर वर्तमानाच्या निराशेत आणि भविष्याच्या संदेहात त्याला हेलेनाची मूर्ती धीर देई, सामर्थ्य देई. श्रद्धाळू माणसाला अंतकाळी आशा आधार देते, तशी. पित्याचे नाव नाही, कुटुंब नाही, कुणीतरी समाजामध्ये फेकून दिलेला. बुडणाऱ्या इसमाला लाटांनी, किनाऱ्यावर फेकून द्यावा तसा हा दुर्दैवी तरुण त्या देवदूताच्या पंखावर बसून तरंगत होता. त्या देवदूताने त्याला आपल्या दैवी कटाक्षाने उचलून घेतला होता, ज्या कटाक्षात माणसाच्या हृदयात जादूची ज्योत पेटविण्याची शक्ती आहे ही ज्योत कित्येकांना स्वर्गीय दीप ठरते. कित्येकांना नरकातला वणवा ठरते.

तॉमासला प्रेम म्हणजे भक्ती होती. ‘बियात्रीज’च्या पायाजवळचा तो डॉन्टे होता. कौमार्य कौमार्याकडून पुजले जात होते. या भावनेचे पावित्र्य कोणत्याच क्षुद्र विचाराने किंवा हालचालीने डागळले नव्हते. प्रेम हे वासनामुक्त असावे, दोन जीवांचा तो विशुद्ध संगम असावा, एकाच आत्म्याचे ते दोन पंख असावेत, प्रेमाचा स्वार्थ, हेतू, पूर्णता प्रेमातच असावी असे जर कुणाला वाटत असेल तर अशा विशुद्ध प्रेमाचा नमुना म्हणून आम्ही तॉमासकडे बोट दाखवू.

अनुक्रमणिका

कंजूष ज्याप्रमाणे आपले धन लपवून ठेवतो, त्याप्रमाणे तॉमासने आपले प्रेम गुप्त का ठेवावे? भाऊ हे संबोधन अपुरे आहे. euamo (मी प्रेम करते) या उद्गाराची गरज आहे. या उद्गारात खरी भावना खरी तळमळ, त्या भावनेचे पूर्वत्व साठलेले आहे आणि या भावनेसमोर निरागस बाल्याची मूर्ती विरून जाते. हे सारे जर त्याला कळत होते तर त्याने आपली प्रेमभावना गुप्त का ठेवावी? या शंकेचे समाधान असे की, हा दुर्दैवी तरुण कृतज्ञतेचा गुलाम होता.

तॉमासच्या शिक्षणाचे श्रेय रॉबेर्तला होते. त्याच्या मुलीचे कोडकौतुक करून तिला प्रसंगी मदत करून तॉमासने आपले कर्तव्य पार पाडले होते, या गोष्टीची त्याला जाणीव होती. पण एक शंका त्याला जाचीत होती. आपण तिच्यावर प्रेम केले तर न जाणो लोकदृष्टीने आपण कृतघ्न ठरू आणि एक दिवस आपल्या उपकारकर्त्यांची आपल्यावर अवकृपा होईल! या कृतज्ञतेच्या भावनेमुळे त्याचे उदार हृदय कुढत होते, दबत होते, गुदमरत होते आणि म्हणून, आपल्या प्रणयभावनेची हालचाल दिसू लागताच तो ती निपटून टाकू पहात होता. आपल्या हृदयात भक्तीभावाने साठवून ठेवलेल्या बालपणीच्या गोड आठवणी तो हाकलून लावी. जुन्या सुखद विचारांना सांगे की, आपल्याला छळू नका. आपल्या प्रेमाला सांगे की कृपा करून आपल्याला विसर. कारण ज्या मनाला असले विचार व भावना भुलावणी घालतात ते मन आपल्या काबूत राहात नाही. अशा अतिरेकी विवेकामुळे तॉमासने कृतज्ञतेचे दास्य पत्करले होते.

जो समाज ख्रिस्ती धर्माच्या आदेशानुसार चालत आहे असे तो समजत होता, तो आता त्याला स्वार्थी व ढोंगी वाटू लागला. अहंकाराने तो उन्मत्त झाला आहे. आत्मप्रौढीने बहिरा झाला आहे, कठोर झाला आहे. त्याला पापी माणसाचे शाप ऐकू येत नाहीत त्याचप्रमाणे निर्मळ जीवांचे आक्रोश त्याच्या कानापर्यंत जात नाहीत अशा समाजाला योग्य दिशा कशी मिळणार? तो दयाळू व समंजस कधी होणार?

तॉमास जेव्हा स्वतःलाच असे प्रश्न करी आणि त्यांचे समाधान त्याला करता येत नसे, तेव्हा त्याचे हृदय गारठून जाई. किती विलक्षण समाज हा! जरा अधिक दयाळू हो. मी अन् माझी देवता यांच्यामध्ये तू लुडबुडू नकोस. तू बलाढ्य आहेस, मी दुबळा आहे. दुष्टांना तू सोडणार नसशील तर माझ्या नशिबी सुखाचा लेश नाही एवढे निश्चित. माझ्या हेलेनाची आणि माझी कायमची ताटातूट!

याप्रमाणे स्वतःशीच बोलता बोलता भावनावेगाने तो कापू लागे, भीतीने पांढराफटक होई. हजारो शंकानी विकल होई. त्याच्या नाका–तोंडातून सुस्कारे बाहेर पडत. अशावेळी अवचित त्याच्या सर्वांगाचा भडका उडवणारी एक ठिणगी त्याच्या डोळ्यातून बाहेर पडे. तेव्हा हेलेनाचे डोळे चट्कन खाली वळत. मग वर उचलले जात आणि पवित्र नजरेने ती जणू त्याला उत्तर देई. तिच्या तोंडातून 'भाऊ' असा गोड शब्द निघे. तो कानावर पडताच तॉमासच्या जळणाऱ्या हृदयावर बर्फाचा खडा टाकल्यासारखे होई. मग तो आपले मोकाट सुटलेले भीरू प्रेम आवरून घेई आणि स्नेहाच्या लक्ष्मणरेषेच्या आत त्याला कोंडून ठेवी.

आपल्याला तॉमासबद्दल निर्मळ बंधुप्रेम वाटते की, ते खरेखुरे प्रेम आहे हे हेलेनला अजून कळले नव्हते, कदाचित दोन्ही भावना असू शकतील. कदाचित एका भावनेची वरचढ असेल. स्नेहातून निघालेले प्रेम लगेच आपले स्वरूप दाखवीत नाही. ते संधिप्रकाशासारखे असते. संधिप्रकाशात रात्रीचा अंधार व उषेची पहिली प्रभा यांचा संगम होतो. जे प्रेम आपल्या आवेगाने आक्रमण करीत नसते, आपले विक्रम सुरूवातीलाच दाखवीत नसते, ते प्रेम आपल्या शांत गतीने स्नेहसदृश वाटते. ते विजेप्रमाणे झेप घेत नाही. वणव्याप्रमाणे हळूहळू पसरत जाते.

अनुक्रमणिका

आज दहा वर्षापासून तॉमास व हेलेन एकमेकांवर मुग्ध प्रेम करीत आली होती. पण कधीच त्या भावनेसंबंधी एक शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडला नव्हता. त्यांचे निःश्वास सायंकाळच्या वाऱ्याशी मिसळत. त्यांचे कटाक्ष नक्षत्राशी गुजगोष्टी करीत. त्यांच्या चुंबनांचा वर्षाव फुलांवरच होई. निसर्ग हाच त्यांचा निकटचा दोस्त होता. तोच त्यांची गुपीते साठवून ठेवी. काळाने या प्रेमिकात नवे गुण पाहिले आणि त्याने एकमेकांचे कौतुक, आदर करण्याची कामगिरी त्यांच्यावरच लादली.

तॉमास घटकेत बागेतील वाटावरून झपाझप चालत जाई घटकेत खोलीच्या खिडक्यांबाहेर, असलेल्या बाकावर बसून पानाच्या गर्दीआड बसलेल्या रूपसुंदर हेलेनाकडे पाही. हातांच्या कोपरांवर भार टाकून, चेहरा हातावर रेलून ती रॉबेर्तशी गप्पा–गोष्टी करी. त्या वेळी तॉमास आपल्या प्रेयसीवर डोळे स्थिर करून तिच्यातून दरवळणारा सुगंध जणू शोषून घेई. आणि स्वतःशीच पुटपुटू लागे.

“चारचौघात मी तुला बहीण म्हणून संबोधू नये असा या लोकांचा आग्रह. त्यांन शरम वाटत असेल कदाचित. चर्चमध्ये देवासमोर एक दिवस मी तिला पत्नी म्हटलेलं त्यांना कसं रुचेल? अशक्य आहे हे.”

अशा दुर्धर विचारात बुडून तो मान खाली घाली. त्याची छाती धडधडू लागे. त्याला गुदमरल्यासारखे होई. पण तोंडातून एकदेखील हुंदका बाहेर पडत नसे.

किती गाढ प्रेम करीत होता तो तिच्यावर!

आणि ती कशी घाबरी घुबरी होई!

३

Festina lente ["सावधगिरी बाळगावी."]

तॉमास आपल्या विचारात मग्न होता तेव्हा रिर्कार्द ॲमिलीसमवेत बागेत उतरत होता. त्यांच्या मागोमाग एक नोकर, शिवणकामाची पेटी घेऊन चालत होता. थोड्या अंतरावर माग्नोदची मुलगी थांबली व सोबत्याला म्हणाली, "हेलेन कशी नाही आली?"

"येईल इतक्यात." रिकार्द म्हणाला. इतके बोलून ती दोघे तळ्याच्या दिशेने चालू लागली.

थोड्याच वेळात एका डेरेदार झाडाच्या सावलीत एका लाकडी बाकावर ती बसली.

या आसमंताचा एकांत, फुलांचा सुगंध, तळ्याचा आल्हादकारी गारवा, पाण्याच्या पृष्ठभागावर चिखलाने तयार केलेल्या सुंदर आकृती, सभोवतालचे केळीचे बन. असा हा परिसर प्रणयाराधनेला अनुकूल असाच होता.

एक भला मोठा अजगर तळ्यानजीक मरून पडला होता. त्याच्याकडे रिकार्दने ॲमिलीचे लक्ष वेधले. नंतर त्यांच्यामध्ये संभाषण सुरू झाले. ते वेगवेगळ्या विषयांना स्पर्श करीत जाऊ लागले.

ॲमिली हिंदी होती. शिक्षणामुळे तिच्या काही गुणांचा विकास झाला होता. पण तिच्या अहंकारी वृत्तीत बदल झाला नव्हता. ती मातापितरांना वंचित झाली होती. चांगल्या शिक्षकाच्या हाताखाली, बुद्धीवर संस्कार झाले होते. पण मनावर झाले नव्हते. दैव तिच्यावर उलटले होते. या गोष्टीमुळे तो आपल्याच भवितव्याचा नेहमी विचार करीत होती. ॲंग्लो इंडियन समाजामध्ये माजलेल्या कलहाने व काळजीने तो समाज खिळखिळा झाला होता. स्त्रीजातीला सर्वसाधारण असलेल्या चाणाक्षपणात ॲमिली स्वतःला श्रेष्ठ समजत होती. आणि स्वतःच्याच बळावर आपले हृदय काबूत ठेवू पहात होती. तिला माहीत होते की, काही मोह स्त्रीला इहलोकात स्वर्ग देतात. तर काही मृत्यूच्या खड्ड्यात लोटतात.

रिकार्द शृंगारशास्त्रात मोठा पारंगत होता. स्त्रियांशी प्रेमाचे खेळ खेळणे ही त्याची करमणूक होती, स्त्रीस्वभावाचे त्याला अचूक ज्ञान होते. आणि कोणत्या शस्त्रांचा स्त्रियांवर परिणाम होईल व आपला हेतू कसा साध्य होईल हे त्याला उपजत कळत होते. त्याच्या पुरुषत्वाच्या इतिहासात विजयाच्या मानाने अपजय कमी होते. प्रेम ही त्याच्या दृष्टीने एक कला होती. आणि त्याची साथी स्त्री रडून हसून आपल्या प्रतिष्ठेचा बळी देऊन, त्याच्या विजयाला हातभार लावीत होती.

आपल्या तारुण्याच्या पहिल्या पर्वात त्याने नवऱ्यांपासून त्यांच्या बायका आणि बापांपासून त्यांच्या मुली हिरावून घेण्याचा खटाटोप केला होता. आपल्या साहसात जयाचा आनंद हाच त्याला महत्त्वाचा होता. त्याचा धिःकार करणाऱ्या बाईच्यामागे तो प्रेमवेड्याप्रमाणे लागत असे. पण ती एकदा हस्तगत झाली म्हणजे लवकरच त्याला तिचा कंटाळा येई. त्याची तुलना अशा पारध्याशी करता येईल की, जो झुंज, सायास, संकटे यांच्यामागे असलेल्या धुंदीसाठी शिकार करतो. आणि ती मिळाली म्हणजे तेथेच टाकून पुढे

जातो. त्याचे मतलबी व चतुर भाषण बायकांच्या हृदयांचा लगेच ठाव घेत होते. त्याच्या कटाक्षाने त्या घायाळ होत होत्या. त्याच्या देहसौंदर्यावर त्यांचे डोळे लुब्ध व्हायचे आणि त्यांच्या सद्गुणांची तो जी प्रशंसा करी ती त्यांच्या मनात विश्वास निर्माण करायची. अशा या ससाण्याची नजर एका पारवीकडे वळली. तो तिचा पाठलाग करू लागला. ॲमिली आता दोन अजगरांच्यामध्ये होती. रिकार्द व ॲमिली काही वेळ स्तब्ध होती.

"किती सुंदर आहे हा तलाव!" ॲमिली उद्गारली. स्तब्धतेचा तिला कंटाळा आला होता.

"आजच्या इतका हा तलाव मला कधीच सुंदर दिसला नाही." रिकार्दने नजर वर न करता म्हटले.

ॲमिलीच्या डोळ्यांपुढून एक ढग निघून गेला. ती भीती होती. रिकार्दच्या लक्षात ही गोष्ट आल्याशिवाय राहिली नाही.

"आपल्या मनाच्या समाधानाचं प्रतिबिंब आपल्या भोंवतालच्या वस्तूत पडत असतं. आणि त्यामुळेच त्या विशेष सुंदर दिसू लागतात. आज मी किती आनंदी आहे याची तुला कल्पना नाही." रिकार्द म्हणाला.

ॲमिली दचकल्यासारखी झाली.

"मी समजले नाही." तिने गोंधळून म्हटले.

"तू म्हणतेस ते खरं आहे. कारण माझ्या मनात काय चाललं ते तूं ताडलं नाहीस."

"चला, आपण परतू या. हेलेन काही येत नाही."

"मी निरोप पाठवतो तिला." एवढे बोलून रिकार्दने हिंदुस्थानी भाषेत एका नोकराला बोलावून त्याला निरोप सांगितला. हेलेनाच्या नावाचा उल्लेख ॲमिलीला ऐकू आला व तिचे मन शांत झाले.

"माझे गुपीत तुला ठाऊक नाही, ॲमिली." तो गहिवरून म्हणाला.

बोलता बोलता त्याने तिच्या पायावर लोळण घेतली.

"माझं तुझ्यावर प्रेम आहे. हे सांगण्याची संधी मी पहात होतो. होय, पहिल्या प्रेमाचं पावित्र्य व जोष माझ्या प्रेमात आहे. आता कुणी ऐकत नाही, पहात नाही. अशा वेळी माझं रहस्य मला जाळीत आहे हे तुला सांगितल्याशिवाय मला चैन पडणार नव्हतं. माझ्या प्रामाणिक भावनेचा तिरसकार करू नकोस. माझा हेतू एवढाच की, तुझं कल्याण व्हावं."

"साहेब, माझ्यावर दया करा." ॲमिली उठता उठता म्हणाली. ती बरीच अस्वस्थ दिसत होती.

"तू अनाथ आहेस. ज्या लोकांना आम्ही जिंकलं अशापैकी तू एक आहेस. हे मला माहीत आहे. पण त्या गोष्टीची मला पर्वा नाही. आम्हा दोघांमध्ये एक दरी उत्पन्न झाली असती तरी ती भरून काढायला माझं

अनुक्रमणिका

प्रेम समर्थ आहे. म्हणून तुझ्यापाशी माझं हेच मागणं की, तू माझी हो. माझ्या आयुष्याची सहचरी हो. माझ्या जीविताचा प्रकाश हो."

ॲमिलीच्या हृदयात काय चालले होते ते सांगणे अशक्य आहे.

ॲमिली, तुझी निर्विकारवृत्ती पाहून मला फार वाईट वाटत आहे." इतके बोलून रिकार्दने तिच्या गळ्याभोवती आपल्या हातांचा विळखा घातला, तशी ॲमिलीने किंकाळी फोडली व त्याच्या बाहूत ती बेशुद्ध होऊन पडली.

तॉमास तत्काळ तलावाकडे धावत आला.

रिकार्दने एका हाताने ॲमिलीचा देह पकडीत दुसऱ्या हाताने समोरचा अजगर दाखविला.

तॉमासला वाटले अजगराच्या भितीमुळे ॲमिली बेशुद्ध झाली असेल.

ॲमिली शुद्धीवर आली तेव्हा रिकार्दच्या उद्धट वागणुकीची आठवण होऊन ती संतप्त झाली.

अनुक्रमणिका

४

कानपुरातील समारंभ

कानपूरच्या लष्करच्या सेनापतीने आपल्या मुलीच्या वाढदिवसाच्या निमित्ताने एक जलसा करायचे ठरविले होते. रॉबेर्त व रिकार्द यांना निमंत्रणे आली होती. त्यामुळे ते दोघेही प्रवासाच्या पूर्वतयारीत गुंतले होते.

इंग्रज माणूस एका नबाबाप्रमाणे हिंदुस्थानात प्रवास करीत असतो. वीस–तीस नोकर, दहा पंधरा सामानाच्या पेट्या, दोन मैदानी राहुट्या, चार घोडे, आठ कुत्रे, वीस उंट, स्नान करण्याचे टब, सोडावॉटर व बिअरच्या बाटल्यांनी भरलेल्या टोपल्या, एवढा सरंजाम सैन्यातील छोट्या अधिकाऱ्यालादेखील आवश्यक वाटतो. शेवटच्या युद्धांत सैन्याच्या शीघ्र हालचालींना अडथळा करणारे काही असेल तर हा अवाढव्य संरजाम. युरोपियन पलटणीच्यामागे एक भलेमोठे लमाण असायचेच. अतिशयोक्तीचा दोष न पत्करता, असे म्हणता येईल की, त्या दिवशी रॉबेर्त, त्याची मुलगी, चुलतभाऊ, दोन हिंदी मुले यांच्यासमवेत फिझाबादहून निघाला तेव्हा हे जुनाट शहर ओस पडल्यासारखे झाले. त्यांचा दरबार एवढा मोठा होता.

ही यात्रा हेलेन, तॉमास व ॲमिली यांना फारच मजेची गेली. युरोपियन लोकांच्या नजरेला इकडचा निसर्ग आगळ्या स्वरूपात दिसू लागतो. भाताची विस्तीर्ण शेते अशा रीतीने पसरलेली असतात की, एक लहरते हिरवे वस्त्रच पसरल्यासारखे दिसते. त्यांच्या सीमारेषेवर उभी असलेली वनराजी त्यांच्या मुकुटाप्रमाणे शोभते. त्या गर्द झाडीत कपाशीची शुभ्र बोंडे आपल्या वेगळ्या रंगाने उठून दिसतात. सफेद व शिडशिडीत पोफळी भव्य प्रासाद उभे करतात आणि आपल्या हलत्या झावळ्यांनी प्रकाशाचे स्वागत करतात. वातावरणात हरएक रंगांच्या पक्ष्यांचे थवे उडत असतात आणि प्रकाशकिरणात ही अद्‌भुतरम्य सृष्टी न्हाऊन निघते.

संध्याकाळी चार वाजता आमचे प्रवासी कानपूरला पोहोचले आणि आगाऊच ठरवून टाकलेल्या बंगल्याकडे रवाना झाले. तिकडच्या नबाबाने त्यांना रात्रौ नऊ वाजता आपल्याकडे बोलविले होते. त्याच्याकडे कलावंतीणींचा नाच होता.

जी बाई आपल्या सौदर्याची व नीतीची विक्री करते व आपले माधुर्य व गोडवा यांना तिलांजली देते तिला युरोपात वेश्या म्हणतात. काल जी बाई कुमारी व पतिव्रता असते ती आज दासी बनते; कुंटीण होते. अंधार, व्यसने, सैतान यांच्या तावडीत सापडते. ही दुर्दैवी बाई आपली लाजलज्जा, मन इत्यादी सारे गमावून बसते. तिच्या भोवतालचे सौंदर्यवलय हा हा म्हणता घुराप्रमाणे नष्ट होते. तिचा विनय हा तिच्या पेशाची पताका बनतो. तिच्यापाशी असते ते तिचे शरीर. आणि ते देखील कुष्ठरोगासारख्या रोगांनी निरुपयोगी ठरेपर्यंत. नंतर ते एखाद्या हॉस्पिटलच्या दयेच्या स्वाधीन होते. शरीर व मन ही दोन्ही कुजली म्हणजे तिच्या दुर्दैवाला पारावर नसतो. मग तिला एकच आशा शिल्लक राहाते. कारण ती अमर असते. ही आशा म्हणजे परमेश्वर.

ज्या स्त्रीला कधीच प्रतिष्ठेची जाणीव नसते, स्वाभिमानाची जिला कल्पना नसते, कौमार्याची जिला कदर नसते, जिला कधीच विनयाने स्पर्श केलेला नसतो, अशा बाईला हिंदुस्थानात कलावंतीण म्हणतात. ती आपल्या जन्मसिद्ध हक्काने वेश्या बनते. तिने काहीच गमावलेले नसते. कारण इतराकडून तिला काहीच मिळालेले नसते. ती कधीच पतित नसते. कारण समाजाच्या दृष्टीने ती कधीच पवित्र नसते. मातेचा वारसा म्हणून वेश्येचे जीवन तिने स्वीकारलेले असते. या व्यवसायावर ती कलेचा साज चढविते. आणि ही कला तिचा धंदा बनतो. कलावंतीण सार्वजनिक चौकात नाच करते. देवळात गाणे म्हणते. आणि घरात धंदा चालवते. आपल्या सुनांच्या शीलावर डोळ्यात तेल घालून देखरेख ठेवते. एरवी ती त्यांचा तिरस्कार करते आणि आपल्या प्रिय मुलींना ओगळ धंद्यात लोटते. किती हृदयद्रावक विरोध हा!

ह्या दुर्दैवी स्त्रियात काही अशा असतात, ज्यांनी कौमार्यावस्था कधीच पाहिलेली नसते. ज्यांना वेश्याव्यवसायाचे शिक्षण बालपणापासून मिळालेले असते. पण अशा स्त्रियातदेखील काही अशा सापडतात की, त्यांना आपल्या दुःस्थितीचा वीट आलेला असतो. आपल्या निष्ठाशून्य चंचल, दुष्ट व विषयांध नवऱ्याचा त्या तिरस्कार करतात. हा नवरा म्हणजे समाज. त्याच्या भयानक नियतीनेच त्यांच्यावर तो लादलेला असतो. तो त्यांना दोन गोष्टी देतो. पैसा व उपेक्षा. जो ब्राह्मण कलावंतीणीला तिच्या शय्यागारात एवढी चहातो त्याला ती रस्त्यात दिसली तर तिच्याशी दोन शब्द बोलायला तो तयार नसतो. ती बिचारी आपली मान खाली घालते, आपली कास सोडते आणि लाचार होऊन ढोंगी ब्राह्मणाच्या सावलीसमोर आपल्या जिवाची कुरवंडी करते.

समाजाची बंधने तोडून एकाच पुरुषाला निष्ठा देणे ही कलावंतीणीची आकांक्षा असते. त्यातच तिच्या जीवनाची कृतार्थता आहे. जिला कधीच प्रेम लाभले नाही, तिला त्याचा लाभ होणे या सारखे दुसरे कोणते भाग्य आहे? जी सगळ्यांचीच दासी बनली होती, तिला एकाचीच दासी होण्यासारखे दुसरे काय अभिमानास्पद आहे? आजवर कोमेजून गेलेले हृदय मग आश्चर्यकारक रीतीने उमलू लागते. आणि शांती व आनंद यांनी ते शिगोशिग भरून जाते.

जमीनदाराचा बंगला बैठा होता. मध्यभागी एक विस्तीर्ण चौक होता. त्याच्या चोहोबाजूंना ओसऱ्या होत्या. त्याच्यावर सोफा व खुर्च्यांच्या दोन दोन रांगा इंग्रजसाहेबाकरिता राखून ठेवल्या होत्या. हिंदी पाहुणे फरशीवरच्या बैठकीवर बसले होते. चौघी कलावंतीणी अंगणात नाच करीत होत्या आणि गळ्यातून स्वरमाला फेकीत होत्या. छताला टांगलेल्या दिव्यांतून प्रकाशझोत ओसंडत होते. नृत्यांगनाच्या अंगावर उंची रेशमी घागरे होते आणि अंगात जरतारीची तंग पोलकी होती. त्यांनी त्यांच्या वक्षस्थळांना उठाव आला होता. पायांत रुपेरी पैंजण होते. त्यांना घुंगूर बांधले होते. हातात सोन्याचे बिलवर चमकत होते. गळ्यात मोत्याचे हार होते. त्यांना सोन्याची नाणी लटकत होती. नाकात हिऱ्याची नथ होती. गायनाच्या साथीला सारंगी, तबला व दुसरी काही वाद्ये होती. या नृत्यांगना वाद्याच्या साथीत गाणी म्हणत म्हणत, ओळीने पुढे येत होत्या, मागे जात होत्या. आणि हा नाच चालला असताना त्या नाजूक व अर्थपूर्ण हावभाव करीत होत्या.

रॉबेर्त आपल्या मंडळीसह तेथे पोहोचला, तेव्हा तेथे रात्रीचे दहा वाजले होते. सगळ्यांच्या नजरा तॉमास व ॲमिलीकडे वळल्या. हिंदी प्रेक्षक त्यांच्याकडे तिरस्काराने व इंग्रजी प्रेक्षक अचंब्याने पाहू लागले.

अनुक्रमणिका

बऱ्याच वेळानंतर नाच संपला तशी कलावंतीणी तबके हातात घेऊन पुढे आल्या. तबकात विडे होते, ते निमंत्रितासाठी होते. सुपारी, लवंग, वेलची घालून पानवेलीच्या पानात विशिष्ट पद्धतीने ते बनवले होते. इंग्रज पाहुण्यांनी या भेटीच्या मोबदल्यात बरेच रुपये तबकात टाकले. ब्राह्मणांना विडे देण्याचे धैर्य त्यांना झाले नाही. नाचानंतर वाघाची लढत झाली. एका विजयरथात बसून नबाबाचा, तेराचौदा वर्षांचा मुलगा रिंगणात शिरला. तो रथ फुलांनी शृंगारला होता. दोन उमदे घोडे तो ओढीत होते. त्याच्या चारी कोपऱ्यात मोठमोठ्या मेणबत्या जळत होत्या. त्यांचा धूर वातावरणात दाटत होता.

नबाबाच्या मुलाने एक लांब शुभ्र कोट घातला होता. त्याच्या गळ्यात पाचूचा मौल्यवान हार होता. त्याच्या हातात एक सोनेरी मुठीची तलवार होती. त्याने प्रवेश करताच त्याचे स्वागत करण्यासाठी हिंदी पाहुणे चटकन उठून उभे राहिले. इंग्रज किंचित वाकले. त्याच्याशी संभाषण करण्याचा मान फक्त सेनापतीलाच मिळाला.

थोड्या वेळानंतर तेथे दोन मोठे पिंजरे आणण्यात आले. त्यात दोन अजस्त्र वाघ होते. शिपायांनी ते पिंजरे डाव्या व उजव्या बाजूला परस्परापासून वीस हात अंतरावर ठेवले. मग नबाबजादा रथातून उतरला व एका देखण्या अरब घोडीवर बसला. मग त्याने एक वर्तुळाकार फेरी मारली. मध्यभागी नबाबजादा. काही नोकर व दोन पिंजरे याशिवाय दुसरे माणूस दिसत नव्हते.

लढत सुरू व्हायची वेळ झाली. लव्याजम्याची माणसे आपल्या धन्याचा जयजयकार करण्यासाठी जवळच एका बाजूला अदबीने बसली होती. त्याच्यामध्ये गडबड सुरू झाली तशी लोकांची उत्कंठा वाढली. एका उपाध्यायाच्या इशाऱ्या बरोबर शिपायाने प्रथम एका पिंजऱ्याचे दार उघडले व नंतर दुसऱ्या पिंजऱ्याचे. त्यातून दोन वाघ बाहेर पडले. व त्यांनी एकमेकावर चाल केली. समुदाय स्तब्ध झाला. चेहरे पांढरे फटफटीत झाले. तोंडे बंद झाली. नबाबजाद्याने घोड्याला टाच मारली, तशी तो श्वापदांपाशी येऊन ठेवला. शाकुंतल नाटकातील नायकापेक्षाही शांत व निर्भय असा मग तो मोठ्या कौशल्याने व निर्धाराने वार करू लागला. तरवारीचे पाते मेणबत्यांच्या मंद उजेडात तळपू लागले. वाघांची मुंडकी भुईवर आदळली. नबाबजाद्याचा पोषाख त्यांच्या रक्ताने लाल झाला. लोकांच्या तोंडून जयजयकार झाला. उपाध्यायाने नबाबजाद्याच्या मस्तकावर पुष्पमुकुट ठेवला.

काही क्षण गेले. वाघाची धूडे हालचाल करू लागली आणि थोड्याच वेळात त्यातून आठदहा वर्षांची दोन मुले बाहेर पडली! या अनपेक्षित घटनेमुळे सगळेच आश्चर्यमूढ झाले. तरीदेखील प्रेक्षकांचा उत्साह कमी झाला नाही.

व्हरांड्याच्या एका बाजूला, एका स्वतंत्र दालनात नबाबाची बहीण बसली होती. ती अप्रतिम लावण्यवती होती. त्या दिवशी ती कोणालाच दिसली नाही. तिचे दालन एका हिरव्या पडद्याने आच्छादले होते. तो पडदा एकदाही वर उचलला गेला नाही. सेनापती तिला अभिवादन करण्यासाठी गेला तेव्हादेखील ती त्याला दिसली नाही.

नबाबच्या वाड्यातून निमंत्रित मंडळी एका देवळात गेली. देऊळ लहानच होते, व प्रेक्षणीय तर मुळीच नव्हते. एका अजस्त्र वटवृक्षाने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. त्या वृक्षाच्या डहाळ्यांना आकाशदिवे टांगले होते व पुष्पमाला लोंबत होत्या.

अनुक्रमणिका

आता तुम्ही एक अफाट वृक्ष कल्पनाचक्षूंसमोर उभा करा. त्या वृक्षाची पाने लांब–रुंद असतात. असंख्य डहाळ्या चौफेर पसरलेल्या असतात. अशी एक आख्यायिका आहे की, अशा एका वृक्षाच्या सावलीत, त्याच्या विस्तीर्ण छपराखाली सैन्याच्या एका तुकडीने आसरा घेतला होता. या जुनाट वृक्षाच्या फांद्यातून जाड मुळे निघतात. कमानंदार दरवाजे निघतात, कधी कधी त्या आवारात खोल्या व मजले तयार करतात, हरएक प्रकारचे पक्षी तेथील खोलगट भागात वस्ती करतात. कावळे, कोकीळा, कवडे, पारवे इत्यादी पक्षी आपापल्या स्वरांनी एक विलक्षण वाद्यवृंद बनवितात. आणि आपापल्या वाद्यांच्या सहाय्याने आपापली कामगिरी बजावीत पहाटेच्या वेळी उषास्तोत्र म्हणतात. ख्रिश्चन, फकीर व योगी या घुमटाखाली विसावा घेतात. आणि वेगवेगळ्या भाषातून आपापल्या प्रार्थना करतात. त्यांचे पडसाद स्वर्गापर्यंत जातात. अशी कल्पना करा की, ही इमारत दरवर्षी मानवजातीप्रमाणे सारखी वाढत आहे. तिच्यात एक मंदिर असे आहे की, जेथे ख्रिस्ती मंदिराचे प्रमाणबद्ध सौंदर्य आहे अन् देवालयाची भव्यता आहे. ऊन आणि चांदणे तेथे आळीपाळीने वावरत आहेत. तेथे सगळ्यांना मुक्तद्वार आहे. कुणालाच तेथे बंदी नाही. असा हा वटवृक्ष सगळ्या जिवंत प्राण्यांचा निवारा, सर्व धर्मांचे मंदिर, सर्व यात्रेकरूंची धर्मशाळा, ‘नोआ’ची होडी, परमेश्वराने सर्व दुःखितासाठी बनविलेला आहे.

नाच संपला. आता दुसऱ्या दिवशीच्या सेनापतीच्या बॉल डॉन्सकडे वळू.

अनुक्रमणिका

५

बॉल

सेनापतीच्या बंगल्यावर आज खूप गर्दी लोटली हाती. लष्करी बडे अधिकारी, त्यांचे परिवार, न्यायाधीश, नाविक अंमलदार असे निरनिराळे लोक होते. दरवाजाबाहेर लष्करी बँड वाजत होते व आतल्या आवारात एक ऑर्केष्ट्रा गोड चिजानी रसिकांचे मनोरंजन करीत होता. बॉलचे दालन लंबचौकोनी होते. खांबाच्या दोन रांगानी त्याचे तीन विभाग पाडले होते. छताला तीसांहून अधिक दिवे टांगले होते. त्यांचे प्रकाशझोत स्त्रीपुरुषांच्या हेलावणाऱ्या बैठकीवर पडत होते. युरोपियन लोक उंची खुर्च्यांवर बसले होते आणि त्यांच्या हातातील सुंदर चिनी पंखे हळूवार कौशल्याने हलत होते. या निमंत्रित मंडळीत काही नबाब उठून दिसत होते. आपल्या जरतारीच्या पोषाखाने ते मयूरपक्षांप्रमाणे शोभत होते. त्यांचे हिरवे सोनेरी पंख पारव्याच्या शुभ्रतेच्या विरोधाने प्रेक्षकाचे लक्ष वेधून घेत होते.

बॉलला सुरुवात झाली. तशी रॉबेर्त आपल्या मंडळीसह दाखल झाला. दोन मुली पहिल्या मजल्यावर मांडलेल्या बैठकीवर जाऊन बसल्या. त्यांचा वेष साधा पण चित्तवेधक होता. 'गॉझ' वस्त्राचे तलम कपडे त्या पेहेरल्या होत्या. ॲमिलीच्या प्रसाधनाची जादू आगळी होती. नेहमीच ती नीटनेटकी दिसे. लवचिक अंगकाठी, चालताना सहजसुंदरपणे लहरत जाई. गोंडस अवयव लावण्याला उठाव देतात. तिची कातडी किंचित गोरी असती तर 'आंदालुझियन' स्त्रियांसारखी ती दिसली असती. हेलेनच्या डोळ्यात कमी उल्हास होता, ढबीत अधिक गांभीर्य होते. कातडी नाजुक व पारदर्शी, गाल गोजिरवाणे, डोळे व केस पिंगट. या बाबतीत अमिली वेगळी होती. तिचे केस काळसर होते. डोळही तसेच. वर्ण श्यामल.

काही वेळानंतर ऑर्केस्ट्रावर एक गत वाजू लागली. मध्यभागी गोळा झालेले पुरुष फुलपाखराप्रमाणे तत्काळ बागेत विखुरले. स्त्रियांच्या रांगेत उत्कंठा थरथरली. प्रत्यकीला आपल्या निवडीचा जोडीदार हवा होता. सेनापतीने आपला हात देऊन हेलेनला नृत्याच्या जागी नेऊन बसविले. दुसऱ्या जोड्या भराभर तयार होऊ लागल्या.

दालनाच्या पलिकडच्या टोकाला एक तरुणी बसली होती. आणि दारापाशी एक पुरुष उभा होता. त्यांना साथी मिळाले नव्हते. ते तॉमास व ॲमिली होते. त्यांनी परस्परांकडे पाहिले आणि माना हलविल्या.

रिकार्द एका पडद्यामागे उभा होता. त्याने हा प्रकार पाहिला व या संधीचा फायदा घेण्याचे ठरविले. आपली साथी हुडकण्यासाठी जणू त्याने दालनातून एक फेरी मारली. तो जवळ पोहोचताच ॲमिली आपल्या डोळ्यांनी बोलली "मला हात द्या."

रिकार्दने वाकून आपला हात पुढे केला. मग ॲमिली अतिशय सफाईने, एक प्रकारच्या तंद्रीत असल्याप्रमाणे त्याच्या बाहूंवर रेलली. रिकार्दला तिच्या मुद्रेवर आनंद व कृतज्ञता हे दोन्ही भाव पसरलेले दिसले. स्त्रियांचे दैव कोणत्या गोष्टीवर अवलंबून असते ते सांगता येत नाही!

अनुक्रमणिका

नृत्य चालू असताना रिकार्द आपल्या प्रेमभावासंबंधाने बोलू लागला. अशा नाजूक व गंभीर विषयावरील संभाषणात ॲमिलीने जो संयम व चातुर्य दाखविले, त्याचे मनातल्या मनात त्याने कौतुक केले.

“मोठी चतुर मुलगी आहे ही—तो स्वतःशीच म्हणाला.—” पण काही झालं तरी ही स्त्री आहे. एवढं पुरे.”

ऑर्केस्ट्राची पहिली गत संपली, तेव्हा रिकार्द तिला जवळच्या खोलीत घेऊन गेला. तेथे पेयाची व्यवस्था केली होती. बराच वेळपर्यंत तो दोघे निर्भर बोलत राहिली.

एवढ्याच ऑर्केस्ट्रावर दुसरी चीज सुरू झाली. त्याबरोबर दोघेही त्या गर्दीत घुसली आणि त्या धुंद फेरीत सरकू लागली. अवचित बाकीच्या जोड्या थांबल्या. जणू विद्युतप्रवाह त्यांच्या अंगातून जात आहे. आता असे वाटू लागले की, फक्त एकच जोडी तेवढी नाचत आहे ती म्हणजे रिकार्द ॲमिलीची.

माग्नोदची मुलगी अत्यंत कौशल्याने नाचत होती. सगळ्यांचे डोळे तिच्या उडत जाणाऱ्या हलक्या फुलक्या कायेवर स्थिर झाले. त्यांचे श्वासोच्छ्वास जणू थांबले.

नृत्य वलयाच्या सुरुवातीला लिलीच्या फुलापेक्षाही लवचिक अशा आपल्या देहाला ती अशी डौलदार आवर्तने देत होती आणि अशा धुंद बेफिकीरीने पुढे सरकत होती की, कुणालाही वाटावे, एखाद्या जलप्रवाहात एक हंसीच डौलाने तरंगत तरंगत पुढे पुढे जात आहे. अधून मधून ती काही क्षण ‘गॉझ’ वस्त्रांच्या लाटात अदृश्य होई. तिचे गोंडस मस्तक तेवढे तरंगत राही. आणि गंगेच्या पाण्यातून भव्य उषा निघावी तसे तिचे मस्तक दिमाखाने शोभे. तिचे तरल व तरतरीत पाऊल म्हणजे पोलादी कळ होती. असे वाटत होते की, ते जमिनीवर पडतच नाही. ती नाचत नव्हती. उडत होती. देहातीत चैतन्यासारखी.

नृत्य संपले. टाळ्यांचा गजर झाला. ॲमिलचे हृदय धडधडू लागले. तिच्या शरीरातून एक चमक धावली. तिची धगधगणारी नजर रिकार्दच्या अभिलाषी नजरेला भिडू लागली. आणि त्यांचे हात पुनः पुन्हा गुंफू लागले.

ॲमिलीला विसर पडला होता. ॲमिलीने क्षमा केली होती. ॲमिली प्रेम करू पहात होती. ‘वाल्स’ हा नाच भोवळ आणतो.

काहीवेळापूर्वी उपेक्षित; अवमानित राहिलेली अमिली आता बॉलची राणी बनली होती. आणि याचे श्रेय अर्थातच रिकार्दला होते.

जी माणसे आपल्याला आनंदाचे क्षण देतात, त्यांचे अकल्याण आपण इच्छित नाही. बॉलचे धुंद वातावरण आणि ऑमिलीला मिळालेले यश यांनी ती बेहोष झाली होती.

उलट, अमर्याद आनंद वेडाला स्पर्श करतो. पुष्कळवेळा पहाडाच्या कडा पानाफुलांनी झाकाळलेल्या असतात.

अनुक्रमणिका

दुसरी चीज सुरू होण्यापूर्वी तॉमास आपली निवड करण्याच्या उद्देशाने हेलेनपाशी जात होता. इतक्यात घोडेस्वाराच्या दलातील एक तरुण अधिकारी त्याच्याजवळ येऊन लगबगीने म्हणाला हिचा जोडीदार ठरलेला आहे.

हेलेन चपापली, तशी लगेच त्या तरुणाने तिला हात देऊन दालनाच्यामध्ये नेली. तॉमास नाराज होऊन जवळच्या गॅलरीत गेला. हेलेनाबरोबर याच चीजेवर नाचण्याची त्याची दुसरी पाळी होती. हॉर्टमनच्या घरी कधी कधी असले नाच होत. तेथे असल्या चीजांना आपापली भाषा होती. पहिल्या चीजेवर उमेदवार नवऱ्यांचा हक्क असतो. दुसरी चीज वडिलांच्या देखरेखीला भिणाऱ्या प्रणयी युगुलांना मिळते. तिसरी चीज आपल्या नवऱ्याच्या संशयी स्वभावाची भीती बाळगणाऱ्या प्रेमिकांना कृपा म्हणून देण्यात येते.

तॉमास ज्या गॅलरीत होता, तिच्या बाहेर परस होते. तेथे परदेशी झाडाची गर्दी होती. इतर दुर्मिळ वनस्पतीही माजली होती. आणि संत्र्याच्या हिरव्या झाडांनी शोभणाऱ्या वाटा होत्या. मध्यभागी एक झरा उडत होता. त्याचे पाणी दगडादगडातून उडत एका विस्तीर्ण कुंडामध्ये पडत होते. जमीन रेतीने आच्छादली होती. ती रेती इतकी बारीक व सळसळीत होती की, तो एक गालिचाच वाटावा. चिमुकले कंदील पर्णसंभारात दडून चांदण्यासारखा मंद प्रकाश फेकीत होते. तॉमस तेथे बसतो न बसतो इतक्यात काही झाडांच्या पलिकडे बसलेल्या दोन इसमामधील संभाषण त्याच्या कानावर पडू लागले. ते तो उत्कंठेने ऐकू लागला.

“तुला माहीत नसेल, जॉर्ज रॉबर्तच्या मुलीशी सलगी करतो.”
“कालापव्यय करतो आहे बिचारा.” दुसरा म्हणाला.
“माझ्या लक्षात नाही आलं.”

“मग ऐक, तिला रिकार्दशी लग्न करावचं लागेल. दाविदाची इस्टेट मिळविण्याकरता नि आपल्या बापाची कर्जफेड करण्याकरिता.”

“बापाचे हे हिशोबी तर्क आहेत.”
“आपल्या बापाला ती तुरुंगात कुजू देणार नाही. मी तिच्यावर असा आरोप करू इच्छित नाही की,...”

“जॉर्ज हा इतका श्रीमंत आहे की, तो आपल्या साऱ्याचं कर्ज फेडून टाकील व हेलेनला सुखी करील.”

“लोक असं बोलतात की, तिचं तॉमासवर प्रेम आहे. तिच्याबरोबर नाचण्यासाठी तो नुकताच तिच्याकडे गेला होता.”

“मुलांचं वेड! लवकरच निघून जाईल ते! ब्राह्मणाशी लग्न! ती तर ऑब्रियन आहे! ही हद्द झाली.”

याचवेळी आणखी काही गृहस्थ गॅलरीत शिरले आणि हे संभाषण तेथेच संपले.

अनुक्रमणिका

वरील संवादातील शब्द तॉमासच्या मनात बंदुकीच्या गोळीप्रमाणे घुसले. आणि त्याला दुर्धर वस्तुस्थितीची जाणीव झाली. त्याला कळून चुकले की, आपल्या प्रेमाच्या मार्गात फार मोठ्या अडचणी उभ्या आहेत.

मत्सराच्या वावटळीने त्याचे रक्त तापले. आणि ज्याच्या हृदयात नुकत्याच उगवणाऱ्या प्रेमाच्या ठिणगीने वणव्याचे रूप धारण केले.

ज्या मूर्तीची त्याने श्रद्धेने पूजा केली होती, त्याच मूर्तीसमोर आता त्याची मनोदेवता निपचित पडली. कर्तव्य बुद्धी नष्ट झाली. व विवेक संपुष्टात झाला.

तो ताडकन् उभा राहून म्हणाला, "नाही, हे मला सहन होणार नाही."

तो पुन्हा नृत्यागारात आला. हेलेनचा शोध घेण्यासाठी त्याने चौफेर नजर फिरविली. ती जॉर्जसमवेत 'पॉल्का' नृत्य करीत होती.

त्यांच्याकडे त्वेषाने पाहून तो म्हणाला, "शंकाच नाही. ती दोघं एकमेकांवर प्रेम करतात. म्हणूनच तर तिला मघाशी माझ्याबरोबर नाचायचं नव्हत."

आणि काही क्षणात त्याची कल्पना विलक्षण गतीने त्याच्या बालपणातील हसऱ्या व निर्मळ दिवसांवरून फिरू लागली. मनातल्या यातना सोशीत तो जुन्या आठवणींची चाळवाचाळव करू लागला.

आता प्रेम त्याचे हृदय जाळीत होते. त्या हृदयात मत्सराने आपले जहर ओतले होते. आणि आपले सैतानी विचार, आपली सारी विदारक वेडी स्वप्ने, यांचा नंगा नाच सुरू झाला होता.

नृत्य संपले. जॉर्ज तॉमासपाशी येऊन म्हणाला की, हेलेन त्याच्याशी बोलू इच्छिते.

त्याने तिची भेट घेतली. तो निस्तेज दिसत होता. हेलेनाने त्याची क्षमा मागितली आणि आपल्याबरोबर एक 'वॉल्स' नाचण्याची विनंती केली. तॉमासने तिच्या विनंतीचा निर्धाराने अव्हेर केला. आणि तो तेथून बाहेर पडला. बॉल पहाटे तीन वाजता संपला.

रॉबेर्त आपल्या मंडळीसह सगळ्याच्या शेवटी तेथून निघाला.

जॉर्ज हेलेनाला सोबत करायला दरवाजापर्यंत आला. त्यांच्यामागून तॉमास आला. तो जितका खिन्न दिसत होता तितकीच ॲमिली आनंदित दिसत होती. तिने त्या रात्री नृत्यसम्राज्ञीचे प्रभावी स्थान सोडले नव्हते. एकही तरुण तिला आपल्याबरोबर नाचण्याची विनंती केल्याशिवाय राहिला नाही. विजयाच्या उन्मादाने ती बेहोष झाली होती. त्यामुळे तिच्या ध्यानात आले नाही, की, त्या नृत्यात आपण एकटीच एक हिंदी तरुणी असल्यामुळे आपल्यावर अशा उड्या पडल्या. तिला हे उमगले असते तर!

अनुक्रमणिका

६

मत्सर

शंका आणि भीती यांनी ग्रासलेला तॉमास खोलीत आला. शेषरात्र कशी घालवायची ते त्याला कळेना. बॉलच्या दुःखद आठवणी व संशयाच्या यातना यामुळे त्याची झोप उडाली होती.

कुत्रा इनामी खरा. पण त्याच्या शरीरात विष तयार होते. त्याचप्रमाणे माणसाच्या हृदयात प्रेमापोटी मत्सर तयार होतो. त्याच्यासारखा जुलमी, भयानक सैतान नाही. ते एकप्रकारचे वादळ आहे. तेथे प्रेम व द्वेष, दुःख व सूड असुरांप्रमाणे झगडतात. व मानवी मनाच्या दरीत नरकातल्या विजा झळाळतात. सगळ्यांची भीती वाटणे, सगळ्याबद्दल अविश्वास बाळगणे, साध्यासुद्धा गोष्टीची फाजील चिकित्सा करणे, क्षुद्र गोष्टींना अतिरिक्त महत्त्व देणे, काल्पनिक भूतांना कवटाळणे, अंधाऱ्या गुहेत प्रवेश करणे, प्रलयाचा ठाव पाहाणे, स्वप्नसृष्टीत बुडून जाणे, विश्वास टाकणे व लगेच अविश्वास दाखवणे, प्रेम करणे व लगेच त्याचा गळा दाबणे, मुलांप्रमाणे रडणे व श्वापदांप्रमाणे गर्जना करणे, स्वर्गातून नरकात उडी टाकणे आणि नरकातून स्वर्गात जाणे, हे सारे मत्सरालाच शक्य आहे.

तॉमास वेड्याप्रमाणे खोलीत येरझारा घालीत होता. काळ्याकुट्ट, भयाण आठवणीचे थैमान त्याच्या मस्तकात चालले होते. परस्परविरोधी विकार–विचारांच्या या झगड्यात त्याने एकच विजय मिळविला होता. कृतज्ञतेचे जे भूत तो आणि हेलेन यांच्यामध्ये उभे राही, आणि त्यांना एकमेकांपासून विभक्त करी, त्याने आता पळ काढला होता. निदान त्याच्या डोळ्यांना ते आता दिसत नव्हते. जगाने दिलेले आव्हान त्याने बेडरपणाने स्वीकारले होते.

समाजाशी जी झुंज मी देऊ पहात आहे— तो म्हणत होता— ती सुंदर, महान् व म्हणूनच दिव्य होईल यात शंका नाही. हा समजा असत्यावर, निष्ठुरतेवर जगत आहे. आपल्या बळकट, पोलादी हातांनी लहानांना चिरडून टाकीत आहे. तो पाणी, उजेड व फुले यांच्या मक्तेदार बनला आहे. आणि हे सारे करूनदेखील तो उपेक्षित, अपमानित, दुर्दैवी माणसांना कृतघ्न ठरवीत आहे. 'समानता' हा माझा जय होईल. जी समानता समुद्रीसपाटीप्रमाणे मोठे व छोटे, समर्थ व दुबळे, श्रीमान व गरीब या सगळ्यांना एका पातळींवर आणील. माझा जय म्हणजे पृथ्वीवर उतरलेले स्वर्गातील राज्य. माझा जय म्हणजे बायबलच्या आदेशानुसार सगळ्या कायदेकानूंची केलेली सुधारणा. माझा जय म्हणजे हेलेन.

तॉमासने खिडकी उघडली. व तो तेथे जाऊन बसला. आणि बेफाट चिरुट ओढू लागला. शेवटचा चिरुट संपविला. रात्र लांबू पहात होती. तो तर तिला संपवू पाहात होता. काही शिपाई अजून झोपले नव्हते. त्याने एका शिपयाला जवळ बोलावले. व चिलीम आणायला सागितली. त्याची आज्ञा ऐकून शिपायाला अचंबा वाटला. कारण तॉमास असल्या मादक पदार्थांना स्पर्श करीत नाही हे त्याला ठाऊक होते; पण निरुपायाने त्याने हुकूमाची अंमलबजावणी केली.

काही घटका गेल्या, तॉमास पुन्हा खिडकीपाशी येऊन बसला. दुसऱ्या खुर्चीवर त्याने पाय पसरले. डाव्या हातावर मस्तक रेलले. जवळच शिपाई उभा राहून नव्या हुकूमाची वाट पाहू लागला.

अनुक्रमणिका

अफूचे पहिले झुरके त्याला सोसवले नाहीत, कडवट लागले. पुढचे झुरके वाईट लागले नाहीत. नंतरचे मस्त लागले; पण पुढे चिलीम ओढता येईना. ती हातातून गळून पडली. आणि पुढे त्याला एक प्रकारची गुंगी आली. शिपायाने तीनदा म्हटले. अल्ला! अल्ला! आणि तो निघून गेला.

आता त्याने मस्तक खुर्चीच्या पाठीवर टेकले होते. डोळ्याच्या पापण्या थरथरत होत्या. नाकपुड्या कापत होत्या आणि चेहऱ्याच्या नसा हळूहळू सैल होत होत्या. कलेवराचा फिक्कटपणा त्याच्या मुद्रेवर पसरला होता. दुरून पहाणाराला तो प्रेतवत वाटावा; पण त्या निश्चल शरीराच्या आत जीवन ज्योत जोराने धगधगत होती, 'डॉन्टे'ची प्रतिभा हिणकस वाटावी अशी त्याची कल्पना तरारत होती.

टॉमासला समोर पौर्वात्य वेषात एक स्त्री दिसते. दैवी सौंदर्याने नटलेली व माणसांना अलभ्य अशी. तिचे सोनेरी कुरळे केस तिच्या नितंबावर रुळलेले आहेत. तिच्या मस्तकावर निळ्या रेशमी वस्त्राचा टोप आहे. त्याच्यावर शहामृग पक्षाचे पीस खोवलेले आहे. तिच्या हितशुभ्र गळ्यात हिऱ्याचा हार चमकत आहे. तिच्या डोळ्यांतील तेज, कमानदार भुवया, शुभ्र दंतपक्ती, लाल ओठ यांनी तिच्या लावण्याला पूर्णत्व आणले आहे.

टॉमास तिच्यासमोर गुडघे टेकतो आणि तिच्या प्रेमाची आराधना करतो.

ती हळूहळू या युवकाजवळ येते. तिच्या डोळ्यात स्वर्ग साठला आहे. ओठावर प्रेम तरळत आहे. गतीत लय आहे. हालचालीत गंभीर नाट्य आहे.

त्याचा हात धरून कोमल स्वरात ती म्हणते, "चल माझ्याबरोबर."

टॉमास तिचा शब्द झेलून धरतो.

नंतर दोघेही एका प्रकाशमान रथावर आरूढ होतात. गरुड पक्षी आकाशाच्या अवकाशात उड्डाण करतात. रथ उडत जातो. ती दोघे आता स्वर्गलोकातून जात आहेत. त्यांच्याभोवती परीसारख्या सुंदर स्त्रिया दिसतात. त्यांच्या कानावर दिव्य गायनाचे आलाप पडू लागतात. तेथील हवा सुगंधी असते. काय ते वैभव! काय ते अनंत! काय ते नभोविश्व!

टॉमास आपल्या सहचरीशी प्रेमालाप करू लागतो. ती लाजते. टॉमास आराधन चालू ठेवतो. ती एक नेत्रकटाक्ष फेकते.

"तुझं नांव?" प्रेमवेडा टॉमस उत्कंठतेने विचारतो. त्याला ते नाव समजून घ्यायचे आहे. एकच नाव त्याला भाग्यवान करू शकते.

"माझं नाव?" ती उदासीन स्वरात म्हणते. आणि इतक्यात वाऱ्याची झुळूक येते. तिचे एक सोनेरी कुरळ हलते. आणि सूर्यकिरणाप्रमाणे त्याच्या डोळ्यावर उतरते. एवढ्यात हा अभागी युवक दचकून जागा होतो.

अनुक्रमणिका

तॉमास स्वर्गसुखातून बॉलच्या रात्रीच्या नरकात कोसळतो भीषण वास्तवतेला परततो.

पुन्हा तो खोलीत येरझारा घालतो. त्याला निर्णय घ्यायचा असतो. परमेश्वरच त्याला तो सुचवतो. सकाळच्या कोवळ्या सूर्यकिरणात तो पत्र लिहितो. त्यात रात्रीच्या हृदयद्रावक विचारांचा तो थांगपत्ता लागू देत नाही.

"हेलेन, मी तुझ्यावर प्रेम करतो हे तुला माहीत आहे. आजच पहिल्यांदा माझ्या तोंडातून निघणारा गोड पण करुण शब्द तू माझ्या डोळ्यात तरळत असलेला कित्येकदा पाहिला असशील. आपल्यामध्ये पसरलेल्या दरीची जाणीव न ठेवता मी तुझ्यावर प्रेम कले. तू 'ऑब्रियन'ची वंशज आहेस आणि मी गरीब, निराधार पोरका आहे. माझ्या स्वप्नाचे मस्तक सोनेरी आहे आणि पाय चिखलाचे आहेत. माझ्या हृदयावर तुझ्या हुकमतीचा शिक्का आहे. पण माझ्या कपाळावर विस्तवाच्या अक्षरांनी कोरलेली दास्याची निशाणी आहे. मी तुला टाळू पाहातो. पण ज्या वेळी इतर पुरुषाच्या नजरा तुझ्यावर रोखल्या जातात, त्या वेळी माझा तोल सुटतो आणि वाटते सगळ्या विश्वाशी झगडून तुला हिरावून आणावी. हे माझे अशक्य प्रेम मी हृदयात डांबून टाकले असते तर बरे झाले असते असे वाटू लागते. तसे झाल्यास तुझ्या दयेची याचना करण्याचा हक्क मी गमावून बसलो असतो. ज्याप्रमाणे एखादा मरणोन्मुख इसम त्याच्या समाधीवर एक दिवस ढाळल्या जाणाऱ्या अश्रूवर स्वतःचे सांत्वन करतो त्याचप्रमाणे तुझ्या दयेच्या जोरावर मी स्वतःचे सांत्वन करतो.

तॉमास.

दुसऱ्या दिवशी अकरा वाजता हे पत्र हेलेनच्या हातात पडले. ती एकटीच होती. ते वाचून ती विचारमग्न झाली. त्यातील प्रत्येक शब्द, प्रत्येक अक्षर समजून घेतल्यावर तिने एका कागदाच्या तुकड्यावर लिहिले. "आज तीन वाजता दिवाणखान्यात मला भेट. तुझ्याशी खूप बोलायचे आहे. — तुझी भगिनी हेलेन"

तॉमासला त्या चिठ्ठीत तिची बेफिकीरी दिसली. चिठ्ठीतील वाक्ये, शैली, मजकूर सारे मामुली होते. ते वाचून तॉमास खवळला.

तीन वाजता तो दिवाणखान्यात दाखल झाला. तेथे हेलेन खुर्चीवर बसलेली त्याला आढळली. आज ती त्याला विशेष सुंदर दिसली. तिचे सोनेरी कुरळे केस नेहमीप्रमाणे तिच्या खांद्यावर अस्ताव्यस्त पसरले होते. चेहरा फिक्कट दिसत होता. त्यामुळे लाल ओठ उठून दिसत होते. डोळ्याखाली निळसर अर्धवर्तुळे दिसत होती. अंगात शुभ्र, तलम पोषाख होता. मुद्रेवर करुणरम्य म्लानता दिसत होती.

तॉमास कण्हत होता. त्याचे काळीज जोराने धडधडत होते. मुद्रेवर आणि डोळ्यात मत्सराची काजळी पसरली होती. त्याचे भवितव्य या भेटीवर अवलंबून होते.

"असं तुला काय झालं आहे, तॉमास?" त्याच्या चेहऱ्याचे निरीक्षण करीत ती म्हणाली.

"तसं काहीच नाही." त्याने नजर न उचलता म्हटले.

अनुक्रमणिका

“बैस. “हेलेन म्हणाली. आणि त्याचा हात प्रेमभराने हातात घेतला—” आता बोल माझ्यावर प्रेम करतोस ना तू?”

“म्हणजे! तुला नाही दिसत? नाही कळत?”

ह्या उद्‌गाराबरोबर त्याच्या नजरेने हेलेनाच्या हृदयाचा ठाव घेतला. ती अस्वस्थ झाली.

“माझे रहस्य तू कधीच जाणलं आहेस. ते तुला माझ्या तोंडून ऐकायचं आहे का? तॉमास, माझ्यावर विश्वास ठेव. परमेश्वराला साक्षी ठेवून सांगते तू मला हवा आहेस. नाव काहीही दे. प्रेम म्हण, माया म्हण. नावाचं महत्त्व मला नाही वाटत. मी तुला एवढचं आश्वासन देते की, ही भावना खरीखुरी आहे. अढळ आहे.” एवढे बोलून तिने आपली नजर जमिनीला लावली. तिच्या गालावर गुलाबी छटा फाकली.

त्याच्यावर तिचे प्रेम होते.

“तू तर म्हणतेस, माझ्यावर तुझं प्रेम आहे मग काल तू पहिली चीज माझ्या साथीनं का नाचली नाहीस? माझी आवडती चीज ती. तिच्याशी आपल्या कितीतरी आठवणी निगडीत झालेल्या आहेत!”

“तुझ्याशी कसं वागावं तेच मला समजत नाही. अलीकडे तुझा स्वभाव कडवट झाला आहे. दुःखाने झुरत रहाण्यात तुला आनंद वाटत आहे.”

हे शब्द तिने अशा निर्विकार स्वरात व अशा पद्धतीने उच्चारले की ते ऐकून तॉमासला वाटले की, आपण तिच्यावर निष्कारण आरोप केला आणि संशय घेऊन तिला छळले.

“मला क्षमा कर.” तो म्हणाला. आणि सद्‌गदित होऊन त्याने तिचे पाय धरले.

“उठ लवकर, कुणी पाहिलं तर काय म्हणेल?”

“होय, असेच जमिनीला गुडघे टेकून माझ्या आकांक्षा माझ्या भावना, माझ्या आयुष्यातलं एक तप तुझ्यासमोर मला उघड करायचं आहे. आजवर माझं प्रेम मी मनात दडपून टाकलं होते. मी स्वतःलाच ते लपवून ठेवलं होतं. आतापर्यंत मी त्याला मैत्रीच म्हणत आलो होतो. आज ते प्रेम सगळ्या क्षुद्र व अर्थहीन नावाचा अव्हेर करीत आहे. त्याना मी काडीचंही महत्त्व देत नाही. ज्यालामुखीच्या उदरात वर्षानुवर्ष सळसळणाऱ्या लाव्हारसाप्रमाणे आता माझं प्रेम बाहेर पडू पहात आहे. अशक्याची स्वप्नं मी रंगविली. प्रेम करायला हृदयाची तेवढी आवश्यकता असते एवढ मी मानीत आलो. असलं कोमल व उदार हृदय माझ्यापाशी आहे हे निश्चित. माझ्या स्वप्नांतून मी जागा झालो तेव्हा मला दिसून आलं की, तुझ्या माझ्यामध्ये एका वंशाचा अहंकार आहे आणि दोन वंशामधील द्वेष आहे. मला प्रतिकार करायचा होता. पण कुणाला ते कळत नव्हतं. केवढं दुर्दैव माझं! आपल्यामध्ये कोणती दरी पसरली आहे याची तुला कल्पना आहे? तू नावाजलेल्या ऑब्रियन घराण्याची वंशज आहेस. तुझं लग्न रिकार्दशी ठरलेलं आहे. मी जिच्यावर प्रेम केलं ती असली कोणीच नव्हती! ती एक स्वर्गीय परी होती एवढंच मी म्हणेन. तुझ्यासारखा मी श्रीमंत व उच्च का नाही झालो? किंवा तू माझ्याप्रमाणे गरीब, दुर्दैवी का नाही झालीस?” त्याला पुढे बोलता येईना. त्याने

अनुक्रमणिका

मस्तक नमविले. त्याच्या गालावरून आसवे ओघळू लागली आणि त्याच्या तोंडातून एक जोराचा हुंदका बाहेर पडला. जणू काय त्याने त्याच्या हृदयाच्या चिंधड्या उडवून त्याला दुर्धर यातनात लोटले.

त्याचे हे जळजळीत शब्द ऐकून हेलेन गहिवरली आणि तिने आपला हात पुढे केला. त्याच्यावर झडप घालून त्याने त्याच्यावर चुंबनाचा वर्षाव केला. आणि मग काही क्षणात आजवर आपल्या मनात जोपासलेल्या एका गुप्त अस्थिर भावनेचे रूपांतर गाढ प्रेमात झाले.

"तॉमास"— तिने आपल्या कंपित स्वरात म्हटले. "आईबापानी आपल्या मुलीसाठी संपत्तीची व प्रतिष्ठेची अपेक्षा करावी हे साहजिक आहे. पण स्त्रीला हवं असतं ते हृदय. माझ्या आजोबांच्या अहंकाराचा वारसा मी घेतलेला नाही. कारण मानसन्मान किताब इत्यादी गोष्टी हृदयावर सौंदर्याचा साज चढवू शकत नाहीत. आपली मनं आज एकत्र येऊन सगळं अंतर विसरली आहेत. आपल्या प्रेमासाठी केवढाही त्याग करण्याची माझी तयारी आहे. फक्त माझ्या वडिलांच्या सुखाला मला जपलं पाहिजे. त्याचा त्याग मी करू शकत नाही. मला विश्वास आहे की, तू माझ्याकडे एवढं मागणार नाहीस."

"कधीच नाही"— तॉमास म्हणाला. तिच्या या शब्दांनी त्याच्या मनातली मृतवत झालेली कृतज्ञतेची भावना उफाळून वर आली. "—तुझ्या वडिलाच्या दुःखाला मी कारण झालो तर मी एक महाकृतघ्न माणूस ठरेन. मी तशी अपेक्षा केली तर तुझ्या प्रेमालाही मी अपात्र ठरेन."

हेलेनला त्याच्या या भावनेचा अभिमान वाटला. आपल्या आकर्षक व मोहक स्वरात तिने त्याला बसायला सांगितले. व ती म्हणाली.

"मग ठीक आहे. माझ्या पप्पांशी बोल. त्यांना अडचणीतून मुक्त करण्याचं मला वचन दे. निराश होऊ नकोस. सगळ्या दुःखावर तोडगा आहे. माझ्यावर विश्वास ठेव."

एवढ्यात तीनदा जिन्याची घंटी वाजली. रॉबेर्त, ॲमिली व रिकार्द फेरफटका करून परत आले होते.

तॉमास दिवाणखान्यातून बाहेर पडला.

तो आज शांत मनाने जात होता. कारण कोणताही महत्त्वाचा निर्णय म्हणजे विश्रांतीच असते.

अनुक्रमणिका

७

गौप्यस्फोट

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता तॉमास रॉबेर्तच्या खोलीकडे जात होता. जाताना मध्येच थबकत होता. परतत होता. अशा मनःस्थितीत काही वेळ गेल्यावर मनाच्या निर्धाराने त्याने रॉबेर्तच्या खोलीत प्रवेश केला.

"बैस," रॉबेर्तने खुर्चीकडे अंगुली निर्देश करीत म्हटले.

"पपा,"— तॉमास बसता बसताच म्हणाला. "माझी फारा दिवसाची योजना कानावर घालण्यासाठी मी इकडं आलो आहे. तुमच्यापासून ती गुप्त ठेवणं म्हणजे तुमच्याशी कृतघ्न होणं ठरेल. हेलेनावर माझं प्रेम आहे. तिला मी मागणी घालायला आता आलो आहे." त्याने सद्‌गदित स्वरात म्हटले.

रॉबेर्तने आपल्या मानीव पुत्राकडे चमकून पाहिले. त्याच्या मुद्रेवर दुःखाचे व आश्चर्याचे भाव उमटले.

"नि तिच्यावर तू कधीपासून प्रेम करायला लागलास तॉमास?"

"तिच्या माझ्या पहिल्या भेटीपासून नेहमीच उत्कट प्रेम करीत आलोय तिच्यावर.—"

"मला ते कळतं."— रॉबेर्त रुक्ष स्वरात म्हणाला— "तू तिचा भाऊ आहेस, या नात्यापलीकडे दुसरं नातं तुमच्यामध्ये असू शकत नाही."

"ते सगळं मला माहीत आहे. हेलेनासंबंधीच्या तुमच्या योजना मला अज्ञात नाहीत. तिचं लग्न तिच्या चुलत भावाशी ठरलं आहे. हे घडून आलं तर तुमच्या घराण्याच्या इस्टेटीची ती वारस होईल. तुमच्या वडिलांच्या मृत्युपत्रातील ती एक अट आहे."

"मग माझ्याकडे तिला मागणी घालायची नव्हतीस तू—"

रॉबेर्त आवेशाने खुर्चीवरून उठत म्हणाला.— "जे मला देता येत नाही ते मागण्यात काय अर्थ आहे."

"पण हेलेनानं आपल्या इस्टेटीचा हक्क सोडला तर! — नि मी तुम्हाला तुमच्या अडचणीतून मुक्त केलं तर—"

'तरीदेखील नाही.—' रॉबेर्तने पाय आपटून ठासून सांगितले. "ऑब्रियन घराण्यातील एक मुलगी तुझ्या दर्जाच्या तरुणाशी लग्न करू शकत नाही."—

अनुक्रमणिका

हे उद्‌गार कानावर पडताच तॉमासच्या ओठावर उपरोधिक स्मित उमटले. त्याचे डोळे लांडग्याच्या डोळ्याप्रमाणे चमकले. काही क्षणाच्या स्तब्धतेनंतर तो निर्भय उठला. आणि त्वेषाने म्हणाला,

"साहेब, तुमच्या अधिकाराचा दुरुपयोग करून, स्वतःचा बचाव न करू शकणाऱ्या एका माणसाचा विनाकारण पाणउतारा करू नका. लक्षात ठेवा की, तुमच्या–माझ्यामध्ये झुंज अशक्य आहे."

रॉबेर्तच्या लक्षात आले की, आपण घेतलेला पवित्रा अप्रासंगिक आहे. तॉमास माग्नोदचा मुलगा असल्यामुळे त्याने वडिलांचा स्वाभिमान उचलला आहे. त्याला चिथावला तर तोच बळकट होईल. कुरवाळला तर तो नरम होईल, असा विवेक करून त्याच्याबाबतीत उदार व्हायचे रॉबेर्तने ठरविले.

"दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडलेला माझ्यासारखा एक असहाय्य बाप एका प्रेमवेड्या तरुणाविरुद्ध काय करू शकेल?"— रॉबेर्त संथ व हताश आवाजात म्हणाला— "काहीच करू शकत नाही. बापापासून त्याच्या आवडत्या मुलीला हिरावून घेऊन त्याला यातनांचं मरण देण्याची तुझी इच्छा असली तर प्रश्न नाही. बोल, माझ्या गांजलेल्या मनाची आणखी दुर्दशा करण्याचा विचार आहे का तुझा? ज्या माणसानं तुला प्रेमानं वाढविलं, वागविलं, त्याच्या सुखाची तुला कदर का नसावी? तॉमास, तुझ्या वडिलांनी माझ्यापासून कपटानं संपत्ती हिरावून घेतली. आता मुलगी हिरावून घेऊन त्याचं अपुरं कार्य तू पुरे कर."

"माझे वडील? साहेब तुम्ही काय बोलता हे? माझे वडील?" तॉमस गोंधळून करुण स्वरात म्हणाला.

"होय, तुझेच वडील."

तॉमासचे सर्वांग भीतीने शहारले. त्याचे कपाळ घामाने चिंब झाले. रॉबेर्तच्या पायावर अंग टाकून तो ओरडला.

"केवढं दुर्दैव माझं!"

"माझ्या मुला, असा रडू नकोस.—" रॉबेर्त त्याला आलिंगन देत म्हणाला. "एक भयंकर गुपीत फोडून मी तुला दुःखात लोटलं आहे. हे गुपीत तुला कळायला नको होतं. माझ्याकडून तुझा अपमानही झाला असेल. आयुष्याच्या अंतापर्यंत तुझ्यावर प्रेम करण्याचा माझा निर्धार होता. तुला सुखी झालेला पहाण्यासाठी मी माझं रक्त दिलं असतं. त्याच माझ्यावर तुझ्या ह्रदयाच्या चिंधड्या उडविण्याचा प्रसंग यावा? कित्येकवेळा मित्रांनाच कर्तव्यनिष्ठूर व्हावं लागतं. समाजात आपली पायरी जेवढी उच्च, तेवढीच त्याने आपल्यावर लादलेली कर्तव्य निष्ठूर असतात. माझ्यासाठी नव्हे. तर माझ्या मुलीसाठी, आम्हा दोघांनाही प्रिय असलेल्या त्या निर्मळ जीवासाठी तुझ्यापाशी माझं हेच मागणं आहे की, या निष्ठूर व निर्लज्ज जगाच्या तिरस्कारापासून तिचं संरक्षण कर. प्रेम आंधळं असतं हे मला माहीत आहे. त्याला उपहासाची कदर नसते. उलट उपहासात ते भूषण मानतं. ते कायम असेपर्यंत तेवढीशी भीती नसते; पण नंतर? हेलेन व तू यांच्यामध्ये कलह पेटणार नाही याचा काय भरंवसा? तिला आपल्या गतायुष्याचा विसर पडेल आणि तुला वर्तमान आयुष्याचा. मग माझ्यासारख्या पित्यावर केवढा दुर्धर प्रसंग ओढवेल याची कल्पना कर. तुला माझी मैत्री आणि हेलेन यापैकी एका गोष्टीला मुकावं लागेल. निवड करावी लागेल. तुझ्या ह्रदयाची मला

कल्पना आहे. त्यात दडलेले प्रेमाचे धन व शील यांची मला जाणीव आहे. असल्या हृदयाचा मी अव्हेर करतो असं समजू नकोस. जगच त्याला माझ्यापासून हिरावून घेत आहे. धिःकार असो त्याच्या खोट्या अहंकाराचा, खोट्या प्रतिष्ठेचा!"

"कृपा करून आणखी बोलू नका.— आसवांनी भिजलेला टॉमास म्हणाला— "जगात जे काही पवित्र आहे त्याची शपथ घेऊन सांगतो की, आयुष्याच्या अंतिम क्षणापर्यंत तुमच्यावर प्रेम करून, तुमची सेवा करून वडिलांच्या पापांची आणि तुमच्या उपकाराची मी फेड करीन."

"उठ आता नि तुझ्या पप्पाला आलिंगन दे."

मग त्यांनी एकमेकांना मिठी घातली. त्यांचे अश्रू मिसळले. कृतज्ञतेने प्रेमावर मात केली. मत्सराने कधीच पळ काढला होता.

विचाराचा गोंधळ आवरीत टॉमास खोलीत आला. तो पार गहिंवरून गेला होता. जणू काय फार मोठ्या आघाताने तो घायाळ झाला आहे.

हताश होऊन त्याने खुर्चीवर अंग टाकले. थोड्या वेळानंतर त्याची चिकित्सक बुद्धी जागृत झाली आणि त्याच्या संकटग्रस्त परिस्थितीचा विचार करू लागली. एका बाजूला हेलेनावरील त्याचे गाढ, उदात्त प्रेम; त्याला स्पर्श करून लगेच कायमचे पळून जाणारे भाग्य. दुसऱ्या बाजूला गुन्ह्याच्या सावलीत गुरफटलेल्या वडिलांच्या स्मृतीने लादलेली कर्तव्ये. बापाचा गुन्हा मुलाच्या क्षुल्लक चुकीने कदाचित अधिक तीव्र होणार; आणि शेवटी त्याच्यावर निस्सीम प्रेम करणाऱ्या पितृवत रॉबेर्तबद्दलची अपार कृतज्ञता... ह्या सगळ्यात अंतर्गत कलह चालला होता. त्याने प्रेमाला रामराम ठोकला असता तर जगाने त्याला भागूबाई ठरविले असते. प्रेमाचा पाठपुरावा केला असता तर तो कृतघ्न ठरला असता; कोणताही पर्याय स्वीकारला असता तरी दोषारोप टळत नव्हता. पण मनोदेवता काय सांगत होती? "हेलेनाच्या सुखाची होळी करायला तयार होऊ नकोस. तिच्यासाठी तुझ्या सुखावर पाणी सोड. भाग्याची ही एकच संधी तुझ्या हाती आहे. हेलेनाचे तुझ्यावर नितांत प्रेम आहे. रॉबेर्त तुला पुत्रवत चहातो. जग तुझा गुलामाप्रमाणे धिःकार करते. प्रेमाची फेड प्रेमाने कर. आणि जगावर सूड उगव. स्वर्गातील उंचीपर्यंत चढ. मग तेथून तुला तेच जग क्षुद्र व लहान दिसेल." या गूढ व चमत्कारीक आवाजाने त्याच्या हृदयाच्या सगळ्या तारा छेडल्या गेल्या. त्याला असा भास झाला की, एक स्वर्गीय प्रकाश आपल्याला उजळून टाकीत आहे. एक बळकट अदृश्य हात आपल्याला आधार देत आहे. प्रथम हेलेनाने त्याला अंधत्व आणले होते. आता ती प्रकाश देत आहे.

हातातल्या पेल्याच्या तळाशी एक मोती होते. त्याच्या मनोदेवतेला ते दिसत होते.

मग त्याने आवेगाने मेजाकडे धाव घेतली. तो बसला. एक विचार येत होता. दुसरा निसटत होता. हेलेनावर प्रेम न करणे कसे शक्य आहे?

अनुक्रमणिका

८

शाप

असे सांगतात की, युरोपियन संस्कृतीवर ख्रिस्ती धर्माची हुकूमत चालते. ही गोष्ट खरी नाही. त्या संस्कृतीचा केवळ पृष्ठभाग तो धर्म उजळतो. तिचे अंतरंग नाही. युरोपचे दडपण आशिया अमेरिकेवर आहे. आणि या सगळ्यांचे आफ्रिकेवर आहे. युरोपियन राष्ट्रात आज बॅरन्स नाहीत. पण राष्ट्रेच बॅरन्स झाली आहेत. मध्ययुग व एकोणीसाचे शतक यांच्यामध्ये अंतर ते हेच. आफ्रिकेतील काळे लोक हे युरोप अमेरिकेतील ब्राह्मणांचे अस्पृश्य आहेत. त्यांना स्वातंत्र्याच्या जीवनदायी प्रकाशाचा लाभ होत नाही. आणि प्रेमाची शीतल सावलीही मिळत नाही.

राजकारणातील स्वार्थांध व भोगवादी लोकांना हे कळत नाही की, आफ्रिकन लोकांच्या काळ्या कातडीखाली तेजस्वी बुद्धिमत्ता असू शकते. त्यांचा या गोष्टीवर विश्वास नाही की, त्यांचा काळा रंग म्हणजे मनातील काळा रंग नव्हे. सालोमनचे काळे तंबू व त्या खालचा वैभवशाली व तेजस्वी दरबार यांच्यामधला भेद त्यांना कळत नाही. त्यांना हे देखील कळत नाही की, हंसाच्या शुभ्र पिसांखाली टणक काळे मांस असते. स्वातंत्र्य गोऱ्या लोकाना सूर्याप्रमाणे आहे, काळ्या लोकांना चंद्राप्रमाणे आहे. आणि गव्हाळी लोकांना अरुणांप्रमाणे आहे. असे का व्हावे? ते सारख्याच प्रकाशाने सगळ्या प्रदेशांवर का तळपू नये? वाळवंटावरून आकाशातील ढग पाऊस पाडल्याशिवाय जातात, त्याप्रमाणे ते स्वातंत्र्य आफ्रिकन लोकांवरून का जावे?

हे लोक अमेरिकेत व आफ्रिकेत गुलाम का मानले जावे? आणि कुष्टरोग्याप्रमाणे त्यांचा सगळीकडे का धिःकार व्हावा?

धनिकांचे डोळे या दुर्दैवी लोकांकडे का वळत नाहीत? ते कष्टतात, तळमळतात. रक्त, धर्म, स्वातंत्र्य इत्यादी बाबतीत ते त्यांचे बांधव आहेत. आफ्रिकन लोक दिवसरात्र उपवासात काबाडकष्ट करतात. डोळ्यांतून पाणी व अंगातून घाम गाळतात. त्यांचे कष्ट म्हणजे त्यांच्या मालकांची चैन. चाबकांच्या फटकाऱ्यांनी पिळून निघालेला त्यांच्या हातावरचा घाम म्हणजे त्यांच्या मालकाच्या घरात दरवळणारा ऊद. त्यांची नग्नता म्हणजे त्यांच्या धन्याची तलम वस्त्रें. त्यांची अखंड दुःखे म्हणजे त्यांच्या मालकाची असंख्य सुखे. त्याच्या बुद्धीचा अंधार हा क्लोरोफॉर्मसारखा असतो. त्याच्यामुळे आपल्या व्यक्तिमत्वावर घाव घालणाऱ्या नराधमाच्या बाबतीत माणूस बधीर होतो. (Vos non vobis)

“शेवटचे पहिले होतील” असे सत्याच्या प्रतीकाने—ख्रइस्टने म्हटले आहे. सात हजार वर्षाच्या प्रदीर्घ काळात आफ्रिकन नेहमीच शेवटचे राहिले आहेत. ते पहिले कधी होतील? या सोन्याच्या देशांत मनुष्य तेवढा गरीब आहे. प्रकाशाच्या या देशांत माणूस तेवढा अंधारात आहे. फुलांच्या या देशांत माणूस तेवढा ओसाड आहे.

पोर्तुगालला बायबलचे राजकारण कळले आहे. फ्रेंच क्रांतीच्या पुरस्कर्त्यांनी जगाला शिकविण्यापूर्वीच पोर्तुगालने ते अंमलात आणले आहे. त्याने आपल्या आफ्रिकेच्या वसाहतीत गुलामगिरी

अनुक्रमणिका

चालू ठेवू नये. नव्हे, चालू ठेवताच कामा नये. कारण त्याच्या कायदे—कानूना हे एक लांच्छन आहे. फुलांवर बसावयाची बंदी माश्याना कुणी करू शकत नाही. पण त्याना हाकलणे मात्र सर्वांना शक्य आहे.

समाजाविरुद्ध बंड पुकारण्यास तॉमासला तशीच सबळ कारणे होती. समाजाने त्याच्याबाबतीत काय केले हे वाचकांना समजून घ्यायचे आहे काय? त्याची ज्ञानेंद्रिये त्याने तल्लख केली. त्यांच्या शक्तिची वृद्धी केली. त्याच्या बुद्धीवर संकार केले. त्याच्यात आकांक्षा निर्माण केल्या. त्याला महत्त्वाकांक्षी बनविले. त्याच्या ध्येयांना प्रोत्साहन दिले. त्याला स्पर्धा शिकविली. त्याला स्वाभिमानी केले. आणि जेव्हा श्रद्धेने व विश्वासाने त्याने समाजापासून एवढीच अपेक्षा केली. आपली एकच आकांक्षा पुरी करा. एकच ध्येय मूर्त करा, तेव्हा तोच समाज आजवरची ममता लाथाडून क्रुद्ध झाला आणि (त्याने) सैतानी हास्य करून म्हटले— अशक्य! मग आशाभंग झालेला हा दुर्दैवी युवक समाजाच्या विरुद्ध उठला. आपल्या वाटेत उभारलेला अडथळा मोडून टाकायला सरसावला. निष्फळ प्रयत्न! त्याच्या बोटांतून रक्त वाहू लागले. त्याची शक्ती खचली. आणि आकाशाच्या उंचीवरून तो शून्याच्या खोल दरीत कोसळला. तशी तो दुबळ्या त्वेषाने शिव्यांची लाखोली वहात बरळला. “अशक्य.”

समाजाने आणखी काही केले.

त्याला स्वर्गीय परीसारखी सुंदर आणि देवदूतासारखी निष्पाप अशी एक स्त्री दाखविली. तिच्यावर प्रेम करायला, तिची पूजा करायला, आपले सुख, आपले भवितव्य तिच्या चरणी वाहायला त्याला भाग पाडले. आणि हे सारे केल्यावर, तो जेव्हा तिला पत्नीच्या पदावर बसवावयाला गेला तेव्हा, तोच समाज तिला त्याच्या बाहूंतून हिरावून घेण्यासाठी धावला आणि ओरडला—

“ऑब्रियनची वंशज एका ब्राह्मणाच्या सटरफटर मुलाशी लग्न करू शकत नाही.”

आणि त्याने पुन्हा म्हटले “अशक्य”

या निराशजनक शब्दाऐवजी समाजाने जर त्याला म्हटले असते— “श्रीमंत हो” तर तसे प्रयत्न त्याने केले असते.

“पंडित हो” असे म्हटले असते तर तो पंडित झाला असता. “कीर्तिमान हो” असे म्हटले असते तर त्याने नावलौकिक मिळविला असता. पण ही संपत्ती आणि कीर्ती त्याला काय कामाची? सगळा मोठेपणा पदरी असूनही तो एक किरकोळ माणूस मानला गेला असता. सगळ्या नक्षत्रांमध्ये रात्र मानला गेला असता. आणि तरीही त्याच्यापाशी एक हृदय असे होते की, जे त्याला सांगे “प्रेम कर” आणि परमेश्वरी आवाजाप्रमाणे अचूक अशी त्याची मनोदवता सांगे “तू प्रेम करायला पात्र आहेस.”

तॉमासने पेन उचलले व खालील पत्र लिहिले. त्यात दुःख आणि कडवटपणा यांचा लोट वाहू लागला.

हेलेन,

अनुक्रमणिका

मला काय हवय तेच मला कळत नाही. शेकडो परस्पर विचारांनी, भावनांनी मी हैराण झालो आहे. आयुष्यात इतकी जाचक अवस्था मी कधीच अनुभवली नाही. माझे हृदय शतधः विदीर्ण झाले आहे. माझ्या सगळ्या आशा धुळीला मिळाल्या आहेत. पण माझे कर्तव्य..... होय, ते मी पार पाडले आहे.

मला हेवा वाटत नाही. संताप नाही. तरीही मी सोसतो आहे. कोणी कधीही प्रेम केले नसेल असे प्रेम मी करीत आहे. माझ्या अपार दुःखावरून मला माझ्या अपार प्रेमाची जाणीव झाली. इतके स्पष्ट ते मला यापूर्वी कधीच दिसले नाही.

इतरांना वडिलाचे नाव मिळते. घराण्याची परंपरा आणि संपत्ती मिळते. माझ्यापाशी होते ते फक्त तुझे प्रेम. ते देखील त्या दुष्टांनी हिरावून घेतले.

आता त्यांना आणखी काय हवे आहे?

जगाचा उपहास, तिरस्कार टाळावा म्हणून तुझ्या वडिलांनी माझ्या मागणीचा अव्हेर केला. आणि म्हणून मला प्रिय असलेल्या स्त्रीचा मी त्याग करीत आहे. आयुष्याच्या अंतापर्यंत मला तिच्यावर प्रेम करायचे आहे. माझ्या उपकार कर्त्याचा मी शाप ओढवून घेतला असता आणि कृतघ्नतेचे लांच्छन पत्करले असते तर तुझ्या प्रेमाला मी अपात्र ठरलो असतो.

ज्या प्रेमाने आम्ही दोघे झपाटले गेलो ते प्रेम फार दारून आहे. आम्हाला काहीच माहीत नव्हते. माझ्या पोरकेपणाने आम्हाला समान बनवले. आता ताठा, अहंकार आमची ताटातूट करू पहातो.

मी चर्चा चिकित्सा नाही करीत. रडतो मात्र. या दुःखाबद्दल मला क्षमा कर. तू मला शिकवलेल्या सद्गुणात गुन्हा पाहू नकोस. संकटाना मी भीत नाही. त्यांची मला ओढ आहे. कारण ती धैर्याला जाग आणतात. मृत्यूला सामोरा जाण्याइतका निधडेपणा माझ्या अंगी निश्चित आहे. त्याचप्रमाणे दुर्दैवाचे तडाखे सोसण्याची ताकद आहे. पण कृतघ्न व्हायचा मला धीर होत नाही.

इथून गेल्याशिवाय गत्यंतर नाही. तुझ्याशिवाय जाणे... म्हणजे माझ्याशिवाय जाणे... मरणकाळची यातना सुरू झाली आहे. परमेश्वर करो नि ती लवकर संपो.

तॉमास.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी पाच वाजता रॉबेर्त, हेलेना, अमिली, रिकार्द व तॉमास दिवाणखान्यात गोळा झाली होती. तॉमास कलकत्त्याला जात होता. इतर चौघेजण फिझाबादला परतत होते.

निघण्यापूर्वी आपल्या बालमित्राशी हस्तांदोलन करून हेलेनाने त्याला एक पत्र दिले. तिच्या हाताच्या थंडगार स्पर्शाने—कदाचित शेवटचा ठरणार असलेल्या स्पर्शाने त्याचे हृदय व्यथित झाले. दोघेही स्तब्ध झाली. ज्या संधिप्रकाशात प्रेमिकांच्या लज्जेला निवारा मिळतो त्या संधिप्रकाशात दोघानीही भरपूर आसवे गाळली. त्यापैकी कितीतरी तॉमासच्या हातावर सांडली.

अनुक्रमणिका

सुसज्ञ घोडे निघत होते. तॉमासचे मन—त्याचे जीवनच त्याला सोडून चालले होते. त्या जिन्याच्या शेवटच्या पायरीवर निश्चल अशी जी आकृती दिसत होती. ती म्हणजे दुःखाचा एक पुतळा.

हेलेनाच्या पत्रात खालील मजकुर होता.

तॉमास,

तुझा त्याग मला कळतो. तो पाहून मी थक्क होते. ज्या स्वर्गीय वातावरणात तू चढलास, तेथून तू खाली उतर असे मी तुला कसे सांगू? मी तसे केले तर तुझीच हानी होईल; तिची भरपाई माझे प्रेम करू शकणार नाही.

तुझ्या वीरोचित त्यागाने तू माझे हृदय व जीवन सर्वस्व हिरावून घेतले आहेस अशा वेळी माझे मन हर्षानंदाने नाचत आहे.

माझ्या पित्याला जननिंदेपासून मुक्त करण्यासाठी केवढाही त्याग केलास तरी मला तो थोडाच वाटेल. मी सर्वस्व पणाला लावीन. पण माझ्या मनाचा सौदा मात्र मी करू शकत व इच्छित नाही. कारण माझे मन माझे नाही. परमेश्वराचे आहे. एक वगळून सारे त्याग मी करीन. पण देवाच्या मूर्तीसमोर मी प्रेम करीत नसलेल्या पुरुषावर मी प्रेम करीत आहे, असे प्रतिज्ञेवर सांगणे माझ्या हातून कदापिही होणार नाही.

समाजाच्या उपरोधाची मला कदर वाटत नाही. माझ्याप्रमाणे प्रेम करणाऱ्या माणसांना समाजाचा उपरोध शिवू शकत नाही. माझ्या प्रेमाच्या संरक्षणाखाली तुझ्या प्रेमाचा अभिमान वाहात असताना मी उच्च स्वरात सर्वांना सांगेन की, मी त्याच्यावर प्रेम करते. होय, त्याच्या प्रेमाखातर तुमच्या साऱ्या तिरस्काराचा मी तिरस्कार करते. त्याचप्रमाणे तुमच्या सुखाचाही मी तिरस्कार करते.

माझ्या वडिलांना अडचणीतून सोडविण्याची पराकाष्ठा कर नि इतर बाबतीत माझ्यावर विसंबून राहा. परमेश्वरावर श्रद्धा ठेवू या. तोच कृपा करील.

हेलेन.

या पत्राने तॉमास सर्वस्वी विरघळून गेला. त्यात त्याला केवढा तरी आशय भरलेला दिसला. त्या अक्षरामागचे अफाट दुःख त्याला जाणवले.

तॉमास अफू पिऊ लागला.

अनुक्रमणिका

९

प्रवास

बॉलच्या रात्रीमुळे ॲमिली बागेतले अप्रिय प्रकरण विसरली होती. तिच्या मनात रिकार्दबद्दल उत्पन्न झालेली अढी आता गेली होती. उमलणारे यौवन, कृतज्ञतेची भावना आणि सुखस्वास्थ्याची लालसा या गोष्टीमुळे त्या दोघांमध्ये पुन्हा मैत्रीचे संबंध दृढ झाले होते. आपण तिला बहाल केलेली बुद्धिमत्ता आणि चातुर्य यांचा तोल सांभाळण्यासाठी परमेश्वराने जणू तिच्या मनात अहंकाराचे बीज पेरले होते. सगळ्या मोहांसमोर जी पाषाणाप्रमाणे स्थिर राही, तीच स्मृतीसमोर मेणाप्रमाणे मऊ होई. ॲमिली सहजासहजी विरघळत होती. रिकार्दला ह्या ‘सॅम्सन’ ला जिंकायचा होता, त्याला शक्ती कुठून मिळते याचा रिकार्दला थांग लागला होता. आता प्रश्न होता, तो कालांतराचा. प्रत्येक किल्ल्याला कुठेतरी दुबळी बाजू असते. प्रत्येक हृदयाला खोलगे असतात.

“कुणाला ठाऊक, परमेश्वरानंच ही बळकट फांदी मला आधारासाठी दिली नसेल?” ॲमिली स्वतःलाच प्रश्न करीत होती. जे भाग्य माझ्याकडे चालून आलेले आहे नि जे माझ्यावर फुलांचा वर्षाव करीत आहे त्याचा मी अव्हेर का करावा? नि हा माणूस एक खुशाल–चेंडू आहे याचा निर्वाळा मला कोण देऊ शकेल? बॉलच्या रात्री केवढ्या अभिमानाने त्याने माझी बाजू सावरून धरली! मी विवेकाने वागले पाहिजे हे मला कळते; पण फाजील चिकित्साखोर बनून माझ्या भेटीला येत असलेल्या हंसऱ्या सुदैवाकडे मी पाठ का म्हणून फिरवावी? तसे करणे आत्मघातकीपणाचे ठरणार नाही काय?

सगळ्याच बायकांच्या मनांत असले कलह माजत असतात. ते भयंकर असतात यात शंका नाही. ज्या हरत नाही त्या भाग्यवान.

अशा दुर्धर प्रसंगी स्त्रियांचे विचार खळबळ उडवतात. कल्लोळ उत्पन्न करतात. कधी पर्वत होतात. कधी टेकड्या होतात. कधी उंच सखल मैदाने होतात. कधी दऱ्या होतात. कधी प्रचंड गुहा होतात. कधी लाटांप्रमाणे आकार बदलतात. सगळे झटपट होते. सगळीकडे धोकेच धोके. इतक्या चांगल्या पण दुबळ्या स्त्रीला तोंडघशी पाडण्यासाठी त्यांचे संगनमत होते.

ॲमिली भोळीभाबडी स्त्री नव्हती. चातुर्याची देणगी परमेश्वराने तिला भरपूर दिली होती; पण तिला जगाचा अनुभव नव्हता. ज्यांना प्रेमाचा मार्ग ठाऊक असतो त्या स्त्रिया या समुद्रात निर्भय प्रवास करतात. पाण्याखाली दडलेल्या खडकाची त्यांना माहिती असते. काही थोड्या अशा असतात की, त्या पडता पडताच स्वतःला सावरून धरतात नि हे अशा सफाईने करतात की, अतिशय चोखंदळ निरीक्षकांच्या नजरेलाच तिच्या मुद्रेवरील क्षणिक पतनाचे अवशेष दिसून यावेत. कुमारी फसतात. विवाहित घसरतात.

स्त्रीचा दुबळेपणा हेच तिचे औदार्य. ती दुबळी असते कारण ती साधी सरळ असते. सगळ्याबद्दल अविश्वास बाळगण्यासारखा असताना ती कोणाचबद्दल अविश्वास बाळगीत नाही. आपल्या प्रियकराच्या डोळ्यात तिला पापाचे डाग दिसत नाहीत. आणि स्तुतिपाठकांच्या शब्दात तिला सर्पाची शीळ ऐकू येत नाही. ती आजूबाजूला पाहात नाही. कारण तिला लाजलज्जा असते. ती वळून मागे पाहात नाही. कारण

तिल अनुताप तसे करू देत नाही. ती पुढे पाहात नाही कारण, ती प्रियकरावर विसंबून असते. ती त्याच्या हाताचा आधार घेऊन बंद डोळ्यांनी प्रश्न न करता, चालते नि वाटेत हा कपटी पुरुष तिला तेथेच सोडून पळ काढतो; तेव्हा ती बेशुद्ध होऊन पडते. मग जे दिसते व जे दिसत नाही त्यामुळे तिचा थरकाप होतो. तिचे कुटुंब, तिची लाज, तिची प्रतिष्ठा सारे मागे राहाते. पुढे रहाते ती तिची दुर्दशा! परतणे अशक्य असते. पुढे जाणे भयंकर असते. परमेश्वरा, तुला तिची दया येत असेल तर मृत्यूला तिच्या सोबतीला पाठव. तोच तिचा एकमेव निवारा. जीवित म्हणजे सुळावरची पोळी. गमावलेला लोकादर कसा मिळवायचा? जो पुन्हा अलभ्य असल्यामुळे दैवी तेजोवलयात गुरफटलेला दिसतो. तिला कापरे भरविणारे लोकांचे उपहास तिला आता कसे टाळता येतील? बिचारीचे दुर्दैव किती दारून!

प्रेमात सर्वस्वाने उडी टाकणे आणि त्याच्यापासून दूर रहाणे या दोन गोष्टींच्यामधील वाट आपण पसंत केली आहे असे ॲमिलीला वाटले. बिचारी चुकत होती. प्रेम हेच आधी एक कोडे. होय किंवा नाही. पहिल्या पावलावर भवितव्य अवलंबून असते काहींचे पहिले पाऊल पडते ते नरकात उतरण्यासाठी, काहींचे पडते ते स्वर्ग गाठण्यासाठी.

प्रवासात रिकार्दने ॲमिलीबद्दल फारच आस्था दाखविली. तिच्याकडे विशेष लक्ष पुरविले. सुसंस्कृत पुरुषाला शोभेल अशी त्याच्याकडून तिला वागणूक मिळाली. प्रेमासंबंधी त्याने चकार शब्द काढला नाही. त्यासंबंधी तिला स्वतःलाच विचार करू दिला.

रात्रीच्या वेळी जेव्हा लमाणाने तळ ठोकला व तंबू ताणले तेव्हा रिकार्दने हेलेनाला व ॲमिलीला शिपायांच्या जेवणाचे दृश्य पहायाला बोलावले.

जगाच्या कोणत्याही भागात हिंदी शिपायासारखे कमी खाणारे व भुका सोसणारे दुसरे शिपाई असतील असे वाटत नाही. वोब्रेंचा व्हाइस्कॉउंट असे म्हणायचा की, माफक आहाराच्या बाबतीत हिंदी सैन्य आघाडीवर आहे. सोशिकपणात ते स्पॅनेश शिपायांना मागे टाकतात. शिपाई जेव्हा स्वारीवर निघण्याच्या तयारीत असतो तेव्हा नाचणीच्या पिठाच्या जाड भाकऱ्या तो घरी भाजायला लावतो. जितके दिवस स्वारीला लागतील त्याच्या दुप्पट भाकऱ्या तो आपल्याबरोबर घेता. एखादा ओढा किंवा झरा वाटेत लागला म्हणजे हा शिपाई येथे बसून एखादी भाकरी खातो. हेच त्याचे जेवण. दिवसाला दोन भाकऱ्यापेक्षा तो अधिक खात नाही. त्याच्या आहारातील साधेपणा इंग्रजी शिपायाच्या भरगच्च खाण्याजेवणाशी व्यस्त प्रमाणात असतो. त्याचा आहार एखाद्या जंटलमनचा असतो.

रिकार्दच्या शिपायाच्या जेवणात भाकऱ्याशिवाय दुसरे काही नव्हते. एका झाडाच्या मुळाशी त्याच्या गर्द पानांतून झरणाऱ्या शुभ्र चांदण्यात तीस चाळीस शिपाई बसले होते. प्रत्येकाच्यापुढे भाकऱ्याची एकेक चवड व तांब्याचा एकेकच लोटा होता. काही शिपाई भाकऱ्या खात होते तर काही गात होते.

दुसऱ्या झाडाच्या मुळाशी त्याच्या बुंध्याला अर्धवट टेकून एक इसम बसला होता. त्याच्याभोवती पाचसहा शिपाई चक्राकार बसले होते. झाडाला टेकून बसलेला ब्राह्मण उच्च आवाजात त्यांना काही वाचून दाखवीत होता. जवळच एक धुनी पेटली होती. तिच्यात नुकतीच तोडलेली ओली लाकडे कर्कश आवाज काढीत जळत होती. ब्राह्मणाच्या हातात हितोपदेशाचे पुस्तकच होते.

अनुक्रमणिका

तॉमास आणि त्याच्या मैत्रिणी हे वाचन लक्षपूर्वक ऐकू लागल्या. आपण पण ते ऐकूया.

“दरबार”— ब्राह्मण वाचीत होता— “म्हणजे गरीबाचें विष आहे. तरुण बायको ही म्हाताऱ्या नवऱ्याचे विष आहे.”

“भवितव्य, आपल्या कृत्यांच्या मदतीशिवाय घडत नसते. त्याला दोन चाके असतात एक परमेश्वराच्या मालकीचे. दुसरे माणसांच्या.”

“श्रमाशिवाय काहीच मिळत नसते. निजून राहिलेल्या वाघाला शिकार मिळत नसते.”

“नीच माणसांच्या संगतीत शिक्षण नीच बनते. समान माणसास ते समान बनते. श्रेष्ट माणसात ते श्रेष्ठ बनते.”

“गरीबांच्या शब्दांना किंमत नसते. गरिबांप्रमाणेच ते गरीब असतात.

“आता एक कहाणी ऐका”— ब्राह्मण बोलू लागला. “धर्मपूर शहरात राम नावाचा एक ब्राह्मण रहात असे. तो देवभीरू होता. व मोठ्या पुंजीचा मालक होता. परमेश्वराने त्याला जशी संपत्ती दिली होती तसाच त्याला एक मुलगा देऊन त्याच्या सुखाला पूर्णता आणली होती. त्याच्या मातापितरांनी त्याचे एवढे लाड केले, त्याच्या इतक्या लहरी सांभाळल्या की, त्याने तारुण्यात प्रवेश केला तेव्हा तो त्यांच्या आज्ञा मानेनासा झाला. स्वतःच्या चैनीत गुंग असल्यामुळे इतरांना तो त्रासदायक होऊ लागला. त्याच्या स्वैर वागणुकीमुळे त्याची आई खंगत गेली आणि थोड्याच अवधीत तिचा अंत झाला. मुलगा व्यसनी व बदफैली निघाला. वयाच्या सोळाव्या वर्षी तो धर्मपूरच्या गुंडाचा राजा झाला. त्याच्या पदरी उमदे घोडे होते, त्याचप्रमाणे सुंदर स्त्रिया होत्या. त्यात जुगाराच्या व्यसनाची भर पडली होती.

पितृप्रेमातून निघालेली सारी दक्षता, कायद्याने बहाल केलेले सारे उपाय यांचा रामाने मुलाच्या स्वैर वर्तनाला आळा घालण्यासाठी भरपूर उपयोग केला. पण व्यर्थ!

मुलाच्या विवंचनेच्या भाराखाली रामा आजारी पडला. मरणकाळ जवळ ठेपला आहे असे दिसून येताच त्याने घराजवळ एक फास तयार करवून घेतला. आणि मुलाला जवळ बोलावून म्हटले, “ज्या वेळी या जगात तू अगदी एकाकी पडशील, तुला एकदेखील मित्र राहाणार नाही आणि तू दैन्यदारिद्र्यात पडशील तेव्हा आयुष्याचा अंत करण्याचा विचार तुझ्या मनात येईल, त्या वेळी तुझ्यासाठी तयार करून ठेवलेल्या या फासाचा उपयोग कर”

मुलाने बापाच्या या उद्दामपणाची थट्टा केली. बापाला उत्तर केले ते हेच. रामा दोनच दिवसांनी मरण पावला.

थोड्याच काळात रामाच्या मुलाने आपली संपत्ती उधळून टाकली. व तो वैभवातून दारिद्र्यात आदळला. ओळखीची माणसे पांगली. सगळ्या चैनीचा शेवट झाला. महिनेच्या महिने विवंचनेत कुढू लागला. जीवनार्थ कलहाचे सारे उपाय खुंटले. जुन्या थाटमाटाची, डामडौलाची शिक्षा मिळाली. दैन्यात

दिवस घालवू लागला. अशा स्थितीत असताना एक दिवस एका मित्राने त्याला आपल्याकडे जेवणाचे निमंत्रण दिले.

रामाच्या मुलाने चांगला पोषाख चढविला. मित्राला भेट म्हणून नेण्यासाठी घरामागच्या झाडाचा एक पिकलेला आंबा तोडला, त्याच्या घरापासून मित्राचे घर बरेच दूर होते. बाहेर ऊन रखरखत होते. बरीच वाट चालून झाल्यावर तो थकला व विश्रांतीसाठी एका बांधावर झाडाच्या सावलीत आडवा झाला. जवळच आंबा ठेवला. इतक्यात तेथे रामाचा आत्मा एका गिधाडाच्या रूपात उतरला आणि क्षणार्धात त्याने ते फळ उचलले. “महादेवा”!— संतप्त होऊन रामाचा मुलगा ओरडला— “झाडावर इतके आंबे असताना हा दुष्ट माझाच आंबा का घेऊन गेला? आता मी काय करू?”

तो मित्राच्या घरी पोहोचला तेव्हा प्रथम त्याने वाटेत घडलेला प्रकार मित्राच्या कानावर घातला.

“हाः हाः!”— आपला हंशा दाबण्याचा प्रयत्न करीत मित्र म्हणाला— “मोठी गंमतीदार गोष्ट आहे ही! तुला वाटतं मला तुझ्या आंब्याची गरज होती?”

मित्राच्या या थट्टेने रामाच्या मुलाला मरणप्राय दुःख झाले. त्याला खरमरीत उत्तर द्यावे असे वाटले. पण गरीबीमुळे त्याचे तोंड बंद झाले. धनिकांना गरीबांशी वाद घालीत बसण्याची सवय नसते.

दोन महिन्यानंतर रामाच्या मुलाची अन्नान्न दशा झाली. सगळे उपाय संपले होते. शेवटी आत्महत्येचा उपाय सुचला. त्याला बापाच्या उद्‌गाराची आठवण झाली. तो फासापाशी आला. आणि वाळवीने कदाचित तो पोखरून टाकला असेल अशा शंकेने तो त्याचे बारीक निरीक्षण करू लागला. ही तपासणी चालू असताना दोन लाकडी खांबावर ठेवलेली पाटी मधोमध भंगली आणि तिच्यातून हिरे, माणिक, मोती इत्यादी रत्नांचा सडा जमिनीवर पडला.

“पितृप्रेमाचे रहस्य!”— पश्चात्तापदग्ध रामाचा मुलगा गहिवरून उद्‌गारला आणि त्याने फासाच्या खांबाला मिठी घातली.

या प्रकारानंतर आठच दिवसांनी रामाने आपले घर पूर्ववत शृंगारले. तो आता नेमस्त राहू लागला.

रामाच्या मुलाच्या आकस्मिक भरभराटीची वार्ता लवकरच सर्वत्र पसरली. लोक चर्चाचिकित्सा करू लागले; पण कुणालाच त्याच्या भाग्याचे खरे कारण कळून आले नाही. त्याचे अभिनंदन करण्यासाठी त्याचे जुने मित्र मोठ्या आस्थेने त्याच्या घरी जाऊ लागले.

एक दिवस त्याचा शेवटचा मित्र आला. मोठ्या उत्कंठतेने त्याने त्याच्या या नव्या वैभवासंबंधी पृच्छा केली.

“ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे—” रामाचा मुलगा म्हणाला— “या जागी मी बसलो होतो. सुखाची आशा सोडन, अगदी निराश होऊन. अशावेळी घराच्या एका कोपऱ्यात मुंग्याची एक रांग पाहिली ती सोन्याची एक भली मोठी पहार घेऊन जात होती. मी ती उचलून आणली आणि विकून टाकली.”

अनुक्रमणिका

“कदाचित तेथे दुसरी एखादी पहार असू शकेल.” त्याचा मित्र गंभीर व विचारी मुद्रेने म्हणाला—“मी प्रयत्न करून पाहू का?”

रामाच्या मुलाने उत्तर केले नाही.

बऱ्याच वेळानंतर तो मित्र जाण्यासाठी उठला, तेव्हा रामाच्या मुलाने खोचकपणे म्हटले.

“एक पक्षी आंबा उचलून घेऊन जाऊ शकतो या गोष्टीवर तुझा विश्वास बसत नव्हता. आणि मुंग्या सोन्याची पहार घेऊन जात होत्या या गोष्टीवर आज तू विश्वास ठेवतोस, याचं कारण मी तुला विचारीत नाही. ते मला माहीत आहे. त्या वेळी मी गरीब होतो. माझ्या शब्दांना किंमत नव्हती.”

त्याचा मित्र मान खाली घालून मुकाट्याने निधुन गेला.

ब्राह्मणाने पुस्तक मिटले.

अनुक्रमणिका

१०

नवे मोह

फिझाबादला रिकार्द हेलेनभोवती रुंजी घालू लागला. व तिच्याशी प्रणयचेष्टा करण्यात दंग झाला. या दिवसात त्याला ॲमिलीचा सपशेल विसर पडला. या उपेक्षेची ॲमिलीला जाणीव झाली तेव्हा ती संतापली. दुसऱ्याचे हृद्गत त्याच्या मुद्रेवरून ताडण्यात तरबेज असलेल्या रिकार्दला ॲमिलीच्या मनात चाललेल्या कलहाचा ठाव लागला.

एक दिवस ॲमिली मॉझार्टची एक चीज पियानोवर वाजवीत होती. रिकार्द अवचित खोलीच्या दाराशी आला. निस्तेज, कापरा, उत्कंठेने भरलेला असा. त्याला तशा अवस्थेत पहाताच तिने एक किंकाळी फोडली.

“मी परत जाणार नाही. आज तीन दिवस मी तुझ्याशी बोलण्याचा प्रयत्न करतोय. दररोज इथपर्यंत येतो नि परत फिरतो. आज माझं हृद्गत तुला कळवल्याशिवाय मी इथून हलणार नाही.”

“हे पहा, लोक ऐकतील.”

“बागेत एक फेरफटका मारून येऊ.” असे घाईघाईने बोलून त्याने हात पुढे केला. तो आपल्या हातात घेत ती उठली.

मग दोघेही जिना उतरून बागेत आली. आणि तलावाकडे जाऊ लागली.

“ही जागा तुला त्रासदायक होत असली तर सांग— “रिकार्दने एका लोखंडी बाकावर बसत व आपल्या शब्दांचा तिच्या मनावर कोणता परिणाम होत आहे हे आपल्या धूर्त नजरेने पाहात म्हटले.

“त्रासदायक? ... का”? रिकार्दसमोर असलेल्या एक वेताच्या खुर्चीवर बसून तिने म्हटले— “तुझ्या बोलण्याचा अर्थ मला नाही समजला.”

“मला देखील तुझ्या अलीकडच्या वागणुकीचा अर्थ कळत नाही.”
“ते फूल पहा किती सुंदर दिसते ते! काही दिवसापूर्वी तेथे एक कळी होती.” ती म्हणाली.
“माफ कर. कोड्याची भाषा मला कळत नाही.”
“यात कठीण काहीच नाही.”

“आता आलं ध्यानात. तुला सांगायचं आहे की, काळ हा सगळ्या गोष्टीत बदल घडवून आणतो. खरं की नाही? तुझ्यात देखील असाच बदल झाला तर काय बहार होईल.”

यावर ॲमिली बोलली नाही. ती नुसती हसली.

अनुक्रमणिका

“माझ्या हातून त्या दिवशी अविचार घडला हे मला मान्य आहे. मला क्षमा कर. प्रेमाचाच अतिरेक आहे तो. कदाचित मी तुला मुकेन ही भीतीही असेल. माझ्यासारख्या अल्पपरिचयाच्या पुरुषाचं तू झटपट स्वागत केलं असतं तर त्या वेळी कदाचित मी तुझ्या त्या छचोरपणावर खूष झालो असतो; पण आज तुझ्या वर्तनाचा मी धिःकार केला असता.”

“माझं वागणं तुला बरोबर वाटलं यात मला आनंद आहे. मी तुझी फार फार आभारी आहे.”

“पण आता”— रिकार्द दबलेल्या स्वरात म्हणाला— “मला ओळखण्याइतका तुझा माझा सहवास वाढला आहे. तुला कळून आलं असेल की, माझं तुझ्यावर उत्कट प्रेम आहे. नि ते या बागेइतकंच तजेलदार नि सूर्याइतकंच धगधगीत आहे. आमच्या पहिल्याच भेटीपासून एका अदृश्य धाग्यानं मी तुझ्याशी जखडत गेलो. माझ्या हृदयावर तुझी मूर्ती इतकी ठसली आहे की, माझ्या भोवतालच्या एकंदर वस्तूत मला तुझं प्रतिबिंब दिसत आहे. प्रत्येक दिवशी तुझ्यात मला नवंनवं सौंदर्य प्रतीत होत आहे. त्या ‘ब्रिगाडीए’ने दिलेल्या बॉलमध्ये तुला दिसून आलंच असेल की, मी माझ्या चुकीची भरपाई केली. सगळ्या स्त्रियांत तू उठून दिसावीस अशा पद्धतीनं मी त्या रात्री तुझ्यासमवेत नृत्य केलं. तुझ्या जयजयकारात मी धन्यता मानली. ॲमिली, इतःपर माझ्याशी अशा दुजाभावानं बोलू नकोस. तुझ्या निष्कपटी स्वभावाला ते शोभत नाही.”

ॲमिलीने आपली नजर रिकार्दवर स्थिर केली होती. त्याच्या प्रणयचेष्टांना, भावनेच्या नाटकी प्रदर्शनाला व बेहोषीला एखादा देवदूतच बळी पडला नसता ॲमिली ही एक स्त्री होती. तिने सगळ्याच गोष्टींवर विश्वास ठेवला.

“रिकार्द, मला असा नवरा हवा की, जो माझ्यावर मनापासून प्रेम करील नि त्या प्रेमासाठी या क्षुद्र व अहंकारी जगाची कदर करणार नाही. पण तुला एक सांगते, तू विचारपूर्वक पाऊल टाक. तुझ्या या वयात मनाचा चंचलपणा स्वाभाविक आहे. नि प्रेमाच्या थिल्लर प्रदर्शनाबद्दल अविश्वास बाळगणं हे आम्हा स्त्रियांना क्षम्य आहे. प्रेमाचे देखावे पुष्कळवेळा फसवे असतात. जेव्हा प्रेमाचे पहिले आवेग ओसरतात तेव्हा काहीच शिल्लक राहात नाही किंवा राहिलीच तर ती करुणा राहाते, जी धिःकारापेक्षाही जाचक असते.”

“मी खूप विचार केला आहे, ॲमिली, आणि माझा निर्धार कायम झाला आहे. जगाला अचंबा वाटण्यासारखं माझ्यात काय आहे? तू सुंदर आहेस, आकर्षक आहेस, बुद्धिमान व शीलवान आहेस. माझं प्रेम आंधळं नसतं तरीदेखील इतकी योग्य निवड त्यालादेखील करता आली नसती. चारित्र्याच्या प्रकाशात उजळलेलं प्रेम खोटं असूच शकत नाही.”

रिकार्द स्तुतीचा वापर करण्यात कुशल होता. आणि ॲमिलीला सर्वसाधारण स्त्रियांप्रमाणे त्या स्तुतीतील धोके हेरता येत नव्हते. स्तुती हा सगळ्या स्त्रियांचा ‘इव्ह’चा शाप आहे.

तरुण रिकार्द काही वेळ मुकाट राहिला. मग ॲमिलीचा कापरा हात आपल्या हातात घेऊन त्याने भावानावेगाने त्याचे चुंबन घेतले.

अनुक्रमणिका

ॲमिलीच्या हृदयातील द्वद्व रेखाटणे दुर्घट आहे. तिचे मस्तक सुन्न झाले होते. क्षणात त्याची काहील होई. क्षणात ते बर्फाप्रमाणे थंडगार होई. क्षणात ते पिसाट होई. क्षणात सुज्ञ होई. विविध विरोधी संवेदनाचा असा अनुभव तिला आयुष्यात कधीच आला नव्हता. त्यामुळे ती विलक्षण गोंधळली. हर्षानंदाच्या या अवस्थेत तिला एक चिंता जाळीत होती. आपले कुठेतरी चुकत आहे. ही टोचणी तिला अस्वस्थ करीत होती.

एक शंका तिच्या मनात चमकून गेली. “जर रिकार्द—”

अनुक्रमणिका

११

अंधत्व

प्रेमाची गती फार शीघ्र असते. रिकार्दच्या ॲमिलीशी गुप्त गाठीभेटी वारंवार होऊ लागल्या. तॉमासची अनुपस्थिती, हेलेनची उदास मनःस्थिती आणि रॉबेर्तच्या विवंचना या गोष्टीमुळे त्यांच्या प्रणयाला मोकळे रान मिळाले.

आपल्या शेवटच्या किरणांचा फिझाबादवर सोनेरी शिडकाव करून सूर्य मावळू लागला म्हणजे दोघेही हलक्या पावलांनी व उल्हसित मनाने व्हरांड्यात येत. हळूहळू सौम्य चंद्रकिरणात ती न्हाऊ लागत. फुलांचे सुगंध दरवळू लागत. झऱ्यांचा मर्मर ध्वनी त्यांचे स्वागत करी. मग त्यांच्या धुंद प्रेमालापांना बहर येई. प्रतिज्ञांना ऊत येई. वचने देत. आसवे ढाळीत. भविष्यातले मनोरे उभवीत. चिरंतनाची स्वप्ने कुरवाळीत. अफाट हृदय एवढ्या नानाविध आनंदाला तोकडे होई.

प्रियकर व प्रेयसी एकमेकांत बुडून एकजीव होतात तेव्हा प्रेम पूर्णत्व गाठते. कवी कामॉंइशच्या म्हणण्याप्रमाणे प्रणयी जीव एकमेकात विसर्जित होतात, तेव्हा त्यांच्या भाग्याला पारावार नसतो, त्याचवेळी खरे हृदय जाणवते. खरे जीवन प्रकट होते. खरे स्वप्न आकार घेते. खरा विचार उभा राहतो. ज्या वेळी एक दुसऱ्यासाठी जगतो त्याचवेळी म्हणता येते की **J'ai mal a votre poitrine** (माझी वेदना तुझ्या हृदयात)

रिकार्दला वाहिलेल्या प्रेमात ॲमिलीला आवेग, हुरहूर, हर्ष इत्यादी साऱ्या भावनांचा अनुभव आला होता. तिने त्याला आपले मन अर्पण केले होते व ती त्याची अक्षरशः दासी झाली होती. त्यासाठी तिने सर्व नीतीसंकेत व कर्तव्ये यांच्याकडे पाठ फिरवली होती.

तिच्या सुखाच्या आकाशात एखादा काळा ढग तरंगू लागला म्हणजे रिकार्दच्या ममतेने तो विरघळून जाई.

"माझी फसवणूक! ... आणि त्याच्याकडून!"

कधी कधी हा भयंकर विचार एखाद्या राक्षसाप्रमाणे तिच्यासमोर उभा राही. तेव्हा रिकार्दची आवडती मूर्ती ती व तिचा सैतान यांच्यामध्ये उभी ठाके.

"तसं कदापी होणार नाही."

मग तो राक्षस पळ काढी. तिच्या शंका निरसत.

ॲमिली फार पुढे गेली.

अनुक्रमणिका

दुसरी संध्याकाळ. व्हरांड्यातच्या भेटीची. तॉमासला पत्र लिहून तुला मी मागणी घालतो असे रिकार्दने तिला कबूल केले होते. पण जवळजवळ आठ महि लोटले तरी त्याच्याकडून उत्तर आले नाही असे रिकार्द म्हणाला.

ॲमिली त्या निकालाची मोठ्या उत्कंठेने प्रतिज्ञा करीत होती. कारण त्याच्यावर तिचे सुखसर्वस्व अवलंबून होतेच पण त्यापेक्षाही तिची अब्रू अवलंबून होती. प्रत्येक रात्री ती याबाबतीत रिकार्दशी पृच्छा करी.

शेवटी एक दिवस आपल्या प्रियकराच्या पायावर लोळण घेऊन ती ओक्साबोक्शी रडू लागली. तिच्या तोंडातून शब्द फुटेना. तिचे शरीर थरथर कापू लागले.

बऱ्याच स्तब्धतेनंतर ती म्हणाली, “यापुढे मात्र ही स्थिती मला लपवून ठेवता येणार नाही. मी शरमेनं मरते.”

हे शब्द कानावर पडताच रिकार्द दचकला. आपल्या दुष्टपणाची जाणीव असूनही त्याला स्वतःचाच तिरस्कार आला. कधी कधी भूकंप खडक मुळासकट उपटून टाकतो. नजिकच्या संकटाच्या जाणीवेने हतबुद्ध होऊन रिकार्दने त्वेषाने आपले हात पिरगळले. मग मन स्थिर करून तो निर्धाराने म्हणाला—

“मला थोडा वेळ विचार करू दे. माझ्यावर विश्वास ठेव, ॲमिली.”

त्या अभागी स्त्रीने उत्तर केले नाही. त्याचा हात आपल्या हातात घट्ट धरून ती हुंदके देत होती.

काही क्षणानंतर एक नवी कल्पना सुचल्याप्रमाणे रिकार्द उल्हसित होऊन म्हणाला, “मी उद्याच कलकत्त्याला जाऊन तॉमासचे उत्तर घेऊन येतो.”

“मला अशा स्थितीत सोडून जाणार तू? ही गोष्ट अशक्य आहे.

“मग मी काय करावं असं तुला वाटतं? मी काही जास्त दिवस थांबणार नाही. मी येईपर्यंत तुझी इमानी तारा तुला सोबत करील.”

“तोपर्यंत तू मला दिसणार नाहीस! नाही, हे शक्य नाही!”

“स्वर्गातील देवांची, तुझ्या माझ्या सुखाची, तुझ्या पोटांतील अदृश्य जिवाची तुला शपथ आहे. मला अडवू नकोस.”

रिकार्दच्या शब्दात व आवेशात त्याचा आत्मविश्वास उमटत होता.

“किती दिवस लागतील?”

“ते मी कसं सांगू? कदाचित पंधरा—”

“पंधरा? नाही रिकार्द, नाही—”

अनुक्रमणिका

“तुला माहीत आहे की, ही गोष्ट माझ्या हाती नाही. शक्य तितक्या लवकर तुला भेटण्याची मी शिकस्त करीन.”

“देतोस वचन?”

“शपथ घेतो.”

तिच्या डोळ्यात तिचे मन फुटू पाहात होते. करुणेचे अवशेष त्याच्या हृदयात मरत होते. विस्तवासमोर बर्फ होते.

थोडा वेळ थांबून ती म्हणाली, “आणखी एक गोष्ट कबूल कर.”

“तू सांगशील ते करीन. बोल.”

“देवाच्या मूर्तीसमोर पाद्री फ्रान्सिश्कु नैवेद्य दाखवतात. तेव्हा आठ महिन्यापूर्वी तू ज्या जागी शपथ घेतली होतीस त्याच जागी त्या थपथेचा पुनरुच्चार तू पुन्हा करून दाखवायला हवा.”

“तुला वाटतं माझ्या हातून—”

“मला तशी भिती वाटत नाही. त्यापेक्षा मी मरण पत्करीन. माझ्या मनोदेवतेचा तो आदेश आहे. त्याची पूर्तता केल्याशिवाय मी राहाणार नाही.”

“ॲमिली तू एक देवता आहेस.”

“उद्या शनिवार. आठ वाजता सकाळी पाद्री फ्रान्सिश्कु प्रार्थनेला येतील. त्या वेळी तू चर्चमध्ये आल्याशिवाय राहू नकोस.”

“माझ्या प्रतिज्ञेचा मी पुनरुच्चार करीन.

“ते मग पाहू.”

“तुझ्या इच्छेप्रमाणे होऊ दे. माझी तयारी आहे.”

रिकार्दने तिच्या तप्त कपाळाचे चुंबन घेतले.

दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता ॲमिली चर्चमध्ये गुडघे टेकून बसली होती. तिच्याबरोबर तारा व आणखी दोन दासी होत्या.

ॲमिलीच्या मागे रिकार्द होता.

अनुक्रमणिका

आठ वाजता प्रार्थना सुरू झाली. ॲमिलीने Veni Creator ही प्रार्थना म्हटली. कारुण्याने तिच्या आवाजाला मार्दव आणले होते. आणि तिच्या हृदयावर असलेला दुःखभार तिच्या गळ्यातून निघणाऱ्या स्वरात कंप व सौंदर्य ओतीत होता. आणि तिचे हुंदके सर्वशक्तिमान व दयाळू परमेश्वराच्या पायाशी नेत होता. त्या निःश्वासात ऑगनचे निःश्वास मिसळत होते.

घंटी वाजली. नैवेद्याची वेळ झाली. सगळ्यांची मस्तके वाकली. पाद्री फ्रान्सिश्कु ख्राइस्टची मूर्ती उचलीत असताना ॲमिलीने आपल्या तोंडावरील वस्त्र बाजूला सारले. आणि मान उंच करून रिकार्दला म्हटले.

“प्रतिज्ञा करतोस ना?”

“हो.”

“एवढंच पुरे.—” ॲमिली उद्गारली.

मग आपली नजर तिने ख्राईस्टकडे वळविली. जणू काय ती परमेश्वरालाच विचारीत होती.

“ऐकलंस ना?

अनुक्रमणिका

१२

खंदक

शपथेनंतर तीन दिवसांनी रिकार्द कलकत्त्याला जायला निघाला. त्याचा वियोग ॲमिलीला अतिशय दुःसह झाला. त्या रात्री ती खोलीतून बाहेर पडली. व्हरांड्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत धावत गेली आणि तिने चौफेर नजर फेकली.

बागेतली झाडे तिथेच होती. आकाशातील तारे अजून लोपले नव्हते. तेथे वहाणारे वारे तेच होते. सारे काही तेच होते. रिकार्द तेवढा नव्हता. सगळ्यांपाशी ती त्याची मागणी करीत होती. पण कोणीच तिला तो देऊ शकत नव्हते. तो म्हणजे तिचे विश्व होता. तिचा स्वर्ग होता. तो बसत होता, त्या सगळ्या जागांना तिने स्पर्श केला. त्याच्यावर अश्रू ढाळले. त्या अवकाशात त्याला हजारदा पाहिला. त्याचे चुंबन घेतले.

बराच वेळ ती निश्चल राहिली. एक कल्पना तिच्या मस्तकात चमकली. वेळ न दवडता तिने रिकार्दच्या खोलीकडे धाव घेतली. दार जोराने लोटले. तसे ते उघडले. ती आत गेली मग केवढा वेळपर्यंत आपल्या प्रियकराच्या आठवणीने निश्चल झाली. वेडीपिशी झाली. मग त्या अंधारात चांचपडत फिरू लागली. मेजावरची काड्याची पेटी हाताला लागली. काडी पेटवली. त्या प्रकाशात पत्राची एक घडी दिसली. ती उचलली. ते पत्र रिकार्दचे होते. तिने त्याचे चुंबन घेतले. मग ती पुटपुटली.

"निरोपाचं पत्र माझ्या हाती द्यायला त्याला धीर झाला नाही" काडीच्या उजेडात ती पत्र वाचू लागली.

"माझा प्रिय मित्र जॉर्ज यास,

ही हिंदी मुलगी धूर्त असली तरी शेवटी ती चीत झाली. आता पहा म्हणावं या बायकांची धूर्तता. प्रत्येकीला एक दुबळी बाजू असते. ती हेरायला कौशल्य लागते. ॲमिली गर्विष्ठ होती म्हणून गर्वाच्या खिडकीतून मी तिच्या हृदयात प्रवेश केला. आता शिताफीनं इथून निसटण्याच्या विचारात आहे..."

या ओळी वाचताच आपल्या मस्तकावर कोणीतरी प्रहार केल्यासारखे तिला वाटले. आसपासच्या वस्तू गरगर फिरत आहेत असा तिला भास झाला. अक्षरे कागदावर तरंगू लागली. ज्योतीतून ठिणग्या उडू लागल्या. अंगात तुटत चाललेली शक्ती गोळा करीत ती पुढच्या ओळी वाचू लागली.

"बिचारी ॲमिली समजते की, माझे तिच्यावर प्रेम आहे आणि मी तिच्याशी लग्न करणार आहे. काय वेडेपणा! मी वचनबद्ध झालो आहे. माझ्या काकाची इस्टेट मिळवण्यासाठी मला हेलेनाशी लग्न केले पाहिजे,"

ॲमिलीला पुढे वाचता येईना. तिने आकाशाकडे हात उचलले. एक किंकाळी फोडली व बेशुद्ध होऊन खाली कोसळली. हातातल्या जळत्या काडीमुळे बिचारीची दोन बोटे भाजली.

अनुक्रमणिका

दुःख मोठे असले म्हणजे ते हृदयात मावत नाही. मग त्याचा स्फोट होतो. एका हिंदी रणशिंगाचे स्वर कानांचे पडदे फाडून टाकतात, त्याप्रमाणे दुःखाची गत आहे. दुःखाचा अतिरेक म्हणजे वेड. आणि वेड म्हणजे बधिरता. दुःखाची धुंदी फार काळ टिकत नाही. तिचे परिणाम मात्र दाहक असतात. ॲमिली थोडा वेळ मूर्च्छित झाली. पण शुद्धीवर येताच तिच्या मनात ज्या विचारांचे वादळ माजले, त्यांनी तिच्या मनाच्या चिंधड्या उडविल्या. त्यांचे वर्णन कोण, कसे करू शकणार?

तिच्या प्रेमाचा अत्यंत नीचपणे धिक्कार झाला होता. तिची फसवणूक झाली होती. तिच्या भूतकाळातील प्रेमाच्या साऱ्या आठवणी तिला लज्जास्पद वाटाव्या अशाच होत्या. भविष्यकाळात तिला कोणताच आशाकिरण दिसत नव्हता. सगळीकडे तिला भकास, शून्य दिसत होते आणि हे सारे थोडे म्हणूनच की काय, जगणे तिला टळत नव्हते. तिला वाटले, आपल्या या अवस्थेइतकी दुर्धर अवस्था दुसरी कोणतीच नसेल.

विश्वास हे प्रेमाचे पहिले भाग्य. अविश्वास ही त्याची शेवटची आपत्ती.

ॲमिली वेड्याप्रमाणे खोलीतून तडक बाहेर पडली. धावतच तिने व्हरांडा ओलांडला आणि तिची आवडती दासी तारा तिला दिसली मात्र, ती रडत, हुंदके देत तिच्या गळ्यात पडली. बडबडू लागली.

“त्याचं माझ्यावर कधीच प्रेम नव्हतं ग—कायमचा घात झाला— मला फसवलं—”

हे शब्द कसेबसे तिच्या तोंडातून निघाले. डोळ्यांतून घडघळा आसवे वाहू लागली.

अवचित तिचे रुदन बंद झाले आणि मान वाकडी पडली. तिला नर्व्हस ॲटॅक येत असल्याची ही सुरुवात होती.

तारेने आपल्या धनिणीला कॉटवर नेऊन निजविले. ती अभागी मृत्युसारखीच फिक्कट पडली होती. तिचे सर्वांग थंडगार पडले होते, ओठांतून अर्थशून्य शब्द निघत होते. हुंदक्यांनी ती गुदमरत होती. तिच्या इमानी दासीने तिला कसलेसे औषध हुंगायला दिले. त्यामुळे थोड्या वेळाने ॲमिलीने डोळे उघडले व ती प्रयासाने उठून बसली.

तारा तिची बारीकसारीक हालचाल पाहात होती.

ॲमिली उठून चालू लागली. पिशाच्चाप्रमाणे ती अगदी ताठ व मंद चालत होती. ती एका मेजापाशी गेली व तिने तिरीमिरीने त्याचा खण उघडला. त्यात पत्रांच्या चवडी होत्या. वाळलेली फुले होती. फुलांचे गुच्छ होते. केस होते. फोटो होते. काही वेळपर्यंत ते सगळे खोटे अलंकार तिने भकास नजरेने पाहून घेतले. मग थरथरणाऱ्या थंड हातांनी त्या सगळ्या वस्तू बाहेर काढल्या आणि फरशीवर टाकल्या.

मग एका जळत्या मेणबत्तीने तिने त्यांना भडाग्नी दिला.

क्षणार्धात, त्या ज्वाळांचा भयानक उजेड चोहोंकडे पसरला. धुराचे लोट छपराकडे धाव घेऊ लागले आणि व्हर्जिलच्या काव्यातील नायकाच्या हृदयातून, आपत्काली निघालेल्या आक्रंदनाप्रमाणे, जळणाऱ्या आठवणींचा कडकडाट होऊ लागला.

ॲमिली त्या वेळी जितकी गंभीर तितकीच भीषण दिसत होती. तिच्या अंगात एक शुभ्र झगा होता. ती अनवाणी होती. केस तोंडावर अस्ताव्यस्त पसरले होते. सताड उघडे डोळे जळजळीत दिसत होते. ओठांवर विकट हास्य नाचत होते. फड–फडणाऱ्या ज्वाळांभोवती तिची कापरी पावले पडत होती. धुराच्या काळ्या वलयात ती गुरफटली होती. जणू काय देवळातील संगमरवरी देवीच्या मूर्तीला अजगरांनी वेढा घातला आहे. अशी ॲमिली नरकातील वणव्याभोवती नंगानाच करणाऱ्या पिशाच्च्यासारखी दिसत होती. अपार निराशेची भकास मूर्तीच जणू! खुद्द वेडापेक्षाही भयानक!

ॲमिली पुन्हा निद्रा व जागृती यांच्यामधल्या भ्रमिष्टावस्थेत पडली. गुन्ह्याचे साक्षीदार समोरच्या आगीत जळून खाक होत होते. पण राक्षसाच्या कितीतरी खुणा अजून शिल्लक होत्या. त्या बिचारीला त्या होळीत टाकता येत नव्हत्या.

सकाळी ॲमिली उठली ती झोपेतून म्हणण्यापेक्षा मरगळीतूनच म्हटलेले बरे. गुन्हेगाराची जागृती ही महाजाचक असते. देवतांच्या कौलाला पहाटेची वेळ आवडते. त्या वेळी माणसांच्या साऱ्या शक्ती शीण गाळून ताज्यातवान्या झालेल्या असतात. अंतरंगातला दिवा सगळ्या अंधाराला भेदून जातो आणि भूतकालाचे शव आपले काळे वस्त्र फेकून देऊन शापित वर्तमानकाळासमोर डौलाने उभे ठाकते.

ॲमिली स्वतःचाच न्यायनिवाडा करीत होती. स्वतःलाच दोषी ठरवीत होती. स्वतःलाच शासन करीत होती. काही दिवसांपूर्वी जी स्त्री स्वतःच्या सामर्थ्याची प्रौढी मिरवीत होती, तिला आपल्या पावित्र कर्तव्याचा कसा विसर पडला? तिचे हात जखडून टाकणारी, तोंड बंद करणारी, डोळे अंध करणारी आणि बुद्धिभ्रंश करणारी ही शक्ती कोणती? कोणती ही जादू? कोणता हा संस्कार? आठ महिनेपर्यंत तिला शाश्वत तत्त्वांचा विसर कसा पडला? आणि तिने आपले पवित्र्य, आपली अब्रू–स्त्रीचे एकमेव वैभव तिला संरक्षण देण्यासाठी पुढे झालेल्या पहिल्यावहिल्या पुरुषाला सहजासहजी कसे देऊन टाकले?

ॲमिलीची निर्घृण चिकित्सा येथेच थांबत नव्हती. तिच्या गुन्ह्याचा भयानकपणा वाढविणाऱ्या दुसऱ्या काही गोष्टी होत्या. ती स्वतःची हेलेनाशी तुलना करी, तेव्हा तिला कापरे भरे तिची बालमैत्रीण ही उषेसारखी होती. पण तिचे दर्शन ॲमिलीला भीतीदायक वाटे. तिची ती दुसरी मनोदेवता होती. तिच्यात–हेलेनात ती स्वतःचे रूप पहात होती. आणि ते तिला विकट दिसत होते.

ॲमिलीच्या मनात हेलेनाबद्दल मत्सर निर्माण झालेला होता, परंतु त्याची चिकित्सा करण्याचा तिला धीर कधीच झाला नव्हता. त्यामुळे आपल्या बहिणीशी तिची वागणूक तुटक व तुसडी झाली होती. तिचा सल्ला ॲमिलीला या आपत्तीत उपकारक रला असता. आणि तिच्या अफाट दुःखाला हेलेनाने आपल्या उदार हृदयात थारा दिला असता. ॲमिलीच्या मनात आता पदोपदी हेलेनाची गोड व विनयशील मूर्ती वावरू लागली होती. तिने दाखविलेला अविश्वास व संशय, बेइमानीपणा, कृतघ्नता, स्नेहाची प्रतारणा इत्यादी गोष्टी हेलेना तिच्या तोंडावर जणू फेकीत होती. आणि हे आरोप ॲमिलीच्या दृष्टीने इतके खरे होते की, ती स्वतःचा बचाव करू शकत नव्हती. मुकाट्याने सारे सोशीत होती. ज्या श्रेष्ठत्वासाठी व वर्चस्वासाठी

ती इतकी तळमळत होती, तेच श्रेष्ठत्व–वर्चस्व तिला आता दुःखाच्या खाईत लोटू पहात होते. तिच्या व हेलेनामध्ये आता केवढी दरी पसरली होती. अब्रू व बेअब्रू यांच्यांत केवढी तफावत होती! ॲमिली व हेलेना यांच्यामध्ये केवढा खंदक 'आ' वासून पडला होता!

प्रियकराच्या बाबतीत अविचारी, बहिणीशी तुसडी, भावाशी कृतघ्न, सगळ्यांच्या दृष्टीने शीलभ्रष्ट असा आपला गतायुष्याचा दारुण निष्कर्ष तिने काढला होता.

आणि तिचा भविष्यकाळ? मृत्यूशिवाय मला दुसरे भवितव्य नाही.— ती मनात म्हणत होती— मी जिवंत राहिले तर जग माझ्याशी निष्ठुर होईल, मरण पत्करले तर कदाचित मला क्षमा करील. मला विसरून जाईल. मृत्यू सगळे हिशोब चुकते करतो. जीवनाला ते शक्य नसते. चिता पवित्र करते. परमेश्वराला माझी करुणा येईल. जिवंत रहायला तो परवानगी देणार नाही. लाजलज्जा असून बेअब्रू पदरी येणे यासारखे दुसरे मला शासन नाही.

दुसऱ्या दिवशी आपली बहीण आजारी आहे असे कळताच हेलेन तिच्या खोलीत आली. तिने पहिले चुंबन घेतले तशी ॲमिली दचकली. ते चुंबन एका कुमारिकेचे होते.

ॲमिली मग पुन्हा कधीच खोलीबाहेर पडली नाही. आजारी असल्याचा तिने बहाणा केला. जो वैदू आठवड्यातून एकदा तिला तपासण्यासाठी येई, त्याने सागितले की, तिला **Supra orbitaria nevralgia** हा आजार झाला आहे.

हेलेन, रॉबेर्तचे समाधान करण्यासाठी, वैद्यकीय अज्ञानाला जेथे वारंवार निवारा मिळतो त्या 'नर्व्हस सिस्टिम' वर तो वैदू व्याख्यान झोडी.

अशाप्रकारे दोन महिने गेले. ॲमिलीला फारच त्रासदायक, कंटाळवाणे असे. या अवधीत ती झुरत राहिली. हेलेन व रॉर्बर्त यांनाही तिची फार काळजी वाटे. शेवटी फिझाबादला तातडीने निघून येण्यासाठी तॉमासला पत्र लिहिण्यात आले.

कित्येक वेळा, ताराने आपल्या दुर्दैवी मालकिणीला काहीतरी दूर सारण्याच्या उद्देशाने हात झाडलेले पाहिले. हृदयद्रावक किंकाळी फोडून हताश पडलेली पाहिली. कित्येकवेळा रिकार्दच्या काल्पनिक सावलीशी बोलताना, चुंबने देताना पाहिले.

ॲमिलीच्या काळजीने व्याकुळ झालेली हेलेना दिवसरात्र डोळ्यांतून आसवे गाळीत होती. ॲमिलीच्या खोलीतून ती क्वचितच बाहेर पडे. तिच्या उशीलगत बसून तिच्या बारीक सारीक हालचालीवर नजर ठेवी. आणि तिचे मन उल्हसित ठेवण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करी. दुखणाईत उठली म्हणजे हेलेन आनंदित होई. आणि झोपली म्हणजे विषण्ण होई. ॲमिलीला वाचविण्यासाठी तिने आपले आयुष्य दिले असते. रात्रीच्या वेळी तारा तिची जागा घेई.

हेलेनाची खोली बरीच दूर होती. तरीदेखील एके रात्री ॲमिलीचे कण्हणे तिच्या कानावर गेले. घटकेत ते बंद होई. काही वेळाने पुन्हा सुरू होई.

अनुक्रमणिका

हेलेन धावत बाहेर पडली आणि घंटी वाजवली. तारा आली आणि हेलेनाच्या प्रश्नांना उत्तरे देऊन म्हणाली की, ॲमिली स्वप्नात अशीच बडबडत असते. हेलेनाला तिचे म्हणणे खरे वाटले.

दुसऱ्या दिवशी तारा बऱ्याच सकाळी हेलेनाच्या खोलीत गेली. ती अगदी हताश दिसली. तिचा चेहरा ओढलेला दिसला.

“आई ग! असं काय झालं तुला?”
“ॲमिलीबाईचं दुखणं वाढलं आहे” तारा स्फुंदत म्हणाली.
“दुर्दैव बिचारीचं” हेलेन कपाळाला हात लावून बोलली.

मग ती ताबडतोब कापत उठली आणि ॲमिलीच्या खोलीकडे धावली.

समोरचे दृश्य विलक्षण होते. ॲमिलीचे डोळे बंद होते गाल फिकट व खोल गेलेले. केस अस्ताव्यस्त, छातीवर पसरून फरशीपर्यंत आलेले.

“बाई! बाई!” तारा हलक्या आवाजात हाक मारीत होती.
इतक्यात ॲमिलीच्या तोंडून एक निःश्वास निघाला.

हेलेन वाकली व तिने तिला आपल्या बाहूत कवटाळली. आणि ती बेभान होऊन रडू लागली. ॲमिलीने बहिणीवर नजर टाकली आणि अतिशय मंद स्वरात म्हटले “क्षमा कर, ताई.”

तिचा श्वासोच्छ्वास जड व कष्टाचा होत होता.

हेलेनाने तिला किंचित उचलून ताराला म्हटले “चल पळ, डॉक्टरना बोलाव.”

मग बहिणीकडे वळून ममताळू स्वरात बोलली “काय झालंय ते सांग ना मला.”

“मरणापूर्वी मला क्षमा कर. तुझ्या पायांना स्पर्श करण्याची देखील माझी लायकी नाही. माझा तिरस्कार कर. पण दया कर. तू देवता आहेस. त्या माणसानं मला फसवलं... मी त्याच्यावर प्रेम केलं... त्याला सगळं देऊन टाकलं... सगळं सगळं. मी वेडी झाले!”

ही वाक्ये अडखळत, हुंदके देत उच्चारताना तिने आपली मान वर उचलली होती. नजर बहिणीकडे लागली होती. तिच्या घमेंडखोर प्रशंसाप्रिय वृत्तीने तिचा घात केला होता. आता आत्मा राखण्यासाठी हेलेनासमोर ती अगदी दीन झाली होती.

या धडपडीत तिचे सारे त्राण तुटले. मान वाकडी झाली. डोळे मिटले.

“गेली! अरे देवा!—” हेलेन ओरडली.

अनुक्रमणिका

थोड्या वेळानंतर ॲमिलीने डोळे किंचित उघडले. ती शुद्धीवर आली. हेलेनाला एक आशाकिरण दिसला.

“एक वचन देतेस का मला”— ॲमिलीने विचारले. तिच्या स्वरात तिचे काळीज पाझरले होते— माझं मागणं एवढंच की, तॉमासला यातलं काही कळवू नकोस नि तू माझ्या मुलीची आई हो.”

हे शेवटचे वाक्य तिच्या तोंडून संथ व खिन्न रीतीने निघाले. त्यात काहीतरी हृदयद्रावक असे होते.

“हे घे वचन.”— हेलेन उत्तरली. तिला आपल्या बहिणीत भ्रमाची लक्षणे दिसली.
“आभारी आहे.” ॲमिलीने क्षीण स्वरात म्हटले.

ॲमिलीने बहिणीला जवळ ओढली. तिला आवेगाने मिठी घातली आणि आपले थंडगार ओठ तिच्या ओठावर ठेवून तिचे चुंबन घेतले.

तेवढ्यात डॉक्टर आला. त्याने तिला तपासली आणि “करण्यासारखे काहीच नाही” असे सांगितले.

“आता जरा बाहेर चला. मला या बाईचं शेवटचं म्हणणं ऐकून घ्यायचं आहे.”

हे उद्‌गार पाद्री फ्रान्सिश्कुचे होते.

खोली बंद करण्यात आली. पाद्री फ्रान्सिश्कु सुमारे अर्धा तास पश्चात्तापदग्ध आजाऱ्याबरोबर राहिला. तेथे जे काही घडले ते कुणालाच कळले नाही व कळणारही नाही.

शेवटी, खोलीचे दार उघडण्यात आले. पाद्री फ्रान्सिश्कु तिचा डावा हात आपल्या हातात घेऊन तिच्या बिछान्याजवळ वाकून बसला होता. जणू मरणोन्मुख ॲमिलीच्या सगळ्या पापांचे ओझे त्याच्या मानेवर पडले होते. त्याचे ओठ मिटले होते जणू हृदयातील रहस्यावर शिक्कामोर्तब केले आहे. निश्चल नजर ॲमिलीवर रोखली होती. ती जणू काय सांगत होती :—

“तू जात आहेस नि मी इथं राहात आहे. तुझ्या नि माझ्या पातकांबद्दल मी आसवं ढाळीन.”

ॲमिलीचे डोळे तिच्या हातातील क्रॉसकडे लागले होते. ती अगदी मंद आवाजात बोलत होती. तिला अधूनमधून हुंदके येत होते.

“आता मला कळतं, पटतं. मी आता गर्विष्ठ नाही...”

पाद्रीच्या डोळ्यातून एक आसू गळले. ते गालावरून वाहात तिच्या कपाळावर पडले. या पवित्र उदकाने ती पुनित झाली—

अनुक्रमणिका

हेलेन वेडीपेशी होऊन बहिणीकडे बघत होती.

“हेलेना! हेलेना! पाद्री फ्रान्सिश्कु! मला वचन देता ना? हेलेन, माझ्या वतीने देवाची करुणा भाक. तो तुझं ऐकेल. कारण तू कुमारी आहेस.”

हा शेवटचा शब्द तिने अशा व्यथित स्वरात उच्चारला की, तो ऐकणाऱ्याची आतडी तुटावीत.

क्षणकाल गाढ शांतता नांदली.

“मला काहीच दिसत नाही.” ॲमिली म्हणाली. “मी गुदमरते. रॉबेर्तला बोलवा—

“हा पहा मी आलोच” एक माणूस मरणोन्मुख ॲमिलीच्या जवळ येत म्हणाला.

“मला काय होतंय ते कळत नाही.” ॲमिली पुटपुटली.

हेलेनाचा हात हातात घेऊन तो दाबला आणि मग कापऱ्या स्वरात ती उद्गारली.

“रॉबेर्तसाहेब, पाद्री फ्रान्सिश्कु, तारा, हेलेना! माझ्या मित्रानो! मला क्षमा करा. जशी मी माझ्या सगळ्या शत्रूना केली आहे तशी. होय! सगळ्यांना...”

मग थोडावेळपर्यंत तिचे ओठ हलले. थरथरले. पण शब्द फुटला नाही.

ॲमिली गेली होती.

पुरुषांनो! तुम्ही घेतलेला हा बळी! परमेश्वरा! तू निर्माण केलेल्या या दुबळ्या बाईला क्षमा कर!

तिने पण क्षमा केली आहे.

अनुक्रमणिका

१३

ढागाळलेले आकाश

बऱ्याच दिवसांत सॉबाल आपल्याला दिसला नाही.

त्याच्या आयुष्यात बऱ्याच घडामोडी झाल्या. त्याने सावकारीचा धंदा सोडला होता. आणि कलकत्त्याच्या काही व्यापारी कंपन्यांशी त्याचा संबंध जडला होता. तो दानधर्म करीत होता. रॉबेर्तच्या बाबतीत त्याने त्याला कर्जफेडीसाठी दुसऱ्यांदा आणखी दोन महिन्याची मुदत दिली होती. या कारणामुळे पाद्री फ्रान्सिश्कुशी त्याचे संबंध अधिक निकट झाले होते आणि त्याच्या गुणांची प्रशंसा चोहीकडे होत होती. पण तो ताराला व रॉबेर्तच्या दोन नोकरांना बंगल्यातील एकंदर हालहवाल आपल्याला कळावी म्हणून मुक्त हस्ताने पैसे चारीत होता. हे त्याच्या चाहत्यांना कळले असते तर त्याच्या प्रशंसेचे पर्यवसान तिरस्कारात झाले असते.

रॉबेर्तचा तो द्वेष करीत होता. आणि ॲमिलीच्या मृत्यूनंतर हा द्वेष रिकार्दपर्यंत परसला होता. त्याची ही द्वेष भावना "हेकुबाच्या" अग्नीसारखी होती. तिच्यावरती बर्फाचा जाड थर होता.

ॲमिलीच्या मृत्यूनंतर वीस दिवसांनी तॉमास व रिकार्द कलकत्त्याहून फिझाबादला येऊन पोहोचलो. माग्नोदच्या मुलाला आपल्या दुर्दैवी बहिणीच्या मृत्यूचे कारण समजले नव्हते. ताराने पुरविलेल्या माहितीवरून हेलेनाला ॲमिलीच्या शेवटच्या उद्‌गाराचा अर्थ कळून चुकला होता. त्यामुळे ती तॉमासला काहीच सांगू शकत नव्हती.

एका संध्याकाळी तॉमास सॉबालच्या भेटीसाठी त्याच्या घरी गेला. सॉबालला फॉरबस आणि कंपनीची काही पत्रे त्याने आणली होती.

माग्नोदचा मुलगा आपल्या घरी आलेला पाहून सॉबालला गहिवर आला. खोलीच्या दाराशी तो निश्चल उभा राहिला. आपल्या छातीवर हात दाबून तो हृदयाची धडधड जणू बंद करू पाहात होता. आतापर्यंत वापरलेले रुपडे त्याला त्रासदायक होत होते.

तॉमासकडे वळून त्याने म्हटले. "कृपा करून या खुर्चीवर बसा."

तॉमास बसला. काही क्षणाच्या स्तब्धतेनंतर तॉमासने मस्तक उंचावून म्हटले, "माझे वडील तुमचे देणेकरी आहेत. तुम्ही त्यांना आजवर बऱ्याच सवलती दिलेल्या हे मला माहीत आहे. तुम्ही दिलेली मुदत उद्या संपते. अशा वेळी मी तुमच्यापाशी एक उपकार मागायला आलो आहे. जर तुम्हाला मुदत आणखी सहा महिने वाढविता आली तर मी तुमचा ऋणी राहीन. या कर्जाबद्दल मी जबाबदार आहे. आणि म्हणून माझी हमी देणारी पत्रे मी आणली आहेत.

सॉबालने पत्रे घेतली नाहीत. तॉमासला उत्तर करण्याचे भान त्याला राहिले नाही. तो तॉमासचे निरीक्षण करण्यात गुंतला होता. त्याने रॉबेर्तला मघाशी बोलताना वडील म्हणून संबोधले होते ते ऐकूण सॉबालच्या अंगावर काटा उभा राहिला होता. तॉमासच्या कामाच्या बाबतीत त्याने मन डळमळत होते.

"मिस्टर तॉमास, मी तुमच्या आईवडिलांना व बहिणीला ओळखत होतो."

"सगळी गेली! मी रडण्यासाठी जिवंत राहिलो आहे. मोठं दुर्धर माझं नशीब!"

हे शब्द उच्चारतांना तॉमासचे ओठ पांढरे पडले होते व डोळ्यात आसवे जमली होती. सॉबालच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वहात होत्या.

"मेली? मारली गेली म्हणा—"

"त्यांचा खून झाला?" तॉमास ताडकन उसळून ओरडला. त्याचा चेहरा भयानक दिसू लागला.

"होय, त्यांचा खून झाला. नीचपणानं आणि भेकडपणानं. सॉबाल संतप्त होऊन म्हणाला.

"काय भयंकर गोष्ट सांगत आहा तुम्ही! नि खुनी कोण? सांगा लौकर—"

"तुम्ही ज्याला मघाशी वडील म्हटले तोच!"

"अशक्य! सर्वस्वी अशक्य! तुमचं म्हणणं सिद्ध करा. नाहीतर आताच तुमचं तोंड कायमचं बंद करून टाकतो."

तॉमास गरजला व त्याने एक खुर्ची उचलली.

सॉबाल एका क्रूर आनंदाने तॉमासकडे पाहात म्हणाला— "जरा शांत व्हा नि माझं म्हणणं ऐकून घ्या."

मग सॉबालने माग्नोद कुटुंबाची दुःखद कहाणी त्याला सांगितली. सैतानाने खंजीराच्या टोकाने त्याच्या हृदयात लिहिलेल्या त्या कहाणीची पाने त्याच्यासमोर धरली. कानपूरला असताना तॉमास व हेलन यांच्यामध्ये व नंतर रॉबेर्त व तॉमास यांच्यामध्ये घडलेल्या प्रसंगाचे त्याने सविस्तर वर्णन केले. माग्नोदचा मुलगा आपल्या मानीव बापाचे कर्ज फेडण्याची खटपट का करीत आहे हेही त्याने त्याला सांगितले. एक गोष्ट मात्र त्याने गुप्त ठेवली. ती म्हणजे ॲमिलीचे रहस्य.

तॉमास ऐकत होता. काहीच बोलत नव्हता. कारण त्याला काहीच सांगता येत नव्हते. बाप, आई, बहीण यांच्या प्रतिमा त्याचा जळफळाट उडवीत होत्या.

'सूड!' संतापाने धगधगणाऱ्या नजरेने तो ओरडला.

"होय सूड!" सैतानी हर्षाने सॉबाल किंचाळला.

अकस्मात तॉमासच्या मनात वीज चमकली. ती एक शंका होती.

अनुक्रमणिका

“रॉबेर्त जर आमच्या कुटुंबाचा व माझ्या सुखाचा मारेकरी आहे तर त्यानं एवढे त्रास सोसून मला का शिक्षण दिलं? नि मुलगा म्हणून तो अजून माझं कोडकौतुक का करतो?”

“साफ खोटं—सॉबाल त्याला अडवीत म्हणाला.

“असं म्हणणं म्हणजे त्या दुष्ट माणसाला फाजील महत्त्व देणं होय. तुम्हाला कोणी शिकवलं असेल तर त्या पाद्री फ्रान्सिश्कुनं हे सिद्ध करणारे कागदपत्र माझ्यापाशी आहेत. रॉबेर्त तुमचा द्वेष करतो. कारण तुम्ही ब्राह्मण आहात. तुमचं लग्न हेलेनाशी होऊ नये अशी त्याची इच्छा आहे. कारण तुम्ही उच्च, श्रेष्ठ नाही. या बाबतीत तुम्हाला शंका आहे काय? त्याला असं कळवा की, मी त्याला कर्जमुक्त करतो. मग पाहू या तुम्हाला तो आपल्या मुलीशी लग्न करण्याची संमती देतो की काय?”

“मग या माणसाचे माझ्यावर कोणतेच उपकार नाहीत?” तॉमासने अनावर उत्कंठेने प्रश्न केला.

सॉबालच्या तोंडून रहस्यस्फोट झाला तेव्हा, रॉबेर्तबद्दलच्या कृतज्ञतेचे सगळे धागे तटातट तुटत आहेत असे तॉमासला वाटले. हेलेनाला आपल्या बाहूंत घ्यायला तो आता पूर्ण मोकळा झाला होता. तो पुढे म्हणाला :—

“बोला, मला पुन्हा सांगा, त्या माणसाचे माझ्यावर कोणतेच उपकार नाहीत! हे शब्द मला पुन्हा ऐकवा. कारण यापेक्षा मला मोठं स्वातंत्र्य नाही व भाग्य नाही”

“एक गोष्ट, फक्त एकच, तुम्ही त्याला देणं लागता ती म्हणजे चिरंतन द्वेष!”

तॉमासने शरीर पिरगळल्यासारखे करून त्याचा हात दाबला आणि म्हटले. “त्या चांडाळाच्या हातून हेलेनाची मुक्तता करतो आणि माझ्या आईवडिलांच्या व बहिणीच्या मृत्यूचा सूड घेतो.”

“तुमचा क्रोध अनावर होऊ देऊ नका”— सॉबाल शांतपणाने म्हणाला :— “यथाकाल साऱ्या गोष्टी पार पडतील. वेळ भरपूर आहे. घाई नको. हेलेन दररोज संध्याकाळी सहा वाजता, पाद्री फ्रान्सिश्कुला बरोबर घेऊन इकडे येते. नि तिनं सांभाळलेल्या एका पोरक्या मुलाला पाहून जाते. या बंगल्याच्या तळमजल्यावर ती जागा आहे. तेथे तुम्ही तिच्याशी मोकळेपणाने बोलू शकाल. मी आता बाहेर जातो. मी परत येईपर्यंत तुम्ही इथच थांबा. आता फक्त साडेतीन वाजले आहेत.”

“मला तुमची सूचना मान्य आहे. माझ्यासारख्या एका दुर्दैवी माणसाबद्दल तुम्ही केवढं अगत्य दाखवता, ते मला कळून चुकलं आहे.”

एवढे बोलून तॉमास रडू लागला.

आता सॉबालचे घर सोडून वाचकांनी थोडा वेळ बंगल्यात जाऊन यावे अशी त्यांना माझी सूचना आहे.

अनुक्रमणिका

रॉबेर्त खुर्चीत बसून होता. त्याच्या हातात एक पुस्तक होते. पण ते तो वाचीत नव्हता. आपल्या विचारात तो इतका गर्क होता की, हेलेन दार लोटून आत आली तरी त्याला त्याची जाणीव नव्हती.

हेलेनाने बापाकडे वळून पाहिले. त्याच्या मुद्रेवर काळजी दाटली होती. त्याच्याजवळ जाऊन तिने त्याच्या कपाळाचे चुंबन घेतले.

"हेलेना, बरी आहेस ना तू?"

"होय पप्पा."

ॲमिलीच्या मृत्यूनंतर हेलेन सर्वस्वी पालटली होती. पूर्वी आनंदी असणारा चेहरा आता उदासीनतेच्या काळ्या पडद्याखाली झाकळून गेला होता. ती क्वचितच खोलीबाहेर पडे. रिकार्द तिला दृष्टीसमोर नको होता. दरम्यान त्याने दोनदा तिच्याजवळ आपले प्रेम व्यक्त केले होते.

"पप्पा"— आपली नजर खाली वळवून ती म्हणाली—" तुमच्याशी थोडं बोलायचं आहे."

"बोल, मी ऐकतो आहे."— रॉबेर्त म्हणाला. त्याच्या मुद्रेवर आश्चर्य दिसत आहे.

"पप्पा, आमच्या सुखस्वास्थ्याच्या, औचित्याच्या व तुमच्या मनःशांतीच्या दृष्टीने विचार केला तर मी माझ्या चुलतभावाशी लग्न करावं हे इष्ट आहे. या गोष्टीत तुमचं हित गुंतलं असल्यामुळे तुमच्या निर्णयाला संमती देण्याचं मी ठरवलं होतं; पण ते आता शक्य नाही असं मला दिसून आलं आहे. माझं त्या माणसावर प्रेम नाही. नि मी त्याच्यावर कधीही प्रेम करू शकणार नाही. उलट, मनापासून मी त्याचा तिरस्कार करू लागले आहे. माझ्या सुखाची होळी करून पप्पांना आपलं सुख मिळवायचं आहे काय? ते अवश्य मिळेल. पण या माणसाशी विवाहबद्ध होणं माझ्याकडून कालत्रयी घडणार नाही."

रॉबेर्त त्वेषाने खुर्चीवरून उठला. आणि त्याने हेलेनाकडे अशा भकास मुद्रेने पाहिले की, तिने लगेच मान खाली घातली.

"आमच्या कुटुंबातील खलपुरुष तॉमास यानं तुला वडिलांची अवज्ञा करायला शिकवलेलं दिसतंय. त्या ब्राह्मणाकडून मला हे बक्षीस मिळत आहे."

"पप्पा, मी प्रतिज्ञेवर सांगते की, तॉमास याबाबतीत माझ्याशी एक शब्ददेखील बोलला नाही. तो निष्पाप आहे."

"मुली"— रॉबेर्त निश्चल स्वरात, वात्सल्याने भरलेल्या हृदयाने म्हणाला— "तुझं अकल्याण मी इच्छित नाही. रिकार्द आमच्या कुटुंबांतला, आमच्या दर्जाला शोभेसा आहे. तुला सुखी करायला त्याच्यापाशी कसलीच वाण नाही."

"त्याच्यापाशी जे सगळं काही आहे त्याचा मला काय उपयोग? जर तो—"

अनुक्रमणिका

आपण पप्पापाशी बोलत आहोत याचे तिला स्मरण झाले आणि भानावर येऊन तिने तोंडातले वाक्य अर्धवट सोडले.

“मग बापाची अवज्ञा करण्याचे धाडस करतेस तू?”
“ते धाडस मी अवश्य करते. कारण रिकार्दला मी पूरेपूर ओळखते.”

हेलेनाने कापऱ्या आवाजात व वेगळ्याच आवेशात हे उत्तर वडिलांना दिले.

“कृतघ्न मुली, तुझं नि तुझ्या बापाचं सुख तू लाथाडतेस. तुरुंगाच्या अंधारात व दुष्कीर्तीत तू त्याला लोटू पहातेस. नि सुखी करू पहातेस ते एका शापित ब्राह्मणाला. माझ्या व स्वर्गात असलेल्या तुझ्या आईच्या तोंडून तुझ्यावर शापाचा वर्षाव होईल हे लक्षात ठेव.”

“पप्पा, क्षमा करा”— हेलेना रॉबेर्तच्या पायावर लोळण घेऊन व ते घट्ट पकडून म्हणाली— “माझं आयुष्य, माझं सुख सगळं सगळं तुमच्यासाठी सोडायला मी तयार आहे. पण त्या राक्षसाशी मला लग्न लावायला भाग पाडू नका. त्यापेक्षा मी हजार वेळा मरण पत्करीन.”

तेवढ्यात नोकर आला आणि त्याने रॉबेर्तला सूचना दिली की, बाहेर दिवाणखान्यात सॉबाल आलेला असून तो साहेबाशी एका महत्त्वाच्या विषयावर तातडीने बोलू इच्छित आहे.

“त्याला सांग, साहेब घरी नाहीत म्हणून.” हे शब्द त्याने उच्चारले मात्र खोलीचे दार लोटून सॉबालची उग्र मूर्ती आत शिरली.

“काय ही मग्रुरी” रॉबेर्त अभावितपणे उद्‌गारला.

हेलेन बाहेर गेली. संध्याकाळचे सहा वाजायला आले होते.

“मी तुमचा अधिक वेळ घेऊ इच्छित नाही. फक्त दोनच शब्द. मी तुम्हाला दिलेली मुदत परवा संपते. तुरुंग किंवा रोख पैसे काय निवडता?”

सॉबालचे अपरिचित व कडक भाषण ऐकून रॉबेर्तने हातांनी तोंड झाकून घेतले.
त्याचे जखमी झालेले हृदय तेवढ्याच त्वेषाने सॉबालचा धिःकार करायला त्याला सांगत होते. पण परिस्थिती त्याला संयमाने वागायला सांगत होती.

“थोडे दिवस थांबा. लवकरच माझ्या मुलीचं लग्न होईल. मग—”

“तुमच्या मुलीचं लग्न?” खळखळून हसत सॉबाल ओरडला. “तुमची मुलगी तॉमासशिवाय दुसऱ्या कुणाशीच लग्न करू शकत नाही. कारण तिच्या अब्रूचा इथ प्रश्न गुंतला आहे.”

“तिची अब्रू? — हे एक भयंकर कुभांड आहे.”

अनुक्रमणिका

"ज्याच्याजवळ तिच्या दुर्वर्तनाचे भरपूर पुरावे आहेत. त्याचे तोंड तुम्ही बंद करू शकत नाही पुन्हा एकदा सांगतो, तुमची मुलगी टॉमासला दिल्याशिवाय गत्यंतर नाही."

"मग तुम्हाला मी निक्षून सांगतो की मी देणार नाही..."

रॉबेर्त पायांची आदळ आपट करून म्हणाला.

"हा नीचपणा आहे"— सॉबाल गरजला. त्याच्या हृदयात सांचलेल्या द्वेषाला त्याने मोकळी वाट करून दिली.

रॉबेर्तच्या तोंडावर त्याने नीच हा शब्द फेकला तेव्हा, आसुरी समाधानाने त्याचा चेहरा चमकला.

थोडा वेळ थांबून सॉबाल पुढे म्हणाला "तुम्हाला पुरावा पहावयाचा असला तर माझ्याबरोबर या."

रॉबेर्त वेड्याप्रमाणे त्याच्या मागोमाग गेला. जादूटोणा केल्याप्रमाणे त्याची गत झाली होती.

रॉबेर्तच्या समवेत सॉबाल आपल्या घरात गेला. मग एक जिना उतरून एका तळघरात शिरला आणि एका खोलीकडे बोट दाखवून निग्रही आवाजात म्हणाला, "त्या कुलूपाच्या फटीतून पहा. आणि मग मला सांगा, तुमच्या मुलीच्या शीलावर तुमचा विश्वास आहे की नाही ते."

रॉबेर्तने कुलूपाच्या फटीतून पाहिले. त्याच्या नजरेसमोर एक दुष्ट चित्र उभे राहिले. ते पाहून त्याच्या तोंडून एक किंकाळी निघाली आणि तो धाडकन् फरशीच्या दगडावर पडला. त्याची हेलेन एका बालकाला छातीशी धरून त्याचे ममतेने मुके घेत असलेली त्याला दिसली होती.

मग सॉबालने त्याला आपल्या हाताचा आधार देऊन उठविले आणि त्याला घेऊन तो दुसऱ्या खोलीत गेला. दार बंद केले आणि मग त्याला खोलीत ठेवून तो बाहेर आला आणि मग टॉमासला भेटला. तो मघाशी होता त्याच स्थितीत आढळला. पाषाणवत, निश्चल असा.

"मिस्टर टॉमास"— त्याच्याकडे एक कागद देऊन सॉबाल बोलला— "रॉबेर्तनं मला देणं असलेल्या रकमेच्या फेडीची ही पावती आहे. ही माझी तुम्हाला भेट आहे. हेलेनाशी तुम्हाला बोलायचं असलं तर त्या जिन्यात राहून तिची वाट पाहा."

टॉमास हतबुद्ध झाला होता. आपण काय ऐकत आहो याचे त्याला भान राहिले नव्हते. कागद हातात घेऊन तो जिना उतरला. शेवटच्या पायरीवर निश्चल बसून व सॉबालने दाखवलेल्या दारावर नजर रोखून तो हेलेनाची प्रतीक्षा करू लागला. त्याचे हृदय जोराने धडधडत होते. ओठ कापत होते. कान हेलेनाच्या चाहुलीकडे लागले होते.

सात वाजले. कडी काढल्याचा आवाज त्याच्या कानावर आला, तशी त्याने डोळ्यात प्राण साठवून पाहिले. बुरख्यात गुरफटलेली एक व्यक्ती बाहेर येत असलेली त्याला दिसली. ती हेलेन होती. टॉमास

अनुक्रमणिका

तिच्याजवळ गेला आणि ती दचकून अंग काढील या भीतीने हलक्या आवाजात तो तिला हाका मारू लागला.

तो ओळखीचा आवाज कानावर पडताच हेलेनच्या तोंडून एक चित्कार निघाला. ती परतली व खोलीकडे वळली. परंतु तॉमास तिच्यासमोर गुडघे टेकून बसला. तिचे हात आपल्या हातात घेऊन तिची भीती त्याने दूर केली.

"हेलेना"— त्याने अत्यंत हळूवार स्वरात म्हटले— तो स्वर जणू त्याच्या काळजातून निघत होता.
"तॉमास"— ती आपल्या स्वर्गीय परीच्या स्वरात म्हणाली.

मग थोडा वेळ दोघेही गप्प राहिली. पण आपल्या मूक भाषेत पूर्वी कधीच बोलली नव्हती, इतके बोलली. स्तब्धतेला अर्थ नसतो. पण कधी कधी खूप अर्थ असतो. तॉमासने त्या स्तब्धतेचा भंग केला.

"हेलेना, तुला विसरण्याचा मी खूप प्रयत्न केला, पण व्यर्थ! आपल्यामधील अंतर व समुद्र ही दोन्ही माझं वेडं प्रेम नष्ट करू शकली नाहीत. कारण ते त्याच्याइतकंच अफाट होतं. आपल्या स्मृती त्याचं पोषण करीत होत्या. आणि दिवसेंदिवस माझं कमनशीब वाढत होतं. इतके दिवस तुझ्यापासून दूर राहून मी फार फार सोसलं. दुःखभारानं मी मेलो नाही. कारण एक आशा जगवीत होती. तुझ्यावर अनिर्बंध प्रेम करायला, माझं हृदय तुला पूर्णतया अर्पण करायला मी आज मोकळा आहे. सर्व मायाममतेच्या पाशांतून मुक्त केलेलं माझं हृदय मी आज तुला अर्पण करीत आहे. तुझ्या वडिलांनाही कोणतंच देणं लागत नाही. तुझी तशी इच्छा होती म्हणून त्यांचं सारं कर्ज मी फेडून टाकलं. कारण तुझी इच्छा मी पवित्र मानीत आहे. आता तू माझी आहेस. कुणीच तुला माझ्यापासून हिरावून घेणार नाही. ते साहस करणाऱ्याची मी गय करणार नाही."

हे जळजळीत उद्‌गार ऐकूण तिच्या हृदयाचे पाणी झाले.

"तुझ्यावर मी प्रेम केलं की नाही ते तुला माहीत आहे. माझ्या एका शब्दानं, विचारानं माझ्या प्रेमाला डाग लावला असेल तर सांग. माझ्या वडिलांची संकटातून मुक्तता कर अशी मी तुझ्यापाशी मागणी केली नि तू मला दिलेलं वचन पाळलंस. आता परमेश्वराचं नाव घेऊन सांगते की, तुझ्यापासून मला वेगळी करणारी शक्ती या जगात नाही. आमची निरंतरची आकांक्षा, गोड स्वप्न, आमचं सुख आता पुरं करू या. नियतीनं तुला कुठंहि ठेवला, कसाही ठेवला, गरीब वा श्रीमंत, ब्राह्मण किंवा आयरीश तरी माझं जीवित सदैव तुझं राहील."

"कदापि नाही."— एका अज्ञात आवाजाने अवचित ओरडून म्हटले. आणि लगेच या दोन प्रेमिकांच्या मध्ये रॉबेर्त उभा राहिला. त्याची मुद्रा भयानक दिसत होती.

"अरे वा, अगदी वेळेवर आलास. माझ्या कुटुंबाच्या मारेकऱ्या"— तॉमास रॉबेर्तची ओळख पटताच ओरडला— "माझ्या ऋणांची आठवण करण्यासाठीच तू आला आहेस. माझ्या वडिलांची, आईची व शेवटी बहिणीची तू हत्या केलीस. माझ्या सूडाला तू भीत होतास. तो टाळावा म्हणून भेकडपणानं खोट्या कृतज्ञतेच्या पाशांनी तू माझे हात बांधून टाकलेस. चांडाळा! माझ्या हातून तुझा मृत्यू आहे."

अनुक्रमणिका

तॉमासने जमिनीवर पडलेला लोखंडी दंडुका उचलला व तो त्याच्या मस्तकावर घालायला धावला— एक हत्या घडू पहात होती.

“तॉमास! ते माझे वडील आहेत”— हेलेन जिवाच्या आकांताने आपल्या प्रियकराला मिठी घालून ओरडली.

“सोड त्याला”— रॉबेर्त तिचा हात पकडून तिला जोराने दूर ढकलीत म्हणाला “माझ्या नावाला काळिमा फासणाऱ्या मुलीला मला वाचवण्याचा अधिकार नाही. माझ्या अब्रूवर घाला घालणाऱ्या या इसमाला मी शिक्षण दिलं. तसंच शिक्षण मी तुझ्या मुलाला द्यावं म्हणून तू मला वाचवू पाहतेस?”

हे शब्द कानावर पडताच तॉमासच्या तोंडातून हृदयद्रावक आरोळी निघाली. त्याने जे ऐकले, त्याने त्याच्या मनातील जगाचा चुराडा केला. किती भयानक होते ते!

“हेलेन! मुलाची आई!” तो पुटपुटला आणि बेशुद्ध झाला.

“माझ्यावर असला लाजिरवाणा आरोप!” हेलेन उद्गारली. “अरेरे! त्याचं माझ्यावर कधीच प्रेम नव्हतं तर!”

अनुक्रमणिका

Vox clamans ["वाळवंटातील आवाज"]

आठ दिवसांनंतरची गोष्ट. फिझाबादच्या खाली ज्वालामुखी धुमसत होता. शहराच्या कानाकोपऱ्यात फकीर आपल्या गूढ भाषेत प्रवचने झोडीत होते. शिपाई आपल्या बंदुकी साफसूफ करीत होते. धर्मयुद्धाच्या घोषणेने हिंदी रक्ताला अनेक शतकांच्या झोपेतून जाग आली होती आणि ते सळसळू लागले होते. म्हातारी आणि मुले भीतीने कापत होती. चळवळ सर्वत्र फैलावली होती. उठाव सार्वत्रिक झाला होता.

एके सकाळी रॉबेर्तचा पुतण्या रिकार्द आपल्या बिछान्यावर मृतावस्थेत आढळला. त्याच्या छातीवर सुऱ्याचे दोन वार झाले होते.

मृताच्या कागदपत्रात एक चिठ्ठी सापडली. त्यावरूण स्पष्ट दिसून आले की, ज्या मुलाची हेलेन गुप्तपणे काळजी घेत होती तो रिकार्दचा मुलगा होता. पोलीस त्याला आपल्या ताब्यात घेऊ लागले. हेलेनाने विरोध केला. न्यायाधीशाच्या कडक आदेशानंतर तिला माघार घ्यावी लागली. तिने केलेल्या प्रतिकाराचा बोलबाला झाला. हेलेनाकडे आदराने पहाणाऱ्या लोकांच्या मनात तिच्या चारित्र्यासंबंधी शंकाकुशंका वावरू लागच्या.

रिकार्दच्या खुनाचा वहीम तॉमासकडे येऊ लागला. कारण प्रेमप्रकरणातील रिकार्द आपला प्रतिस्पर्धी आहे असे मानून त्याने पूर्वदिवशी रिकार्दला द्वंद्वयुद्धाचे आव्हान दिले होते.

तॉमास आता कैदेत होता. फिझाबादचा तुरुंग म्हणजे आठ खिडक्यांची एक छोटी इमारत. तळमजल्यावर खालच्या वर्गाचे कैदी होते. वरच्या मजल्यावर उजव्या बाजूला कोर्टाचे कामकाज चालत असे. डाव्या बाजूला पहिल्या वर्गाच्या कैद्यांना ठेवण्यात आले होते तेथेच तॉमास होता. तो खिडकीशेजारी एका खुर्चीवर बसला होता. तेथून फिझाबादची विस्तीर्ण शेते दिसत होती आणि त्यांच्यामधोमध वाहात जाणारी घोगरा नदी दिसत होती. या आसमंताची खिन्नता व भयानक शांतता यात त्याला त्याच्या शत्रूचे हृदय दिसत होते. त्या निश्चल डोंगराच्या शिखरात त्याला त्याच्या छळवाद्याची निष्ठूरता जाणवत होती. त्याचे फिक्कट गाल व चेहऱ्याचे आकसलेले अवयव हे त्याच्या शारीरिक व मानसिक ग्लानीची कल्पना देत.

त्याचे हृदय प्रेम व कृतज्ञता या दोन गोष्टींवर जगले होते. आणि अकस्मात एक दिवस त्याचा आधार तुटला होता. त्याची प्रेयसी विश्वासघातकी निघाली होती. आणि त्याचा हितकर्ता मित्र खुनी ठरला होता.

त्याच्या मनात पाद्री फ्रान्सिश्कुची पूज्य मूर्ती उभी राहिली. त्यांनी आपल्याला अशा अवस्थेत पाहिले तर, खुनाचा गुन्हा शाबित झालेला एक कैदी म्हणून ते शरमेने ठार होतील. अशा दुःसह विचारांत व यातनांत त्याचे मन तडफडत होते. अशा एका प्रसंगात सापडला होता की, जो आयुष्यात एकदाच येऊ

शकतो आणि जो बुद्धी व वेड यांच्या सीमारेषेवर असतो. संथ प्रकृतीच्या माणसांप्रमाणे तॉमासचा मत्सर हा सागराप्रमाणे गाढ व सखोल होता.

अफू हाच त्याचा विरंगुळा बनला होता.

तो अशा केविलवाण्या मनःस्थितीत असतानाच खोलीचे दार लोटून पाद्री फरान्सिश्कु आत आला. जणू प्रत्यक्ष धर्म सांत्वनासहित येत आहे. त्याला पाहाताच तॉमास दचकला. उठला व मान वर केली. पाद्रीचे आगमन त्याला त्रासदायक वाटले. त्याच्या प्रेयसीने त्याच्याशी दगलबाजी केली होती, तरीदेखील तत्परतेने या पूज्य उपदेशकापाशी जाऊन त्याच्या हातांचे चुंबन घ्यायची त्याची तयारी होती. पण एका भयंकर गुन्ह्याचा त्याच्यावर आरोप ठेवण्यात आला होता. व प्रत्यक्ष न्यायदेवता त्याचा पाठलाग करीत होती. अशा स्थितीत नजर उचलून या पवित्र माणसाकडे पाहण्याचा त्याला धीर झाला नाही. एखादा सज्जन गुन्हेगाराकडे ज्या तिरस्काराने पाहतो तो तिरस्कार आपल्या वाट्याला येईल अशी त्याला भिती वाटली.

पाद्री फरान्सिश्कुला त्याच्या भीतीचा अंदाज आला. ती दूर करण्यासाठी पाद्रीने चेहऱ्यावर शांतता दाखविली. ओठावर हास्य खेळविले आणि अत्यंत मायाळू स्वरात म्हटले,

“तॉमास, या प्रसंगी तुला माझ्यासारख्या वृद्ध माणसाच्या उपदेशाची गरज आहे. सांत्वनाची, धीराची गरज आहे. या साऱ्या गोष्टी तुझ्यासाठी मी घेऊन आलो आहे”—

“तुमच्या कृपेचा स्वीकार करण्यापूर्वी तुम्हाला एक विनंती करायची आहे. मी निरपराधी आहे या गोष्टीवर विश्वास ठेवा. मी खुनी नाही. एका दुर्दैवी माणसाला गुन्हेगार कल्पून न्यायदेवतेनं त्याचा छळ चालविला आहे.”

“मी खुनी नाही!” पाद्री फ्रान्सिश्कु पुटपुटला.

पाद्रीचा चेहरा आनंदाने फुलला. त्याची छाती उत्साहाने फुगली. त्याला तॉमासच्या स्वभावाची ओळख होती. सूडबुद्धीने खुनासारखा महाभयंकर गुन्हा करून पुन्हा तो नाकबूल करण्याचे पातक त्याच्या हातून घडणार नाही याची त्याला खात्री होती.

“रिकार्दचा खून तू केला नाहीस?” बराच वेळ स्तब्ध राहिल्यानंतर पाद्री फ्रान्सिश्कुने त्याला प्रश्न केला.

“पाद्रीसाहेब”, — ताडकन उठून तॉमास म्हणाला,— “परमेश्वराची शपथ घेऊन सांगतो की, मी निष्पाप आहे. सगळेजण मला अपराधी समजतात. त्याची मी पर्वा करीत नाही. कसल्याच गोष्टीवर माझी श्रद्धा राहिली नाही. जी स्त्री देवदूताइतकी पवित्र आहे असे मी मानीत होतो, ती स्त्री दुसऱ्या पुरुषाच्या गळ्यात सहजासहजी पडली नि आज वेश्या बनली. ज्या वेळी तिला माझ्या हृदयसिंहासनावर बसवून माझे विचार, माझा भविष्यकाळ इतकंच नव्हे तर माझं संपूर्ण जीवित मी अर्पण करीत होतो, त्यावेळी त्याच दिवशी, त्याच क्षणी, ही विश्वासघातकी बाई दुसऱ्याच्या बाहूपाशात पडून माझी थट्टा करीत होती. माझ्या शब्दांवर निंदानालस्तीची वस्त्रं चढवीत होती. माझ्या आनंदाच्या क्षणात धार्मिक अत्याचारांचे रंग भरीत

अनुक्रमणिका

होती. एवढं झाल्यावर मी परमेश्वरावर कशी श्रद्धा ठेवू? आता मी माझ्या हृदयात डोकावून पाहतो. तेथे काही दिवसापूर्वी तिचं मंदिर होतं. आज मला तेथे काय आढळतं? पोकळी! भयाण शून्यता! मी तिला हाका मारतो, प्रार्थितो, ओरडतो. पण ती येत नाही— येऊ शकत नाही. तरी बरं, ते तिचं स्थान नव्हे. मी परमेश्वराचा असा कोणता गुन्हा केला म्हणून त्यानं निष्ठुर होऊन मला या राक्षसांच्या ताब्यात दिलं, ज्यांना इंग्रज हे नाव आहे, ज्यांनी माझं रक्त प्राशन केलं. माझ्या कुटुंबाचा विध्वंस केला.... आणि त्यांना मी बाप नि मित्र म्हणतो! या साऱ्या यातना माझ्या मृत्यूनंच संपतील. त्याचीच मी वाट पाहात आहे. त्याचं मी आनंदानं स्वागत करीन."

तॉमासचे डोळे लालबुंद झाले होते. मस्तकात आग पेटली होती. गाल रखरखत होते. तो एक क्रोधाचा, निराशेचा दारूण झटका होता.

पाद्री फ्रान्सिश्कुने त्याच्या वेडाला, क्रोधाला बांध घालण्याची घाई केली नाही. बराच वेळ त्यांना थैमान घालू दिले. रोग हटायला या गोष्टींची गरज असते. जखमेतून रक्त वाहू दिले पाहिजे. पाद्रीने वादळानंतरच्या शांततेची वाट पाहिली. तॉमास शांत झाला आहे असे दिसून येताच पाद्री त्याच्याजवळ गेला आणि त्याने ममताळू स्वरात म्हटले—

"हे पाहा, तॉमास, माणसाला अपराधी ठरविणाऱ्या गोष्टी टाळणं त्याच्या हाती नाही. सर्वोच्च न्यायदेवतेला मात्र सारं दिसत आहे. तुझ्या तोंडून जे उद्गार बाहेर पडले, ते ऐकून मला दुःख होतं. कारण तुझ्यापासून मी वेगळ्या तत्त्वज्ञानाची व सहनशीलतेची अपेक्षा करीत होतो. परमेश्वराबद्दल जे तू बरळलास त्याबद्दल त्याची क्षमा माग. त्याचप्रमाणे, काही माणसावर जो तू विनाकारण अन्याय केलास त्याबद्दल थोडी दिलगिरी दाखव. माझ्या मुला, विकारानं तुझा ताबा घेतला आहे. ज्या रॉबेर्तनं तुला प्रेम आणि शिक्षण देऊन आणि त्यासाठी सर्वप्रकारचा त्याग करून तुझा प्रतिपाळ केला त्याच्यावर तू आग पाखडलीस. तुझ्या बहिणीच्या मृत्यूच्या बाबतीत तो निष्पाप आहे. त्याच्या मुलीच्या, हेलेनाच्या शीलावर तू उखडलास. तिचं समर्थन करायला एकच शब्द पुरे आहे. ती देवदूत आहे. एवढंच सांगतो."

"देवदूत? ... हेलेन?" तॉमास आश्चर्याने म्हणाला.
"होय देवदूत"— पाद्रीने उत्तर केले.

या शब्दांचा परिणाम तॉमासच्या मनावर एवढा झाला की, तो वेडपटाप्रमाणे पाद्रीकडे पाहातच राहिला. आश्चर्याच्या धक्क्याने त्याच्या शक्ती जणू कुंठीत झाल्या आणि त्याच्या बुद्धीला क्षणकाल बधिरता आली. काही वेळाने उपरोधिक स्मित करून तो म्हणाला,

"मग त्या मुलाला तिनं पोलिसाच्या स्वाधीन का केलं नाही? आपलं प्रेम, कुटुंबाचा नावलौकिक, आपलं शील यांच्यावर पाणी सोडायला ती का तयार झाली? दुसऱ्याच्या मुलासाठी?"

"होय, ते शक्य आहे"— पाद्री स्थिर व गंभीर स्वरात म्हणाला— "ज्याला मन नाही, हृदय नाही. त्याला मात्र हे कळू शकत नाही."

"मग हे मूल कोणाचं?" तॉमासच्या उत्कंठेचा कळस झाला.

अनुक्रमणिका

“कुणाचं? ... ते मी सांगू शकत नाही. ते एक पवित्र रहस्य आहे—” आपल्या गालांवरून आसवे पुशीत पाद्री फ्रान्सिश्कु म्हणाला.

“पाद्रीसाहेब”, — थोड्या स्तब्धतेनंतर तॉमासने म्हटले, “ तुम्ही उदार मनानं माझ्या दुःखाचं सांत्वन केलं. मला धीर दिला. त्यामुळं मी गहिवरून गेलो आहे. माझ्यावर आता तुम्ही नवीन कर्तव्यं लादीत आहात. पण अजून मी म्हणतो तुमची चूक होत नसेल ना?”

खोलीचे दार उघडले. आणि एक शिपाई आत आला. त्याने तॉमासला सांगितले की, कोर्टात हजर होण्याची वेळ झाली आहे.

अनुक्रमणिका

१५

क्रॉसवरचे दिव्य

न्यायालय एका दालनात आहे. एका लोखंडी कठड्याने ते दालन विभागले आहे. वरच्या कचेरीत तीन मेजे दिसतात. मधले न्यायाधीशाचे, बाजूची दोन मुख्य कारकुनांची. त्यांच्यामागे पोलीस शिपायांच्या उग्र आकृती उठून दिसतात. त्यांचे पोषाख काळे असून छातीवर चांदीचे बिल्ले आहेत. न्यायाधीश एका खुर्चीवर बसलेला आहे. खटल्याच्या कागदपत्रांवरून तो आपली नजर झरझर फिरवीत आहे. कठड्याला लागून एक मोकळा बाक आहे. दालनाच्या खालच्या बाजूला वेगवेगळ्या पोषाखांचे, वेगवेगळ्या वयाचे बरेच लोक बसले आहेत. दालनातील मंद प्रकाशात सारे दृश्य भयानक दिसते. कायद्याची अधिसत्ता या छपराखाली मुकाट गिरक्या घेत असते. गाढ शांतता नांदते. एकाएकी घंटी वाजते. एक माणूस पुढे होतो व कठड्याजवळच्या बाकावर बसतो.

त्याची उदात्त, गंभीर मूर्ती त्याच्या खिन्न व थकलेल्या चेहऱ्यातून निथळणारी त्याची निर्व्याजता यामुळे कोणत्याही न्यायाधीशाचे मन त्याच्याकडे आकृष्ट व्हावे. न्यायाधीश उजव्या बाजूच्या कामगाराकडे वळून म्हणतो.

"चौकशीच्या अहवालाचा पहिला भाग वाचून दाखवा."

कामदार उठून उभा राहतो व हातातील कागद गंभीर आवाजात वाचून दाखवतो.

"*** दिवशी सात वाजता रिकार्द दाविस आपल्या खोलीत मृतावस्थेत आढळला. त्याच्या छातीवर सुऱ्याचे तीन वार होते."

"पुरे"— न्यायाधीशाने वाचन बंद करायला लावले आणि मग आरोपीकडे वळून म्हटले— "मिस्टर तॉमास, या खुनाचा वहीम तुमच्यावर आहे. कारण या हत्त्येच्या पूर्वदिवशी तुम्ही रिकार्दला द्वंद्वयुद्धाचे आव्हान देऊन पत्र लिहिलं होतं. रिकार्दला दुसरा शत्रू नव्हता."

"सुंदर निष्कर्ष!"— आरोपी खदखदा हसत म्हणाला— "मला रिकार्दचा सूड घ्यायचा होता आणि तुम्ही खात्री बाळगा, मी तो घेणार होतो. पण तो शिष्ट समाजात रूढ असलेल्या पद्धतीप्रमाणे, नीचपणानं, भेकडपणानं खून करून नव्हे, परमेश्वरा! आरोपपत्रात देखील केवढा हा अन्याय."

"रिकार्दने तुमचा असा कोणता अपमान केला होता?"
"एक नव्हे. अनेक. पण इथं ते गैरलागू आहेत. त्यांच्यासाठी मी न्यायाची याचना करीत नाही."
"कदाचित ते सत्यस्थितीवर प्रकाश टाकतील."
"मी तुम्हाला आश्वासन देतो की, ते प्रकाश टाकणार नाहीत."
"ते मी ठरवीन."
"मग मी काहीच सांगू इच्छित नाही."

“तुम्हालाच हे बाधक होईल.”

“होऊ द्या. आयुष्यात मला आता कोणतंच स्वारस्य राहिलेलं नाही. माझ्या दृष्टीनं सारं व्यर्थ आहे.”

तरुण आरोपी प्रेक्षकांकडे वळला तेव्हा त्याची नजर पाद्री फ्रान्सिश्कुवर पडली. पाद्री आपल्या विचारात गर्क दिसला. त्याचे डोळे आकाशाकडे लागले होते. तो जणू काय परमेश्वराला विचारीत होता. “एवढ्यासाठीच का माझा सारा त्याग होता?”

एवढी चाचणी झाल्यावर न्यायाधीश हेलेनाकडे वळला. ती पण तिथेच आत होती. तिने काळा वेष घातला होता. व त्याच रंगाचा बुरखा तोंडाभोवती घेतला होता. तिच्या बाजूला तारा सफेद पोषाखात बसली होती.

“ज्या मुलाला तुम्ही दयाळूपणानं आपल्या पदरी ठेवून घेतलं, त्या मुलासंबंधी मला काही माहिती हवी आहे. रिकार्दचं एक पत्र खटल्याच्या कागदपत्रात आहे. त्याच्यावरून असं कळतं की, त्याला एक मुलगा होता. तुम्ही बाळगलेला मुलगा तोच तरं नाही ना?”

हेलेनाच्या चारित्र्यासंबंधी ज्या कंड्या उठल्या होत्या, त्यांच्यावर न्यायाधीशांचा विश्वास नव्हता. आणि म्हणूनच त्यांना विशेष स्पष्टीकरणाची गरज भासत होती.

“जज्ञसाहेब”, हेलेन क्षीण स्वरात म्हणाली. “त्या मुलाची मातापितरं कोण आहेत, ते मला माहीत आहे. पण त्यांची नावं मला इथं उघड करता येणार नाहीत. तुमच्यापाशी माझी विनंती एवढीच की, तुम्ही ताब्यात घेतलेलं मूल माझ्याकडे परत देण्याची व्यवस्था करावी.”

“हे पहा. ह्या बाबतीत तुम्ही गुप्तता राखली तर तुम्ही गोत्यात याल.”

“त्या निष्पाप मुलासाठी काहीही सोसायची माझी तयारी आहे. माझी पुन्हा आपल्याला प्रार्थना आहे की, ते मूल माझ्या स्वाधीन करावं.”

“मला ते मूल तुमच्या स्वाधीन करता येत नाही. त्याला माझा निरुपाय आहे. ते मूल रिकार्दचं आहे असं सिद्ध झालं तर त्याच्या लगतच्या नातेवाईकांकडे मी पाठवून देईन. माझं ते कर्तव्य आहे.”

“कनवाळू जज्ञसाहेब, मेहेरबानी करून असं करू नका”— हेलेन उभी राहून उद्गारली— “त्याला इतक्या दूर नका पाठवू, गरीब बिचारं पोर—”

प्रेक्षक आता आपसात कुजबुजत होते. त्यांच्या चेहऱ्यावर नापसंती दिसत होती. कारण त्यांच्या दृष्टीने हेलेन ढोंगी होती.

तिच्या आसवांतून व गोंधळातून जो भाव व्यक्त होत होता, तो ती शब्दाखाली झाकू पाहात होती असे त्यांचे मत झाले होते. ही कुजबूज चालली असतानाच एक आवाज स्पष्ट ऐकू आला, “अजून तुमच्या मनात शंका आहे का, पाद्री फ्रान्सिश्कु” तो टॉमासचा होता.

अनुक्रमणिका

न्यायाधीशाने त्याला गप्प राहाण्याची सूचना देऊन, हेलेनाकडे वळून व आवाज उंचावून म्हटले, “मी पुन्हा निक्षून सांगतो, ते मूल मी तुम्हाला परत करू शकत नाही.”

“तुम्हाला ते द्यावंच लागेल”— हेलेना तोंडावरचा बुरखा बाजूला सारून ओरडली. “कारण ते माझं व टॉमासचं आहे.”

“साफ खोटं. नीच आळ आहे हा!” टॉमास हाताच्या मुठी वळवून गुरगुरला व आवेशाने दोन पावले पुढे गेला.

एका शिपायाने तात्काळ त्याचा दंड पकडून त्याला मागे खेचले.

हेलेन निर्भय नजरेने प्रेक्षकवर्गाकडे पहात होती. तिचे शील तिच्या विजयाच्या आच्छादनाखाली चमकत होते, त्यागाच्या तेजोवलयात गुरफटले होते. तिचा भालप्रदेश उन्नत झाला होता. तिची सगळीच काया आगळ्या तेजाने तळपत होती. आपल्या पंखावर विश्वास असल्यामुळे मोडत असलेल्या फांदीवर बसूनही निर्भर गाणाऱ्या बुलबुल पक्षाप्रमाणे ती शांत व निर्धास्त दिसत होती. तिचे मन निष्पाप होते म्हणून तिला कसली भीती शिवत नव्हती.

पाद्री फ्रान्सिश्कु आयुष्यात पहिल्यांदाच एका असत्याला आशीर्वाद देत होता.

हेलेन ही त्या मुलाची आई आहे असे जे प्रेक्षक समजत होते त्यांचे मत आता डळमळू लागले. कारण स्वतः तीच हे गुपित स्पष्ट व निर्भयपणे फोडीत होती. तिची गंभीर व तेजःपुंज मुद्रा हेच तिच्या निरपराधीपणाचे समर्थन होते. पुष्कळवेळा माणसांची मनोदेवता देह आरपार भेदून ‘नाही’ असे म्हणते, जेव्हा त्याच्या तोंडातून ‘होय’ असा आवाज निघतो.

न्यायाधीशाने घंटा वाजवली व कोर्ट बंद होत असल्याचे जाहीर केले, तेव्हा एक इसम कठड्यापाशी जाऊन मोठ्याने बोलला—
“या बाईनं आताच एक दिव्य करून दाखविलं आहे. तिनं ज्या मुलाला आपल्या पदरात घेतलं आहे त्याची ही आई नव्हे.”

हे शब्द सॉबालचे होते.

प्रेक्षकवर्ग चमकून हेलेनाकडे वळला. कोणीच तिला साथ दिली नाही. सगळ्यांनी मनोमन तिला आदरांजली वाहिली.

आपल्या प्रेमापायी तिने अब्रूचा व नावलौकिकाचा जो त्याग केला होता, तो एवढा अलौकिक होता. की, त्याचे स्मारक म्हणून एखादे मंदिर बांधणे योग्य ठरले असते. आणि म्हणूनच लोकादराचे त्वरीत भक्तीभावात रूपांतर झाले.

अनुक्रमणिका

हेलेनाची नजर जमिनीकडे लागली होती. स्वतःचा बळी देऊन दुसऱ्याला तारू पाहाणाराची वृत्ती ही अशी असते. हा जयाचा विनय आहे.

न्यायाधीशांनी सॉबालला आत घेतले आणि विचारले.

“या मुलासंबंधी तुम्ही काही अधिक माहिती देऊ शकाल काय?”

“मुलासंबंधीच नव्हे, तर गेल्या दिवसात जो खून झाला, त्यासंबंधीदेखील मी खूप सांगू इच्छितो.”

“साहेब, याबाबतीत मेहरबानी करून तुम्ही काहीच सांगू नका. देवाची शपथ आहे. तुम्हाला.” हेलेनने सॉबालला विनंती केली.

“चौकशीत व्यत्यय आणू नका.” न्यायाधीशाने हेलेनाला ताकीद दिली.

सॉबालने न गडबडता खिशात हात घालून एक लॉकेट बाहेर काढले व ते न्यायाधीशाच्या हातात देऊन म्हटले, “या लॉकेटमध्ये एक कागद आहे. तो कृपा करून वाचून पहा. त्यात मुलाच्या मातापितरासंबंधी तुम्हाला हवी असलेली माहिती मिळेल.”

एवढे बोलून सॉबाल तॉमासजवळ गेला व त्याच्या कानात काहीतरी पुटपुटला.

न्यायाधीशाने लॉकेट उघडून त्यातील कागद वाचला व सॉबालला म्हटले.

“या बाबतीत आणखी एक शब्द देखील बोलू नका, आता मला सांगा, रिकार्दचा खुनी कोण?”
“मी.” सॉबालने अत्यंत व अतिशय शांतपणाने म्हटले. हा पहा पुरावा.

सॉबालच्या हातात रक्ताने माखलेला एक सुरा होता.
प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर भीती व आश्चर्य हे दोन्ही भाव उमटले. जो माणूस इतरांसाठी जगत होता, ज्याचे हरएक सद्‌गुण लोकांच्या परिचयाचे झाले होते, तो माणूस खुनी आहे या गोष्टीवर प्रेक्षकांचा विश्वास बसत नव्हता. हे विलक्षण रहस्य समजून घ्यायला सगळेजण आतूर झाले होते.

“आता सगळी हकीकत थोडक्यात सांगतो”— सॉबाल बेदरकार म्हणाला— “रात्रीचे बारा वाजले होते. बाहेर गडद अंधार होता. चोहोकडे स्मशान शांतता पसरली होती. मी घरातून बाहेर पडलो. मला रस्त्यात कोणीच आढळले नाही. माझ्या द्रव्याच्या जोरावर रिकार्दच्या खोलीत मी निर्धास्तपणे जाऊ शकतो. उंबऱ्यावरून काही क्षण मी त्याला पाहून घेतलं. तो गाढ झोपला होता. त्याची ती शांत निद्रा पाहून मी खवळलो. ते हृदय मला असह्य झालं. मंद पावलांनी मी पलंगाकडे गेलो. माझी शिकार जवळ होती. मी मागे वळून पाहिलं. माझी भली मोठी सावली भुईवर पसरली होती. ती जणू मला बजावीत होती ‘सर पुढ’ मारेकऱ्याची निष्ठुरता माझ्या अंगात शिरली होती. खुनी इसमाचा डळमळीतपणा मला शिवला नव्हता. या दुष्ट माणसाच्या श्वासोश्वासाचा दुर्गंध मला जाणवला. माझा रक्तानं माखलेला उच्छवास त्याचा श्वास झाला. एक शब्द न उच्चारता मी सुरा उगारला, तो त्याच्या छातीत खुपसला. त्याने डोळे उघडले, धडपड

केली. दुसऱ्यांदा सुरा खुपसला आणि त्याच्या कानात मी हे का करतो ते सांगितले. त्याच्या तोंडून एकदेखील शब्द निघाला नाही. त्याला माझा आशय कळला असावा. लवकरच त्यानं प्राण सोडला"

न्यायाधीश, कामदार व शिपाई पाषाणवत निश्चल झाले. त्यांचे श्वसन थोडावेळ जणू बंद झाले होते. सॉबाल सगळ्यांकडे विकट हास्य करून पाहात होता.

न्यायाधीशाने थोडा वेळ स्तब्ध राहून घंटी वाजविली आणि सॉबालचा निर्देश करून म्हटले.

"या इसमाला कैदेत ठेवा. तॉमासची कैद चालू राहील."

"Ate amanha (उद्या भेटू)" सॉबाल न्यायाधीशाकडे वळून म्हणाला. त्याच्या मुद्रेवर दुष्ट हास्य तळपत होते.

Ate amanha (ठीक आहे उद्या भेटू)" दालनात असलेले काही फकीर म्हणाले.

हेलेनाच्यासमोर तॉमासने जमिनीवर गुडघे टेकले. तो तिची क्षमा मागत होता.

१६

१८५७—शिपायांचे बंड

मागल्या ** १९५७ साली हिंदुस्थानांत इंग्रजी सत्ता दृढ झाली ती १८५७ साली नष्ट होईल. ज्याप्रमाणे एक युरोपीयन प्लासी (Plassey) होऊन गेली, त्याचप्रमाणे एक भारतीय प्लासी होईल. मनूचा हा देश एखाद्या नाण्याप्रमाणे अलेक्झांडर, तैमुरलंग, आल्बुकेर्क, डुप्ले व क्लाईव्ह यांच्या हातात गेला, त्याचप्रमाणे तो आता पुनरेव आपल्या मूळ धन्याच्या हातांत येईल. १८५७ सालच्या प्रारंभी फकीर लोक याप्रमाणे प्रचार करीत फिरत होते. सगळी जनता या प्रचाराची नोंद घेत हाती. फक्त इंग्रज मात्र त्यांच्याकडे दुर्लक्ष करून या ज्वालामुखीवर स्वच्छंद क्रीडा करीत होते आणि वरील भाकिताची टर उडवीत होते, बॅथॅलची (Bethel) मुले एलिझेवची टर उडवीत होती त्याप्रमाणे. इतका गाजावाजा केलेल्या या प्रकरणाच्या निकालाकडे सारा युरोप आस्थेने व उत्सुकतेने डोळे लावून बसला होता.

शेवटी तो निकाल लागला. पण तो अपेक्षेप्रमाणे उतरला नाही. इतकेच नव्हे, तर तो फार निराशाजनक झाला. कारण **वॉशिंग्टन, फ्रँकलिन व टँल** यांच्याऐवजी रणांगणांत **कालीगुला व निरो** उतरले. नानासाहेब **तुसँची** (Toussaint) बरोबरी करू शकला नाही. उठावाला बंडाचे स्वरूप आले आणि बंडाचे पर्यवसान ठगांच्या दरोडेखोरीत झाले. ज्या दिवशी इंग्लंड कानपूरात पराजित झाले, त्याच दिवशी ते युरोपात विजयी झाले. निःपक्षपाती राष्ट्रे, हिंदी लोकांचे क्रौर्य व इंग्रजांची आसुरी सूडबुद्धी पाहून भयभीत झाली. इंग्रजांनी संयम सोडून आपल्या संस्कृतीकडे पाठ फिरविली आणि 'टोशास ठोसा' या तत्त्वाचा अवलंब करून त्यांनी आपल्या शत्रूशी झुंज दिली. हे युद्ध भयंकर झाले. ह्या हत्याकांडाकडे युरोपने पाठ फिरविली कारण, ते युरोपीयन संस्कृतीला लांच्छनास्पद होते. त्याची आठवण देखील आज आपला थरकाप उडविते. इतके ते भयानक होते.

हा उठाव चिरडण्यात आला. कारण तो बंडावा होता. हिमालयाच्या परिसरांत दुमदुमलेला 'दीन दीन' आणि दिल्लीच्या तटावरून निघणारा तोफांचा गडगडाट हे शतकानुशतकांच्या गाढ झोपेतून हिंदुस्थानच्या विराट पुरुषाला जाग आणू शकले नाहीत. हा विराट पुरुष हृदयाच्या मर्यादेत असेपर्यंत "हक्क' म्हणून संबोधला जातो. चौकांत उतरला म्हणजे क्रांतीचे नाव धारण करतो. आणि त्याच्या पहिल्या प्रतिकारासरशी त्याचे रूपांतर प्रलयाग्नीत होते.

हे बंड शिपायांपुरतेच मर्यादित राहिले. क्रांती आम जनतेची झाली असती. बंडांत सूडबुद्धीचे थैमान होते. क्रांतीत विचारांना प्राधान्य लाभले असते. बंडात संहारी शिवाचे तांडव दिसले. क्रांतीत प्रशांत विष्णू दिसला असता. 'कॉंपबॅल' बंडाला पुरून उरला. क्रांतीसमोर तो हरला असता, सैन्याच्या फळीतून नष्ट झालेले शिपाई पुन्हा दिसले नाहीत. त्यांची नवीन भरती झाली नाही. जनता मृत्यूंजय झाली असती. कारण माणसाचा हक्क अमर असतो.

इंग्लंडने हिंदुस्थान जिंकला नाही. हिंदुस्थानच त्याच्या स्वाधीन झाला. त्याच्या स्वातंत्र्याचा मोठा शत्रू म्हणजे तो स्वतःच वेगवेगळ्या राजघराण्यांतील वर, वेगवेगळ्या ज्ञातीमधील द्वेष आणि वेगवेगळ्या धर्मांमधील कलह ही त्याच्या चिलखताची दुबळी बाजू होती. जिच्यावर वार करून नव्या डेव्हिडने

गोलियाथला जखमी केले. एकच धर्म असता, एकच जात असती. एकच राजघराणे असते तर हिंदुस्थान अजिंक्य ठरला असता. नाना मुखांचा व नाना हातांचा ब्रम्हदेव हास्यास्पद आहे. त्याला एकच तोंड असते, तर तो महान प्रभावी झाला असता. समाज ज्ञातीसंस्थेने दुभंगले व जेरुसलेमच्या नशिबी दास्य आले. ते एकत्र आले असते तर तॅर्मोपील्श व आस्तुरियश सारखी तटबंदी त्यांनी उभारली असती. हिंदुस्थानला ब्रिटिश म्हटले काय, ब्राह्मण म्हटले काय, उदारमतवादी माणसांना व एकंदर मानवजातीला सारखेच. ती एकच गोष्ट सहन करणार नाहीत, ती ही की, सत्ता ही पितृसम सौम्य नेतृत्वाच्या कक्षेत न राहाता शोषक व्हावी. जे निःपक्षपाती लोक स्वातंत्र्य चहातात आणि वंशवर्ग इत्यादिकांना गौणत्व देतात, त्यांना हिंदुस्थान हा हिंदुस्थानाकरिताच हवा आहे आणि म्हणून ते सगळ्या हुकूमशहांचा धिःकार करतात. मग ते नबाब असोत, "क्लाईव्ह" असोत. ज्या देशाने बुद्धिबळाच्या खेळांत लोकशाही बसविली, ज्या देशाने देवदूताच्या स्वरांत सगळी स्वर्गीय उदात्तता आणि बुलबुल पक्षाच्या स्वरांत पृथ्वीवरील सगळे सौंदर्य आपल्या महाभारताच्या महाकाव्यांत, साहित्याच्या या खऱ्याखुऱ्या हिमालयात गायिले; तो देश युरोपच्या सहानुभूतीला, आदराला निश्चित पात्र आहे.

सुदैवाने इंग्लंडला हिंदुस्थानातील आपल्या मिशनची—कर्तव्याची जाणीव आहे.

ईस्ट इंडिया कंपनी संपुष्टात आली आहे आणि तूर्त सरकार राज्यकारभार हाकीत आहे. आज व्यापारी फायद्यातोट्यांचा प्रश्न नाही. प्रश्न आहे तो पंधरा कोटी लोकांच्या भवितव्याचा. या दृष्टीने विचार केल्यास शासनपद्धतीला महत्त्व आहे. ब्रिटिश इंडिया आज उच्च व नीच जाती, आणि धनिक व दरिद्री अशा भेदांनी विभागली आहे. हे भेद मनस्वी आहेत. उच्चवर्णीय, उच्चजातीय, हे बुद्धिमान, अहंकारी असल्यामुळे आपला धर्म, परंपरा, चालीरीती यांना आग्रहाने चिकटून आहेत. कनिष्ठ वर्गातील लोक अशिक्षित व असुसंस्कृत आहेत. प्राचीनविद्याविशारदांचे मत असे आहे की, वरिष्ठवर्ग व कनिष्ठवर्ग यांची उत्पत्ती भिन्न वंशापासून झाली आहे. या सगळ्या भेदांवरून निष्कर्ष एवढाच घ्यावयाचा की, ब्रिटिश सरकारने ज्या उपायांचा अवलंब केला पाहिजे ते भिन्न रोगांच्या बाबतीत भिन्न असल पाहिजेत. सुधारणेची प्रभावी साधने दोन आहेत : ख्रिस्ती धर्म व शिक्षण. यापैकी पहिल्या किंवा दुसऱ्या गोष्टीची सुरुवात परिस्थित्यनुसार करायला हवी. ज्या समाजांना स्वतःची संस्कृती व धर्म आहेत, ते सहजासहजी त्यांचा त्याग करायला तयार नसतात. असा बदल करण्यांत आपले हित आहे असे त्यांना मनोमन पटले, तरच ते त्याचा स्वीकार करतात. ज्यांना धर्म नाही किंवा असलाच तर तो केवळ मामुली स्वरूपाचा, तेच तेवढे, दुसरा धर्म स्वीकारू शकतात. श्रेष्ठ जाती आणि कनिष्ठ जाती यांना वर सांगितलेले पर्याय लागू पडतात.

आणखी एक गोष्ट आहे. तिचा उपयोग हीन मानल्या जाणाऱ्या जातींना धर्मश्रद्धेकडे वळविण्यासाठी करता येईल. ती म्हणजे धर्मांतरामुळे त्यांना मिळू शकणारे स्वातंत्र्य. ज्याच्यामुळे त्यांची दास्यांतून सुटका होते. वरिष्ठ जातींचा शिक्षणाकडे स्वाभाविक ओढा असतो. ते त्यांना भरपूर मिळाले म्हणजे जुन्या, धार्मिक संकेतांची त्यांच्यावर असलेली पकड सैल होते. मुंबई येथील जमशेटजी जिजीभाई हॉस्पिटलांत आम्हाला एकदा सफेद डगले घातलेल्या काही उच्चवर्णीय हिंदी तरुण डॉक्टरांना भेटण्याची संधी मिळाली. ते विधीनिषेध न बाळगता आपल्याच एका धर्मबांधवाच्या प्रेताची चिरफाड करीत होते. हा प्रकार पाहून आम्हाला अचंबा वाटला व आनंद झाला. एका शतकापूर्वी ही गोष्ट अशक्य होती. ब्रिटिश सरकार हिंदुस्थानच्या आर्थिक विकासाच्या ज्या सुधारणा इतक्या हिरीरीने करीत आहेत, त्यांच्यामुळे त्याच्या संस्कृतींत मोलाची भर पडेल. पण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही की, हिंदुस्थानासारख्या विस्तीर्ण देशांत धर्म व चालीरीतीच्या भिन्नतेमुळे वेगवेगळ्या जमातींचा संबंध परकीयांशी फार थोडा येत असतो.

अनुक्रमणिका

आणि म्हणून त्या परकीयांचा प्रभावही त्यांच्यावर अधिक पडू शकत नाही. कनिष्ठ जातींचा ख्रिस्ती धर्मात प्रवेश घडवून आणण्यापूर्वी त्यांचे स्वेच्छेने मतांतर घडले पाहिजे. त्याचप्रमाणे उदाहरणांचा व अन्य साधनांचा उपयोग झाला पाहिजे. थोडक्यात, हा प्रश्न कौशल्याने हाताळला जावा. हिंदुस्थानातील काही प्रजेचे पोर्तुगालने धर्मांतर घडवून आणले, ते लष्करी सामर्थ्यावर, हुतात्म्याच्या रक्ताच्या बळावर, संतांच्या महात्म्यावर व "इन्किझिशन"च्या अग्नीकुंडाच्या जोरावर. या युद्धात जे पराजित झाले, ते ख्रिश्चन बनले. इंगजांनी हे उदाहरण नजरेसमोर ठेवावे. मात्र शक्तीचा गैरवापर करू नये. कारण पंधरा कोटी लोकांवर बळजबरीने धर्मांतर लादणे इष्ट नाही व शक्यही नाही.

धर्मप्रचाराच्या बाबतीत जेजुईट लोक यशस्वी झाले आहेत. कारण ते आपल्या कार्यांत वाकबगार होते. हिंदुस्थानात ते ख्रिस्ती धर्माचे ब्राह्मण ठरले. मूर्तिपूजक हिंदूंना ते आपले उत्सव निर्वेध साजरे करू देत. ख्रिस्ती धर्म व हिंदू धर्म यांच्यामधील साम्य ते दाखवून देत आणि शक्य तेथे जुन्या समजुतीशी ते मिळतेजुळते घेत.

पाद्री व्हियेराच्या शब्दांत सांगावयाचे झाले तर ते समाजांत माणसाप्रमाणे वागत, शेतात बैल होत, रानात सिंह होत आणि आकांशात गरुड होत. जेजुईटांची संघटना ही इतर देशांच्यातल्याप्रमाणे हिंदुस्थानातही बलाढ्य ठरली. कारण एक मस्तक व हजारो हात अशा पद्धतीने ते काम करीत. एखाद्या ॲकाडमीच्या निःसंदिग्धपणाने विचार करीत आणि अलेक्झांडरच्या कर्तबगारीने काम तडीला नेत. ती एकमाणसी कंपनी होती. कसल्याच गोष्टीची तिला वाण नव्हती. तिच्यांत तत्त्वज्ञानी, डॉक्टर अध्यापक, वादक, चित्रकार, प्रवचनकार, उपदेशक होते. राजांच्या मर्जीतले लोक होते. वक्ते होते. पंडित होते. संत होते. सैतान होते. हे सारे प्रकाश एकवटल्याने तिला सूर्याचे तेज प्राप्त झाले होते. अनेक अवयव एकाच हेतूने प्रेरित झालेले— एकत्र आल्यामुळे, तो एक पंथ झाला होता. आपल्या साऱ्या सुट्या भागांच्या एकीकरणामुळे ते एक प्रचंड यंत्र बनले होते. एवढी हत्यारे उपलब्ध झाल्यामुळे ती एक शस्त्रांस्त्रांचे कोठार बनले होते. या शक्तीच्या मिलाफामुळे ते एक राष्ट्रच बनले होते. जेजुईटांची संघटना अशी परिपूर्ण होती.

अनुक्रमणिका

१७

वादळ आणि शांतता

अठराशे सत्तावन्न सालच्या मे महिन्यात फिझाबादला बंडाचा वणवा पेटला. अठराशेहून अधिक बंडखोरांचा नायक सॉबाल होता. फिझाबादच्या अधिकारी वर्गाने पळ काढला. जनतेने बंडखोराचे स्वामित्व मान्य केले सॉबालने पहिली गोष्ट केली ती ही की, पाद्री फ्रान्सिश्कुच्या घराचे संरक्षण करण्याकरिता आपल्या सैन्याची एक तुकडी पाठवून दिली. तॉमास तिकडेच होता. सॉबालने हेलेनालाही तिकडेच पाठवून दिले. एवढे केल्यावर व फिझाबादच्या संरक्षणाची योग्य ती व्यवस्था लावल्यावर तो बंगल्याकडे जायला निघाला.

रॉबेर्त भोजनगृहात होता. तो वेगवेगळ्या विचारांनी, विवंचनानी त्रस्त झाला होता. हताश होऊन मुकाट बसला होता. त्याने मान वर केली तेव्हा त्याची नजर सॉबालकडे गेली आणि तो हतबुद्ध झाला. त्याच्या तोंडून शब्द फुटेना. बंडखोराचा नायक त्याच्यासमोर थांबला आणि एवढा वेळपर्यंत अपार आनंदाने त्याला रोखून पाहू लागला, जाळ्यात अडकलेल्या माशीकडे कोळी पहातो तसा. मनमुराद हा आनंद चाखल्यावर तो रॉबेर्तजवळ आला आणि त्वेषाने त्याला दंड पकडून विकट हसला,

“साहेब, तुमच्या बाबतीत माझ्या हातून काही अन्याय तर घडला नाहीना?”— रॉबेर्तने दचकून प्रश्न केला.

“ते तुला माहीत नाही?”— सॉबालने निश्चल व भयानक स्वरात म्हटले— “मला ते माहीत आहे. आजच घडल्याप्रमाणे ते सारं मला आठवत आहे. वार करणाऱ्या शस्त्राला त्या वाराची आठवण राहात नाही. पण ज्या शरीराला जखम होते, ते शरीर ती विसरत नाही.”

“हे पहा, तुमचा कधी अपमान केल्याचं मला आठवत नाही. तुमचं मी कांणतंच वाईट केलेलं नाही—”

“कधीच?”— सॉबालने आपल्या स्वरात बदल न करता म्हटले. त्याच्या ओठावरचे हास्य अधिकच भीषण झाले— “ते या भिंतींना, या छपराला, या खोलीतल्या सगळ्या वस्तूंना विचारा. त्या उत्तर देऊ शकल्या नाहीत तर इथं माग्नोद आहे. तो मुकाट रहाणार नाही. कारण याच जागी माझा भयंकर छळ झाला.” एवढे बोलून सॉबालने आपला डगला व तोंडावरचे कपडे काढून बाजूला फेकले.

“माग्नोद!!” रॉबेर्त ओरडला.

“होय. जिवंत माग्नोद”— सॉबाल किंचाळला. त्याच्या आवाजाची धार चढली. पहिला आनंद ओसरला. क्रोधाने पेट घेतला.

अनुक्रमणिका

"माझा मुखवटा पाहिलास ना? तुला तो सुंदर वाटला. त्याचं तू कौतुक केलंस. माझ्या सौजन्याच्या त्या कवचाखाली माझ्या मनात साचलेल्या द्वेषाचं तुला कधी दर्शन झालं नाही. माझ्या बर्फाच्या थंडगार थराखाली ज्वालामुखीच्या हृदयात रसरसणाऱ्या लाव्हारसाची तुला कधी जाणीव झाली नाही. तुझ्यावर झडप घालण्यासाठी दबा धरून बसलेला वाघ तुला सॉबालच्या मनात कधी दिसला नाही. साहजिक आहे. बारा वर्षापूर्वी जळून खाक झालेल्या राखेत त्याची ओळख कुणाला कशी पटेल? दिवसचे दिवस मी सैराट भटकत राहिलो. मुकाट्यानं अनेक संकटाशी मुकाबला केला. भुकेनं व्याकुळ झालो. लोकापाशी याचना करण्याचा धीर झाला नाही. रात्रीच्या रात्री जागून रक्ताची आसवं केली, विष केलं. दगड्या–धोंड्यावर अंधारात ठेचाळलो. पण सूड घेता आला नाही. एकदा तुझ्या आयुष्याची दोरी माझ्या हातात पडली. पण मी ती तोडली नाही. कारण माझ्या क्रोधाला तुझ्या रक्ताची मेजवानी करायची होती. तू कितीदां तरी मला एकाकी भेटलास पण मी तुला ठार मारले नाही. कारण मोठ्या मेजवानीसाठी तुला राखून ठेवायचं होतं मला. मी किती सहनशील आहे, हे तू पहातोस. आता मला तुझे हाल हाल करायचे आहेत. तुझे राईराई एवढे तुकडे करून तुला मरण द्यायचं आहे. बारा वर्षाच्या हालअपेष्टेनंतर परमानंदाचे काही क्षण मला अनुभवायचे आहेत."

माग्नोदचा आवाज कापत होता. डोळे धगधगत होते. आणि चेहऱ्याचे भाग आसुरी झाले होते.

रॉबेर्त या राक्षसाला पाहून निश्चल झाला. त्याला कापरे भरले. डोळे सताड उघडे राहिले. त्याच्या मुद्रेवर दारुण व्यथा साकळली. त्याने बोलण्याचा प्रयत्न केला. पण तोंड उघडता आले नाही.

काही वेळ थांबून सॉबालने आपली नजर त्याच्या नजरेवर रोखून आणि त्याचा दंड साऱ्या ताकदीने आवळून म्हटले.

"तू अशा भ्रमात होतास की, मी हताश होऊन, निर्बल होऊन मेलो असेन. ज्यांनी मला लाथाडलं, माझी थट्टामस्करी केली, त्याचं काहीच वाकडं न करता मेलो असेन. कदाचित तू असंही समजत असावास की, तू केलेल्या माझ्या भयंकर अपमानाचा मला विसर पडला असेल. तू चुकलास. स्वाभिमानाला झालेल्या जखमा कधीच भरून येत नाहीत. आता मला सांग, तुझा स्वाभिमान तूर्त कुठं आहे? तुझ्या मग्रूरीचं काय झालं.?"

हे औपरोधिक शब्द रॉबेर्तच्या हृदयात कट्यारीसारखे घुसले. त्याचा अहंकार दुखावला गेला. आणि तो अडखळत म्हणाला.

"मला मारून टाक. हेच माझ्या स्वाभिमानाचं तुझ्यापाशी मागणं आहे."

रॉबेर्तचे उद्‌गार कानावर पडताच सॉबालने त्याचा हात सोडला आणि पुन्हा एक विकट हास्य केले.

"वा! मग तुला दुसरं काही नको? तसं असलं तर तू आजच मारशील. एखाद्या क्षुद्र कीटकाप्रमाणे जळून मरशील; जेव्हा आगीचे लोळ तुझ्या अंगावर चढतील, धुराच्या लोटात तुझा चेहरा काळाठिक्कर पडेल, आणि असल्या यातनांनी तुझ्या तोंडून हृदयद्रावक किंकाळ्या निघतील तेव्हा—"

अनुक्रमणिका

माग्नोदच्या तोंडून हे शब्द निघाले नि अवचित पाद्री फ्रान्सिश्कुची मूर्ती दारात दिसली.

दोघांच्याही तोंडून आश्चर्योद्‌गार निघाले आणि मग त्यांनी एकमेकांना आलिंगन दिले.

“पाद्रीसाहेब, तुम्ही भलत्याच वेळी आलात.”

“नाही. अगदी वेळेवर आलो. परमेश्वरानंच मला इकडे धाडलं. माग्नोद! रॉबेर्तला क्षमा कर. तो देखील तुला क्षमा करील. तुझ्या मित्राची ही विनंती आहे.”

“नि माझ्या सूडाचं काय?—”

“माग्नोद, क्षमेसारखा दुसरा उत्तम सूड नाही. बाकी सारं वेड आहे, भ्रम आहे, व्यर्थ आहे. रॉबेर्तला जाळून टाकायचं आहे तुला? ठीक आहे. ते तू करशील; पण मग? तुझ्या हृदयात तीच पोकळी राहील. सूडाची अतृप्त तहान तुला अशीच छळीत राहील. रॉबेर्तच्या निष्पाप मुलीवर भलताच आळ घालून, ॲमिलीच्या मृत्यूचा गुन्हा त्याच्यावर लादून त्याला दुःख दिलं नाहीस का तू? त्याच्या काकांचा वारसा त्याच्यापासून हिरावून घेऊन व त्याला दारिद्र्यात लोटून तू त्याला दुर्दैवी केलं नाहीस? या तुझ्या पापांबद्‌दल तुला काही वाटल का? काहीच नाही. रॉबेर्तला आपल्या अपराधाचा पश्चाताप झाला. त्यानं तुझ्या मुलाना शिक्षण दिलं आणि तुझ्या मुलीच्या मृत्यूचा त्यानं आतोनात शोक केला. इतकं तुला माहीत असूनही तू त्याचा सूड घेणार?”

“हेलेनासंबंधी जे मी ऐकलं ते सारं खोटंच तर—” रॉबेर्तने अतीव आनंदाने विचारले.

“साफ खोटं”— पाद्री फ्रान्सिश्कुने उत्तर केले. “हेलेना व तॉमास हे देवदूत आहेत. हेलेनानं सांभाळलेल्या मुलाची मातापितरं कोण आहेत ते माझ्यापेक्षा माग्नोदला चांगलं माहीत आहे.”

“रॉबेर्तनं माझ्या मुलांना शिक्षण दिलं असेल या गोष्टीवर माझा विश्वास बसत नाही.” माग्नोद म्हणाला.

“माग्नोद, तुला चांगलं माहीत आहे की, मी कधी खोटं बोलत नाही.” पाद्री फ्रान्सिश्कु गंभीर व निश्चल स्वरात म्हणाला.

त्याच्या मुद्रेवर अपार आशेचा ठसा उमटला होता. त्याला झालेल्या अत्यानंदाने त्याचे डोळे विस्फारले होते व ते ताऱ्याप्रमाणे चमकत होते. त्याच्या प्रबळ निष्ठेप्रमाणेच त्याचा आवाज निर्धारित होता. त्याचे शब्द जणू त्याच्या श्रद्धेच्या प्रकाशातून व आचीतून निघत होते. थोडक्यात तो देवाच्या मूर्तीप्रमाणेच शोभत होता.

एवढ्या आत्मविश्वासाने उच्चारलेल्या पाद्रीच्या शब्दांनी राक्षसाचा माणूस झाला. बारा वर्षांच्या निद्रेनंतर जुन्या दाट स्नेहाला अकस्मात जाग आली. त्याने आपल्या हृदयात आनंदाचे कल्लोळ उठविले

अनुक्रमणिका

आहेत आणि सूडभावनेने भरलेले आपले मन पूर्ण रिते झाले आहे आणि तेथे प्रेम व शांती यांचे स्तोत्र घुमत आहे असे माग्नोदला दिसून आले.

त्याने आपले तोंड दोन्ही हातांनी झाकून घेतले व तो हुंदके देऊ लागला.

बारा वर्षांचा वणवा काही क्षणात विझवून टाकून माणसाचे मग स्वर्गापर्यंत चढविणाऱ्या मानवी शब्दाची केवढी ही अचाट ताकद!

बराच वेळपर्यंत माग्नोद मान खाली घालून निश्चल व निर्विकार बसला होता. जणू काय त्याच्या सूडाच्या क्षुद्र भावना त्याच्या पायांवर लोळण घेत आहेत. आणि संध्याकाळच्या सावल्या पर्वताच्या पायथ्यांचे चुंबन घेतात त्याप्रमाणे त्याच्या पायांचे चुंबन घेत आहेत.

शेवटी पाद्री फ्रान्सिश्कुच्या समोर गुडघे टेकून माग्नोदने म्हटले, "मागच्या सगळ्या गोष्टींवर आज पडदा पडत आहे. दाविदचे हे मृत्यूपत्र. आणि मी विकून टाकलेल्या जडजवाहिराचा हा हिशोब घ्या. तुमच्या आशीर्वादाची मला आता गरज आहे."

ख्रिस्ताच्या उपदेशकाने त्याला आशीर्वाद दिला. माग्नोदच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. बारा वर्षांनंतर आपल्या हृदयावरील प्रचंड दडपण दूर झाल्यासारखे त्याला वाटले.

"क्षमा करण्यासारखी दुसरी पवित्र गोष्ट नाही."

माग्नोदला आवेगभरात मिठी घालून पाद्री फ्रान्सिश्कुने म्हटले, "माझ्याबरोबर चला."

दोघेही खोली बाहेर गेले. रॉबेर्तला वाटले, आपण स्वप्नात तर नाही ना?

लवकरच माग्नोद, तॉमास व हेलेन भोजनगृहात एकत्र जमली. रॉबेर्तच्या पायापाशी त्यांनी गुडघे टेकले. मग एकाच मिठीत चौघेही गोळा झाले. हुंदक्यांच्या आवाजाशिवाय दुसरे काहीच ऐकू येत नव्हते. आसवांशिवाय दुसरे काही दिसत नव्हते. दुर्दैव मावळत होते. आणि भाग्य उजळत होते.

पाद्री फ्रान्सिश्कु उठून उभा राहिला. त्याच्या ओठावरील स्मितात त्याच्या मनात उचंबळणाऱ्या उच्चतर समाधानाचा सुगंध दरवळत होता. त्याने आपला थरथरता हात पसरून सगळ्यांना आशीर्वाद दिला आणि आकाशाकडे डोळे लावून म्हटले, "परमेश्वरा, आता माझी आठवण ठेव."

अनुक्रमणिका

१८

उपसंहार

दिल्ली जिंकून घेतल्यानंतर एक महिन्याचा काळ लोटला. सेन्ट झेवियरच्या चर्चमध्ये हेलेन व तॉमास यांचे लग्न लागले. फ्रेंच पाद्री लब्राँ याने लग्नाचा विधी केला. मग त्याने माग्नोदला कॅथॉलिक धर्माची दीक्षा दिली आणि त्याला रॉबेर्त दाविस हे नवे नाव दिले.

पाद्री फ्रान्सिश्कु या वेळी स्वर्गात होता. आणि तेथून तो या आनंदोत्सवात सहभागी होत होता. परमेश्वराने त्याची प्रार्थना ऐकली होती.

अनुक्रमणिका

उल्लेख–सूची

प्र. २ : पृ. ३

परगेटरी : हत्त्या, व्यभिचार वगैरे महापातके केलेल्या ख्रिस्ती धर्मानुयायाचे आत्मे ज्या ठिकाणी शुद्ध होण्यासाठी जातात ते ठिकाण. तेथे ते शुद्ध झाल्यावर त्यांना स्वर्गाचे द्वार मोकळे होते.

प्र. ३ : पृ. ५

जॉब : एक धर्माधिकारी. परमेश्वराचा एकनिष्ठ भक्त. सैतानाने त्याला नामोहरम करण्याची सिद्धी मिळविली, त्यामुळे जॉबवर महान आपत्ती कोसळल्या. तो घाणेरड्या वस्तीत राहू लागला. त्याला महारोग झाला. तो म्हणायचा, “देवाने दिले. देवाने घेतले.” सगळ्या संकटांना तो पुरून उरला. शेवटी परमेश्वराने त्याचा उद्धार केला (बायबल जुना करार).

प्र. ३ : पृ. ५

साऊल : ख्रिस्तचा एक विरोधक. ख्रिस्ती धर्माचा नायनाट करण्यासाठी खूप झटला. सेंट इश्तेव्हांव या संताला ठार केले. शेवटी हृदयपालट झाला. व ख्रिस्ताचा शिष्य बनला.

पॉल : ख्रिस्ती धर्माचा पहिला प्रचारक. वेगवेगळ्या देशांत धर्मप्रचार व धर्मसंघटना करून इसवी सनाच्या ६७ व्या वर्षी हौतात्म्य पत्करले.

पिटर : ख्रिस्ताचा पट्टशिष्य व पहिला पोप ‘तू माझा विश्वासघात करशील’ असे ख्रिस्ताने त्याला सुरवातीलाच म्हटले होते. त्याप्रमाणे त्याची वागणूक झाली. ख्रिस्ताला पकडण्यात आले, त्या वेळी पिटरने तीनदा सांगितले की, आपण त्याला ओळखत नाही. शेवटी त्याला पश्चात्ताप झाला. इसवी सनाच्या ६७ व्या वर्षी त्याचा वध झाला. ‘निरो’ बादशहाच्या कारकीर्दीत हा प्रकार घडला.

मादालेना : एक पतिता. ख्रिस्ताने तिचा उद्धार केला.

गोवळकोंडा : एक पुरातन शहर. आजचे हैद्राबाद. औरंगजेबाने ते उध्वस्त केले. मौल्यवान हिऱ्यांबद्दल प्रसिद्ध.

कार्तागो : आफ्रिकेचे एक पुरातन शहर. फिनीशियन लोकराज्याची राजधानी. ख्रिस्तपूर्व सातव्या शतकांत स्थापना. सीपियाव एमिलियानू या रोमन सेनापतीने त्याचा पाडाव केला.

निनीव्ही : ख्रिस्तपूर्व दोन हजार वर्षांपूर्वी नीनू या राजाने या शहराची स्थापना केली. ॲसिरीयन राज्याची राजधानी. नीनू राजाने आपली बायको सेमीरामीश हिचा वध केला.

अनुक्रमणिका

जेरूजालेम : जुदेया देशाची राजधानी. नाबूकोदोनोसोर या खाल्डियाच्या राजाने ते उध्वस्त केले. जेरुसलेम.

दुबळा गालिलेब : ख्रिस्ताचा शिष्य पीटर. तो सुरुवातीच्या काळात अशासाठी दुबळा ठरला की, ख्रिस्ताला—आपल्या गुरूला आपण ओळखत नाही असे त्याने ख्रिस्ताच्या शत्रूंना सांगितले.

प्र. ३ : पृ. ६

जगदीश्वरवादी : PANTHEISE परेश्वर हा जगतापासून वेगळा नाही असे मानणारा तत्त्वज्ञानी पंथ.

प्र. ७ : पृ. १५

Bom Dia : 'बाँ दिअ,' सकाळच्या वेळी अभिवादन करण्याची पोर्तुगीज पद्धत.

प्र. ७ : पृ. १६

Piuet super pectatores laqueos : केलेल्या पातकांबद्दल दुःखावेगाने अश्रू ढाळा.

प्र. ७ : पृ. १७

नाबुकोदोनोजोर : पुरातन खाल्डियन देशाचा क्रूर राजा. ज्युदा राज्याचा पाडाव करून जेरूजालेम नष्ट केले. त्याबद्दल परमेश्वराने त्याला कडक शासन केले. बैलाचे रूप धारण करून सात वर्षेपर्यंत तो रानावनांत हिंडला. त्यानंतर त्याला मानवी रूप प्राप्त झाले व तो पुन्हा राज्यावर बसला.

प्र. ७ : पृ. १८

नाना : एक बंडखोर. १८५७ चे प्रसिद्ध नानासाहेब.

प्र. ९ : पृ. २५

झांटिपी : ग्रीक तत्त्वज्ञ सॉक्रेटीस याची खाष्ट पत्नी.

प्र. १० : पृ. ३०

Nigra sed formasa : काळी पण सुंदर.

प्र. ११ : पृ. ३२

Quantum mutatus ab illo? : तुझ्यांत केवढा मोठा बदल झाला?

अनुक्रमणिका

प्र. ११ : पृ. ३२

Doice Far Niente : आळसांत स्वर्गसुख.

प्र. १२ : पृ. ३५

O homem poe e Deus dispoe : माणूस ठरवितो, पण परमेश्वरी इच्छेप्रमाणे घडते.

प्र. १२ : पृ. ३६

Thecel, Manes, Phares : बाबीलोनचा राजा बाल्टाजार फार चैनी होता. पर्‌शीयाच्या 'सिरु' राजाने त्याच्या राजधानीला वेढा घातला. तेव्हा तो आपल्या तटबंदीच्या सामर्थ्यांवर विसंबून नाच–तमाशांत मग्न होता. त्या वेळी परमेश्वराच्या अदृश्य हाताने समोरच्या भिंतीवर वरील वाक्य लिहिले. "तुझा पातकाचा झाडा घेतला. तुझे दिवस भरले."

प्र. १३ : पृ. ३७

Sis mortuus mundo vivens iterum Deo : तूं या जगाला मुकलास खरा; पण देवाच्या राज्यांत अमर झालास.

प्र. १३ : पृ. ३७

ज्यूडासचे चुंबन आहे : ज्यूडास हा ख्‌रिस्ताचा एक शिष्य. त्याने ख्‌रिस्ताचा विश्वासघात करून त्याला शत्रूच्या हवाली केले. ख्‌रिस्ताच्या पायाचे चुंबन घेत असतानाच त्याच्या नाशाचा डाव तो रचीत होता.

प्र. १३ : पृ. ३८

डायोजेनीस : एक ग्रीक तत्त्ववेत्ता. भारी विक्षिप्त. फकीरी जीवन कंठणारा. भर दिवसा तो कंदील घेऊन फिरत असे. या बाबतीत कोणी विचारले तर उत्तर देई, "मी माणसाच्या शोधात आहे."

साक्रिस्तांव : चर्चमधील एक कनिष्ठ कर्मचारी.

प्र. १३ : पृ. ३८

महंमदाची पारवी : महंमद पैगंबर आपल्या कानांत धान्याचे दाणे ठेवीत असे. एक पारवी येऊन ते टिपीत असे व त्याला परमेश्वरी संदेश देत असे.

अनुक्रमणिका

प्र. १३ पृ. ४०

Boas tardes : संध्याकाळच्या वेळी अभिवादन करतांना म्हटले जाणारे वाक्य.

शेरीडन : इंग्रजी नाटककार व प्रभावी वक्ता.

विल्बर फोर्स : इंग्लिश वक्ता.

पाद्रोआद : पाद्री वर्गाचे नियमन करणारा पोर्तुगीज सरकारला असलेला हक्क.

प्र. १३ : पृ. ४१

प्रॉपागांद फिदे : ख्रिस्ती धर्म प्रचारक संस्था.

जॉनास : एक प्रॉफेट प्राषेत. त्याला निनीव्हला जाऊन धर्मप्रचार करण्याची परमेश्वरी आज्ञा झाली. पण तो पळाला. प्रवासांत वादळ झाले. नावेत पापी माणूस असल्यामुळे वादळ झाले असे समजून त्याला समुद्रांत फेकून देण्याचे ठरले. पापी माणूस निवडण्यासाठी चिठ्या टाकण्यात आल्या. जॉनसचे नांव निघाले. त्याप्रमाणे त्याला समुद्रांत फेकण्यात आले. एका मोठ्या माशाने त्याला गिळून टाकले. तीन दिवसपर्यंत तो त्या माशाच्या पोटात जिवंत राहिला. मग निनीव्हला पोचला. आणि त्याने धर्मप्रचार केला.

प्र. १८ : पृ. ५३

आल्सेबियडीश : अथेन्सचा सेनापती. स्वार्थी व महत्त्वाकांक्षी. शत्रूला सामील झाला व स्वदेशाविरुद्ध लढला.

प्र. १८ : पृ. ५४

बायरन : एक प्रख्यात इंग्लिश कवी. स्वैर वर्तनाबद्दल प्रसिद्ध.

प्र. १९ : पृ. ५९

Nunquam minus solus quam solus : जेव्हा तू एकाकी असतोस तेव्हाच तूं एकाकी नसतोस. म्हणजे गजबजलेला असतोस.

प्र. २० : पृ. ६१

Consumatum est : या वाक्याचा अर्थ : कारभार आटोपला. ख्रिस्ताचा वध होण्यापूर्वी त्याने परमेश्वराची प्रार्थना केली. त्या वेळी त्याच्या तोंडून निघालेले उद्गार.

अनुक्रमणिका

प्र. २० : पृ. ६५

दाव्हीदप्रमाणे : निर्भय. दाव्हीद हा इस्त्राइलचा राजा. त्याने मोठ्या निर्धाराने महान आपत्तींना तोंड दिले. “मी पापी आहे” हे त्याचे उद्‌गार! प्राफेट नाताने त्याला “श्रीमंत व गरीब” ही कथा सांगितली. तेव्हा त्याच्या तोंडून हे उद्‌गार निघाले.

सांसाव : हिब्रूचा बलाढ्य राजा. त्याची शक्ती त्याच्या केसात होती. दालिला नावाच्या इसमाने त्याचे केस विश्वासघाताने कापून त्याला शत्रूच्या स्वाधीन केले. मग त्याला तुरुंगात ठेवण्यांत आले. तेथे कांही काळानंतर त्याचे केस वाढले. तो पुन्हा शक्तिमान झाला. त्याने हिब्रुचे मंदिर मोडले व त्याच्या खांबाखाली फिलिस्थिमनना गाडून टाकले.

भाग २ रा

प्र. १२ : पृ. ११४

Supra orbitary nevra'gia : नसांचा एक विकार.

प्र. १६ : पृ. १३३

एलिझेव : ज्यू. संत. एलीएसचा शिष्य. त्याला टक्कल होते. म्हणून गावची मुले ‘टकल्या टकल्या’ म्हणून त्याची टिंगल करीत. एकदां जमीन दुभंगली व टवाळखोर पोरे जमिनीत गाडली गेली.

आरकिमिडीज : सीराकुजचा एक प्रख्यात शास्त्रज्ञ. त्याने पुष्कळ शोध लावले. तो म्हणत असे की, पृथ्वीबाहेर थोडीशी जागा मिळाली तरी आपल्या पहारीने आपण पृथ्वी उलथून टाकू. रोमन सेनापती मार्सेलस याने सीराकुजला वेढा घातला तेव्हा तो ठार झाला.

प्र. १६ : पृ. १३३

वाशिंग्टन : अमेरिकन लोकशाहीचा संस्थापक व दोन खेपा अध्यक्षा. ब्रिटिशाचा पाडाव केला.

फ्रँकलिन : अमेरिकन संशोधक. राजकारणी व योद्धा.

टेल : चौदाव्या शतकाच्या प्रारंभी सुइस देश ऑस्ट्रियाच्या जोखडांतून याने मुक्त केला.

आल्बर्ट : बादशहाच्या पुतळ्याला—टोपी काढून मुजरा करायला त्याने नकार दिला. तेव्हा टेलच्या मुलाच्या मस्तकावर एक बोर ठेवून त्याचा वेध घ्यायला त्याला बादशहाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. त्याने अचूक वेध घेतला.

अनुक्रमणिका

तूस्सा : सांवडोमिंगोस या बेटावरील बंडाचा निग्रो संचालक व सेनापती. याने फ्रेंचांवर विजय मिळविला.

कालीगुला : एक रोमन बादशहा. ख्रिस्ती शकाच्या ३७ ते ४१ वर्षेपर्यंत राज्य केले. क्रौर्याबद्दल प्रसिद्ध. रोमन जनतेला एकच डोके असते तर, एकाच वाराने तिला ठार करता आल असते असे तो म्हणत असे. चैनीत संपत्ती खलास केली. केरेयास या इसमाने त्याचा खून केला.

नीरो : रोमचा बादशहा. क्रूर. आपल्या आईचा— 'आग्रीपीना'चा खून केला. ओक्ताव्हिया त्याची बायको. हिला ठार केली. हजारो ख्रिश्चनांना हालहाल करून ठार केले. रोम शहर जाळले व ते जळत असतांना अत्यानंदाने गाणी गाऊं लागला. सिनेटने देशाचा शत्रू म्हणून त्याला कैद केले, तेव्हा त्याने आत्महत्त्या केली.